म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
. क्र. : ९६९५

REFBK-0015132

७१९२६
१८१५
निबंध
१५।३।६७

# बहुरूपी निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 15132

संपादक

श्री. ना. बनहट्टी

म. ना. अदवन्त

REFBK-0015132

सुविचार प्रकाशन मंडळ

पहिली आवृत्ती

जानेवारी १९६८

मूल्य चार रुपये

सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशक
शामकान्त बनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
धनतोली, नागपूर-१
४६१/४ सदाशिव, पुणे-२

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव
टिळक रोड, पुणे-२

## अनुक्रमणिका


आजचा बहुरूपी निबंध ७

मते आणि मतप्रचार
विनोबा १

स्वामित्वभावना विरुद्ध सौंदर्यभावना
द. के. केळकर ६

ध्येयवादी
ग. त्र्यं. माडखोलकर १४

जीवनातील करार
पु. ग. सहस्रबुद्धे २१

अक्षरवाङ्मयाचा गुणविशेष
ना. सी. फडके २९

विनोदाचे तत्त्वज्ञान
प्र. के. अत्रे ४१

गंधर्वकन्ये, काय बोलू ?
वि. स. खांडेकर ५३

वाङ्मयातील सत्य, शिव व सौंदर्य
वा. ल. कुलकर्णी ६२

कोंडलेले क्षितिज
दुर्गा भागवत ७३

नानी
वि. द. घाटे ८३

एक अपूर्व संध्या
न. वि. गाडगीळ ९२

शरावती
रा. भि. जोशी १०१

उध्वस्त विजयनगर
गंगाधर गाडगीळ १०८

पुस्तकांची दुःखे
मं. वि. राजाध्यक्ष १२२

मी नाही विसरलो
पु. ल. देशपांडे १३१

मनाच्या ढाली
अनंत काणेकर १४१

बिचारा शेखमहंमद
भगवंत देशमुख १४५

निसर्ग आणि आम्ही
म. ना. अदवन्त १५४

न चुकणारी माणसे
गो. वि. करंदीकर १६१

परिचयात्मक टीपा १६७

## भूमिका

'बहुरूपी निबंधा' तील निबंधांची निवड करताना आम्ही एक विशिष्ट दृष्टिकोन नजरेसमोर ठेवला आहे. मराठी निबंधाचे स्वरूप आज झपाट्याने बदलत आहे. त्याच्या कक्षाही रुंदावत आहेत. तो अधिकाधिक आत्मनिष्ठ होत चालला आहे आणि शास्त्रीय पातळीवरून तो आज कलात्मक पातळीकडे झुकतो आहे. त्याच्या आशयाप्रमाणे त्याचे बहिरंगही विविध रूपे धारण करीत आहे.

आजच्या निबंधाचे हे बहुरूपी स्वरूप लक्षात यावे या दृष्टीने यातील निबंधांची निवड केली आहे. त्यातही ज्यांचे लेखन अद्यापि सुरू आहे असेच लेखक मुद्दाम निवडले आहेत. या निवडीत मतभेदाला जागा असेल पण त्याचे बहुरूपी स्वरूप समजवून घेण्याच्या दृष्टीने आम्ही केलेली ही निवड सामान्यतः मान्य व्हावी.

या कामी आपापले उतारे समाविष्ट करण्याची परवानगी देऊन सर्वच लेखकांनी आम्हाला उपकृत केले आहे. त्यांचे मनःपूर्वक धन्यवाद.

ज्ञानेश्वरांच्या शब्दात —

**न्यून ते पुरते । अधिक ते सरते ।**
**करून घ्यावे इतुके । विनविले मिया ॥**

हीच रसिकांना विनंती.

१ डिसेंबर १९६५

— प्रकाशक.

# आजचा बहुरूपी निबंध

आज मराठी निबंध हा बहुरूपी होत चालला आहे. इंग्रजांच्या राजवटीत निबंधाची जी भूमिका होती, जी प्रेरणा होती आणि उद्दिष्ट होते त्यापेक्षा अगदी भिन्न अशा प्रेरणा व भिन्न अशा भूमिका आजच्या मराठी निबंधांत डोकावू लागल्या आहेत. त्यामुळे आजच्या मराठी निबंधाच्या स्वरूपात संपूर्ण कायापालट होत असल्याचे दिसत आहे. कालचा निबंध लोकजागृती करण्यासाठी, लोकांचे अज्ञान दूर करण्यासाठी आणि लोकांना बहुश्रुत करण्यासाठी जन्माला आला होता. त्यात विद्वत्व होते, अभिनिवेश होता, युयुत्सु वृत्ती होती, युक्तिवाद होता, तर्कशुद्ध दृष्टी होती आणि आर्जवीपणा होता. यापैकी पुष्कळच निबंधकार वृत्तपत्राचे संपादक असल्याने नेतृत्वाची व बहुजनसमाजाला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकाची भूमिका अपरिहार्यतेने त्यांच्या वाट्याला आली होती. अपरिहार्यतेने म्हणण्याचे कारण असे की ती एक राष्ट्रीय गरज होती. जे जे आपणांस ठावे । ते ते दुसऱ्यास शिकवावे । शहाणे करून सोडावे । अवघे जन ।। या रामदासांच्या भूमिकेतून कालचा निबंध निर्माण झाला. समाजात वैचारिक व मानसिक क्रांती घडवून आणण्याचे, जनतेत स्वत्व निर्माण करण्याचे व महाराष्ट्राचा वैचारिक पिंड पुष्ट करण्याचे महान कार्य या निबंधाला करावयाचे होते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून ते श्री. म. माट्यांपर्यंत अनेक प्रभावी निबंधकारांनी हे काम यशस्वी रीतीने केले. कालच्या निबंधात निबंधकाराचे व्यक्तिमत्व प्रगट होत होते पण ते केवळ वैचारिक पातळीपुरते मर्यादित होते. त्यांचे प्रखर विद्वत्व, वक्तृत्वाचा डौल, विषय पटवून देण्याची त्यांची हातोटी, तर्कशुद्ध विचारसरणी इत्यादी अनेक पैलूंचा साक्षात्कार त्यांचे निबंध वाचताना होत असे. त्या दृष्टीने कालच्या निबंधांची तुलनाच करावयाची झाली तर ती एखाद्या विद्वान वक्त्याच्या व्याख्यानाशी करता येईल. विषयाचे गाढ ज्ञान आणि

परिणामकारक वक्तृत्वशैली ही जशी व्याख्यान परिणामकारक होण्यासाठी आवश्यक असते त्याप्रमाणे निबंधांतही या दोन महत्त्वाच्या गुणांचीच आवश्यकता असते. अर्थात वक्तृत्वाची शैली ज्याप्रमाणे प्रत्येकाची भिन्न, त्याप्रमाणे निबंधातही प्रत्येकाची शैली निराळी असणे अपरिहार्य होते. पण या दोहोंचे मुख्य साध्य एकच. लोकशिक्षण आणि लोकजागृती करून समाज समर्थ बनविणे, तत्कालीन सामाजिक, राजकीय वा वाङ्मयीन प्रवृत्ती व त्यांचा विषयनिष्ठ आविष्कार हे कालच्या निबंधांचे महत्त्वाचे विशेष समजावयास हवेत.

आज मराठी निबंधांचे हे स्वरूप बदलले आहे—बदलत आहे. निबंध हा लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा संपन्न व प्रसन्न आविष्कार अशी आज निबंधाची व्याख्या ( धारणा ) होत चालली आहे. त्यामुळे आज निबंधकार हा निबंधाचे मध्यवर्ती केन्द्र बनत आहे व भावना, विचार, शैली ही सारी त्याच्या व्यक्तिमत्वात विलीन होऊन साकार होत आहेत. निबंधाच्या जुन्या प्रेरणा व जुनी उद्दिष्टे आज फक्त संपादकीय वा वृत्तपत्रीय लेखनापुरतीच मर्यादित राहिली आहेत. ( त्याही क्षेत्रात संपादनाचा अर्थ किती बदलला आहे याची कल्पना जुनी केसरी, काळ सारखी वृत्तपत्रे व आजची केसरी, सकाळ, लोकसत्ता सारखी वृत्तपत्रे यांचे तौलनिक निरीक्षण केल्यास सहज येऊ शकेल. ) आज निबंधकार जनतेला शिकविण्यासाठी लिहीत नाही, लोकजागृती करण्यासाठी लिहीत नाही. त्या प्रेरणा अगदी आनुषंगिक व दुय्यम झाल्या आहेत. निबंध हा लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा कलात्मक आविष्कार झाला आहे. त्यामुळे तो पूर्वीच्या निबंधासारखा विषयनिष्ठ किंवा वस्तुनिष्ठ न राहता पराकाष्ठेचा आत्मनिष्ठ बनला आहे. लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे विविध रंग त्याच्या निबंधात सहजतेने आविष्कृत होत असल्याने निबंधातील लेखक आज आपणाला अधिक आकृष्ट करू लागला आहे. पूर्वी विषयाचे ज्ञान करून देण्यासाठी व करून घेण्यासाठी निबंध लिहिले व वाचले जात असत. आज एखाद्या विषयाच्या अनुषंगाने लेखकाच्या अंतरंगात उमटलेल्या क्रिया-प्रतिक्रियांचे दर्शन त्याच्या निबंधातून घडते व ते जाणून घेण्याच्या दृष्टीने वाचक निबंध वाचतो. निबंध-लेखक व वाचक या दोघांच्याही भूमिकेत असा विलक्षण फरक पडला आहे. त्यामुळे कालचा वैचारिक पातळीवरील निबंध ही एक रचना होती; आजचा निबंध ही एक ललितकलाकृती बनत आहे. कलेचे अनिर्बंध स्वातंत्र्य

स्वाभाविकच आजच्या निबंधाला लाभले आहे. त्यामुळे तंत्राच्या किंवा रचनेच्या चौकटीत आजचा निबंध बसू शकत नाही—त्याची ठराविक चाकोरी पण बनत नाही. कलावंताची प्रतिभा कलाकृतीला जसे वळण देईल तशी ती आकार घेत जाते. कलावंताच्या प्रकृतीधर्माशी ती एकरूप होते व त्याच्या व्यक्तिमत्वाचा ठसा त्या कलाकृतीवर उमटत असतो. आजच्या निबंधात नेमके हेच झाले आहे. जुन्या पंडिती वळणाच्या निबंधापेक्षा या निबंधाची पृथगात्मकता व्यक्त करण्यासाठी कालच्या या वैचारिक निबंधांना निबंध असे नाव दिले तर आजच्या निबंधांना ललित निबंध असे नाव द्यावे लागेल.

अर्थात आजही इंग्रजी राजवटीत निर्माण झालेली व समृद्ध झालेली वैचारिक निबंधांची परंपरा चालू आहेच. पण या परंपरेत आज लेखन करणारे सर्व लेखक कालच्या परंपरेवर पुष्ट झाले आहेत. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, प्रा. द. के. केळकर, ग. त्र्यं. माडखोलकर, बॅ. सावरकर आदी निबंधकारांची परंपरा ही इंग्रजी राजवटीतील जुन्या निबंधकारांची परंपराच आहे. विषयाचा वस्तुनिष्ठ आविष्कार व त्याच्या वैचारिक पातळीवरील व्यक्तिमत्वाचे त्यात पडलेले प्रतिबिंब हीच या निबंधांची वैशिष्ट्ये समजावयास हवीत. वाचकांना ज्ञान देणे, उपदेश करणे, मार्गदर्शन करणे या भूमिकेवरून लिहिलेले हे निबंध आजही जुन्या परंपरेच्या सामर्थ्याची साक्ष देतात.

पण आजच्या या वैचारिक निबंधातही पूर्वीच्या निबंधांपेक्षा थोडा बदल झालेला दिसेल. विद्वत्तेचे प्रदर्शन हे आजच्या वैचारिक निबंधांचे स्वरूप राहिले नाही. त्याला एखाद्या विषयावरील प्रगट चिंतनाचे स्वरूप आले आहे. त्यामुळे तो कालच्या वैचारिक निबंधांपेक्षा अधिक आत्मनिष्ठ बनला आहे. विद्वत्व आहे, पण त्याचे प्रदर्शन नाही; मतांचा पुरस्कार आहे, अभिनिवेश आहे, पण आग्रहीपणा नाही; परमतखंडन आहे, पण त्यात कटुता नाही. जुन्या पिढीत वा. म. जोशी किंवा न. चिं. केळकर यांच्या निबंधातून या आजच्या निबंधाची बीजे सापडतात. पण आज वा. ल. कुलकर्णींसारख्या लेखकाच्या निबंधातून आजच्या निबंधाचे हे स्वरूप स्पष्ट दिसते. ‘ डायरीतील पाने ’ ‘ ऐतिहासिक कादंबरीच्या निमित्ताने ... ’ इत्यादी त्या त्या निबंधांची शीर्षकेच निबंधाच्या बदलत्या स्वरूपाची साक्ष देतील. त्याच्या विषयाच्या अनुषंगाने केलेले हे प्रगट चिंतन वाचत असताना विषयाबरोबर त्याच्या लेखकाचे व्यक्तिमत्वही डोळ्यासमोर

साकार होत जाते. आचार्य विनोबा भावे यांचा प्रत्येक निबंध म्हणजे एका समृद्ध व तत्वज्ञ मनाचे प्रगट आत्मचिंतनच आहे. ग. त्र्यं माडखोलकर यांच्या 'ध्येयवादी' बद्दल तेच म्हणता येईल. 'अक्षर वाङ्मयाचा गुणविशेष' मध्ये तर लेखकाचा आत्माविष्कार विशेषच जाणवतो. आजच्या गंभीर निबंधाच्या स्वरूपात हा जो बदल होत आहे त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे निबंधकारांच्या भूमिकेत झालेला फरक होय. त्यामुळे आजच्या वैचारिक निबंधातून लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब अधिकाधिक पडू लागल्याचे व त्यात विषयाइतके निबंधकाराला महत्त्व येत असल्याचे स्पष्ट जाणवते.

प्रवासवर्णनपर निबंधात तर हे आता अधिक स्पष्टपणे जाणवू लागले आहे. किंबहुना प्रवासवर्णन ही ललित निबंधाची महत्त्वाची शाखा बनू लागली आहे. पूर्वी प्रवासवर्णन किंवा स्थलवर्णनात स्थल महत्त्वाचे असे. ज्या स्थलाचे व प्रवासाचे वर्णन करावयाचे त्याचा भरपूर बारीक तपशील पुरविणे हेच त्या वेळी त्या लेखकाचे महत्त्वाचे कार्य असे. त्यात 'मी' किंवा 'आम्ही' (बहुधा आदरार्थी 'आम्हीच') जो येत असे तो केवळ गौरवापुरता किंवा तपशीलाशी संलग्न असे म्हणूनच. त्या 'मी' ला तसे काहीच महत्त्व नव्हते. महत्त्व होते ते त्या 'अजिंठा' किंवा 'वेरूळ' किंवा 'ताजमहाल' या स्थळांना. त्यांचा इतिहास, भूगोल हा जास्त महत्त्वाचा. त्यातील 'मी' तटस्थ असे. अजिंठ्यात लेणी किती आहेत, कोणत्या लेण्यात चित्रे आहेत, शिल्प कोणत्या लेण्यात विशेष चांगले आहे, कोणत्या इसवी सनात ती निर्माण झाली असावी यालाच विशेष महत्त्व. पण आजच्या प्रवास किंवा स्थलवर्णनाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. त्यांत स्थलाइतकेच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला व त्याच्या भावनांना महत्त्व आले आहे. अजिंठा किंवा वेरूळ यांच्या वर्णनाच्या तपशिलपेक्षा महत्त्व आहे ते ते शिल्प पाहिल्यावर लेखकाच्या मनावर झालेल्या परिणामाचे. लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे व भावनांचे रंग त्या स्थळात मिसळले गेल्याने आजचे प्रवासवर्णन किंवा स्थलवर्णन कमालीचे आत्मनिष्ठ झाले आहे. उध्वस्त विजयनगरचे किंवा शरावतीचे केवळ वर्णन त्यात असणार नाही, तर त्या दृश्याचा लेखकाच्या मनावर कोणता परिणाम झाला. कोणत्या भावनेने ते भारले गेले याचे त्यात वर्णन असेल आणि हे सारे वर्णन त्या दृश्याशी एकजीव झाले असेल. त्यामुळे अजिंठ्याचे, वेरूळचे, ताजमहालचे किंवा कन्याकुमारीला

पाहिलेल्या सूर्यास्ताचे एकाचे वर्णन दुसऱ्यासारखे असणार नाही. कारण प्रत्येक वर्णनामध्ये त्या त्या लोकांच्या व्यक्तिमत्वाचे रंग मिसळले आहेत. आजच्या प्रवास व स्थलवर्णनाचे स्वरूप आत्मनिष्ठ झाल्याने त्यांचा अन्तर्भाव ललित निबंधात करावयास हवा.

व्यक्तिचित्रणात्मक निबंधामध्येही हा बदल विशेष जाणवतो. व्यक्तिचित्रे हा प्रकार खरोखर कथा व ललित निबंध यांच्या सीमारेषेवर उभा आहे. त्यामुळे या प्रकाराला कथेतही ढकलता येईल किंवा ललित निबंधातही आणता येईल. लेखकाची व्यक्तिचित्र रेखाटण्याची भूमिका कोणती आहे हे विचारात घेऊनच याचा कथा किंवा ललित निबंध यापैकी एकात अंतर्भाव करण्यात यावा. कुमार रघुवीर यांनी 'हृदय' मध्ये रेखाटलेली किंवा व्यंकटेश माडगूळकरांनी 'माणदेशी माणसे' मध्ये रंगविलेली व्यक्तिचित्रे कथेत पडतात. उलट वि. द. घाटे यांच्या 'काही म्हातारे व एक म्हातारी' यामधील व्यक्तिचित्रांचा अन्तर्भाव ललित निबंधात करावयास हवा. घाट्यांची व्यक्तिचित्रे कमालीची आत्मनिष्ठ आहेत तर व्यंकटेश माडगूळकरांची चित्रे तटस्थाच्या भूमिकेवरून चित्रित केली आहेत–शिवाय ती प्रातिनिधिक आहेत आणि बरीच काल्पनिकही आहेत. व्यक्तिरेखा रंगविण्याचा आणखी एक प्रकार म्हणजे तटस्थ वृत्तीने एखाद्या श्रेष्ठ व्यक्तीच्या स्वभावाचे व त्याच्या कार्याचे मोजमाप करावयाचे. मृत्युलेख याच प्रकारात पडतात, शोकाच्या आत्मनिष्ठ भावनेचे रंग जरी त्यात मिसळले असले तरी व्यक्तीच्या कार्याचे मोजमाप पुष्कळच तटस्थ वृत्तीने होते. लोकमान्य टिळक, प्रिन्सिपॉल आगरकर, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू इत्यादी श्रेष्ठ व्यक्तींची किंवा इतिहास व पुराण यातील व्यक्तींची स्वभावचित्रे रंगविताना पूर्वी मूल्यमापनाचा दृष्टिकोन अधिक प्रमाणात समोर ठेवला जाई. आज आता त्याचेही स्वरूप बदलले आहे. आज त्या त्या व्यक्तिरेखा लेखकाच्या भावनांतून रंगून निघाल्या आहेत. लेखकाला त्या व्यक्तीबद्दल वाटणाऱ्या जिव्हाळ्यात त्या न्हाऊन निघाल्या आहेत. आपल्या आवडीनिवडीचे रंग त्यांनी त्या व्यक्तींवर चढविले आहेत. विशेष म्हणजे त्या व्यक्तींच्या अंतरंगात शिरून त्या व्यक्तींची सुखदुःखे, त्यांच्या भावना, त्यांचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याचा प्रयत्न आजचे लेखक करीत आहेत. 'व्यासपर्वा'मधील दुर्गा भागवतांनी रंगविलेली प्रत्येक व्यक्ती पाहा. दुर्गा भागवत त्या व्यक्तीच्या अंतरंगात शिरतात,

त्यांचे मनोगत जाणून घेतात, त्यांच्या सुखदुःखांशी एकरूप होतात असेच ती चित्रे वाचताना आपणाला दिसेल. पण त्याबरोबरच त्यावरील भाष्यही तितकेच महत्त्वाचे वाटेल. त्यामुळे या प्रत्येक व्यक्तिरेखेमागे दुर्गा भागवत यांचे संपन्न व्यक्तिमत्व उभे असल्याचे दिसेल. त्याच्या उलट घाट्यांच्या व्यक्तिचित्रणात आत्मनिष्ठ भावनाविष्कारच खूप असतो. त्या त्या व्यक्तीच्या बरोबरीने घाटे तेथे असतात—त्यांचे अस्तित्व त्या व्यक्तीइतकेच, किंबहुना अधिक जाणवते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखांना निराळा भावपूर्ण आकार येतो. व्यक्तिचित्रणाची ही कला अत्यंत अवघड आहे. दुसऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वात लेखकाला स्वतःचे व्यक्तिमत्व इतके बेमालूम मिळवून घ्यावयाचे असते की त्यामधील वेगळेपणा जाणवू नये. हे फार थोड्यांना जमते. तटस्थपणे व्यक्तिचित्र रेखाटणे व तिचे मूल्यमापन करणे यासाठी चिकित्सक दृष्टी हवी व तर्कशुद्ध विचारप्रणाली हवी; आणि त्या व्यक्तीच्या मोठेपणाचे रहस्य समजण्याइतका बुद्धीचा आवाका हवा. उलट कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिमत्वात स्वतःचे व्यक्तित्व विलीन करावयास उत्कट सहानुभूती व प्रभावी प्रतिभा हवी. एक पद्धती शास्त्रीय, दुसरी कलात्मक म्हणूनच अधिक अवघड. पहिल्या पद्धतीने व्यक्तिचित्रणात्मक वा स्वभाव-रेखनात्मक लेखन करण्यात अनेकांना यश मिळाले. दुसऱ्या पद्धतीचे लेखन घाटे, पु. ल. देशपांडे, दुर्गा भागवत वगैरे सारख्या फारच थोड्यांना जमले.

विनोदी निबंध हा प्रकार खरा ललित निबंध या प्रकारात मोडत असला तरी याची प्रकृती भिन्न आहे. लेखकाच्या आत्माविष्कारापेक्षा विसंगतिदर्शनावर व अतिशयोक्तीवर तो अधिक पोसला गेला आहे. जुन्या काळी तर या विनोदी निबंधाचे स्वरूप निराळे होते व प्रयोजनही निराळे होते. श्रीपाद कृष्णांचा ‘ साहित्य बत्तिशी ’ मधील विनोद उपरोध, उपहास, चमत्कृती व अतिशयोक्ती यांनी नटला आहे. सामाजिक अनिष्ट रूढीवर उपरोधपूर्ण टीका हे त्याचे स्वरूप आहे व समाजसुधारणा हा तिचा उद्देश आहे. त्याचे स्वरूप आजही फार बदलले आहे असे वाटत नाही. निरनिराळ्या क्षेत्रांत रूढ झालेले संकेत वा बदललेल्या चाकोऱ्या यांचे अतिशयोक्तीपूर्ण रीतीने केलेले विडंबन हाच या विनोदी निबंधांचा आत्मा ठरला आहे. असे विनोदी निबंध अनेकदा कथेचा आकार घेतात. कधी प्रथम पुरुषी निवेदनाच्या स्वरूपात प्रगट होतात. पण हे प्रथम पुरुषी निवेदन म्हणजे आत्माविष्कार मात्र नव्हे. लेखकाने धारण केलेला

तो मुखवटा असतो. तो धारण करून हंसत खेळत क्वचित रेशमी चिमटे घेत क्वचित उपरोधाचे तीव्र शस्त्र परजीत तो जीवनातील विविध क्षेत्रामधील विसंगती दाखवीत असतो. अशा तऱ्हेचे विनोदी लेखन अनेकदा चावरे असते. शुद्ध निरागस स्वरूपाच्या विनोदांनी नटलेले निबंध फार थोडे. अशा निबंधातून लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा प्रसन्न आविष्कार असतो. लघुनिबंधाच्या जवळपास ते येतात आणि काही वेळा हितगुज करू लागतात. ' मी नाही विसरलो ' हा पु. ल. देशपांडे यांचा किंवा ' पुस्तकांची दुःखे ' हा मं. वि. राजाध्यक्ष यांचा निबंध याच स्वरूपाचा. असे निबंध लिहिणे फार कठीण आहे. बोचकपणा, टीका करणे उपहास करणे किंवा उपरोधिक लिहिणे कमी अधिक प्रमाणात सगळ्यांनाच जमते पण शुद्ध प्रसन्न हास्य निर्माण करणारा विनोदी निबंध फार क्वचित पाहावयास मिळतो. या प्रकारच्या विनोदी निबंधाची दुसरी एक पद्धत आहे. आपल्याच अनुभवांच्या वा फजितीच्या गोष्टी सांगून वाचकाचे मनोरंजन करणे. त्यामधील ' मी ' हा आत्माविष्कार असेलही. पण त्यातील अनुभवांची गुंफण मात्र मनोरंजक असते. लघुनिबंधाच्या जवळपास येणारा हा ललित निबंध तसा फार दुर्मिळ आहे.

लघुनिबंध तर आत्मनिष्ठ निबंधाचा सर्वांत महत्त्वाचा प्रकार. लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार हेच या निबंधाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य. या आविष्कारात सहभागी होतो तो वाचक. कारण या निमित्ताने वाचकाशी हितगुज करण्याचा आणि हसत खेळत त्याला आपल्या अंतरंगापर्यंत नेण्याचा निबंधकाराचा प्रयत्न असतो तर लेखकाचे हितगुज जाणून घेऊन त्याच्या भावभावनांशी व आवडीनिवडीशी समरस होण्याचा वाचकाचा प्रयत्न असतो. यातूनच वाचक व लेखकामध्ये जिव्हाळ्याचा एक नाजूक धागा निर्माण होतो. जुन्या वैचारिक निबंधात लेखक व वाचक यांच्यामध्ये ते नाते असते अध्यापक व शिष्य यांचे. लेखक वाचकाला एका वरच्या पातळीवरून विषय समजावून देण्याचा प्रयत्न करीत असतो आणि वाचकाची भूमिका असते ग्रहण करणाऱ्या शिष्याची. त्यामुळे लेखकाबद्दल त्याला वाटत असतो आदर. लेखक व वाचक या प्रकारात जवळ येऊ शकत नाहीत. लघुनिबंधात मात्र ही जवळीक विशेष जाणवते. लेखक एखाद्या जिव्हाळ्याच्या स्नेह्याजवळ आपले अंतरंग उघडे करावे अशा भूमिकेने आपल्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार करीत असतो व ती स्नेहाची ऊब वाचकापर्यंत

पोहोचल्याने वाचकाला त्याच्याबद्दल विलक्षण आपुलकी वाटू लागते. त्यामुळे लघुनिबंध हा प्रकार कमालीचा आत्मनिष्ठ व वाचक-लेखकामधील अंतर कमी करणारा आहे. प्रा. फडके यांनी या प्रकाराला 'गुजगोष्ट' हे नाव दिले ते याच अभिप्रायाने.

Loose sally of the mind असे इंग्रजीमध्ये Essay चे जे वर्णन केले आहे ते यथार्थतेने लघुनिबंधांनाच लागू पडते. लघुनिबंधात विषय महत्त्वाचा नाही. 'Any peg to hang a hat upon' अशा रीतीने विषयाचे वर्णन केले जाते. विषय हे मनाच्या स्वैर आविष्काराचे साधन आहे, साध्य नव्हे. त्यामुळे एकाद्या विषयावरील सांगोपांग व तर्कशुद्ध चर्चा लघुनिबंधात अपेक्षित नसते. एखाद्या विषयाच्या अनुषंगाने केलेला तो विचाराचा वा भावनांचा स्वैर-विलास असतो. यात लेखकाचा भावानुभव व विचारानुभव यांचा अत्यंत लालित्य-पूर्ण व हसत खेळत केलेला आविष्कार दिसून येतो. त्यामुळे लेखकाचे व्यक्तिमत्व जितके प्रसन्न व समृद्ध तितका लघुनिबंध रंगत जातो व वाचकांना तो आकृष्ट करतो. लेखकाच्या व्यक्तिगत आवडीनिवडी, त्याची अभिरुची, त्याचा स्वभाव, त्याची मनस्थिति आणि त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन या सर्वांचेच प्रतिबिंब त्याच्या लघुनिबंधात पडत असल्याने लेखकाचे स्वच्छ व नितळ चित्र आपण त्याच्या लघुनिबंधातून पाहू शकतो. त्यामुळे शैली ज्याप्रमाणे प्रत्येक लेखकाची त्याप्रमाणे लघुनिबंधही प्रत्येक लेखकाप्रमाणे भिन्न भिन्न स्वरूप धारण करीत असतो. त्यामुळे लघुनिबंधाचे तंत्र बनू शकत नाही, चाकोरी तर नाहीच नाही. चाकोरी बनत चालली की लघुनिबंध संपला असे समजावे.

लघुनिबंधात मनाचा अनिर्बंध संचार असतो असे जरी म्हटले असले तरी त्यातही आंतरिक संगती असतेच. वर वर पाहता तो विस्कळीत वाटेल पण तसा तो नसतो. हॅम्लेटच्या वेडामध्येही जशी संगती होती. तशीच लघुनिबंधाच्या विस्कळीत व स्वैर विलासातही एक कलात्मक संगती असते. ती तशी नाही असे वाटणे हीच त्यातील खरी मौज. त्यातील विषयान्तरे, पोट विषयान्तरे, वर वर वाटणारी विसंगती या साऱ्याला काही अर्थ असतो. लघुनिबंध म्हणजे केवळ निरनिराळे अनुभव एकत्र केलेली व 'मी'च्या सूत्राने जोडलेली एक कथा नव्हे किंवा ते आत्मचरित्रही नव्हे. त्यातील 'मी' चे अनुभव आत्मचरित्रात्मक असतात असेही समजण्याचे कारण नाही. त्यात कल्पित आणि सत्य यांचे

विविध रंग भरलेले असतात आणि त्यांचा एक कलात्मक निबंध ( Pattern ) लेखक प्रतिभेने निर्माण करीत असतो. त्यात आशय असतो, तत्त्वज्ञान असते, बोध असतो, परंतु त्याची जाणीव न होण्याइतका त्या कलाकृतीत तो एकरूप झालेला असतो. लघुनिबंधालाही विद्वत्ता, बहुश्रुतता, अनुभवाची व्यापकता आवश्यक असते. पण त्यातून त्याचे प्रदर्शन नसते. लेखकाच्या आत्माविष्कारातूनच कलात्मक रीतीने त्याचे प्रगटीकरण होत असते. हसत खेळत तत्त्वज्ञान सांगणारा तत्त्वज्ञ अशी लघुनिबंधकाराची कुणी व्याख्या केली तर ती फारशी चुकणार नाही.

मात्र या सर्व अपेक्षा फार थोडे लघुनिबंधकार पूर्ण करू शकतात. सुरुवातीला चांगले लघुनिबंध लिहिणाऱ्या लघुनिबंधकारांची पुढे पुढे एक चाकोरी बनत जाते — आणि त्या चाकोरीचे अनुकरण सुरू झाले की लघुनिबंधाचा एक साचा बनायला लागतो आणि मग हळूहळू लघुनिबंध संपुष्टात येऊ लागतो. हा एकच प्रकार असा आहे की त्यात कुणी कुणाचे अनुकरण तर करू शकत नाहीच पण स्वतः लेखकही स्वतःचे अनुकरण करू शकत नाही. म्हणूनच वाटतो अतिशय सोपा पण लिहावयास मात्र अतिशय कठीण असे या लघुनिबंधाचे वर्णन केले आहे. त्या दृष्टीने हा अतिशय फसवा प्रकार आहे. मराठीत काही नावे सोडली फार थोड्यांना हा प्रकार जमला.

संपन्न व्यक्तिमत्व व काव्यात्म आणि खेळकर वृत्ती ही लघुनिबंधाला अतिशय आवश्यक आहे. संपन्न व्यक्तिमत्वातून जीवनविषयक समंजस दृष्टिकोन येतो आणि हसतखेळत त्याचा होणारा आविष्कार मोठा मोहक वाटतो. लघुनिबंध-काराची भूमिका त्यामुळे a philosopher and a friend ची असते. असे संपन्न व्यक्तिमत्व असणारे लघुनिबंधकार मराठीत फार थोडे आहेत. त्यामुळेच लघुनिबंधाचा हा प्रकार फारसा फोफावला नाही. या प्रकारात मर्यादित यश मिळविणारे लघुनिबंधकार पुष्कळ आहेत. फडके, खांडेकर आणि काणेकरांनंतर लघुनिबंधाला तशी उंची प्राप्त झालीच नाही. वि. पां. दांडेकर, ना. मा. संत, गो. रा. दोडके, भगवंत देशमुख आदींचे प्रयत्न उल्लेखनीयामध्ये जमा होतील.

आज हा लघुनिबंध विंदा करंदीकरांसारख्या कवीच्या हाती गेला आहे. त्यामुळे तो आज अधिक काव्यात्म आणि चिंतनशील झालेला दिसतो. लघु-निबंधाच्या ठराविक वळणापेक्षा हा निराळ्याच वळणाने जाणारा लघुनिबंध

डोळयात भरतो, त्यातील आशयगर्भता जाणवते पण त्यातील खेळकर अंग आणि त्यामधून प्रत्ययाला येणारा जिव्हाळा कमी झाल्यासारखा वाटतो. पुन्हा या निबंधामधून आपला एकादा मित्र बोलत नसून एक चिंतनशील कवी बोलतो आहे याची जाणीव सतत होत असते व त्यामुळे फडक्यांच्या लघुनिबंधातून वाचक व लघुनिबंधकार यांच्यामधील कमी झालेले अंतर अधिक वाढल्यासारखे वाटू लागते. या लघुनिबंधातून कदाचित ललित निबंधाला एखादा नवा आकार प्राप्त होईल. कुणी सांगावे ?

आज मराठी निबंध हा असा बहुरूपी आहे. जुन्या व नव्या परंपरांचे प्रवाह आज त्यात मिसळले गेले आहेत विषयाला बंधन नाही किंबहुना विषय हा आत्माविष्काराचे एक साधन बनला आहे. लेखकांच्या व्यक्तिमत्वाचे विविध रंग व ढंग मराठी निबंधात प्रतिबिंबित झालेले दिसतात-तो आज जुने परंपरागत शास्त्रीय व तंत्रबद्ध स्वरूप टाकून कलाकृतीचा आकार धारण करू लागला आहे आणि म्हणूनच ' ललित ' ही संज्ञा आज त्याच्या मागे लावण्यात येऊ लागली आहे. ' लेखकाच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचा उत्कट आविष्कार ' हे सूत्र आज मराठीतील निबंधाला यथार्थतेने लागू पडत आहे. तो आविष्कार कुठे खेळकर असेल, कुठे गंभीर असेल तर कुठे काव्यात्म असेल, कुठे तो कमालीचा आत्मनिष्ठ असेल तर कुठे तो वस्तुनिष्ठ असेल. ज्या ज्या लेखकाची जी जी वृत्ती त्या त्या प्रमाणे निबंध आज आकार घेत आहे. आत्मानुभूतीच्या विविध रंगांनी रंगलेल्या आजच्या मराठी निबंधाची ही प्रगतीची वाटचाल निःसंशय स्वागतार्ह आहे.

उद्याचा निबंध कोणते वळण घेईल याची पदचिन्हे आजच्या या बहुरूपी निबंधातून दिसत आहेत. आजच मराठी कथा व मराठी निबंध यांच्या सीमारेषा एकमेकात मिसळल्यासारख्या वाटतात, त्या दोघांचे Fusion होऊन आणखीच एखादा निराळा ' Form ' निर्माण होतो की काय कुणास ठाऊक ?

तो Form कसा असेल याची स्वप्ने रंगवीत बसणे आणि प्रत्यक्षात तो साकार झाला म्हणजे त्याच्या स्वागताला सिद्ध असणे हेच सध्या आपले कार्य !

१ डिसेंबर १९६५.

—संपादक.

४१९२६ १ निबंध
१५७५ १५।१।६८

# मते आणि मतप्रचार

## विनोबा

आपल्यात हल्ली मतभेद पुष्कळ दिसतात. मतभेद असण्यात दोष कांही नाही. पण असणारा मतभेद आणि दिसणारा मतभेद ह्यात फरक केला पाहिजे. मत म्हणजे स्वतंत्र मनाचे म्हणणे. आपले मन स्वतंत्रपणे जे सांगेल ते आपले मत. पण आपल्या मनाची स्थिति इंग्लंडच्या राजासारखी असते. इंग्लंडच्या राजाला स्वतंत्र म्हणणे कोठे आहे? पार्लमेंटने ठराव पास करावा, औपचारिक मंजुरीसाठी राजेसाहेबाकडे तो जावा आणि ह्यांनी त्यावर सही करून टाकावी. अशी तऱ्हा आपल्या मनाची आहे. इंद्रिये कांहीं तरी ठराव करतात आणि मन त्यावर सही करून टाकते. एवढे च आहे की मनाचा स्वभाव तर्कशील असल्यामुळे सही करण्यापूर्वी ते त्या ठरावाच्या समर्थनपर अशी काही युक्ति तयार करून ठेविते. त्याशिवाय त्याचे समाधान होत नाही. त्यापलीकडे इंद्रियांच्या म्हणण्याविरुद्ध तर्क चालविणे हे मात्र त्याच्या अधिकारात जणू नसते च. साधकांनी तर्क करावा तर तो नेहमी वेदानुकूल च करावा अशी मर्यादा आहे. त्याप्रमाणे इंद्रियांना अनुकूल तर्क करण्याचे मनाचे व्रत असते. अश्या प्रकारची मते ही वास्तविक मते नव्हेत. ती फसवणूक आहे. पहाटे उठण्याचा इंद्रियांना आळस. त्यामुळे मनाला हि तसे च वाटते. ते युक्तिपूर्वक म्हणू लागते, “ पहाटे उठणे चांगले नाही. कारण, त्यामुळे दिवसभर पुरती जागृति राहणार नाही. शिवाय असे की पहाटे उठणे ईश्वरी योजनेच्या विरुद्ध च नाही का? मनुष्याने पहाटे उठावे असे ईश्वराला वाटत असते तर त्याने पहाटेस प्रकाश दिला असता ” इतके झाले म्हणजे ते आपले निश्चित मत झाले. हरएकाला मतस्वातंत्र्य पाहिजे असे आपण म्हणतो. पण स्वतंत्र मत ह्याचा खरा अर्थ आपणास कळलेला नाही. इंद्रियांचा पगडा बसू न देता स्वतंत्र वृत्तीने आपले मन आपल्याला जे सांगत असेल ते आपले स्वतंत्र मत. मत

म्हणजे मनात येईल ते नव्हे, पण मन आणील ते. हा मुद्दा लक्षात ठेवला म्हणजे पुष्कळसे मतभेद झडून जातील.

इंद्रिय-निग्रह-पूर्वक आपल्याला जे निश्चितपणे वाटते त्या आपल्या मताचा प्रचार करणे योग्य आहे. पण अश्या प्रकारचा प्रचार करण्याचे खरे साधन आचार, उच्चार नव्हे. उच्चाराने मतप्रचार करू पाहणे हा मोह च होय. हा मोह आपल्यात फार आहे. आपले मत जर खरे असेल तर आपण त्याप्रमाणे वागल्याने त्याचा आपोआप प्रचार होईल च. आपला सत्यावर विश्वास असला पाहिजे. सत्यामध्ये स्वतःचा प्रचार करण्याची स्वयंभू शक्ति आहे. सत्य सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशी आहे. सूर्य जसा झाकला जात नाही तसे सत्य हि झाकले जात नाही. आचरण टाकून बाह्य उपायांनी प्रचार करण्याचा प्रयत्न फुकट आहे. त्याचा काही च परिणाम होऊ शकत नाही. त्याने हिंसा वाढते आणि असत्याचा प्रचार होतो. प्रचाराला हि मर्यादा आहे. सूर्याची प्रचारक शक्ति किती जबरदस्त आहे ? पण तो हि मर्यादा सांभाळून असतो. त्यामुळे तो दुनियेचा ' मित्र ' राहून प्रचार हि करू शकतो. दार बंद करून कोणी निजला आहे तर सूर्य त्याची सेवा करण्यासाठी त्याच्या दाराशी येऊन उभा राहतो. पण दाराला धक्का देऊन आत शिरत नाही. मात्र जरा किलकिले झाले की सबंधच्या सबंध आत शिरला च. ही प्रचाराची मर्यादा होय. आपले मत सत्य असले तरी त्याचा स्वाभाविक रीतीने च प्रचार झाला पाहिजे. मूक आचरण म्हणजे स्वाभाविक प्रचार. आचरणाचे मौन सुटले की हिंसा दाखल होते. आणि हिंसा दाखल झाली की सत्य उडाले च. पाण्याने जसा अग्नि विझतो तसे हिंसेने सत्य विझते. आणि आचरण टाकून प्रचार करण्याचा प्रयत्न म्हणजे नागडी हिंसा च. प्रचाराची घाई ही हि हिंसा च. शिवाय अश्रद्धा, अज्ञान तर खरे च.किंवा दंभ का म्हणू नये ? लहान मुले बी पेरतात आणि जरा अंकुर फुटला की तो लवकर उगवावा म्हणून त्याला वर उपटतात. तसे च हे.

मत म्हणजे इंद्रियनिग्रही मनाचे म्हणणे, आणि त्याच्या प्रचाराचे साधन ते कृति. हे दोन सिद्धांत निश्चित झाले की सर्व आकाश निवळले. कृतीबरोबर प्रसंगविशेषी अल्प उक्ति आपण कल्पू शकतो. पतिव्रता ज्याप्रमाणे पतीचे नांव घेत नाही त्याप्रमाणे कर्मयोगी आपल्या मताचा उच्चार टाळतो. पण दोन्ही पक्षी आपण अपवाद कल्पू शकू. क्वचित प्रसंगी आपले मत मांडण्यास हरकत

नाही. पण आपले मत मांडावे, दुसऱ्याचे खंडन करण्याचा मोह टाळावा. मतप्रतिपादनात आपले मत मांडणे आणि दुसऱ्याचे खोडणे असे दोन भाग कल्पिले जातात. पण ते कल्पनेचे आहेत, खरे नाहीत. दिवा लावणे व अंधार झाडून टाकणे ही जशी दोन कामे तसले च हे दोन भाग. आधी दोन भाग च खोटे. त्यात हि पुन्हा आपला भर बहुतेक दुसऱ्याचे मत खोडण्यावर च ज्यास्त असतो. दुसऱ्याचे मत खोडले की तेवढ्याने आपले मत सिद्ध झाले च असे होत नाही. आणि आपले मत सरळ मांडले म्हणजे दुसऱ्याचे मत खोडण्याची जरूर राहत नाही. भूमितीमध्ये युक्लिडने कोठे च खोडाखोड न करता थोडक्यात सरळ सिद्धान्त मांडले आहेत. त्या सिद्धान्तांची आज दुनियेवर सत्ता चालते. दुसऱ्याचे मत खोडून काढण्यात त्या मताविषयीचे सूक्ष्म प्रेम च असते. भक्तिमार्गांत जसा प्रेमाने तसा द्वेषाने हि ईश्वर मिळतो असे सागतात. बिभीषण प्रेमाने तरला तर रावण द्वेषाने तरला अशी भाषा संत बोलतात. त्यांतला अर्थ हा च आहे. मिल्टनने 'पॅरडाईझ लॉस्ट' मध्ये सैतानाच्या अंगी सात्त्विकतेचा तात्त्विक द्वेष दाखवून त्याच्याविषयी वाचकांची सहानुभूति उत्पन्न केली आहे. सात्त्विकतेचा ज्याला मनापासून इतका द्वेष वाटतो त्याच्या मनांत सूक्ष्मरूपाने सात्त्विकता वसत आहे, तसे च तामसपणाचा जोरजोराने निषेध करीत बसणाऱ्या माणसांत तामसपणा चिकटलेला आहे च, ह्यात शंका नाही.

प्रचाराचे खरे साधन कृति हे होय. तथापि ज्याप्रमाणे प्रसंगी मतप्रतिपादनाची जरुरी कल्पून घेतली त्याप्रमाणे मतप्रतिपादनातून हि क्वचित दुसऱ्याच्या मतातील चूक दाखविण्याचा प्रसंग कल्पिता येईल. पण मत खोडून काढणे निराळे. आणि दुसऱ्याला च खोडून काढणे निराळे. एखाद्या मतातील असारता दाखवितांना त्या मनुष्याला हि मध्ये च गुंतवून टीका करणे गैर आहे. नारळाची कवची फोडून अगदी आतून खोबरे घ्यावे त्याप्रमाणे मनुष्याचे मत, चुकीचे वाटल्यास खोडून आतला माणूस ग्रहण करता आला पाहिजे. नदीचे वळण वाकडे असले तरी ज्याप्रमाणे पाणी वाकडे असत नाही, किंवा भाकरी वाटोळी असली तरी तिची गोडी वाटोळी असत नाही, त्याप्रमाणे मनुष्याचे मत जरी कदाचित दूषित असले तरी आतला माणूस दूषित नसतो. नदीचे वळण किंवा भाकरीचा आकार ही जशी बाह्य परिस्थितीने बनवलेली असतात त्याप्रमाणे मनुष्याच्या मताचे आहे. म्हणून च मताचा विचार करताना माणूस बाजूला च

राखला पाहिजे. पुष्कळ वेळा आपण असे पाहतो की जे आज खोटे वाटते· मनात विचार आल्याबरोबर लिहून टाकण्याची ज्यांना सवय आहे अश्या लेखकांच्या लेखनात त्यांच्या मनाची वळणे कसकशी बदलत गेली हे दिसून येते. म्हणून शहाणे लोक स्वतःचे विचार कृतीत उतरून अंगात मुरून आणि हृदयात भरून आपोआप बाहेर पडल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि रीतीने त्यांना प्रगट होऊ देत नाहीत. आता आपलेच जुने मत पण आज जर आपल्याला ते पसंत नाही तर ते आपण सोडून देऊ, प्रसंगी खोडूनहि काढू. पण कश्या रीतीने आणि कोणत्या भावनेने ? दुसऱ्याचे मतहि खोडण्याचा प्रसंग आल्यास जणू आपलेच जुने मत आहे असे समजून ते खोडले जावे. ह्याहि पेक्षा अधिक चांगला न्याय असा मांडता येईल; आपल्या जुन्या मताकडे आपण कठोर नजरेने पाहात नाही, पण पहावे; आणि दुसऱ्याच्या मताकडे कठोर नजरेने पाहतो, पण पाहू नये. मनुष्याचे खरे मत काय आहे हे त्याचे त्यालाच नीटसे माहीत नसते. केळींच्या सोपटाप्रमाणे मनुष्याच्या मनावर एकावर एक अनेक मतांचे पापुद्रे बसलेले असतात. हे सर्व पापुद्रे सोलून पाहिल्यास त्याचे आतले मन अगदी शुद्ध आणि सरळ असते. शिवाय कालचे माझे मत जसे आज बदलले आहे तसेच आजचेहि मत, आज कितीहि पक्के वाटत असले तरी, उद्या बदलण्याचा संभव आहे ही गोष्ट ध्यानांत वागविली पाहिजे. ह्याचा अर्थ असा नाही की माणसाने संशयावस्थेत रहावे. संशयात मुळींच राहू नये. आज मला जसे वाटते तसे जरूर वागावे. पण दुसऱ्याच्या मताचे खंडन करतांना आपल्या स्वतःच्या अनुभवावरून सिद्ध झालेली मतांची क्षणभंगुरता विसरू नये. संपूर्ण ईश्वर कोणत्याहि स्वरूपात मावू शकत नाही. त्याचा एक लहानसा अंशच व्यक्त होतो. त्याप्रमाणे संपूर्ण सत्य माझ्या मतात असणे शक्य नाही. तसेच ईश्वराचा अंशहि ज्याप्रमाणे असुक एका वस्तूतच राहतो असे नसून सर्वच वस्तूत कमीज्यास्त प्रमाणाने राहतो त्याप्रमाणे सत्याचा अंशहि माझ्याच मतात आहे असे नसून दुसऱ्याच्या हि मतात थोडा तरी आहेच ही श्रद्धा हाच सत्याग्रहाचा आधार. आणि ही च सत्याग्रहाची मर्यादा. कोणताहि मनुष्य, समाज, संस्था सर्वथा सत्यहीन किंवा ईश्वरहीन नाही. म्हणूनच सत्याग्रहाने कोणत्याहि मनुष्याला, समाजाला, संस्थेला जिंकण्याची शक्यता. हा सत्याग्रहाचा आधार. कोणताहि मनुष्य,

समाज, संस्था सर्वथा सत्यहीन किंवा ईश्वरहीन नाही. म्हणूनच आपल्या दृष्टीने असत्यवश झालेल्या मनुष्याचा, समाजाचा, संस्थेचा प्रतिकार करताना आपण अहिंसामय साधनच वापरले पाहिजे. ही सत्याग्रहाची मर्यादा. सारांश, मनुष्याच्या मताचा विचार करताना किंवा त्याच्या कृत्याचा प्रतिकार करता-नाहि, त्या मनुष्याला त्याच्या मतापासून अलग करणे, हे सत्याग्रहाचे मुख्य कलम आहे.

आजच्या पवित्र दिवशी हा बोध ग्रहण करण्याची सद्बुद्धि ईश्वर आपणास देवो.

# २

# स्वामित्वभावना विरुद्ध सौंदर्यभावना

## द. के. केळकर

माझ्या बंगलीच्या समोर अंगणात एक सुंदर लहानशी बाग आहे. रोज प्रातःकाळी उठून त्या बागेत जाऊन खुर्ची टाकून तेथे बसणे हा एक माझा नित्याचा परिपाठ होऊन बसला आहे.

सकाळची उषःकाळची वेळ ही आधीच आल्हादकारक. सूर्याची कोमल आरक्त किरणे सर्वत्र पसरलेली. बागेतील फुलझाडे फुललेली आणि चित्रविचित्र रंगांनी नटलेली. सर्व वातावरण प्रशान्त पण प्रोल्हसित अशा वृत्तीत बुडून गेलेले. अशा स्थितीत सूर्य झपाझप पावले टाकीत वर केव्हा येई हे कळत नसे.

या वेळी मला सर्वांत अधिक आल्हाद कशापासून होत असेल तर बागेतील या पुष्पावरून त्या पुष्पावर उडणाऱ्या फुलपाखरांची क्रीडा निरीक्षण करीत बसण्यात. किती तेजस्वी आणि चित्रविचित्र त्यांचे रंग, किती कोमल स्पर्श, किती तरल आणि त्वरित गती! पुष्पांशी इतके काय त्यांचे हितगुज चाललेले असते ते त्यांचे त्यांनाच माहीत! एकदा एका पुष्पाच्या कानात काही कुजबुजून लगेच दुसरीकडे जावे, आणि क्षणार्धांत काही तरी आठवल्यासारखे करून पुनश्च पहिल्या पुष्पाशी येऊन गुंगावे असा अव्याहत त्यांचा खेळ चाललेला असे. पुष्पाचा मधू लुटून घेऊनच्या घेऊन पुन्हा त्यांना आनंदित करावयाचे ही कला हे फुलपाखरा तुलाच साधावयाची. तुझ्या पंखांवर हे इतके मनोहर रंग कसे उमटले हे आता मला कळले. पुष्पांशी तू इतका तद्रूप होऊन जातोस, आत्मीयत्व विसरतोस, म्हणूनच पुष्पांचे रम्योज्ज्वल रंग तुझ्या पंखांवर न कळत उमटत असावे. पुष्पांचे सौंदर्य खुलवावे आणि आपणही आनंद लुटावा हे तुझ्या खेळकर वृत्तीलाच साधू जाणे.

बागेत विहरणाऱ्या या फुलपाखरांची क्रीडा पाहत बसणे हे माझे नित्याचे व्यसनच होऊन बसले होते. या नित्याच्या व्यवसायात एक दिवस अकल्पितपणे

खंड पडला.

एके दिवशी सकाळी नित्याप्रमाणे बंगलीचे दार उघडून बाहेर जो डोकावतो तो सूर्यकिरणांचा सुखोष्ण कोमल स्पर्श अनुभवावयास सापडण्याऐवजी आकाशात मेघ आल्यासारखे दिसू लागले. दिवस तर ऐन वसंत ऋतूचे. वर पाहू लागलो तोच जो मेघ म्हणून दिसत होता तो झपाट्याने खाली येऊ लागला, विस्तार पावू लागला व पाहता पाहता जमिनीवर हजारो–लाखो लहान लहान सावल्या पळत सुटल्यासारखे दिसू लागले. विचार करण्यास वेळच नव्हता. समोरचा मेघ देखतादेखता विरून जाऊन त्यातून लाखो कीटक बाहेर पडू लागले, बंगलीत शिरू लागले. अधिक विचार न करता मी बंगलीत परत आलो व दारे बंद करून घेतली.

दोन-तीन तासांनी बाहेर येऊन पाहतो तो माझ्या आवडत्या बागेत किती विलक्षण, किती भेसूर फरक पडलेला! हसऱ्या गालाच्या प्रफुल्ल चेहऱ्याप्रमाणे सतेज टवटवीत पुष्पांचा आता मागमूसही राहिलेला नव्हता. दुष्काळातील उपासमारीने काळवंडलेल्या व अस्थिशेष उरलेल्या सापळ्याप्रमाणे फुलझाडांचे नुसते खराटे उभे होते; आणि आजूबासूस सर्वत्र त्या संहारक कीटकांचा सडा पडलेला होता.

निरखून पाहू लागलो तो किती हिडीस प्राणी! असंख्यतर कीटक खाताखाताच मरून पडले होते. फूल नाही, फळ नाही पान नाही, अमुक एक त्यांनी खावयाचे बाकी ठेवले होते, असे नाही. तोंडाशी येईल ते खाऊन फस्त! सर्व इंद्रिये तोंडातच एकवटली होती की काय कोण जाणे! पण इतके मनसोक्त खाऊन चेहरे पहावे तो किती किती फिकटलेले आणि पाय फेंगडे! हजारो तर नुसते खाऊनच मृत्युपंथाला लागलेले आणि त्यांचे बाकीचे संवगडी त्यांची फिकीर न करता स्वतः अधिकच खात सुटलेले.

## फुलपाखरू आणि टोळ

फुलपाखरू आणि टोळ! किती विसदृश जोडी ही! एकाची वृत्ती जगातील सौंदर्याचा आस्वाद घेऊन जग आनंदाने भरून टाकावे ही, तर दुसऱ्याची जगातील सौंदर्य बळकावून, भक्षून फस्त करून जग दुःखाच्या गर्तेत लोटून द्यावे ही.

आज जगभर-धुमसत असलेल्या असमाधानाच्या मुळाशी हीच टोळधाडी स्वामित्ववृत्ती नाही का? एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीवर, एका जातीने दुसऱ्या जातीवर, एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करून सत्ता, मत्ता, सौंदर्य ही सर्व आपणच बळकावून बसावयाचे, हीच वृत्ती आजच्या जगात पोट-दुखीच्या मुळाशी आहे. सर्व जगाचे शेत मी पिकवीन, दुसऱ्याला त्यात नांगर टाकू देणार नाही; धान्य विकले गेले नाही तर उभे पीक जाळून टाकीन, पण कोणाच्या झोळीत चिमूटभर उचलून टाकणार नाही; स्पृश्यवर्ग देवदर्शनाची हेळसांड करू लागला तर देवाळाला टाळे लावीन पण अस्पृश्याची सावली देवळावर पडू देणार नाही; एक ना दोन–सर्वत्र स्वामित्वाची अरेरावी वृत्ती.

या वृत्तीचा करडा लष्करी अंमल जोवर जगावर चालू आहे तोवर सुख-शान्तीला समाजात निवाऱ्याचे स्थान मिळणार नाही. स्वामित्वाची वृत्ती ही एक जहरी निशा आहे. जो जो निशापाणी वाढवीत जावे तो तो कैफ चढत जातो, एक प्रकारच्या मादक आनंदाचे भपकारे येऊ लागतात, पण अंती बेहोष होऊन त्या आनंदाचे भेसूर दुःखात रूपांतर होण्यास अवसर लागत नाही.

## सुखाची विकृत कल्पना

मनुष्यस्वभावाची मोठी गंमत आहे. सुखाकरिता आणि आनंदाकरिता सुख-विषय हस्तगत करण्याची त्याची सर्व धडपड ना? पण या धडपडीत स्वामित्व-भावनेलाच एवढा विलक्षण जोर चढतो की, जी वस्तू हस्तगत करण्याकरिता जिवाचे रान केले ती वस्तू हस्तगत केल्यावर तिचा आस्वाद घेण्याची त्याला विस्मृती पडते, आणि मग वस्तूच्या आस्वादाच्या ऐवजी स्वामित्ववृत्तीच्या आनंदातच माणूस गर्क होऊन जातो. सुखाच्या तिजोरीची एक किल्ली म्हणजे संपत्ती. पण या संपत्तीच्या मागे लोभी माणूस एकदा लागला म्हणजे शेवटी संपत्ती हे सुखाचे साधन आहे हे विसरून जाऊन संपत्तीचा संचय करणे हेच अंतिम सुख होय अशा मिथ्या ग्रहाच्या भोवऱ्यात तो सापडतो. प्रसन्न होई-पर्यंत ज्या संपत्तीची तो हाडाची काडे करून अव्यभिचारी निष्ठेने उपासना करीत असतो, तीच एकदा प्रसन्न झाली की, तिच्या प्रसन्न वातावरणात आनंदाचा आस्वाद घेण्याचा विसर पडून त्याने तिला कडी–कुलुपात कोंडून टाकावे हा देखावा विचित नाही का?

याच्या मुळाशी आनंदाची, सुखाची विकृत व विपर्यस्त भावना दडलेली असते. सुखविषय हा दुसऱ्याचा हिरावून बळकावून सर्वस्वी आपल्या मालकीचा केल्याशिवाय सुखाची खरी माधुरी चाखता येत नाही, ही ती भावना होय. ही भावना होता होता इतकी प्रभावी होते की, तिच्या आहारी गेलेल्याचे लक्ष सुखविषयावरून उठून, हिरावून घेण्याच्या मालकी हक्काच्या भावनेतच सर्वस्वी गुरफटून जाते.

लहान मुलाला खाऊचा तुकडा दिला तर तो नुसता खाणार नाही, तर शेजारच्या मुलाला वाकुल्या दाखवीत टुकटुक करीत खाईल. आपल्या हातात दहा खेळणी असली तरी दुसऱ्याच्या हातातले नवे खेळणे हिसकावून घेतल्याशिवाय काही मुलांना चैनच पडत नाही, आणि मग ती सर्व खेळणी मांडीखाली घालून गाल फुगवून दुसऱ्याकडे तोऱ्याने, वर्चस्वभावनेने पाहण्यात काय तो खरा आनंद !

मानवी समाज या बाल्यावस्थेच्या पलीकडे अद्यापही फारसा गेलेला नाही. मानवाने शास्त्र, विद्या, कला यांचा भव्य प्रसाद उठविला आहे. सृष्टीवर विलोभनीय असे स्वामित्व संपादन केले आहे, पण खुद्द स्वामित्वभावनेवर मात्र त्याला विजय मिळविता आलेला नाही. बाह्य भौतिक सृष्टीची एकनिष्ठपणे सेवा करून तिचे हृदय याने काबीज केले आहे; आणि स्वतःच्या अंतःकरणातील स्वामित्वभावना ही मात्र त्यालाच अद्याप हाताच्या बोटावर हवी तशी खेळवीत आहे.

मानसशास्त्र सांगते की, एखाद्या व्यक्तीचे शारीरिक वयोमान, बौद्धिक वयोमान व भावनात्मक वयोमान ही पुष्कळ वेळा अगदी भिन्न भिन्न असू शकतात. शरीर आणि मन यांची वाढ असमांतर झाली तर शारीरिक वयोमान व बौद्धिक वयोमान यांच्यांत छत्तिसाचा आकडा उमटू शकतो. डोक्याचे केस पिकलेले, पण आतील बुद्धी मात्र बालकाला शोभेशी, किंबहुना बालिश, अशी म्हातारी माणसे तुम्ही पाहिली नाहीत? किंवा वयाने पोरसवदा पण मनाने जरठ असे तरुण तुम्हांला आढळले नाहीत? दाढी पिकली असूनही फिदी फिदी हसून माकडचेष्टा करणारे व मिशी फुटली नसूनही मरतमढयाचा सुतकी चेहरा धारण करणारे हे दोन्ही प्रकार विचित्र नव्हेत का? पण शरीराची व मनाची विसंगत वाढ झालेली माणसे जगात अगदीच थोडी सापडत नाहीत.

मनाच्या निरनिराळ्या शक्तींचीही अशीच बेताल, वेढब वाढ झालेली आढळून येते. बुद्धीने व कल्पनेने अबलख घोड्याप्रमाणे तल्लख असलेली माणसे भावनेच्या किंवा इच्छाशक्तीच्या बाबतीत मद्दड बैलाप्रमाणे सुस्त असलेली कित्येक वेळा आढळून येतात. कल्पनेच्या प्रांतात जे गडकरी अत्यंत धाडसी म्हणून गाजले, तेच गडकरी व्यावहारिक जगात आपल्या एका नाटकावर राजकीयत्वाचा आरोप येण्याचा संभव आहे एवढ्या एका नुसत्या संशयाने ते नाटक जाळण्यास प्रवृत्त झाले, किंवा जो शोपेनहार जग हे दुखःपूर्ण असल्याने आत्महत्या करणे हे श्रेयस्कर असे आपल्या ग्रंथांतून वेहोषपणे प्रतिपादन करी, तोच शोपेनहार देशावर परचक्र आल्यावर स्वतःचा जीव वाचवण्याकरिता एका खेड्यात जाऊन लपून बसला. या गोष्टी कोणास सांगितल्या तर खऱ्या तरी वाटतील? पण अशी वेडौल वाढ झालेली जगात आढळून येते खरी.

## संस्कृतीची बेडौल वाट

आजच्या मानवी समाजाची वाढ ही अशीच बेडौल, बेताल व विसंगत झालेली आहे. शास्त्र, कला, वाङ्मय यांची निस्सीम उपासना करून समाजाने बुद्धीची आश्चर्यकारक वाढ केलेली आहे, पण स्वतःच्या भावनांना सुसंस्कृत करण्याच्या बाबतीत मात्र त्याची बाल्यावस्था अद्याप संपलेली नाही. बुद्धीची झेप एवढी प्रचंड की, अनंत, अथांग भासणाऱ्या विश्वगोलाचे मोजमाप काढण्याची ती उमेद धरते! पण भावनेची क्षुद्रता एवढी, की अनंत विश्वातील रजःकणासमान भूमीवर जेथे तो उभा आहे तेथील सुईच्या अग्रावरील मातीला दुसऱ्यास हात लावू देण्यास ती राजी नसते! बुद्धी राष्ट्रसंघाच्या संघारामात बसून निःशस्त्रीकरणाची सुरस चित्रे रंगविते; पण भावनेची मंथरा तिच्या कानात तत्काळ कुजबुजते की, ही तुझी मनोमय चित्रे कारखान्याच्या बाहेर दर्शनी मांड आणि आत मात्र दारूगोळ्याचा प्रचंड मांड तयार ठेव!

आनंद आणि सुख यांची कल्पना स्वामित्व-भावनेच्या छायेखाली इतक्या शतकानुशतके वाढत आलेली आहे की स्वामित्व-भावनेच्या बाहेर निर्लोभ, निःस्वार्थी सुखाचे जग असू शकेल याच्या कल्पनेचे वारेही तिला क्वचितच लागते.

पण या बाहेरच्या जगाच्या हवेची शुद्ध शीतल झुळूक केव्हा ना केव्हा

तरी अनुभवाला येतेच येते.

आनंदाचे–सात्त्विक, निर्मळ, निरतिशय आनंदाचे–काही विषय असेच आहेत की, ज्यांच्यापर्यंत स्वामित्वभावनेचे पाश पोहोचू शकतच नाहीत. तेथे स्वामित्वाच्या भावनेला गवसणी घालून निर्लोभ अंतःकरणानेच त्यांचा सौंदर्यास्वाद घ्यावा लागतो. पण त्या आस्वादाची माधुरीही तशीच 'सुधातः स्वादीया' व अवीट असते. आकाशाचा अफाट गोल हा असाच निर्भरानंदाचा एक अखंड ठेवा नाही काय ? नभोमंडलातील ती रेशमी इंद्रधनुष्ये, तो विद्युल्लतेचा जरतारी नाच, ती उदयास्तकालीन अवर्णनीय रंगसंपत्ती आणि तो सर्वत्र भरून राहिलेला कोमल, स्निग्ध नीलिमा ही अनंत आनंदाची अमर्याद खुली भांडारे होत. कोणत्याही सत्ताधीशाला त्यांच्यावर आपल्या स्वामित्वाच्या मालकीची मोहोर ठोकता येणार नाही.

पण स्वामित्व नाही म्हणून या विश्वसौंदर्यापासून मिळणारा आनंद उत्कटत्वात रतिभर तरी कमी असतो ? छे ! उलट जास्तच. स्वत्वाचा अर्धवट विसर पडल्याशिवाय आनंदाला उत्कटताच येत नाही. आनंदाच्या उत्कटक्षणी आस्वेता हा आस्वादविषयाशी तद्रूप झालेला असतो. फुलपाखरांप्रमाणेच पुष्पात गुंतून राहिलेला असतो. मग स्वामित्वाच्या भावनेस कोठला थारा ? सूर्याचे स्फूर्तिपद उर्जस्वल तेज, गिरिनिर्झरांचे मंजुळ संगीत, सागराचा गंभीर घोष, पवनाचा शीतल जीवनदायी स्पर्श, हे आनंदाचे अखंड झरे होत. कोणत्या सम्राटाच्या कोणत्या जमादारखान्यात तुम्ही त्यांना कोंडणार ? रात्रीच्या प्रशान्त समयी अन्तरालाच्या प्रांगणात तारकारत्नांचा नुसता सडा पडलेला असतो. कोणीही डोळे भरून त्यांचा तेजस्वी चमचमाट पाहावा आणि धन्य व्हावे. पण त्यांतील एक तरी हिरकणी उचलून तुमच्या लोखंडी पेटीतील अंधारात दडवून ठेवता येईल काय ? अधूनमधून आकाशातील एखादी हिरकणी निखळून भूमीवर येते, पण तेथे स्वैरसंचार करणाऱ्या स्वामित्वबुद्धीच्या लोभी हातात आपण पडू या भीतेने जणू पृथ्वीवर येताच पाषाणवत होऊन काळीठिक्कर पडते ! पण निःस्वार्थ, निर्लोभ, वृत्तीने तारकांचे सौंदर्यनिरीक्षण करीत बसलात तर प्रहरान् प्रहर केव्हा गेले याचे भानही राहणार नाही.

आणि या आनंदाचा आणखी एक विलोभनीय विशेष हा की, या आनंदाचे सेवन असंख्य लोकांनी एकसमयावच्छेदे करून करावे. त्याला संख्येची

मर्यादा नाही, स्थलाची नाही वा कालाची नाही.

सृष्टीमध्ये अवीट आनंदाचे हे विषय जसे आयतेच सिद्ध आहेत, तसे नवीन निर्माण करण्याची अलौकिक शक्तीही मानवांस लाभलेली आहे. ती म्हणजे काव्यादी ललितकलांना जन्म देणारी प्रतिभा. तिच्या साहाय्याने केवळ आनंदैकघन असे स्वतंत्र विश्वच प्रतिभावानांनी निर्माण केले आहे. यात कोणासही मज्जाव नाही काव्यसृष्टीत कोणीही मनसोक्त विहार करावा. व्यास-वाल्मीकिंची छांदोबद्धवाणी एकदा अवतीर्ण झाली की पिढ्यान्-पिढ्यांनी तीतील रसास्वाद लुटीत राहावा. स्वामित्वबुद्धीने एकट्याचा म्हणून उपभोगिला जाणाऱ्या आनंदाला खजील करणारा आनंद असेल तर तो हा काव्यादी ललितकलांचा. स्वामित्वाच्या संकुचित भावनेचा स्पर्श तर याला सहन होत नाहीच; पण याचे सेवन करणारे सहकारी जितके अधिक तितका तो अधिकच खुशीत येतो. नाटकाच्या प्रयोगाला किंवा गाण्याच्या मैफलीला तुम्ही कधी एकलकोंडे जाल ? तसे जाल तर त्यातील आनंद हिरमुसला होईल, फुरंगटेल, फुलणार नाही. उलट समानवृत्ती, सहृदय असे जितके रसिक तुम्ही एकत्र जमाल तितका आनंद अधिकाधिक लज्जतदार होत जाईल.

ही निःस्वार्थी आनंद सेवन करण्याची आवड जितकी वाढेल तितकी समाजात सुखशांती नांदू लागेल.

मात्र या निःस्वार्थ आनंदाच्या केवळ उपदेशाने आजच्या समाजाच्या हाडीमाशी खिळलेली स्वामित्वबुद्धी निखळून पडेल अशा भोळसट भावनेला थारा देण्यात अर्थ नाही. आजच्या स्वामित्वबुद्धीने अन्नाच्छादनासारख्या जीवनास अत्यावश्यक अशा वस्तूही आपल्या कुजट कोठारात गाडून टाकल्या आहेत. त्या तेथून बाहेर काढून कंगाल कुणब्याच्या कणगीत आणून सोडावयाच्या, तर असल्या वस्तू निर्माण करणारे कारखाने हे राष्ट्राच्या मालकीचेच करावे लागतील. अणि आजची स्वामित्वबुद्धी या समाजसत्तावादी प्रयोगाला सुखासुखी तयार न झाली तर—आणि तशी ती क्वचितच होईल—संघटनेला तिच्यापुढे उभी करून, संघटनेकडून तिला दटावून आपल्या हातातील सत्ता सोडण्यास भाग पाडावे लागेल.

पण समाजसत्तेच्या प्रयोगाने आर्थिक स्वामित्वाचा प्रश्न सुटल्यावरही आणि तो आधी सुटलाच पाहिजे, स्वामित्वबुद्धी सर्वस्वी लोपेल असे नाही. समाईक

मालकीच्या तत्त्वावर समाजाची पुनर्घटना केल्यावरही सुंदर स्त्रिया या समाईक मालकीच्या व्हाव्या ही प्लेटोची सूचना आजचा कोणताही समाजवादी मान्य करणार नाही. स्त्री ही मालमत्ता होय अशी समजूत प्लेटोच्या काली रूढ होती म्हणूनच ही मालमत्ता समाईक करावी अशी धाडसी सूचना प्लेटो मांडू शकला. पण स्त्री ही समाजाची स्वतंत्र घटक आहे हे मान्य केल्यावर तिच्यावर समाईक का होईना पण मालकी असावी ही कल्पनाच फोल ठरते. समाजसत्ताक समाजामध्येही सौंदर्यशालिनी स्त्रिया किंवा देखणे पुरुष यांचे साहचर्य थोड्यांनाच लाभेल. तीच गोष्ट कीर्तीची व सत्तेची अथवा अधिकाररूढत्वाची. समाजाची सर्व सत्ता व मत्ता ही तात्त्विकदृष्ट्या समाईक मालकीची झाल्यावरही समाजाचे व्यवहार चालविण्याकरिता दहांनी काम करावे व एकाने त्यांना कामे समजावून द्यावीत व देखरेख करावी असले प्रकार राहणारच; व जो देखरेख करणार त्याचा दर्जा व वेतन ही तात्त्विकदृष्ट्या समान लेखली गेली तरी त्याला थोडा अधिक मान मिळणे हे अपरिहार्यच होईल. शिवाय देखरेख करणाऱ्याच्या जागा संख्येने कमी असल्याने त्या थोड्यांनाच मिळू शकतील. योग्यता असताही पुष्कळांना त्या वस्तुगत्याच मिळू शकणार नाहीत. अशा सर्व ठिकाणी विलोभनीय वाटणाऱ्या या वस्तूंकडे खेळकर वृत्तीने निःस्वार्थानंदसेवनाच्या दृष्टीने पाहण्यास शिकले तरच समाजात सुखशान्ती नांदेल.

# ३

# ध्येयवादी

## ग. त्र्यं. माडखोलकर

सृष्टीत जी स्थित्यंतरे नेहमी घडून येतात, त्यांची विकासवादाच्या अनुषंगाने संगती बसविण्याचा उद्योग शास्त्रज्ञांकडून सदैव होत असतो. परंतु काही स्थित्यंतरे इतकी विलक्षण असतात की, शास्त्रज्ञांनाही त्यांची उपपत्ती लावणे अशक्य होते. कारण शास्त्रज्ञ झाले, तरी तेही सतत आलेल्या अनुभवांच्या आधारावरच सिद्धान्तांची उभारणी करीत असतात. पण मनुष्याचा अनुभव हा स्वभावतःच इतका संकुचित असतो की, त्याच्या अनुरोधाने सृष्टीतील सर्व घडामोडींचे रहस्य उकलणे प्रायः अशक्यच आहे. हाच न्याय मानवी समाजात वारंवार होणाऱ्या क्रांत्यांनाही लागू पडतो. एखादी गोष्ट घडून गेल्यावर तिच्या कारणांची मीमांसा करणे फारसे कठीण नाही. म्हणूनच, जगात आजवर ज्या क्रांत्या झाल्या त्यांच्या कारणांची परंपरा इतिहासकारांनी बहुधा बिनचूक दाखविलेली आढळते. विभूती एकदा निर्माण झाल्यावर, तिचा अवतार व्हावयाला अनुकूल परिस्थिती आधीच तयार झाली होती, हे सहज सिद्ध करता येते. तथापि विभूतीचे अवतारकार्य हा विकासाचा परिणाम आहे, हे जरी क्षणभर मान्य केले, तरी विभूतीच्या कार्यात तिच्या अंतःस्फूर्तीलाही तितकेच महत्त्वाचे स्थान आहे हे विसरून चालणार नाही. पुष्पाचे सौंदर्य आणि सुवास यांचा परिपोष व्हावयाला सूर्यप्रकाशाइतकाच वृक्षाचा स्वभावधर्मही कारण होत असतो. काही विभूतींच्या चरित्रांत असा चमत्कार दिसून येतो की, त्यांच्या कर्तृत्वाचे चीज तत्कालीन परिस्थितीत मुळींच होत नाही. काल हा विभूती निर्माण करितो हे जितके खरे, तितकेच विभूती कालाला निर्माण करिते, हे सुद्धा खरे आहे. नाही तर ज्याच्या धर्माचा स्वीकार आज अर्ध्याअधिक जगाने केला आहे, त्या खिस्ताला सुळावर चढवण्याचा प्रसंग का आला असता? बुद्धाच्या धर्माचा प्रसार त्याच्या डोळ्यांदेखत ज्याप्रमाणे सर्व हिंदुस्थानभर झाला, त्याप्रमाणे खिस्ताच्या

धर्माचा प्रसार का झाला नाही ? त्याला काल अनुकूल नव्हता, हेच खरे; व म्हणूनच प्रतिकूल काळाच्या क्रोधाला बळी पडण्याचा दुर्धर प्रसंग ख्रिस्तावर ओढवला.

परंतु काही विभूतींचा काळ कधीच निर्माण होत नाही. किंबहुना काळाची अननुकूलता त्यांच्या अनन्यसाधारण योग्यतेचेच एक लक्षण मानता येईल. अनुकूल किंवा प्रतिकूल काळाची कदर कोणाला? ज्यांना यशाची अपेक्षा असेल त्यांना. पण ' निराशेचा गाव दिधला आम्हांसी ' हीच ज्यांची भावना त्यांना काळ अनुकूल असो अगर नसो, आपले कार्य पूर्ण केल्याशिवाय ते राहत नाहीत. मग ते कार्य जितके निष्काम असते तितकेच निष्फळ ठरले, तरी चिंता नाही. अशा विभूतींना ' ध्येयवादी ' म्हणतात. त्यांच्या कार्याला ज्याप्रमाणे काळाच्या अनुकूलतेची अपेक्षा नसते, त्याचप्रमाणे काळ त्याला मर्यादाही घालू शकत नाही. त्यांचे कार्य त्रिकालाबाधित, सनातन असते. विनाश हा काळाचा कायदा आहे. तथापि ध्येयवादी विभूतींचे कार्य अविनाशी असते. त्याला ऐतिहासिक स्वरूप कधीच येत नाही. शास्त्रज्ञांचे सिद्धान्त विनाशी असतात. संशोधनाच्या प्रगतीबरोबर नवीन सिद्धान्त प्रस्थापित होताच, जुन्या सिद्धान्तांचे फक्त ऐतिहासिक महत्त्व तेवढेच शिल्लक राहते. मानवी अनुभवावर अधिष्ठित झालेले शास्त्रज्ञांचे सिद्धांत मनुष्याच्या शरीराप्रमाणेच मर्त्य असतात. मनुष्याचा आत्मा जसे वारंवार नवे देह धारण करितो, तशी या अनुभवात्मक ज्ञानाला सिद्धान्तांची नित्यनवीन शरीरे धारण करावी लागतात. त्या ज्ञानाचा उन्मेष विकासाच्या तत्त्वाला अनुसरून होतो. परंतु ज्या ज्ञानाचा उदय अंतस्फूर्तीच्या उद्रेकातून झालेला असतो, त्याला मात्र विनाश किंवा विकास यांपैकी कोणत्याच उपाधीचा उपसर्ग होत नाही. जगातील सर्व ज्ञानाचा उगम अनुभव आणि अंतःस्फूर्ती यांच्यापासून झाला आहे. त्यामुळे मानवजातीचे जे-जे गुरू आजपर्यंत होऊन गेले, त्यात दोन प्रकार दृष्टीस पडतात. जॉन्सन, रामदास, मोरोपंत, लॉक, मिल हे अनुभवाच्या अनुरोधाने उपदेश करणारे गुरू. त्यांचे वाङ्मय आणि तत्त्वज्ञान यांत अंतस्फूर्तीचे जीवन अगदी कमी. सॉक्रेटिस, ख्रिस्त, तुकाराम, माझिनी यांची तत्त्वसृष्टी अंतःस्फूर्तीच्या उद्रेकातून आविर्भूत झाली असल्यामुळे मानवजातीला स्फूर्ती देणाऱ्या जीवनाचा लाभ त्यांच्या तत्त्वज्ञानापासून सतत होत असतो. हे ध्येयवादी आंतरिक प्रेरणेने बोलतात. त्यांचे कार्य

स्वयंस्फूर्त असते; व त्यामुळे समाजाला त्यांचे तत्त्वज्ञान कधीच लवकर मान्य होत नाही. कोणताही नवीन विचार ग्रहण करिताना समाज कमालीची खळखळ करितो. मनुष्याचा स्वभाव जात्याच इतका दुरभिमानी आणि दुराराध्य आहे की, त्याच्या अनुभवाच्या कक्षेपलीकडील कोणतीही गोष्ट सुखाने सांगून त्याला पटत नाही. उलट सांगणारालाच तो मूर्ख ठरवितो. आयुष्याचे चार दिवस मजेने घालविण्याचे सोडून विचार करण्याच्या फंदात कोण पडतो? जगातील प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर सुखाशेचे चांदणे पडलेले पहावे, हीच त्याची इच्छा. ढगांची उदास छाया पडलेल्या स्तब्ध सरोवराप्रमाणे दिसणारी विचारी मनुष्याची गंभीर मुद्रा त्याला बघवत नाही. सुखलोलुप आणि सत्ताधारी लोकांना विचारवंताविषयी वाटणारा हा विद्वेष 'He thinks too much : such men are dangerous.' या उद्गारात शेक्सपियरने अगदी भेदक शब्दांनी व्यक्त केला आहे. जिनोवाच्या सुभेदाराने माझिनीच्या पित्याजवळ त्याच्याविषयीं असे उद्गार काढले होते की, 'हा तुमचा मुलगा रात्री-अपरात्री एकटाच विचार करीत भटकत असतो, हे त्याचे लक्षण काही ठीक नव्हे. एवढ्या वयात हा विचार तरी कसला करितो? तरुण मुलांनी असे एकसारखे विचारात गढून राहणे मला इष्ट वाटत नाही!"

ध्येयवादी विभूतींविषयी समाजाची भावना सामान्यतः याच प्रकारची असते. त्यांतही ज्यांचा स्वार्थ समाजातील रूढींच्या शाश्वतीवर अवलंबून असतो, त्या स्थितिप्रतिनिविष्टांना तर ध्येयवादी हा आपला शत्रूच वाटतो. जगातील सत्ताधारी वर्ग आणि ध्येयवादी यांचे हे शत्रुत्व जगाच्या अगदी आरंभापासून चालत आले आहे. आणि सुधारणेची जरी आता परमावधी झालेली असली, तरी ख्रिस्ताला सुळावर चढविण्यात जो क्रूरपणा तत्कालीन समाजाने दाखविला, त्याचा आज लोप झाला आहे, असे मानण्याचे काहीच कारण नाही. साम्राज्यवादी राष्ट्रांकडून क्रांतिकारकांचा जो छळ सध्या होत आहे, तो कमी क्रूरपणाचा असतो, असे कोण म्हणेल? किंबहुना, सुधारणेची सर्व शस्त्रास्त्रे उपयोगात आणून, क्रांतीची बीजे खणून काढण्याचा उद्योग प्राचीन राष्ट्रांना इतक्या अहमहमिकेने खचित करिता आला नसेल. सामान्य क्रांतिकारकांना फक्त सत्ताधारी वर्गाशीच झगडावे लागते. परंतु ज्याला लोकांच्या विचारांतच क्रांती घडवून आणावयाची असते, त्याला दडपून टाकण्याकरिता सर्व

समाजाची प्रतिकारशक्ती एकवटून उभी राहते. सीझरच्या सत्तेविरुद्ध राजद्रोहाचे शब्द तोंडातून काढल्याबद्दल रोमन सुभेदाराने खिस्ताला फार तर तुरुंगात डांबले असते. पण खुद्द खिस्ताच्या देशबांधवांना त्याच्या राजद्रोहापेक्षा प्रचलित धर्माविरुद्ध त्याने पुकारलेल्या बंडाचीच चीड अधिक आली; व रोमन सुभेदार ' नको, नको, ' म्हणत असता खिस्ताच्या हत्येचे पाप स्वखुषीने आपल्या शिरावर घेऊन यहुदी लोकांनी त्याला सुळावर चढविले. माझिनीबद्दल राज्य-सत्तेचा पुरस्कार करणाऱ्या इटलीतील देशभक्तांना जितका द्वेष वाटे, तितका कदाचित ऑस्ट्रियन सरकारलाही वाटला नसेल.

समाजाच्या या विरोधाशी झगडावयाला जो मनाचा बेगुमानपणा लागतो, त्यालाच वीरवृत्ती म्हणतात. नुसते शौर्य म्हणजे वीरवृत्ती नव्हे. जगात जितके राज्यसंस्थापक किंवा बंडखोर होऊन गेले आहेत, तितक्यांच्या ठिकाणी शौर्य बहुधा भरपूर होते. पण तेवढ्याच एका कारणामुळे त्यांना ' वीर ' ( Hero ) कोण म्हणेल ? पुष्कळ पाणी असल्यामुळेच जर पावित्र्य येते, तर ते कोणत्याही प्रचंड जलाशयाला आले असते. साहसी वृत्तीचे विशुद्ध तेज ज्यांच्या ठिकाणी आविर्भूत होते, त्यांनाच ' वीर ' म्हणतात. परंतु प्रत्येक वीर हा ध्येयवादी असतोच, असे नाही. गॅरिबॉल्डी हा वीर होता, तरी ध्येयवादी नव्हता, पण ध्येयवाद्याच्या ठिकाणी मात्र वीरवृत्तीचा आत्यंतिक उत्कर्ष झालेला दृष्टीस पडतो. त्याच्या ठिकाणी वीराच्याच काय, पण तत्त्वज्ञ आणि कवी यांच्याही आत्मिक गुणांचा उदात्तपणा एकवटलेला असतो. तत्त्वज्ञानाची तपश्चर्या सत्याच्या साक्षात्काराकरिता चाललेली असते; वीर स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सर्वस्वावर लाथ मारतो, व कवीच्या स्फुरणशील प्रतिभेला सौंदर्यदर्शनाचे वेड लागलेले असते. तत्त्वज्ञाचा सत्यशोधनाचा प्रयत्न परिणामी जरी सर्व मानवजातीच्या निःश्रेय-साला कारण होत असला, तरी मूलतः मात्र तो सर्वस्वी आत्मैकनिष्ठ असतो. वीराची स्वातंत्र्यभक्ती कितीही उज्ज्वल असली, तरी सत्याची चाड त्याला असतेच, असे नाही. शिवाय सौंदर्याचे संस्कार ग्रहण करावयाला मनाची जी सूक्ष्म-तरल वृत्ती अवश्य असते, तिचाही त्याच्या ठिकाणी प्रायः अभावच असतो. कवीला लागलेले सौंदर्याचे वेड तर इतके उत्कट असते की, त्यामुळे त्याला सत्यासत्याचेच काय, पण सदभिरुचीचेही प्रसंगी भान राहात नाही. बर्नार्ड शॉ यांनी म्हटल्याप्रमाणे सौंदर्याच्या संवर्धनापुरतीच त्याच्या ठिकाणी

सदसद्विवेकबुद्धी शिल्लक राहिलेली असते. त्यांनी आपल्या 'द डॉक्टर्स डायलेमा' ( The Doctor's Dilemma ) या नाटकात रेखाटलेले चित्रकाराचे स्वभावचित्र हा कलावंताप्रमाणेच कवीच्याही मनोरचनेचा एक नमुनेदार मासला आहे. शेलीसारखा सत्त्वशील सौंदर्योपासक फार विरळा. ज्याप्रमाणे सत्यनिष्ठा ही जितकी कल्याणप्रद तितकीच कठोर असते, त्याप्रमाणे सौंदर्याचें वेडही जितके आनंददायक तितकेच उन्मादक असावे, असे दिसते. एरवी, गटे किंवा ऑस्कर वाइल्ड यांच्यासारख्या प्रतिभाशाली कवींच्या नैतिक अधःपतनाची मीमांसा कशी करावयाची ? किंबहुना, No artist has ethical sympathies ('कलावंतांना नैतिक भावनाच नसतात,') हा ऑस्कर वाइल्डचा सिद्धान्त, निदान कवींच्या पुरता तरी, खरा मानणे अगदीच गैर होणार नाही.

परंतु ध्येयवादी हा जितका सत्यनिष्ठ तितकाच सौंदर्यलुब्ध, आणि जितका सौंदर्यलुब्ध तितकाच स्वातंत्र्यभक्त असतो. सत्याशिवाय सौंदर्याला व सौंदर्याशिवाय स्वातंत्र्याला अस्तित्व नाही, अशी त्याची श्रद्धा असते. स्वातंत्र्य हे साधन आहे, साध्य नव्हे; सत्याचे संरक्षण व सौंदर्याचे संवर्धन हे स्वातंत्र्याचे ध्येय आहे; आणि व्यक्तीला काय अगर राष्ट्राला काय, स्वातंत्र्य जर नसेल, तर हे ध्येय साध्य करून घेता येणार नाही, अशी त्याची श्रद्धा असल्यामुळेच तो स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी आत्मार्पण करायला प्रवृत्त होतो. देशाच्या स्वातंत्र्याकरिता झगडणारा वीर आणि ध्येयवादी यांच्यांत जर कोणता अत्यंत महत्त्वाचा फरक असेल, तर तो हाच. माझिनी व गॅरिबाल्डी यांच्या चरित्रांत हा फरक उत्तम रीतीने व्यक्त झाला आहे. वैयक्तिक स्वार्थांचा तर त्याच्या ठिकाणी पूर्ण लोप झालेला असतोच; पण राष्ट्रीय स्वार्थाचीही भावना त्याला सहन होत नाही. कारण मानवी कल्पनेचे विराट स्वरूप त्याच्या ठिकाणी प्रकट होत असते. इटालीच्या स्वातंत्र्याकरिता माझिनीने इतकी धडपड केली केली, पण ती कोणत्या हेतूने ? नुसत्या इटालीचे स्वातंत्र्य त्याला नको होते. 'रोम सर्व जगाला स्वतंत्र करील,' अशी त्याची श्रद्धा होती; व या श्रद्धेवरच त्याचा विश्वात्मक राष्ट्रधर्म अधिष्ठित झाला होता. पण माझिनीच्या या श्रद्धेची कशी संभावना झाली ? संकुचित दृष्टीच्या समकालीन देशभक्तांना त्याच्या या ध्येयवादाविषयी कधीच फारसा आदर वाटला नाही; व व्यवहारचतुर मुत्सद्यांनी

तर त्याला मूर्खांतच काढले. परंतु त्यामुळे माझिनीची योग्यता कमी मानावयाला कोण तयार होईल? आकाशात अतिशय उंचावर भ्रमण करणारा गरुड कितीही भव्य असला, तरी भुईवर खुरडणाराच्या कोत्या दृष्टीला तो क्षुद्रच दिसतो; व आकाशात कितीही उंच भराऱ्या या गरुडाने मारल्या, तरी घरटे बांधण्याकरिता अखेर त्याला भूतलच गाठावे लागेल, अशी ग्वाही तो आपल्या मनाला दिल्याशिवाय राहत नाही. पण घरटे बांधण्याकरितां गरुड आकाशातून खाली उतरला, तरी हिमगिरीच्या रजतशुभ्र शिखरांचाच तो आश्रय करितो, जमिनीवरील झाडाझुडुपांकडे ढुंकूनही पाहत नाही, हे या व्यावहारिकांच्या गावीही नसते. ध्येयवादी व्यवहाराच्या भूमिकेवर उतरला, म्हणजे व्यवहारालाही विशुद्ध स्वरूप दिल्याशिवाय राहत नाही. त्या दृष्टीने इंग्लंडच्या शतकानुशतके टिकलेल्या साम्राज्यापेक्षा माझिनीच्या उण्यापुऱ्या वर्षांच्या आतच बुडालेल्या रोममधील लोकसत्ताक राज्याला जगाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कारण शक्याशक्यतेच्या विचारांनी बावरून गेलेल्या मानवी बुद्धीला इतिहासातील असले अनुभव बघूनच आपल्या उद्धाराची काही आशा वाटते. माझिनीचा ध्येयवाद तत्कालीन समाजाला वेडेपणाचा वाटला; पण त्याचा विश्वात्मक राष्ट्रधर्म आज अखेर समाजसत्तावादाच्या विकसित स्वरूपात जगाने मान्य केलाच की नाही? आज ज्याचा अशक्य म्हणून उपहास केला, त्याचाच उद्या अभिमानाने अंगीकार करावयाचा, ही जगाची नेहमीचीच पद्धत आहे. आणि ध्येयवादी जर शक्याशक्यतेच्या आवर्तात सापडून संशयात्मा झाला, तर मानवजातीचे पाऊल कधीच पुढे पडणार नाही.

शक्याशक्यतेचे हे विचार स्वार्थामुळे सुचत असतात. ज्याला केवळ यशाचीच अपेक्षा असते, त्याची बुद्धी शक्याशक्यतेच्या विचाराने वारंवार कुंठित होते. पण ध्येयवादी कशाचीच अपेक्षा करीत नाही. यशाची अपेक्षा त्याला नसते, असे नव्हे; परंतु अनुकूल काल येईपर्यंत वाट पाहण्याइतका धीर मात्र त्याला मुळीच नसतो. एक प्रकारच्या अंतःस्फूर्तीने, आंतरिक प्रेरणेने त्याच्या कर्तृत्वाला चलन मिळते; व त्यामुळे, यश मिळो अगर न मिळो, अवज्ञेची किंवा आदराची पर्वा न करिता, तो आपले विचार बोलून जातो. आणि त्यातच त्याचा अलौकिकपणा आहे. विचारांच्या समाधीत बुद्धी विलीन झाली, म्हणजे त्याच्या उघड्याच डोळ्यांपुढे स्वप्नसृष्टीचा विकास होतो; व

म्हणूनच त्याला 'द्रष्टा' (seer) म्हणतात. तत्त्वज्ञाची दृष्टी भूतार्थांचे–भूतकालीन अनुभवांचे–रहस्य शोधीत असते. मुत्सद्दी फक्त पायांपुरते पाहतो, वर्तमानापलीकडे त्याची दृष्टी जातच नाही. पण ध्येयवाद्याला मात्र मानवजातीच्या उन्नतीची स्वप्ने सदैव पडत असतात; व ती स्वप्ने बोलून दाखविण्याचे धाडस तो करितो, म्हणून लोक त्याला 'भविष्यवादी' (prophet) म्हणतात. पण या भविष्यकथनाबद्दल त्याला केवढे घोर प्रायश्चित्त भोगावे लागते! यज्ञ केल्याशिवाय दिव्य शस्त्रे किंवा सामर्थ्य प्राप्त होत नाही, अशी पूर्वी कल्पना होती. ज्या ध्येयांमुळे मानवी जीविताला पावित्र्य आणि पूर्णता येते, त्यांची प्राप्तीसुद्धा यज्ञाशिवाय होत नसावी काय? नाही तर माझिनीसारख्या राष्ट्र-धर्माच्या प्रवर्तकाला जन्मभर हद्दपारी का भोगावी लागली असती? आणि ख्रिस्तासारख्या विश्वधर्माच्या प्रवर्तकाला काट्यांचा मुकुट घालून सुळावर मरण का आले असते? अखिल मानवजातीच्या पापाकरिता एकट्या ख्रिस्ताने आत्मयज्ञ केला, याचा तरी अर्थ काय? गांधीजींचे वर्णन करिताना रवींद्र-नाथांनाही यज्ञाचीच उपमा सुचली होती. आणि खरोखरीच, जगात आजपर्यंत जे-जे ध्येयवादी होऊन गेले, त्यांची चरित्रे पाहिली, म्हणजे अद्याप आम्ही 'नरयज्ञा'चा त्याग केलेला नाही, असेच मनाला वाटते. पण त्याबद्दल दोष तरी कुणाला द्यावा? कारण जगाची धारणा यज्ञाशिवाय होत नाही, असे खुद्द भगवंतांनीच सांगितलेले नाही काय?

# ४

## जीवनातील करार

**पु. ग. सहस्रबुद्धे**

सरदार विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांच्याविषयी पुढील आख्यायिका प्रसिद्ध आहे. हैदरावर मोहीम चालू होती. त्या वेळीं मराठ्यांच्या छावणीच्या आसपास हैदराच्या काही टोळ्या हिंडत आहेत, अशी टेहळ्यांनी बातमी आणली. विठ्ठल शिवदेव लगेच घोड्यावर स्वार झाले आणि चार-पाचशे लोक बरोबर घेऊन त्या टोळ्यांना गारद करण्याच्या इराद्याने बाहेर पडले. छावणीच्या पलीकडे एक नदी होती. पण पावसाळा नसल्यामुळे तिला पाणी बेताचेच होते. फौजेने ती सहज ओलांडली व त्वरेने दौड करून तिने हैदराच्या टोळ्यांना गाठले. उभयपक्षी चकमक चालू झाल्यावर ध्यानीमनी नसता एकाएकी आकाशात ढग जमले व तासाभरात इतका पाऊस पडला की मधली नदी दुथडी भरून वाहू लागली आणि छावणीत परत येण्याचा मार्ग बंद झाला. त्या वेळीं त्यांची स्नानसंध्या झाली नव्हती. हैदराच्या टोळ्यांना पिटाळून लावू व घटका दोन घटकांत परत येऊ, असा त्यांचा अदमास होता; पण पावसामुळे सगळाच घोटाळा झाला. शिवाय मराठ्यांचा येण्याचा मार्ग बंद झालेला पाहून हैदराच्या आणखी टोळ्या जमू लागल्या, आणि त्या दिवशी मोठीच धुमश्चक्री झाली. सरदारांचे वय त्या वेळीं ७८ वर्षांचे होते. एकादशीचा दिवस. स्नान झाल्यावाचून तोंडात पाणीही घालावयाचे नाही, मग फराळ तर लांबच राहिला! त्या दिवशी छावणीत परत यावयास मध्यरात्र झाली. त्यानंतर विठ्ठल शिवदेवांनी स्नान केले, आणि नेहमीचे जयजाप्य उरकून मग फराळ केला.

विठ्ठल शिवदेवांप्रमाणेच जुन्या काळच्या अनेक लोकांविषयी या किंवा या तऱ्हेच्या गोष्टी आपण ऐकतो. हे लोक हा जो निग्रह करीत, हा जो करार त्यांच्या जीवनात दिसे, तो त्या काळाच्या धर्मबंधनांमुळे ते पाळीत, हे उघडच आहे. धर्माची अनुशासने, रूढी, कुलाचार यांवर त्या वेळी माणसांची दृढ

श्रद्धा असे, व त्यामुळे त्या परंपरेने आलेली व्रते कितीही कठोर व दुःसाध्य असली, तरी ती ते सहज आचरीत, व अजूनही क्वचित आचरतात, असे आपण पाहतो. सध्या आता विज्ञानयुगाच्या प्रगतीमुळे धर्मावरची श्रद्धा ढळलेली आहे. धर्मबंधनांची किंमत आता कोणी करीत नाही; आणि निग्रह करण्यास मानवी मनाला जुन्या पीठिकांकडून मिळणारे बळ नाहीसे झाले आहे.

मग त्या जागी कोणते नवे बळ आले आहे?

हाच प्रश्न आहे!

राज्यक्रान्ती झाल्यानंतर एक शासन उलथून पडते; आणि त्याच्या जागी दुसरे आले नाही, तर देशाची काय अवस्था होते ते चीन, ब्रह्मदेश इ. देशांच्या उदाहरणांवरून आपणांस कळून येतेच आहे. दृढ असे शासन नसल्यामुळे तेथे सर्वत्र बेबंदशाही, बजबजपुरी माजून राहिली आहे; आणि देशाचे जीवनच खुंटून गेले आहे. चांगले किंवा वाईट, कोठले तरी शासन हे समाजाच्या जीवनाला अवश्य आहे. समाजाच्या बाह्य जीवनासंबंधी हे जे सत्य तेच त्याच्या मानसिक जीवनाला लागू आहे. तेथे कोणते तरी शासन अवश्य आहे. मागल्या काळीं धर्माचे, पापपुण्याचे शासन होते. आता आजच्या काळीं शासन कोणते आहे?

समाजाची प्राथमिक अवस्था ही मनुष्याच्या आयुष्यातील बालपणासारखी असते. त्या वेळी आपले हिताहित कळण्याची पात्रता जशी लहान मुलांना नसते, तशीच प्राथमिक अवस्थेत समाजालाही ती नसते. त्यामुळे समाजाच्या नेत्यांना जी जी बंधने मानवाच्या प्रगतीला अवश्य वाटतात, ती समाजावर लादावी लागतात; आणि ती केवळ पाशवी दंडसत्तेने लादण्याऐवजी धर्म-कल्पनांची पुण्याई त्यांच्या मागे उभी केली की त्यांचे पालन त्या काळीं कसोशीने होत असे. म्हणूनच ' इष्टं धर्मेण योजयेत्, ' असे मागे धोरण असे. पण समाज जसजसा जास्त प्रगत होईल, जास्त सुसंस्कृत होईल, तसतशी अशी बंधने लोकांवर लादण्याची आवश्यकता कमी झाली पाहिजे. किंबहुना, माझ्या मते हीच प्रगतीची व्याख्या होय. पाशवी दंडसत्ता किंवा परलोकातील शिक्षेचे भय यांची आवश्यकता राहिली नाही, आणि शास्त्र, इतिहास, तर्क यांच्या साहाय्याने जे समाजाला कल्याणकारक ठरेल, ते स्वतःहून पाळण्याची मानवाच्या अंगची प्रवृत्ती वाढली की तो मानव व त्याचा तो समाज प्रगत झाला, सुसंस्कृत

झाला, प्रौढ झाला, असे म्हणावे. म्हणजे धर्मप्रणीत पापपुण्याची भीती ही शक्ती जाऊन, अनावश्यक ठरून, तिच्या जागी विवेक ही शक्ती उदय पावली की मानव सुसंस्कृत झाला व त्याचा समाज प्राथमिक अवस्थेतून निघून प्रौढ अवस्थेत आला, असे म्हणण्यास चिंता नाही.

पण समाजाची कोणतीही अवस्था असली, तरी मानवाला निग्रह, संयम, आत्मदंडन करण्यास साह्य करील, अशा कोणत्या तरी शक्तीचे अधिराज्य त्याच्या चित्तावर असले पाहिजे, हे मात्र निर्विवाद आहे.

आज आपल्या समाजापुढे हा मोठ्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे; आणि त्याला आपण काय उत्तर देऊ, तो आपण कसा सोडवू, यावर आपले यशापयश अवलंबून आहे. आपल्या समाजातील व्यक्तींच्या मनावर कसले अधिराज्य आहे ? धर्मबंधनांचे नाही, हे तर निश्चित आहे. एकादशी आहे, म्हणून मध्यरात्रीपर्यंत आचमनसुद्धा घेऊ नये, आणि तशाच स्थितीत दिवसभर झुंजत राहावे, ही निष्ठा समाजात शेकडा एकाच्याही ठायी राहिली नाही. ती राहिली नाही, यात दुःख करण्याजोगे काही आहे, असे मला वाटत नाही. पण ती निष्ठा गेली, तर तिच्या ठायी दुसरी कोणती तरी आली पाहिजे, ही चिंता समाज करीत नाही, हे पाहून मात्र भीती वाटू लागते, हे खरे आहे.

आमच्या समाजात अशी कोणती निष्ठा आज आहे, असे वाटत नाही. धर्मनिष्ठा लुप्त झाली आहे व विवेकनिष्ठा अजून उदय पावलेली नाही, अशा अवस्थेत आज आम्ही आहो. आमच्या मनावर आज अधिराज्य कसलेच नाही

परमार्थाचे महत्त्व कमी होताच त्या ठायी राष्ट्रनिष्ठा तितक्याच तीव्रतेने यावयास पाहिजे. तरच जीविताला काही पीळ, काही करार निर्माण होईल. पण तसे झाल्याचे आमच्या वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात दिसत नाही. स्वभाषेचा अभिमान हे राष्ट्रनिष्ठेचे एक प्रमुख अंग आहे. पण आता स्वातंत्र्य आल्यावरही पूर्वी इंग्रजी अमलात जितकी आणि जशी स्वभाषेची उपेक्षा लोक करीत, तशी आजही करीत आहेत. सार्वजनिक सभांतून मराठी न बोलण्याची जी क्षुद्र कारणे मागे सांगितली जात असत, तीच सांगून अजूनही वक्ते इंग्रजीत बोलतात, व श्रोते ऐकून घेतात. दहा हजारांच्या समुदायात चार-दोन मराठी न जाणणारे असले, की तेवढे कारण मातृभाषेच्या उपेक्षेस पुरे होते. पूर्वपरंपरेचा अभिमान, स्वदेशीचे व्रत यांविषयी अशीच शिथिल वृत्ती सर्वत्र दिसून

येते. आमच्या बुद्धीला आग्रह असा दिसतच नाही.

मातीच्या गोळ्याने कोठल्या तरी विशिष्ट आकाराचा आग्रह धरल्यावाचून त्याला मूर्तीचे पद प्राप्त होणार नाही. जसा धक्का बसेल, तसा तो गोळा मुरडू लागला, तर त्याला लाथांखेरीज दुसरे काही मिळणार नाही. मी अमूकच आकार धारण करीन, असा आग्रह त्याने धरताच लोक त्याच गोळ्याला वंदन करू लागतात. मूर्ती व मातीचा गोळा यांच्यात अशा आग्रहाखेरीज दुसरा कोणताच फरक नाही. पण तो फरक म्हणजे जमीन-अस्मानाचा फरक आहे. मानवी जीवितासंबंधी हेच खरे नाही काय? एरवी माणूस हा मातीचा गोळा आहे धर्म, राष्ट्रीयत्व हे जे आग्रह त्याच्या बुद्धीला निर्माण होतात, त्यानेच त्याचे कर्तृत्व फुलून येते व त्याला श्रेष्ठ पदवी प्राप्त होते.

असे आग्रह आमच्या जीवनात नाहीत, एवढेच नव्हे, तर ही कल्पनाच आमच्या जीवनाच्या तत्त्वज्ञानातून लुप्त झाल्यासारखी दिसते. आमच्या शाळा व विद्यालये पाहा. विद्यार्थ्यांच्या मनोरचनेला कोरीव, रेखीव आकार उत्पन्न करण्याची पहिली जबाबदारी शाळांची आहे. आणि व्याख्या शिकवणे, नियम पाठ करून घेणे, पाठांतर करणे, सनावळी घोकून घेणे, यांनी ते संस्कार मुलांच्या मनावर होत असत. हल्लीच्या शिक्षणतज्ज्ञांचे व या संस्कारांचे वाकडे आहे. महाराष्ट्रात अशी एकही शाळा नाही, की जेथे विज्ञान, गणित, भूगोल यांतील व्याख्या मुलांनी पाठ केल्या पाहिजेत, अशी कसोशी केली जाते. 'असे का?' म्हणून विचारले तर मोठे उदार तत्त्वज्ञान सांगितले जाते! नुसत्या व्याख्या पाठ करण्यात अर्थ नाही! पण अर्थ समजून पाठ करण्यात तर अर्थ आहे ना? मग ते कोठे केले जाते? कोठेही नाही. आमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्थिती अशी आहे. अंध धर्मनिष्ठा गेली व डोळस विवेकनिष्ठा अजून फार दूर आहे. अर्थ समजल्यावाचून मुलांनी श्लोक पाठ करणे वाईट, म्हणून ते रद्द झाले; आणि अर्थ समजावून देऊन पाठांतर करून घ्यावयास अजून प्रारंभ व्हावयाचा आहे. व्याकरणाची कसोशी हे रेखीवपणा निर्माण होण्याचे दुसरे साधन आहे. पण शाळा-कॉलेजांतील जीवनातून व्याकरण हे अजिबात नष्ट होते की काय, अशी भीती आता वाटू लागली आहे. विद्यार्थ्यांच्या समोर अध्यापनासाठी उभे राहिले म्हणजे त्यांच्या व्याख्याशून्य, व्याकरणशून्य मनाची जाणीव होऊन आपण निर्गुण-निराकार परब्रह्मासमोर उभे आहोत की काय, असा भास होतो; आणि ही

काही हल्लीच्या शिक्षणातील चूक म्हणून नाही. शिक्षणशास्त्राचे हल्लीचे तत्त्वज्ञानच तसे आहे. एका शिक्षणसप्ताहात आदर्शपाठ झाल्यानंतर चर्चेच्या वेळी एका विख्यात शिक्षणतज्ञाने 'मुलांनी घरून अभ्यास करून यावा, अशी माझी मुळीच अपेक्षा नाही, त्यांची शिकण्याची इच्छा असली म्हणजे पुरे,' असे सांगितलेले मी ऐकले आहे. ही निराग्रही वृत्ती धन्य होय !

जे शाळेत तेच गृहजीवनात आहे. अमूक केल्यावाचून मी जेवणार नाहीत अमूक संपल्यावाचून मी झोपणार नाही, असा करार किती बालकांच्या जीवना, सापडेल ? रोज रामरक्षा म्हटल्यावाचून मी झोपणार नाही, ही निष्ठा गेली. तिच्या जागी 'रोज टाईम्समधील अग्रलेख तोंडपाठ केल्यावाचून मी झोपणार नाही,' ही नवी निष्ठा गोपाळराव गोखले यांनी निर्माण केली होती. पण ती जुनी व ही नवी या दोन्हीपैकी एकही निष्ठा सध्याच्या गृहजीवनात राहिलेली नाही. नियमित उठणे, नियमित स्नान करणे, नियमित नमस्कार घालणे या ज्या सवयी धर्मबंधनांमुळे मागे जडत व मातीच्या गोळ्याला आकार आणण्यास मदत करीत, त्या आता गेल्या. आता त्यांच्या जागी काय आले ? या सवयीची चेष्टा करणारे लघुनिबंध ! 'उशिरा उठण्याचे महत्त्व', 'आळशीपणाची कैफियत !' आणि हे निबंध दुसरी तिसरीला नेमण्याची रसिकता सध्याचे शिक्षणतज्ज्ञ प्रकट करीत आहेत.

धर्मबंधनांचा आपण सध्या निरोप घेत आहोत, घेतलाच आहे.पण त्याविषयीची एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. धर्मप्रणीत बंधनांइतकी कार्यक्षमता विवेकप्रणीत बंधनांत निर्माण करणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. रशियातील कम्युनिझमविषयी लिहिताना लॉर्ड केन्स, सिडने वेब्र यांसारखे महापंडितही कम्युनिझम हा दुसरा धर्मच आहे, असे आग्रहाने प्रतिपादितात. प्रा. लास्की यांनी या बाबतीत प्रकट केलेले विचार फारच उद्बोधक आहेत. सोव्हिएत रशियात कम्युनिझमवर लोकांची ऐकांतिक व अंध अशी निष्ठा आहे. याचे समर्थन करताना ते म्हणतात की, रशियात कम्युनिस्ट पक्षाला इकडचा पर्वत तिकडे उचलून ठेवावयाचा होता. वीस वर्षांच्या अवधीत त्यांना पाचशे वर्षांचे कार्य करावयाचे होते. इतके अलौकिक, दुःसाध्य कार्य साधण्यास जे बळ लागते, ते धर्मनिष्ठेवाचून येणे शक्यच नव्हते.

पंडितांच्या या मतांचा आपण विचार केला पाहिजे. जुनी अंध, तर्कशून्य

धर्मबंधने पुन्हा प्रस्थापित करावीत, असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. ती नष्ट झाल्याबद्दल मला क्षणमात्र दुःख होत नाही. पण मार्क्सवाद्यांसारख्या पूर्ण जडवादी लोकांना आपल्या समाजाची पुनर्घटना करण्यासाठी जे सामर्थ्य हवे होते, त्यासाठी त्यांना, अर्वाचीन काळच्या का होईना, पण धर्मनिष्ठेसारख्याच एका निष्ठेचा आश्रय करावा लागला, या घटनेचा अर्थ आपण दृष्टिआड करून चालणार नाही. समाजाच्या रोजच्या जीवनक्रमामध्ये, शाळा-कॉलेजांत, गृह-जीवनात, सार्वजनिक जीवनात जी नियंत्रणे, जी बंधने प्रस्थापित करावयाची, त्यांची विवेकशुद्धता अगदी लहान मुलांनासुद्धा दरवेळी पटली पाहिजे, पटवून देता आली पाहिजे, इतका जो डोळसपणाचा आग्रह आपण सध्या इंग्रजांच्या उदारमतवादाच्या संसर्गाने धरीत आहोत, तो घातक ठरल्यावाचून राहणार नाही. कोणत्याही समाजाला इतके विवेकनिष्ठ जीवन आचरता आलेले नाही, व येणे शक्य नाही. म्हणूनच कशाचा तरी आग्रह हा अवश्य असतो. कोणता तरी करार जीवनात अवश्य असतो. कोठे तरी माणसाने हटून बसणे अवश्य असते. कोणत्या तरी गोष्टी गृहीत धरून त्यांचा पीळ धरणे अपरिहार्य असते. त्यांची जी मूलतत्त्वे, त्यांच्या मागचे जे तत्त्वज्ञान, त्याची चौकशी पंडितांनी जागरूकपणे अखंड करीत राहावी. पण प्रत्येकाच्या जीवनात ती चौकशी दरघडीला निर्माण करण्याचा जो उपक्रम सध्या चालू आहे, तो अनिष्ट आहे. व्याख्येचा अर्थ मुलांना समजत नाही, तर ती पाठच करू नये. श्लोकाचा अर्थ येईपर्यंत पाठांतर बंद करावे, असे जे धोरण, ते या वृत्तीचे द्योतक आहे. सार्वजनिक सभेत स्वभाषेत बोलावे, स्वदेशी व्रताचे आचरण अखंड करावे, हे नियम कोणत्याही क्षुल्लक कारणासाठी तेथल्या-तेथे ‘ विवेक ’ करून माणसे उधळून देतात, हे त्याचेच द्योतक आहे. या माणसांच्या मनाला कसलाच पीळ नाही. आणि पीळ नाही, म्हणजे मनुष्यत्वालाच काही उणे आहे, असा इतिहासाचा निर्वाळा आहे.

आमच्या कथाकादंबऱ्या व चित्रपट पाहा. यांतले नायक कसे आहेत ? त्यांच्या मनाविरुद्ध काही झाले, त्यांच्यावर असह्य अशी आपत्ती आली, काही विपरीत प्रसंग आला, की ते लगेच दारू पिऊ लागतात, अनाचार करू लागतात. प्रेयसीने नकार दिल्याबरोबर सर्व ध्येयवाद गुंडाळून ठेवून कोठे तरी परागंदा होणे हाच पुरुषार्थ दाखविणाऱ्या नायकांची कादंबऱ्यांत बरीच गर्दी

आहे! मोठ्या ध्येयाने प्रेरित झालेला, मोठ्या आकांक्षा चित्तात बाळगणारा व त्यासाठी वाटेल तो प्रसंग आला, तरी धिम्मेपणाने तोंड देणारा असा नायकच अलीकडच्या प्रसिद्ध कादंबऱ्यांत व नाटकांत सापडेनासा झाला आहे. आणि एखादा तसा असलाच, तर तो पहिल्याच तडाख्याला लोळण घेतो, असे दृश्य असते. अशा नायकाचे मनोविश्लेषण मोठ्या चतुराईने करावे, यातच कादंबरीकार गढून गेलेला असतो. जीवनात कोठे पीळ दिसेल, कोठे आग्रह दिसेल, याची जणू काय ललितलेखकांना भीतीच वाटत आहे. 'पुरोगामी वाङ्मय' या विषयावर लिहिताना, टिळक-गांधी हे सरकारशी घनघोर संग्राम करीत असताना पुरोगामी म्हणविणाऱ्या लेखकांनी बहुधा मानापमानातील लक्ष्मीधराचीच भूमिका स्वीकारलेली होती, असे आचार्य जावडेकरांनी म्हटले आहे, ते याच अर्थाने असावे.

रशियात क्रान्ती झाली, त्या वेळी काही वर्षे तेथील लोकांच्या मनावरची सर्व बंधने नष्ट झाली होती. सिगारेट, दारू, अनाचार हेच पुरोगामी, असे काही लोकांना वाटू लागले होते. चार तरुणतरुणी एकत्र जमल्यावर व्यभिचारास अनुकूल न होणाऱ्या मुलीस अनैतिहासिक वृत्तीची व मागासलेली, अशी शिवी मिळत असे. पण तेथील मार्क्सवादी नेते सावध होते. निग्रह, संयम यांवाचून समाज टिकणे अशक्य, हे त्यांनी जाणले होते. त्यामुळे त्यांनी धर्मावर घाव घातला, पण त्याच वेळीं सामाजिक तत्त्वज्ञान त्या ठायी प्रस्थापित केले; आणि आपल्या तरुणांना पराकाष्ठेच्या संयमाचे व निग्रही जीवनाचे धडे दिले. कम्युनिस्ट संघटनेत अनाचार तर लांबच राहिला; पण सिगारेटलासुद्धा बंदी आहे; आणि याच तऱ्हेचे अनेक निग्रह त्यांना पाळावे लागतात. ही कडक व्रते पाहूनच त्यांच्या नवीन तत्त्वज्ञानास पंडितांनी धर्म म्हणून संबोधिले. या करारी जीवनामुळे, या तपश्चर्येमुळे रशियाला केवढे सामर्थ्य प्राप्त झाले आहे, हें आपण आज पाहतोच आहो.

व्रतबद्ध, नियमबद्ध जीवनाला आपल्याकडे हसण्याची चाल आहे. पूर्वीची वेडगळ, अर्थशून्य व्रतवैकल्ये हीच त्याला बरीचशी कारणीभूत आहेत, हे खरे. पण वेडगळ बंधनांना हसताना आपण जीवनातील एकंदर बंधनांनाच हसतो आहोत, हा विवेक आपणांस राहिला नाही; आणि त्यामुळे आपले गृहजीवन, शालेय जीवन व सार्वजनिक जीवन शिथिल झाले आहे. त्यातील तपश्चर्या नष्ट

झाली आहे. नव्या शास्त्राची नवी नियमने येऊन आपल्या जीवनात पुन्हा तपश्चर्या आली नाही, तर या शिथिल, बंधनहीन जीवनास आकार येणार नाही; आणि सामर्थ्य तर साकारतेत आहे. नुसत्या मातीच्या गोळ्यात नाही. परमेश्वरालाही जेव्हा-जेव्हा कार्य करावयाचे असते, तेव्हा साकार व्हावे लागते; आणि साकारता याचा अर्थच वेदान्तात बंधने, नियमने, नियंत्रणे असा आहे. त्यावाचून प्रत्यक्ष परमेश्वरालाही सामर्थ्य प्राप्त होत नाही. मग मानवांना कसे होणार ?

५ ७१९२६ १०७५ निबंध ११।१।६०

# अक्षर वाङ्मयाचा गुणविशेष

ना. सी. फडके

एका सुप्रसिद्ध संस्कृत नाटककाराने म्हणे असे उद्गार काढले आहेत, की ‘ माझ्या ललित कृतीतील मर्म ओळखणारा रसिक मला आज लाभला नाही तरी काही हरकत नाही. पुढे केव्हा तरी आणि कोठे तरी असा रसिक खचित निघेल. ’

या उद्गारांबद्दल विचार करता करता परवा सहज माझ्या मनात आले, समजा, या नाटककाराला कोणी म्हटले असते, ‘ अहो कविराज, आपणाला जी कीर्ती हवी ती अगदी आजच्या पिढीत रोख मिळेल अशी आम्ही हमी घेतली तर मग पुढच्या पिढीत आपलं नावही कुणाच्या स्मरणात राहिलं नाही तर चालेल का आपल्याला ? आजच्या पिढीने आणखी पुढच्याही पिढीने आपली महती गावी हे जरासं कठिण आहे. वर्तमानकाळात तरी आपलं नाव होईल, किंवा भावी कालात तरी. कोणता काल आपण पसंत करता ? बोला. ’

तर या प्रश्नाला त्या संस्कृत नाटककाराने काय उत्तर दिले असते ते सांगणे कठिण आहे.

कारण, आज घटकेला आपले नाव झाले की बस्स झाले, भावी कालात आपल्या ग्रंथांचा जगाला विसर पडला तरी काही हरकत नाही, अशी ललितलेखकाच्या मनाची तयारी असणे क्वचितच संभवते.

आपल्या कृती वर्तमानकाळात तर लोकप्रिय व्हाव्याच, पण पुढेही त्यांची लोकप्रियता निरंतर कायम राहावी असेच कोणत्याही ललितलेखकास साहजिकच वाटत असते. अक्षर वाङ्मयात ( Classical Literature ) आपल्या कृतींची गणना व्हावी अशी त्याची महत्त्वाकांक्षा असते. कारण, ‘ अक्षर वाङ्मय ’ ही एक मोठी बहुमानाची पदवी आहे. इतर कोणत्याही पारि-

तोषिकापेक्षा या पदवीची लालसा ललितलेखकास अधिक वाटते. त्याच्या कृतींचे परीक्षण करताना कोणी जर असे म्हटले, की 'याचे लेखन फार सुंदर व आकर्षक आहे यात संशय नाही; परंतु ते कायमचे टिकणार नाही, अक्षर वाङ्मयात त्याचा समावेश होणार नाही' तर त्याच्या अंतःकरणाला यातना होतात. आपण जे लिहितो ते 'आज चमकले उद्या मालवले' अशा कोटीत पडू नये असे त्याला वाटत असते. आपल्या ललित कृती जशा आज तशाच उद्याही आणि परवाही, निरंतर वाचकांची मने आकर्षित करून घेण्यास समर्थ राहाव्यात अशी त्याच्या मनातली तळमळ असते. तारुण्य, वार्धक्य आणि मृत्यू या प्रत्येक सृष्ट वस्तूच्या ठरलेल्या अवस्था आहेत हे माहीत असूनही ललितलेखकास वाटत असते, की आपल्या कृतींना वार्धक्य कधी येऊ नये—मग मृत्यूची गोष्ट तर दूरच! आपण जे जे लिहिले ते ते सदैव ताजे आणि तरुणच राहावे! त्याला मरण नसावे, त्याला जराही कधी येऊ नये! ते अजरामर, 'अक्षर' ठरावे!

ललितलेखकाला असे वाटते याचे कारण काही ललित कृती अक्षर झाल्याचा प्रत्यक्ष पुरावा त्याच्यापुढे असतो. हजारो वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या ललित-लेखकांच्या नावाभोवतालचे तेजोवलय अजूनही कायम असल्याचे त्याला दिसते. कालिदास, भास, भवभूती इत्यादींच्या प्रतिमा अजूनही रसिकांच्या अंतःकरणाच्या चौकटीत विराजत असलेल्या तो पाहतो. त्यांच्या विविध ललित कृती सर्वस्वी निर्दोष नव्हत्या असे त्याची चिकित्साबुद्धी त्याला सांगत असते; आणि उलट, त्या ललित कृतींबद्दल अजूनही आबालवृद्ध वाचकांना मनस्वी लोलुपता वाटते याचा तर त्याला प्रत्यही प्रत्यय येत असतो. त्यामुळे तो साहजिकच विचार करू लागतो, की 'ज्या गुणांच्या योगाने या कलावंतांनी मानवी अंतःकरण कायमचे वश करून ठेवले ते गुण तरी कोणते? असा कोणता अमृततुल्य गुण आहे, की ज्याचे लवमात्र सिंचन होताच ललित कृती अजरामर होतात? अक्षर वाङ्मयाचे अक्षरत्व आहे तरी कशात?'

साहित्यचर्चेच्या दृष्टीने हा प्रश्न खरोखरच फार महत्त्वाचा आहे. आमचे टीकाकार 'अक्षर वाङ्मय' (Classical Literature) हा शब्दप्रयोग हर-घडी वापरतात; परंतु त्यांनी तरी वरील प्रश्नाचा निर्णय आपल्या मनाशी कधी केलेला असतो किंवा नाही कोण जाणे! बहुतांशी नावडतीचे मीठ अळणी

ठरविणाऱ्या राणीप्रमाणे जे आपल्याला रुचत नाही ते निकालात काढण्यासाठी 'याची गणना अक्षर वाङ्मयात करता येणार नाही' अशी लांच्छनमुद्रा तयार करून टीकाकार आपल्या संग्रही ठेवतात. मला वाटते, या प्रकाराबद्दलचाच संताप व्यक्त करण्यासाठी सुप्रसिद्ध जर्मन कवी गॉएटे आपल्या तरुणपणी एका माणसाकडे बोट दाखवून म्हणाला, 'Kill this dog. He is a revewer!' हे तीव्र उद्गार समर्थनीय असोत वा नसोत; येवढे खास, की ज्या दिव्य गुणांमुळे ललित कृती 'अक्षर' होतात त्या गुणांचे स्वरूप स्वतः लेखकांनी, वाचकांनी व टीकाकारांनी थोडे फार समजून घेतल्यास ते आपल्या मराठी साहित्याच्या वाढीस पोषक होईल.

प्रत्येक राष्ट्राने आपल्या मायभाषेतील काही ललित कृतींचे मोठ्या प्रेमाने रक्षण केलेले असते. त्या राष्ट्रावर आलेल्या विविध आपत्तींतून या निवडक ललित कृती सुरक्षित राहिलेल्या असतात. राष्ट्राच्या राज्यपद्धतीत अनेक क्रान्त्या होऊन जातात, धर्मसंस्थेत बदल होतात, सामाजिक जीवनात स्थित्यंतरे घडून येतात, लोकांची राहणी आणि विचारसरणी पालटते, पण या वेचक ललित कृतींवरचे लोकांचे प्रेम अव्याहत टिकलेले असते. या ललित कृतींना एकप्रकारे राष्ट्रीय संपत्तीचे स्वरूप प्राप्त होते आणि राष्ट्राच्या संस्कृतीतील एक अमोलिक भाग अशा भावनेने राष्ट्रातील आबालवृद्ध स्त्री-पुरुष त्यांच्याकडे पाहू लागतात. याच दृष्टीने कार्लाइलने आपल्या एका निबंधात असे उद्गार काढले आहेत की, 'इंग्रज लोक एक वेळ आपला इंग्लंड देश गमावण्यास तयार होतील, परंतु शेक्सपियरची नाटके ते नेहमी प्राणापलीकडे जपल्यावाचून राहणार नाहीत!'

प्रत्येक राष्ट्राचे असे लाडके शेक्सपियर असतात. त्या ललितलेखकांच्या कृतींत त्या राष्ट्रातील स्त्री-पुरुषांना वाटणारी गोडी कधी संपत नाही.

इतकेच नव्हे, तर एका राष्ट्रात अमरत्व पावलेल्या ललित कृती भाषा-भिन्नत्वाची अडचण दूर करून दुसऱ्या राष्ट्रातील वाचकांनी जर वाचल्या, तर तेसुद्धा 'अक्षर वाङ्मया'त अंतर्भूत होण्यास त्या कृती सर्वथा लायक आहेत अशी कबुली आनंदाने दिल्यावाचून राहत नाहीत. अशा वेळी इतर सर्व प्रकारचे भिन्नत्व विसरून निरनिराळ्या राष्ट्रांतील स्त्री-पुरुष 'वाचक' या एकाच सामान्य अधिष्ठानावर उभे राहू शकतात. इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील

राजकीय विषम भावाची गोष्ट सोडली, तरी त्या दोन देशांतील रहिवाशांत इतर वैषम्ये काय थोडी आहेत ? इंग्रज लोकांचा व आपला धर्म एक आहे, का नीतिनियम एक आहेत, का सामाजिक जीवनाचा दृष्टिकोन एक आहे ? त्यांची आपली या कोणत्याच बाबतीत एकवाक्यता नाही. आज नाही, आणि पुढे कधी होणेही शक्य म्हणता येत नाही. पण असे असूनही शेक्सपियरची नाटके अलौकिक आहेत. आणि ' अक्षर वाङ्मय ' या बहुमानानेच त्यांचा गौरव केला पाहिजे, या विधानात त्यांचे व आपले एकमत होते. कोठे हिंदुस्थान आणि कोठे जर्मनी ? उभयतांचे इतिहास निराळे, धर्म निराळे, आचार-विचार निराळे, राष्ट्रीय आणि सामाजिक जीवनातील प्रश्नही निराळे; तथापि, कालिदासाचे ' शाकुंतल ' वाचताच एखाद्या भारतपुत्राप्रमाणेच त्या साता समुद्रापलीकडच्या ' हूण ' देशातील एक रसिकाग्रणी अवर्णनीय हर्षाने वेडा होऊन नाचू लागतो.

हे लक्षात घेता आपल्याला असेसुद्धा म्हणावे लागेल, की ज्या ललित कृती अमर म्हणून एका राष्ट्राकडून जतन झालेल्या असतात, त्या कोणत्याही राष्ट्राने केव्हाही जतनच कराव्यात अशा योग्यतेच्या असतात. केवळ, त्याच एका विवक्षित राष्ट्राला त्यांच्याविषयी आपुलकी वाटावी असे नव्हे, तर एकंदर मानवजातीला त्यांविषयी जिव्हाळा वाटावा असा काही तरी गुण त्यांच्या ठिकाणी असतो. मनुष्यामनुष्यांत जे अनेक भेद प्रसंगोपात्त व स्थलपरत्वाने निर्माण झाले आहेत त्यांच्या गढूळ पाण्याखाली कमलपत्राप्रमाणे शोभणारे अखिल मानवजातीच्या अंतःकरणाचे एकत्व असल्याची साक्ष पटविणाऱ्या गोष्टी या विचित्र संसाराच्या व्यवहारात फार थोड्या आहेत. पण त्या थोड्या गोष्टींतील अतिशय महत्त्वाची आणि अतिशय प्रभावी कोणती असे विचारले, तर ' अक्षर वाङ्मया 'च्या पदवीला पोचलेल्या ललित कृतींची परंपरा असेच उत्तर द्यावे लागेल.

प्रथम दर्शनी या प्रकाराचे कितीही आश्चर्य वाटले, तरी थोड्याशा विचारा-अंती ते सहज नाहीसे होण्यासारखे आहे. देशपरत्वे व कालपरत्वे मनुष्या-मनुष्यांत अनेक भेदभाव निर्माण होतात खरे; परंतु मानवी अंतःकरणाचे काही धर्म असे आहेत, की त्यांस अविनाशी म्हटले पाहिजे. राग, द्वेष, वात्सल्य, प्रणय, असूया, लोभ, अहंकार इत्यादी विकार मनुष्यमात्राच्या अंतः-

करणात कोठेही आणि केव्हाही असणारच. हे विकार प्रकट होण्याच्या तऱ्हा भिन्न भिन्न असतील; परंतु यांचे मूल स्वरूप म्हणून काही तरी आहे, आणि ते शाश्वत आहे. मानवी संसारातील सारी लहान-मोठी सुखदुःखे या विकारांच्या क्रियेप्रतिक्रियेतूनच निर्माण होत असतात, व त्यामुळे या सुखदुःखांचा बाह्य आकार जरी स्थलकालपरत्वे बदलला, तरी त्यांचेही मूलस्वरूप शाश्वत आणि अचल असते. अमर ठरलेल्या ललित कृती या शाश्वत आणि सर्वसामान्य मनोधर्मांच्या आणि सुखदुःखांच्या अधिष्ठानावर उभ्या असतात. म्हणूनच त्यांपासून मिळणारा आनंद कोणाही सहृदय मनुष्यास केव्हाही मिळू शकतो, आणि त्या ललित कृती जरामरणाच्या पलीकडे जाऊन बसतात.

'इतिहासात सन आणि नावे यांखेरीज काही खरे नसते; उलट नाटकात अगर कादंबरीत सन आणि नावे यांखेरीज सर्व गोष्टी खऱ्या असतात' असे जे एका पंडिताने म्हटले आहे त्यात मोठे मर्म आहे. कारण, या उद्गारांत सहजासहजी ललित वाङ्मयाच्या प्रधान हेतूविषयी आणि अस्सल स्वरूपाविषयी एक मोठे महत्त्वाचे सूत्र ग्रथित झालेले आहे. नाटकात आणि कादंबऱ्यांत ज्या व्यक्तींच्या आयुष्यांतील विविध प्रसंग चित्रित झालेले असतात त्या व्यक्ती कपोलकल्पित समजण्याची वहिवाट आहे, ( कपोलकल्पित हा वाक्प्रचार कसा रूढ झाला कुणास ठाऊक ! वास्तविक कपोल या शब्दाचा अर्थ गाल. गालाने मनुष्य कल्पना करतो असे समजणे म्हणजे मानसशास्त्राची परमावधीची विकृती होय. तेव्हा लोकांनी अविचाराने फार दिवस वापरलेला हा 'कपोल' भाषाशुद्धीच्या दृष्टीने आपण आता सोडून देऊ; आणि असे म्हणू की ललितवाङ्मयातील व्यक्ती आणि प्रसंग लोक सामान्यपणे 'कल्पित' या सदराखाली घालतात. ) त्यांचे 'कल्पित' म्हणून वर्णन करण्यात लोकांना ध्वन्यर्थाने असे सुचवावयाचे असते, की त्या व्यक्ती आणि प्रसंग 'खोटे' असतात; परंतु हा एक प्रकारचा लोकभ्रम होय. खरी गोष्ट अशी आहे, की ललितलेखकाने वर्णन केलेल्या पात्रांत आणि प्रसंगांत जी सत्यता असते, ती या जगात प्रत्यक्ष वावरणाऱ्या जिवंत माणसांच्या आणि प्रत्यक्ष प्रसंगांच्या सत्यतेहूनही फार मोठी असते. कादंबरी-नाटकातून वर्णन केलेली माणसे आपल्याला कधी भेटलेली नसतात हे खरे; परंतु ती आपल्याला केव्हा आणि

राजकीय विषम भावाची गोष्ट सोडली, तरी त्या दोन देशांतील रहिवाशांत इतर वैषम्ये काय थोडी आहेत ? इंग्रज लोकांचा व आपला धर्म एक आहे, का नीतिनियम एक आहेत, का सामाजिक जीवनाचा दृष्टिकोन एक आहे ? त्यांची आपली या कोणत्याच बाबतीत एकवाक्यता नाही. आज नाही, आणि पुढे कधी होणेही शक्य म्हणता येत नाही. पण असे असूनही शेक्स्पियरची नाटके अलौकिक आहेत. आणि ' अक्षर वाङ्मय ' या बहुमानानेच त्यांचा गौरव केला पाहिजे, या विधानात त्यांचे व आपले एकमत होते. कोठे हिंदुस्थान आणि कोठे जर्मनी ? उभयतांचे इतिहास निराळे, धर्म निराळे, आचार-विचार निराळे, राष्ट्रीय आणि सामाजिक जीवनातील प्रश्नही निराळे; तथापि, कालिदासाचे ' शाकुंतल ' वाचताच एखाद्या भारतपुत्राप्रमाणेच त्या साता समुद्रापलीकडच्या ' हूण ' देशातील एक रसिकाग्रणी अवर्णनीय हर्षाने वेडा होऊन नाचू लागतो.

हे लक्षात घेता आपल्याला असेसुद्धा म्हणावे लागेल, की ज्या ललित कृती अमर म्हणून एका राष्ट्राकडून जतन झालेल्या असतात, त्या कोणत्याही राष्ट्राने केव्हाही जतनच कराव्यात अशा योग्यतेच्या असतात. केवळ, त्याच एका विवक्षित राष्ट्राला त्यांच्याविषयी आपुलकी वाटावी असे नव्हे, तर एकंदर मानवजातीला त्यांविषयी जिव्हाळा वाटावा असा काही तरी गुण त्यांच्या ठिकाणी असतो. मनुष्यामनुष्यांत जे अनेक भेद प्रसंगोपात्त व स्थलपरत्वाने निर्माण झाले आहेत त्यांच्या गढूळ पाण्याखाली कमलपत्राप्रमाणे शोभणारे अखिल मानवजातीच्या अंतःकरणाचे एकत्व असल्याची साक्ष पटविणाऱ्या गोष्टी या विचित्र संसाराच्या व्यवहारात फार थोड्या आहेत. पण त्या थोड्या गोष्टींतील अतिशय महत्त्वाची आणि अतिशय प्रभावी कोणती असे विचारले, तर ' अक्षर वाङ्मया 'च्या पदवीला पोचलेल्या ललित कृतींची परंपरा असेच उत्तर द्यावे लागेल.

प्रथम दर्शनी या प्रकाराचे कितीही आश्चर्य वाटले, तरी थोड्याशा विचारा-अंती ते सहज नाहीसे होण्यासारखे आहे. देशपरत्वे व कालपरत्वे मनुष्या-मनुष्यांत अनेक भेदभाव निर्माण होतात खरे; परंतु मानवी अंतःकरणाचे काही धर्म असे आहेत, की त्यांस अविनाशी म्हटले पाहिजे. राग, द्वेष, वात्सल्य, प्रणय, असूया, लोभ, अहंकार इत्यादी विकार मनुष्यमात्राच्या अंतः-

करणात कोठेही आणि केव्हाही असणारच. हे विकार प्रकट होण्याच्या तऱ्हा भिन्न भिन्न असतील; परंतु यांचे मूल स्वरूप म्हणून काही तरी आहे, आणि ते शाश्वत आहे. मानवी संसारातील सारी लहान-मोठी सुखदुःखे या विकारांच्या क्रियेप्रतिक्रियेतूनच निर्माण होत असतात, व त्यामुळे या सुखदुःखांचा बाह्य आकार जरी स्थलकालपरत्वे बदलला, तरी त्यांचेही मूलस्वरूप शाश्वत आणि अचल असते. अमर ठरलेल्या ललित कृती या शाश्वत आणि सर्वसामान्य मनोधर्मांच्या आणि सुखदुःखांच्या अधिष्ठानावर उभ्या असतात. म्हणूनच त्यांपासून मिळणारा आनंद कोणाही सहृदय मनुष्यास केव्हाही मिळू शकतो, आणि त्या ललित कृती जरामरणाच्या पलीकडे जाऊन बसतात.

'इतिहासात सन आणि नावे यांखेरीज काही खरे नसते; उलट नाटकात अगर कादंबरीत सन आणि नावे यांखेरीज सर्व गोष्टी खऱ्या असतात' असे जे एका पंडिताने म्हटले आहे त्यात मोठे मर्म आहे. कारण, या उद्गारांत सहजासहजी ललित वाङ्मयाच्या प्रधान हेतूविषयी आणि अस्सल स्वरूपाविषयी एक मोठे महत्त्वाचे सूत्र ग्रथित झालेले आहे. नाटकात आणि कादंबऱ्यांत ज्या व्यक्तींच्या आयुष्यांतील विविध प्रसंग चित्रित झालेले असतात त्या व्यक्ती कपोलकल्पित समजण्याची वहिवाट आहे, ( कपोलकल्पित हा वाक्प्रचार कसा रूढ झाला कुणास ठाऊक ! वास्तविक कपोल या शब्दाचा अर्थ गाल. गालाने मनुष्य कल्पना करतो असे समजणे म्हणजे मानसशास्त्राची परमावधीची विकृती होय. तेव्हा लोकांनी अविचाराने फार दिवस वापरलेला हा 'कपोल' भाषाशुद्धीच्या दृष्टीने आपण आता सोडून देऊ; आणि असे म्हणू की ललितवाङ्मयातील व्यक्ती आणि प्रसंग लोक सामान्यपणे 'कल्पित' या सदराखाली घालतात. ) त्यांचे 'कल्पित' म्हणून वर्णन करण्यात लोकांना ध्वन्यर्थाने असे सुचवावयाचे असते, की त्या व्यक्ती आणि प्रसंग 'खोटे' असतात; परंतु हा एक प्रकारचा लोकभ्रम होय. खरी गोष्ट अशी आहे, की ललितलेखकाने वर्णन केलेल्या पात्रांत आणि प्रसंगांत जी सत्यता असते, ती या जगात प्रत्यक्ष वावरणाऱ्या जिवंत माणसांच्या आणि प्रत्यक्ष प्रसंगांच्या सत्यतेहूनही फार मोठी असते. कादंबरी-नाटकातून वर्णन केलेली माणसे आपल्याला कधी भेटलेली नसतात हे खरे; परंतु ती आपल्याला केव्हा आणि

कोठे भेटतील याचा नियम नाही हेही खरे. शेक्स्पियरच्या ऑथेल्लोमधील यागो किंवा कालिदासाच्या मेघदूतातील विरहव्यथित यक्ष, किंवा डिकन्सच्या 'डेव्हिड कॉपरफील्ड'मधील पोरका डेव्हिड, किंवा हरिभाऊंच्या कादंबरीतील यमुना— असल्या पात्रांना ऐतिहासिक आधार मुळीच नाही. परंतु, येवढ्या कारणासाठी ती पात्रे 'खोटी' म्हणता येत नाही. उलट, प्रतिमारूपाने ही सारी मंडळी कुणालाही कोठेही भेटण्याचा संभव असल्यामुळे त्यांस नेहमीपेक्षा अधिक खोल अभिप्रायाने 'सत्य' मानणे भाग आहे. भगवद्गीतेत श्रीकृष्णांनी अर्जुनाचे निमित्त करून जगाला असे आश्वासन दिले, की 'संभवामि युगे युगे।' या वचनाचा अर्थ मी स्वतः इतकाच मानतो, की ज्या परिस्थितीत श्रीकृष्णाचे चरित्र झाले तशी परिस्थिती जेव्हा जेव्हा उद्भवेल तेव्हा तेव्हा श्रीकृष्णासारखे मुत्सद्दी, योद्धे आणि सत्याचे कैवारी 'संभवतात.' म्हणजे श्रीकृष्ण हा एक नमुना होय, व या नमुन्याच्या व्यक्ती कोणत्याही देशात आणि कोणत्याही कालात आपल्याला आढळण्याचा संभव असतो. कादंबरीनाटकांतील व्यक्तींचे असेच आहे. त्या 'कल्पित' खऱ्या; पण 'खोट्या' नव्हेत. विविध मानवी विकारांचे आणि स्वभावांचे ते शाश्वत नमुने म्हटले पाहिजेत. त्यांच्याच प्रतिमांनी ही प्रत्यक्ष चित्रविचित्र दुनिया गजबजलेली आहे. एखादा कादंबरीकार प्रस्तावनेदाखल वाचकाला सांगतो, की 'बाबारे, माझ्या कादंबरीतील अमुक पात्र म्हणजे तुझ्या ओळखीचे अमुक माणूस समजू नकोस हो!' हे सांगण्याचा उघडच उद्देश असा, की कोणत्याही कादंबरीतील अगर नाटकातील कोणत्याही पात्राचे चित्र अमुक एका विवक्षित जिवंत माणसाच्या प्रत्यक्ष आयुष्याच्या अरुंद चौकटीत बसवावयाचे नसते. अनाद्यनंत मानवी संसार हीच त्या चित्राला साजणारी खरी चौकट होय. ललित कृतीतील नायक अगर खलपुरुष लेखकाने कल्पनेने निर्माण केलेले खरे, परंतु त्याच्या नमुन्याची माणसे आपल्याला केव्हाही आणि कोठेही भेटण्याचा संभव असतो. आणि या दृष्टीने त्यांना 'सत्य'च म्हटले पाहिजे. सारांश, 'ऐतिहासिक सत्य' आणि 'तात्त्विक सत्य' या दोन गोष्टी भिन्न आहेत. ऐतिहासिक सत्याहून तात्त्विक सत्य अधिक शाश्वत आहे. त्याला स्थलकालाच्या मर्यादा नाहीत. ललित वाङ्मयातील कल्पित पात्रांच्या आणि प्रसंगांच्या ठिकाणी ऐतिहासिक सत्य नसते. पण तात्त्विक सत्य असते; म्हणूनच ललित लेखकाने केलेली त्यांची वर्णने वाचून

आपापल्या विविध सुखदुःखांच्या अनुभवाची पुनरावृत्ती करून घेण्याचा मोह आपणांला आवरता येत नाही.

वरच्या वाक्यातील ‘पुनरावृत्ती’ या शब्दाकडे वाचकांनी लक्ष द्यावे. कारण असे, की ललित वाङ्मयाच्या इतर अंगांविषयी लेखकांत, पंडितांत आणि टीकाकारांत कितीही मतभेद झाले, तरी या ‘पुनरावृत्ती’च्या प्रकाराविषयी मतभेद संभवत नाही असे मला तरी निदान वाटते. कादंबरीतील अगर नाटकातील व्यक्तींचे व्यवहार आणि प्रसंग वाचताना अगर पाहताना आपल्याला आपल्या स्वतःच्या कोणत्या तरी अनुभवाचा पुनःप्रत्यय येतो व या पुनःप्रत्ययात जो एक अवर्णनीय आनंद आहे, त्या आनंदासाठी ललित वाङ्मयाकडे आपण पुनः पुन्हा धाव घेतो. ‘आनंद’ या शब्दाचा विपर्यस्त अर्थ वाचकांनी करू नये. ललित वाङ्मय हे मुख्यतः आनंदासाठी आहे या माझ्या प्रतिपादनाकडे बोट दाखवून पुष्कळदा असे म्हणण्यात येते, की ‘पाहा, फडक्यांना मौजेखेरीज ललितवाङ्मयाचे काही कार्य असते याची कल्पनाच नाही!’ अशा विपर्यासाला वेळोवेळी उत्तर ते काय द्यावयाचे? तो करणाऱ्यांनाच तो शोभतो! मात्र शांत विचार करणाऱ्या वाचकांसाठी येथे एवढे सांगतो, की, ‘आनंद’ म्हणजे ‘चैन’ नव्हे! ‘खा, प्या आणि मजा करा!’ हें सांगण्यापलीकडे ललित वाङ्मयाचे काही ध्येय नसावे असे कोण म्हणेल? आणि एवढेच सांगावयाचे असेल, तर त्याला कलावंताची लेखणी तरी कशाला झिजायला पाहिजे? हे सांगायला कलाकुसरीची काही एक गरज नाही. घिसाड्याच्या राकटपणाने टीकालेख बडवणारे पंडितसुद्धा एवढा संदेश सांगू शकतील की! सारांश, सामान्यपणे ‘चैन’ किंवा ‘मजा’ हे शब्द ज्या अभिप्रायाने वापरले जातात, त्यापेक्षा ‘आनंद’ या शब्दातील अभिप्राय फार भिन्न आहे, खाऊन पिऊन, चैन करून वाटणारी ‘मजा’ आणि ललितवाङ्मयाच्या वाचनाने मिळणारा ‘आनंद’ या दोहोंत कोठल्याही तऱ्हेची तुलनाच होणे शक्य नाही. या आनंदाच्या व्याख्या अनेकांनी अनेक प्रकारे केल्या आहेत. म्हणून ती करण्याच्या खटाटोपात न पडता मी एवढेच म्हणतो की, मनुष्यमात्राच्या ठिकाणी ज्याप्रमाणे विवेक आहे, विकार आहे, सौंदर्याची आवड आहे, निर्मितीची हौस आहे, त्याचप्रमाणे जी सुखदुःखे संसारात वाट्याला

आली त्यांचा पुन्हा एकवार अनुभव घेण्याची विलक्षण इच्छाही आहे. जी स्थळे एकदा पाहिली, ती कालान्तराने पुन्हा पाहावीशी माणसाला वाटतात; ज्या व्यक्ती एकदा भेटल्या त्या पुन्हा भेटाव्याशा वाटतात; जे प्रसंग एकदा घडले ते पुन्हा घडावेसे वाटतात! ही हवीशी वाटणारी पुनरावृत्ती प्रत्यक्ष संसारात एखाद्या वेळी घडतेही, पण ती फार क्वचित. इतिहासाची पुनरावृत्ती घडत असते असे म्हणतात. परंतु, हे मर्यादित अर्थाने खरे आहे. एकंदर मानवजातीचा स्थूल इतिहास त्याच त्याच चाकोरीतून जात असतो इतकाच त्याचा अर्थ. व्यक्तीच्या बाबतीत जीवनप्रसंगांची पुनरावृत्ती घडणे फार विरळा. मात्र, ललित वाङ्मयात या पुनरावृत्तीचा अनुभव आपल्याला अप्रत्यक्षतः मिळतो; आणि तो मिळाला, की आपल्याला एक अवर्णनीय ‘ आनंद ’ होतो. ललित वाङ्मयाची खरी थोरवी हीच आहे.

म्हणूनच मी वर म्हटले, की ललित वाङ्मयाच्या इतर आनुषंगिक गोष्टीं-बद्दल मतभेद होण्याचा संभव असला, तरी वर वर्णन केला त्या प्रकारचा ‘ आनंद ’ देण्याची त्याची जी शक्ती तिच्याबद्दल दुमत होणे शक्य नाही. आणि ही गोष्ट लक्षात घेता जे ललित वाङ्मय अमर आणि अक्षर ठरते, ते कोणत्या गुणविशेषामुळे तसे ठरते याचा उलगडा सहज होतो. उपरिनिर्दिष्ट आनंद देणे हे जर ललित वाङ्मयकृतींचे प्रधान कार्य होय, तर अर्थातच ज्या ललित वाङ्मयकृतीपासून मिळणारा आनंद कधी संपत नाही त्या अक्षरत्व पावतात. पूर्वी कोठे तरी लिहिताना सामान्यतः सर्व प्रकारच्या कलेविषयी मी असे म्हटले होते, की या प्रत्यक्ष सृष्टीत सौंदर्य नाही असे नव्हे, पण त्या सौंदर्यावर स्थलकालाची बंधने आहेत; आणि कलेची महती ही, की तिच्या सृष्टीतील सौंदर्याला स्थलकालाची बंधने नसतात. जे अस्सल ललित वाङ्मय असते त्याची गोष्ट अशीच असते, त्यापासून मिळणाऱ्या आनंदाला स्थल-कालाच्या सीमा लागू शकत नाहीत. हेच विधान उलट फिरवून असे म्हणावयास हरकत नाही, की ज्यापासून मिळणारा आनंद अमुक एका ठिकाणच्या अमुक एका काळातल्या, अगर अमुक एका प्रकारच्या मनोवृत्तीच्या वाचकालाच काय तो मिळण्यासारखा असतो ते ललित वाङ्मय त्या त्या काळापुरते प्रभावी आणि उपकारक ठरले, तरी ते अमर ठरू शकत नाही; आणि जे ललित वाङ्मय अमर आणि अक्षर ठरते, ते तसे ठरते याचे खरे कारण हे की

त्यापासून मिळणारा आनंद बहुतांशी स्थलकालनिरपेक्ष असतो.

वरच्या विधानात 'बहुतांशी' हा शब्द मी मुद्दाम घातला आहे. तो अशासाठी, की वाङ्मयापासून कोणत्याही वाचकाला जो आनंद होतो, त्या आनंदाचा काही भाग त्या वाचकाच्या अंतःकरणाच्या विशिष्ट ठेवणीमुळे उत्पन्न झालेला असतो. कादंबरीतील एखादा प्रसंग वाचताना अगर नाटकातील एखादा प्रसंग पाहताना वाचकाला किंवा प्रेक्षकाला किती आनंद होईल हे लेखकाने ज्या लालित्याने तो प्रसंग रंगविला असेल त्यावर तर अवलंबून राहीलच, परंतु जो वाचक अगर प्रेक्षक तो प्रसंग वाचणार अगर पाहणार त्याची स्वतःची अनुभवसिद्धी किती आहे यावरही तो आनंद अंशतः अवलंबून असणार हे विसरून चालणार नाही. शाकुंतल नाटकात ज्या प्रवेशात कण्वमुनी शकुंतलेला दुष्यंताकडे पाठविताना निरोप देतात त्या प्रवेशाचा आनंद पूर्णांशाने कुणाला बरे घेता येईल? वाटेल त्याला? नाही. तर ज्यांनी प्रेमातिशयाने पालनपोषण केलेल्या पोटच्या मुलीला दुसऱ्याच्या हाती कायमची देताना होणारी अंतःकरणाची कालवाकालव अनुभविली असेल, आणि डोळ्यांत गर्दी करणारी आसवे प्रयत्नाने परतविता परतविता ज्यांची बोटे ओली झाली असतील त्यांनाच शाकुंतल नाटकातील त्या करुणरसाने ओथंबलेल्या प्रवेशातील आनंद पूर्णत्वाने घेता येईल. 'Count of Monte Cristo' या चित्रपटातील ज्या प्रवेशात कुटिल राजनीतीला बळी पडून वर्षानुवर्षे बंदीत अडकलेल्या नायकाची मुक्ततेसाठी चाललेली धडपड दाखविली आहे त्या प्रवेशाचे उदाहरण घेऊ. दिग्दर्शन आणि अभिनय या दोन्हीही दृष्टींनी त्याचा आनंद कुणाही प्रेक्षकाला होईल हे तर खरेंच; पण देशभक्त सावरकरांसारख्या प्रेक्षकाच्या अंगावर आनंदाचे जे रोमांच उभे राहतील ते काही ते वेगळेच! नाटक-कादंबऱ्यांतील कित्येक प्रसंगांचे रोमांच-कारित्व प्रत्येक वाचकाच्या अगर प्रेक्षकाच्या बाबतीत सहज शक्य असते असे नव्हे. रोमांचांचा अनुभव निर्माण करण्यासाठी लेखकाला जशी तपश्चर्या करावी लागते, तशीच तो अनुभव घेण्यासाठी वाचकाची अगर प्रेक्षकाचीही तपश्चर्या झालेली असावी लागते. या दृष्टीने विचार करता ललित वाङ्मयापासून होणारा आनंद अंशतः 'व्यक्तिनिष्ठ' असतो असे आपल्याला म्हटलेच पाहिजे. इतर कोणत्याही कलेप्रमाणेच ललित वाङ्मय म्हणजे कलावंत आणि रसिक या

दोघांच्या अंतःकरणांमध्ये घडणारा एक प्रकारचा 'संवाद' आहे. ध्वनि-शास्त्रज्ञ असे सांगतात, की दोन वीणावाद्ये जर एकाच सुरात उत्तम तऱ्हेने जुळलेली असली तर एका वीणेच्या तारा छेडताच दुसऱ्या वीणेच्या तारा आपोआप स्फुरण पावून ध्वनी करू लागतात. लेखक आणि वाचक यांचे असेच आहे. वाचकाच्या अंतःकरणाची तयारी लेखकाच्या अंतःकरणाच्या तयारीइतकी असेल, तरच वाचकाला लेखकाचे मर्म पूर्णांशाने समजून आनंदही पूर्णत्वाने होईल. याच अभिप्रायाने बहुधा भवभूतीने आपल्या सुप्रसिद्ध दर्पोक्तीत 'समानधर्मा' हा शब्द वापरला असावा. ललित वाङ्मयापासून उत्पन्न होणाऱ्या आनंदात अर्धे कर्तृत्व लेखकाचे तर अर्धे कर्तृत्व वाचकाचे हेच खरे. सूर्यकिरणे ज्या ज्या पदार्थांवर पडतील तो तो पदार्थ तप्त व्हावा हा त्या किरणांचा धर्म तर खराच; परंतु योग्य त्या स्फटिकातून जर ती किरणे पडली तरच त्यांचे दहनशीलत्व पूर्णत्वाने प्रकट होते. ललित वाङ्मयाच्या आनंदाची हीच गोष्ट आहे.

मात्र हे सगळे खरे असले, तरी स्थूल दृष्टीने या आनंदाचा बराच मोठा भाग स्वयंसिद्ध आणि व्यक्तिनिरपेक्ष असतो हे विसरून चालावयाचे नाही. कारण असे, की व्यक्तिव्यक्तींची अनुभवसिद्धी जरी भिन्न असली, तरी मूलभूत म्हणून ज्या काही मानवी भावना आहेत त्या सर्व व्यक्तींच्या ठिकाणी सदैव असतात. त्या सामान्य आणि शाश्वत अशा आहेत. व्यक्तिव्यक्तींना संसारातील सुखदुःखांचा अनुभव वेगवेगळ्या तऱ्हेने आणि तीव्रतेने येतो खरा; पण या सगळ्यांच्या मुळाशी जे मनोविकार असतात ते सगळ्या मानवी व्यक्तींच्या ठिकाणी असतात. ते विकार व्यक्तीचे नसून मानवजातीचे असतात.

गरिबापासून तो श्रीमंतापर्यंत सगळ्याच मनुष्यांना मातेच्या वात्सल्याचा अनुभव आलेला असतो व मातृप्रेमाची भावना सर्वांच्याच ठिकाणी असते. प्रबळाप्रमाणेच दुर्बळालाही महत्त्वाकांक्षा म्हणून काही तरी असते व सुखस्वप्ने पडत असतात. कुबेरकन्येप्रमाणेच भिकाऱ्याच्या मुलीलाहि प्रणयविकार कळतो. सुष्ट, दुष्ट दोघांनाही भय वाटते. आशा-निराशा, काम–क्रोध–लोभ इत्यादी भावना सर्व मनुष्यांच्याच अंतःकरणांत खळबळत असतात. या मानवी भावनांच्या आडव्या-उभ्या धाग्यांनीच प्रत्येक व्यक्तीच्या संसाराचे वस्त्र विणले जात आहे. त्या वस्त्राची लांबी–रुंदी, जाडपणा अगर तलमपणा, आणि आकार भिन्न भिन्न

बनतात. परंतु, त्यातले आडवे-उभे धागे एकच असतात. या धाग्यांची गुंतागुंत आणि उकल करून दाखविणे हेच प्रत्येक ललितकथेचे नियोजित कार्य आहे. ती गुंतागुंत आणि उकल पाहिली की वाचकाला आणि प्रेक्षकाला आनंद होतो. ज्या ललितकथेतील हा आनंद लवकरच जुना होतो, ती कालान्तराने लोकांच्या स्मरणातून नाहीशी होते; आणि उलट, ज्या ललितकथेतील हा आनंद कधी विटत नाही तिचे वाचकांना कधी विस्मरण होत नाही. ती अक्षर वाङ्मयांत समाविष्ट होते.

म्हणजे अक्षर वाङ्मयाचा गुणविशेष कोणता या प्रश्नाचे उत्तर त्याच्या ठिकाणची ‘ आनंद ’ देण्याची अविच्छिन्न शक्ती असेच दिले पाहिजे. मानवजातीच्या ठिकाणी ज्या शाश्वत आणि अविनाशी भावना आहेत, त्यांच्या तारा हळुवार हाताने ज्या कथालेखकाने छेडलेल्या असतात त्यांचे लेखन कोठल्याही काळी रंजक होते. कोणी म्हणेल, की मूलभूत मानवी भावना हलविण्याचा प्रयत्न प्रत्येक ललितलेखक करीत असतो; मग सगळ्याच ललितकृती अक्षर का ठरत नाहीत ? ही शंका जरा साहजिकच आहे. पण वर तंतुवाद्यांची उपमा दिली, तिच्या साहाय्याने या शंकेचे निरसन सहज करता येण्यासारखे आहे. सुरात मिळविलेल्या सतारीच्या तारांप्रमाणे मूलभूत मानवी भावना सदा सुसज्ज आहेत हे खरे; पण, त्यावरून हात फिरविणे हे वाटते तसे सोपे काम नाही. तंतुवाद्य सज्ज असले तरी ते छेडण्यात कसब म्हणून काही तरी आहेच ना ! अलगुजाच्या भोकांवरून बोटांची उघडझाप केली, की सुंदर स्वरमाला निघतात; पण ही गोष्ट सहजसाध्य असती, तर मंजुळ मुरलीरवाने गोपींना स्वतःचीही शुद्ध उरू न देणाऱ्या वनमालीची थोरवी कशाला उरली असती ? ज्याने उठावे त्याने मुरलीधर व्हावे अशी अनवस्था झाली असती. पण तसे होत नाही; आणि त्याचे कारण एवढेच, की संगीतातील सप्त स्वर जरी ठरलेले आहेत, तरी त्यांच्या अनुसंधानाचे व विस्ताराचे कार्य प्रतिभासंपन्न व्यक्तीच्या चातुर्यावर आणि लालित्यावर अवलंबून आहे. हाच न्याय ललितकथेस लागू असल्यामुळे, सामान्यांच्या ललितकथा दरिद्र्यांच्या मनोरथाप्रमाणे उत्पन्न होतात आणि लय पावतात. जो असामान्य लेखक असतो तो शाश्वत मानवी भावनांचा अशा काही जादुगिरीने खेळ करतो, की त्याच्या लेखनातील आनंद मानवजातीच्या पिढ्यान् पिढ्यांनी

घेतला तरी संपत नाही. आनंद देण्याचे अविनाशी सामर्थ्य हीच अक्षर वाङ्मयाची खरी कसोटी होय.

यावर असा प्रश्न संभवतो, की लोकजागृती समाजोन्नती, लोकशिक्षण, राजकारण, धर्मकारण इत्यादी मोठमोठी कार्ये ललितवाङ्मयाच्या साहाय्याने करता येणे अशक्य आहे की काय? किंवा ललितलेखकाने ती वर्ज्य मानली पाहिजेत की काय! यावर माझे स्वतःचे स्पष्ट आणि असंदिग्ध उत्तर असे, की ललितलेखकास ही कार्ये अशक्यही नाहीत आणि वर्ज्यही नाहीत. पण, ती अंगीकारण्याची सक्ती ललितलेखकावर करण्याचा हटवाद करणे म्हणजे मोठा जुलूम होय. ललितलेखन ही एक मोठी प्रभावी शक्ती आहे. तिच्या उपयोगाने उपरिनिर्दिष्ट कार्ये साधता येतीलही; पण ज्याच्या ठिकाणी ती शक्ती आहे त्याने ती साधली नाहीत तर त्याच्या शक्तीवर वैगुण्याचा आरोप कोणालाही करता येणार नाही आणि पुन्हा असे, की अक्षर ठरलेल्या ललितकथांच्या गुणविशेषांची मीमांसा करण्यापुरतेच बोलावयाचे झाले, तर लोकशिक्षण आणि लोकजागृती यांचा त्या गुणविशेषाशी निरपवाद संबंध खचितच नाही. ज्या ललितकथा शाश्वत आणि अमर ठरल्या, त्या त्यांच्यात एखाद्या राष्ट्रापुढे विशिष्ट परिस्थितीत उद्भवलेला एखाद्या प्रश्नाची सोडवणूक करून दाखविली होती म्हणून नव्हे, तर सामान्य आणि शाश्वत मानवी मनोविकारांचे नमुनेदार कल्लोळ त्यात चित्रित झाल्यामुळे, त्यांच्या वाचनाने अगर श्रवणाने कोणाही वाचकाला स्वानुभवाच्या पुनःप्रत्ययाचा आनंद केव्हाही घेता येतो म्हणून!

६

# विनोदाचे तत्त्वज्ञान

प्र. के. अत्रे

हास्य ही जीवनातली एक मूलभूत प्रवृत्ती आहे. वाङ्मयामध्ये त्याला रसाचे स्थान प्राप्त झाले आहे. शब्दांच्या योजनेने हास्यरस निर्माण करणे ह्याला विनोद म्हणतात. सुशिक्षित अन् सुसंस्कृत माणसांच्या समाजात आणि वाङ्मयात विनोदाला फार मोठी प्रतिष्ठा आहे. किंबहुना विनोदबुद्धी असणे हे संस्कृतीचे लक्षण समजले जाते. विनोद हा काही नुसता शब्दांचा खेळ नाही. ती जीवनाकडे पाहण्याची एक विशाल दृष्टी आहे. व्यक्तीच्या किंवा समाजाच्या बुद्धीचा विकास झाल्यावाचून ही दृष्टी त्यांना प्राप्त होत नाही. ज्या समाजात व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य आहे, त्या समाजात तारुण्याचे वातावरण उत्पन्न होते; खेळ, कला, उत्सव यांची वाढ होते; आणि सामाजिक जीवन समृद्ध होते. आशावादित्व, औदार्य, खेळाडूपणा आणि सहानुभूती ह्या सद्गुणांचा अशा समाजात विकास होतो, आणि मग त्यामधून विनोदाचे तत्त्वज्ञान निर्माण होते. विनोद हा इंग्रज आणि अमेरिकन लोकांच्या जीवनाचा तर एक स्थायीभाव होऊन बसलेला आहे. ज्या समाजात व्यक्तीला स्वातंत्र्य नाही किंबहुना समाजाच्या हितासाठी किंवा सुरक्षेसाठी व्यक्तीचे स्वातंत्र्य नियमांनी, रूढींनी आणि कायद्यांनी ज्या समाजात मर्यादित केलेले असते, त्या समाजात विनोदाची वाढ होऊ शकत नाही. विनोदाला त्या ठिकाणी ग्राम्य आणि विकृत स्वरूप प्राप्त होते. भारताला तर सामाजिक जीवनच नाही. लिंगभेदाने, जातिभेदाने आणि पंथभेदाने समाजाच्या शेकडो फाळण्या झालेल्या. त्यात अज्ञान आणि अंधश्रद्धा ह्याची भर. ज्ञानी लोक अरण्यात, देवळात किंवा एकान्तात जाऊन नाक धरून बसलेले. देवाधर्मांच्या नावाने वर्षातून थोडा वेळ माणसे गंभीर चेहरे करून काय एकत्र येतील तेवढीच. समानतेच्या भूमिकेवर सर्व पंथाचे आणि सर्व जातीचे स्त्री-पुरुष आनंदाने एकत्र येतील आणि खेळी-

मेळीने एकमेकांशी वागतील असा एकही खेळ, सण, उत्सव किंवा सामाजिक समारंभ भारताच्या जीवनात नाही. म्हणूनच हास्याला नि विनोदाला या देशामध्ये फारसा मान आणि फारसे स्थान नाही. या देशातले लोक हसत नाहीत असा ह्याचा अर्थ नाही. हसतात; पण हास्याबद्दल त्यांच्या मनात आदर नाही. प्रौढपणाला, सभ्यतेला किंवा विद्वत्तेला न शोभण्यासारखी ती ती गोष्ट आहे असे सामान्यपणे समजले जाते. हसणे किंवा थट्टाविनोद करणे हे पोरकटपणाचे, चावटपणाचे आणि गावंढळपणाचे कृत्य आहे असे मानले जाते. 'टवाळा आवडे विनोद' हे रामदासांचे वचन प्रसिद्धच आहे. याचा परिणाम असा झाला की अजिबात न हसणे, तोंडावरची सुरकुती ढळू न देणे आणि आणि सुतक्यासारखा लांब नि गंभीर चेहरा करून बसणे ही विद्वत्तेची, मुत्सद्देगिरीची आणि साधुत्वाची लक्षणे होऊन बसली. हसणारा माणूस हा उथळ मनाचा आणि बुद्धीचा, तर न हसणारा माणूस हा खोल मनाचा, गहन विचाराचा आणि संथ वृत्तीचा असे समजले जाऊ लागले. अशा रीतीने सभ्य समाजाने बहिष्कृत केल्यानंतर बिचाऱ्या विनोदाने कोठे जावे बरे ? तो ग्राम्य आणि असभ्य लोकांच्या आश्रयाला जाऊन राहू लागला. तेथे त्याने चित्रविचित्र वस्त्रे अंगावर धारण केली अन् खदखदा हसत, दात विचकत, वेडावण्या दाखवीत, वेडेवाकडे अंगविक्षेप करीत आणि अचकटविचकट नि अद्वातद्वा बोलत तो भटकू लागला. त्यामुळे त्याची आणखी-नच बदनामी झाली. लोक त्याला विदूषक म्हणू लागले. विदूषक म्हणजे काही तरी विकृती करून बिघडविणारा किंवा घोटाळा माजविणारा हे शेवटी विनोदाचे स्वरूप होऊन बसले. विनोदाचा हा विदूषकी अवतार सर्व देशातील समाजाच्या कोणत्या ना कोणत्या तरी उत्क्रांतीच्या अवस्थेत झालेला आढळून येतोच. सर्कशीमधला विदूषक हा त्याचा ऐतिहासिक पुरावा म्हणून समजावयाला हरकत नाही. इंग्रजी नाटकातला 'क्लाऊन' आणि संस्कृत नाटकातला 'विदूषक' हे सर्कशीतल्या मुक्या विदूषकाचे बोलके आणि म्हणून थोडे अधिक सुधारलेले भाऊ इतकेच काय ते. संस्कृत साहित्यात काव्य आणि शास्त्र एवढे कळसाला जाऊन पोहोचले, पण विनोद मात्र विदूषकाचे कपडे घालून तसाच मूर्खपणा करीत बसला. त्याच्यात काही सुधारणा झाली नाही. हेच संस्कृतमधले विदूषकी विनोदाचे जुने लोण कालान्तराने पुढे प्राकृत भाषेमध्ये चालत आले.

इंग्रज लोकांचे ह्या देशातले राज्य आता संपले असल्याने त्यांच्याविषयी खरे आणि चांगले बोलावयाला काही हरकत नाही. इंग्रजी जीवनाने आणि वाङ्मयाने आम्हांला दिलेली विनोद ही एक अलौकिक देणगी आहे. मराठी वाङ्मयात मात्र या आधुनिक विनोदाचे फार मोठे कौतुक झाले आणि त्यामुळे विनोदाकडे पाहण्याची महाराष्ट्रीयांची दृष्टी अजिबात बदलून गेली. महाराष्ट्राच्या जीवनात आणि साहित्यात विनोदाला आज निश्चितपणे सन्मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे यांत मुळीच शंका नाही. विनोदाकडे पाहण्याची नवीन दृष्टी महाराष्ट्राला श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि राम गणेश गडकरी ह्या दोघांनी दिली आणि त्यांनीच महाराष्ट्रात विनोदाची एवढी प्रतिष्ठा वाढविली. कोल्हटकरांचे ‘सुदाम्याचे पोहे’ आणि गडकऱ्यांची ‘रिकामपणाची कामगिरी’ या दोन पुस्तकांनी मराठी भाषेमध्ये आधुनिक विनोदी वाङ्मयाचा पाया घातला. सामाजिक जीवनांत विनोद आता उजळ माथ्याने वावरू लागला आहे आणि त्यामुळे विनोदाचा विकास होण्यास अनुकूल असणारे वातावरण महाराष्ट्रात पुष्कळच निर्माण झाले आहे. तथापि, विनोदाची सिद्धी कशी होते ही कला आणि शास्त्र अजूनही फारसे कुणाला माहीत असावे असे वाटत नाही.

विनोदाने हास्य निर्माण होत असले, तरी माणसाच्या सर्वच हसण्याला विनोद कारण असतो असे मात्र नाही. अगदी लहान मूल हसते त्याला विनोद थोडाच कळतो ? गुदगुदल्या केल्याने माणसाला हसू कोसळते. तरुण माणसे एकत्र जमली म्हणजे काही कारण नसताना ती मोठमोठ्याने हसत असतात. हसणे ही एक साथच आहे. सभेत एक माणूस मोठ्याने हसला की सारी माणसे कारण समजल्यावाचून हसू लागतात. हसणाऱ्या माणसाला बघूनसुद्धा हसू येते. अती दुःखाने किंवा वेड लागल्यामुळेही माणूस हसतो. तथापि, सामान्यपणे प्रकृती उत्तम असल्याच्या जाणिवेने, सुखाने, आनंदाने आणि कौतुकाने माणूस हसतो. हास्याचा जन्म शब्दाच्या आधी झालेला असल्याने एका माणसाची भाषा दुसऱ्याला समजावयाला अडचण पडते. पण हास्याचा अर्थ मात्र सर्वांना समजतो. लुच्चेगिरीने किंवा दुष्टपणाने माणसाला हसता येत नाही असे नाही. तथापि, जेथे जेथे हास्य आहे तेथे तेथे स्वागत आहे, सद्भाव आहे आणि सहानुभूती आहे असे समजले

जाते. विनोदामुळे निर्माण होणाऱ्या हास्याची जात मात्र ह्या सर्व हास्यांपेक्षा निराळी असते.

पूर्वपार रूढीमुळे आणि जीवनाच्या ठराविकरणामुळे अमुक अमुक गोष्टी अशा तऱ्हेच्या असाव्यात किंवा अशा अशा तऱ्हेने घडाव्यात अशा प्रत्येक समाजाच्या आणि प्रत्येक व्यक्तीच्या काही ठराविक अपेक्षा निर्माण झालेल्या असतात. या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत म्हणजे साहजिकच हसू येते. रस्त्याने जाणाऱ्या माणसाने चालता चालता पडू नये अशी अपेक्षा असते. पण तोच केळ्याच्या सालपटावरून पाय घसरून खाली पडला म्हणजे हसू येते. टोपी-बाहेर किंवा रुमालाबाहेर शेंडी निघू नये, विजारीच्या गुंड्या लावलेल्या असाव्यात किंवा तिचा मागील भाग फाटका असू नये, दोन्ही पायांत एकाच तऱ्हेचे पादत्राण किंवा एकाच रंगाचे पायमोजे असावेत, चालता चालता डोक्याचा रुमाल सुटू नये किंवा धोतराचा कासोटा फिटू नये, नाटकात काम करणाऱ्या नटाच्या चिकटवलेल्या मिशा किंवा दाढी रंगभूमीवर एकदम गळून पडू नये अशा आपल्या अपेक्षा असतात. या अपेक्षांविरुद्ध गोष्टी घडल्या म्हणजे हसू कोसळते. माणसाचा रंग, आकृती, उंची, जाडी, केस, नाक डोळे, चालणे, बोलणे, वागणे, यासंबंधी आपल्या कल्पना अगदी ठरलेल्या असतात. त्याला कोठेही धक्का बसलेला आपल्याला सहन होत नाही. म्हणून अतिशय काळा किंवा गोरा, उंच किंवा खुजा, लठ्ठ किंवा हडकुळा, ढेरपोट्या किंवा कुबडा, केसाळ किंवा टकल्या, नकटा किंवा गरुडनाक्या, डुचका, चकणा, तोतरा आणि लंगडा अशा तऱ्हेचा माणूस दृष्टीस पडला की हसू येते. व्यंग म्हणजेच अपेक्षाभंग. म्हणून माणसाची सर्व शारीरिक आणि मानसिक व्यंगे ही हास्याचा विषय होऊन बसलेली आहेत. एकाच व्यक्तीच्या नेहमीच्या परिचित पोषाखात, रूपात किंवा मतात एकदम बदल झाला म्हणजेही हास्य उत्पन्न होते. झुपकेदार मिशा राखणाऱ्या माणसाने क्षौर केले, डोक्यावर केसांचा संजाब राखणाऱ्याने मुंडण केले, रोज दाढी-मिशा काढणाऱ्याने मिशा किंवा दाढी राखली, पगडी घालणाऱ्याने डोक्यावर गांधी टोपी चढविली किंवा नेहमी हॅट घालणारा माणूस एक दिवस डोक्याला फेटा बांधून आला म्हणजे तो हास्याचा विषय होतो. परिचित गोष्टीचे कधीही हसू येत नाही. पांढऱ्या रंगाची तंग सुरवार घालणे हे आपल्या देशात सरदारी पोषाखाचे लक्षण समजले जाते.

पण विलायतेत तंग सुरवार घालून जर रस्त्याने एखादा हिंदी माणूस चालू लागेल, तर तो विजार घालावयाचे विसरून आतल्याच वस्त्राने हिंडतो आहे अशा कल्पनेने इंग्रज लोक त्याच्याकडे बघून पोट धरधरून हसू लागतील. एका देशामधल्या लोकांच्या पोषाखाचे आणि चालीरीतीचे दुसऱ्या देशामध्ये जे हसू होते ते ह्याच कारणामुळे. अपेक्षेचा भंग जितका जास्त जोराने होईल तितका त्यापासून निर्माण होणाऱ्या हास्याचा स्फोट जास्त होईल.

अपेक्षाभंगाने हास्य निर्माण करणे हेच विनोदाचे खरे तंत्र आहे. जादूगार ज्याप्रमाणे मोकळ्या मुठीमधून बोल बोल म्हणता रुपया किंवा आंगठी काढतो, त्याप्रमाणें विनोदी वक्ता किंवा लेखक बोलता बोलता किंवा लिहिता लिहिता अपेक्षित शब्दांचा किंवा कल्पनांचा अनुक्रम एकदम अशा काही चपळाईने बदलतो की श्रोत्यांच्या आणि वाचकांच्या हसता हसता मुरकुंड्या वळतात. प्रख्यात अमेरिकन विनोदपंडित मार्क ट्वेन हा एकदा व्याख्यान देत असता गंभीरपणे म्हणाला, " शेक्स्पिअर वारला, शेले गेला, कीट्स मेला अन गेल्या आठवड्यापासून माझीही प्रकृती बिघडली आहे. " त्याबरोबर श्रोत्यांमध्ये प्रचंड हास्यस्फोट झाला. कारण त्यांच्या अपेक्षेला मार्क ट्वेनने एकदम धक्का दिला. श्रोत्यांची अपेक्षा अशी की मेलेल्या मोठमोठ्या लेखकांची नावे मार्क ट्वेन सांगतो आहे. त्या यादीत तो आपले स्वतःचे नाव एकदम घुसडील आणि आपणही लवकरच त्याच मार्गाने जाणार असल्याचे सुचवील अशी त्यांची मुळीच कल्पना नव्हती. ' श्वा, युवा, मघवा ' या पाणिनीच्या सूत्राचा अनुक्रम बदलला की एकदम विनोदाचे सूत्र बनते. ' वसंत ऋतू आला की झाडांना पालवी फुटते, आंब्याला मोहर येतो, वक्त्यांना शब्द फुटतात, छऱ्यांना अभ्रे चढतात आणि पांढऱ्या सशाला पिले होतात ' हे गडकऱ्यांचे वर्णन ह्याच थाटाचे आहे. गडकऱ्यांचा भाऊ एकदा गंभीर चेहरा करून त्यांना सांगू लागला की, " काल रात्री मी झोपलो होतो. सकाळी उठून पाहतो तो माझ्या उशाखाली भला मोठा विंचू. " भावाची अपेक्षा अशी की गडकरी आश्चर्य चकित होतील किंवा आपण थोडक्यात बचावलो म्हणून गडकरी आपल्या बद्दल सहानुभूती व्यक्त करतील. पण तसे काही एक न करता गडकरी शांतपणे म्हणाले, बरोबर आहे. दगडाखाली विंचू सापडणारच ! " या ठिकाणी सहानुभूती मिळवायाला गेलेला माणूस झटक्यासरशीं एकदम ' दगड ' ठरून परत येतो.

हा चमत्कार कसा झाला. हे क्षणभर ऐकणाराच्या मुळी ध्यानातच येत नाही, आणि मला ते लक्षात आल्यावर हसता हसता पुरेवाट होते. सत्याग्रहात शिक्षा झालेल्या एका मित्राला तुरुंगात जाण्याच्या आधी कोणाला काय निरोप सांगा-वयाचा आहे काय हें विचारावयास मी गेलो असता त्यानें हळूच माझ्या कानात ‘ आज संध्याकाळच्या खानावळीत खाडा ’ सांगून येण्याविषयी मला सांगितले. ही सर्व उदाहरणे निरनिराळ्या तऱ्हेच्या अपेक्षाभंगातून निर्माण झालेल्या विनोदाची आहेत. अपेक्षेचा भंग कसा होणार आहे ह्याची आधी श्रोत्यांना किंवा वाचकांना यत्किंचितही कल्पना येता कामा नये. त्याचा वास का आधी आला की मग मात्र विनोदाची गंमत गेलीच. हास्याचा विषय झालेली व्यक्ती आणि हसणारा माणूस ही दोन्हीही एकाच पातळीवर असता कामा नयेत अशी एक त्यात अट आहे. रस्त्यावरून जाणारा माणूस पाय घसरून पडला तर आपल्याला हसू येते खरे. पण केव्हा ? जर आपण रस्त्यावर ताठ उभे असलो तर. आपणही त्या माणसाबरोबर दुसऱ्या सालपटावरून पाय घसरून पडलो तर आपल्याला त्या माणसाचे हसू येणार नाही. उलट, त्याच्याबद्दल सहानुभूतीच वाटेल. ज्या व्यंगाला किंवा ज्या विकृतीला आपण हसतो तो दोष आपल्यामध्ये निदान त्या वेळी तरी असता कामा नये. कुरूपतेवर केलेल्या विनोदाने कुरूप माणसेदेखील हसतात ह्याचे कारण ‘ आपण तेवढे काही कुरूप नाही ’ असा त्यांना मनातून विरंगुळा वाटत असतो हेच होय.

विनोदाचे तंत्र काय आहे हे कळणे अवघड नाही. पण विनोदाची वृत्ती काय असते आणि त्याचे विषय कोणते असतात हे जाणून घ्यावयाचे असेल तर बरेच खोलात शिरावे लागेल. विनोद हा काही सर्व काळी आणि सर्व स्थळी निर्माण होत नाही. त्याचे एक विशिष्ट वातावरण असते. कलेमध्ये आणि खेळामध्ये जे खेळकरपणाचे मोकळे आणि प्रसन्न वातावरण लागते, तसेच वातावरण विनोदनिर्मितीलाही पण असावे लागते. विनोद करणारा आणि विनोद ऐकणारा हे दोघेही त्या खेळकरपणाच्या पातळीवर असावे लागतात. विनोदी माणूस हा खेळकर वृत्तीने जगाकडे आणि जीवनाकडे पाहत असतो. स्वर्गात आनंद असतो अशी आपली कल्पना आहे. पण जग मात्र दुःखाने भरलेले आहे. म्हणून मार्क ट्वेनने म्हणून ठेवले आहे की काव्य स्वर्गात निर्माण होते आणि विनोद पृथ्वीवर उत्पन्न होतो. जगात नानातऱ्हेची दुःखे आहेत, रोग

आहेत, अपघात आहेत, म्हातारपण आहे, मरण आहे, दास्य, दारिद्र्य आणि दैन्य आहे, अपयश, निराशा, अपमान, या निरनिराळ्या मानसिक यातना आहेत. त्यांखेरीज माणसाचे अज्ञान आणि मूर्खपणा तर चोहोकडे तुडुंब भरून वाहतो आहे. अशा या अनंत दुःखांनी भरलेल्या जगात असहाय माणसाने कसे जगावयाचे ? ही दुःखे नाहीशी करण्याचे सामर्थ्य तर त्याच्या अंगी नाही. पण निदान ह्या दुःखाच्या नांग्या त्याला तोडता आल्या आणि त्याच्या यातना त्याला कमी करता आल्या किंवा नष्ट करता आल्या तरी तेवढे त्याला पुरे आहे. जगातील दुःखाकडे गांभीर्याने पाहिले तर ती वाढतात आणि खेळकरपणाने पाहिले तर ती कमी होतात, हे ज्या माणसाच्या पहिल्याने लक्षात आले तो विनोदाचा खरा जनक असे म्हणावयास काही हरकत नाही. दुःखाना हसावयाचे, ती हसण्यावारी न्यावयाचि, हसून हसून ती विसरून जावयाचे, हा विनोदाचा खरा हेतू आहे. जगातील दुःखे हाच विनोदाचा खरा विषय आहे. काव्यात केवळ आनंदच असतो. आणि दुःख नसते असे नव्हे; पण दुःखाकडे पाहण्याच्या काव्याच्या आणि विनोदाच्या दृष्टिकोनात फार मोठे अंतर आहे. दुःखामधून कवी करुण रस निर्माण करतो, तर विनोदी माणूस त्याच दुःखांना हास्यरसाच्या पुरात बुडवून टाकतो.

विनोद हा माणसाला केवढा विरंगुळा आहे ! केवढा धीर आहे ! केवढा आधार आहे ! नाही तर माणसे या जगात दुखाने वेडी झाली असती नाही तर मरून गेली असती. जीवनसत्त्वे शोषून घेणारे चिंतेचे आणि दुःखाचे जे अनंत जंतू आहेत ते विनोदाच्या पिचकाऱ्यांनी मारले जातात, एवढेच नव्हे तर जीवनाच्या अभिवृद्धीस हर्ष, आनंद, खेळकरपणा, तारुण्य ही जी द्रव्ये आवश्यक असतात त्याचा पुरवठादेखील विनोदामुळेच होतो. मरणानंतर माणसाचे काय होईल ह्याचा विचार मोठमोठ्या धर्मांनी केलेला आहे आणि त्याला मोक्षाचा मार्ग सुचविलेला आहे. पण माणसाचे हे खडतर आणि अपूर्ण जीवन कसे गोड करून घ्यावयाचे आणि त्यातून कसा आनंद निर्माण करावयाचा हे रहस्य फक्त विनोदानेच उकलून दाखविले आहे. माणसाला लाभलेले विनोद हे एक महान् तत्त्वज्ञान आहे यात मुळीच शंका नाही. संकटाकडे आणि यातनांकडे गांभीर्याने पाहून कसा निभाव लागणार ? ह्या जगात मरण हे माणसाचे फार मोठे दुःख आहे. मरण काही कोणाला टळत नाही.

मग मरणाचे स्मरण करून काय माणसाने रडत बसावयाचे ? म्हणूनच मरण ह्या विषयावर फार मोठा विनोद निर्माण करून माणसाने मरणाचे भय कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

आमच्या शाळेतले एक लोकप्रिय शिक्षक आसन्नमरण झाले. अर्धा-पाऊण तासाच्या आत ते आता जाणार असे कळताच शाळेतले सर्व विद्यार्थी आणि शिक्षक त्यांच्या घरासमोर जाऊन वाट पाहत बसले. दोन तास झाले. तरी त्यांचा प्राण काही जाईना. मुले आणि मास्तर कंटाळून गेले. कोणी तरी एखादा विद्यार्थी किंवा शिक्षक घरात जाऊन डोकावून येई. तो बाहेर आल्यावर बाहेरचे सर्वजण उत्सुकतेने त्याच्या चेहऱ्याकडे पाहत. पण 'अजून गेले नाहीत!' अशा आविर्भावाने तो जेव्हा मान हालवी तेव्हा बाहेर वाट पाहणारी मंडळी निराश होत. शेवटी संध्याकाळ झाली. रात्री बेरात्री सदर शिक्षक मरण पावले तर त्यांच्या और्ध्वदेहिकाचे सामान आणावयाची पंचाईत होईल, आणि विनाकारण उशीर होईल, ह्या विचाराने शाळेतल्या ड्रॉइंग-मास्तराने हुषारी करून ते सामान आगाऊच विकत आणून काही अंतरावर शेजारी लपवून ठेविले. सबंध रात्र टळत आली तरी शिक्षकाचा प्राण घोटाळतच राहिला. त्यामुळे आपण आणलेले सामान वाया जाते की काय या भयाने ड्रॉइंग-मास्तराची तारांबळ उडाली, आणि आपल्या शिक्षकबंधूस लौकर मरण यावे अशी मनातल्या मनात परमेश्वराची ते प्रार्थना करू लागले. हे मी येथे लिहीत असलेले वर्णन वाचून वाचकांना आपले हसू आवरणार नाही हे मला माहीत आहे. असे का व्हावे ? मरणासंबंधी हकीकत ऐकून दुःख वाटावे का हसू यावे ? दुसरी एक गोष्ट सांगतो. एका गावात प्लेगची साथ आली. माणसे पटापट मरू लागली. गावात एकच वैद्य आणि स्मशान गावापासून दोन मैल दूर. एका माणसाला वैद्याने औषध पण दिले पण तो दुसऱ्या दिवशीच सकाळीं मेला. त्याला खांदा द्यायला माणसे मिळेनात; तेव्हा शेवटी वैद्यबुवांनाच बोलवावे लागले. दुपारच्या उन्हात दोन मैल खांद्यावर प्रेत न्यावे लागल्याने वैद्यबुवा अगदी हैराण झाले. त्यांचा खांदा ठणकू लागला. स्मशानातून परत येऊन वैद्यबुवा कुठे बसताहेत, तोच दुसऱ्या कोणाच्या तरी काखेत गोळा आल्याचा निरोप घेऊन एक माणूस आला. तेव्हा वैद्यबुवा चिडून म्हणाले, "मी ह्या तुमच्या माणसाला औषध देईन. पण खांदा मात्र मुळीच देणार नाही हे अगोदरपासूनच बजावून सांगतो."

मरणासंबंधीच्या या गोष्टी वाचल्यानंतर दुःख हा विनोदाचा विषय कसा होऊ शकतो याचा उलगडा होईल. जगातली पुष्कळशी दुःखे स्वतः माणसांनी निर्माण केलेली आहेत. शुद्ध स्वभावाची माणसे जगात फार थोडी आढळतात. पुष्कळशी माणसे व्यसनी, बदफैली, ढोंगी, असत्यभाषणी, गर्विष्ठ, घमेंडखोर, संशयी, आधाशी, कृपण, छांदिष्ट, अतिरेकी, निंदाखोर, मठ्ठ आणि मूर्ख असतात. ह्यामुळे समाजातील इतर लोकांना फार दुःख आणि हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. मनुष्यस्वभावातल्या या दोषावर आणि खोडीवर किती उत्कृष्ट तऱ्हेचा विनोद निर्माण करता येतो हे ज्याला पाहावयाचे असेल त्याने फ्रेंच भाषेमधील मोलीयरची सारी नाटके वाचून पाहावीत. मोलीयरचे हे नाट्यवाङ्मय म्हणजे हास्यरसाचा एक महासागर आहे. माणसांच्या दोषांकडे गंभीरपणे पाहणाऱ्या शेक्सूपियरने शोकान्त नाटके निर्माण केली, तर त्याकडे खेळकर दृष्टीने पाहणाऱ्या मोलीयरने प्रहसनांचा पाऊस पाडला. स्कॉच लोकांचा चिक्कूपणा, आयरिश लोकांचा मठ्ठपणा, अमेरिकन लोकांची थापेबाजी, आणि नीग्रो लोकांचा मूर्खपणा हे इंग्रजी भाषेतील विनोदाचे चिरंतन विषय होऊन बसले आहेत. मूर्खपणा ही तर कधी न संपणारी अशी विनोदाची खाण आहे. प्रत्येक साहित्यातला विनोदाचा मक्ता बहुधा मूर्खपणानेच घेतलेला असतो. मूर्ख माणसापुढे काय डोके फोडावयाचे ? मूर्खपणाला हसूनच तो समाजातून घालविण्याचा प्रयत्न करावयाचा. देशामधील निरनिराळ्या प्रांतात राहणाऱ्या जनतेच्या धार्मिक नि सामाजिक आचारात आणि दैनंदिन जीवनात इतक्या विकृती आणि विसंगती भरलेल्या आहेत की तेवढ्या भांडवलावर या देशात अनेक वर्षे टिकणारे शेकडो विनोदाचे कारखाने काढता येतील. विनोदाला या देशात फार मोठे क्षेत्र आहे. विनोदाच्या अंगी दुहेरी सामर्थ्य आहे. जीवनातल्या दोषांकडे खेळकरपणाने पाहावयाला विनोद तर शिकवतोच, पण हे दोष हळूहळू नाहीसे करून टाकण्याचेही सामर्थ्य विनोदात आहे. विनोद हे अहिंसेसारखे एक मोठे नाजुक आणि प्रभावी शस्त्र आहे. किंबहुना ती वाङ्मयातील अहिंसाच आहे. एखाद्या माणसाला 'तू गाढव आहेस' असे म्हणणे ही हिंसा झाली. पण 'आपण विद्वान आहात' असे म्हणणे ही अहिंसा झाली. हसण्याने माणसे जास्त लौकर सुधारतात. आपले जगात हसू होईल किंवा लोक आपल्याला हसतील या

भयाचा केवढा धाक वाटत असतो समाजामध्ये माणसांना! माणसाच्या स्वभावात बारीकसारीक इतके कंगोरे असतात की त्यामुळे रोजच्या सामाजिक जीवनात अनेक मतभेद, गैरसमज आणि तंटेबखेडे उत्पन्न होतात. आणि मग त्याचे पर्यवसान भलतेच काही तरी होते. विनोदाची देवघेव समाजात मोकळेपणाने होऊ लागली, म्हणजे व्यक्तीच्या स्वभावातील हे वेडेवाकडे कंगोरे घासून घासून गुळगुळीत होतात आणि त्यामुळे सामाजिक जीवनाची चक्रे सुरळीतपणे फिरू लागतात. माणसाची विनोदबुद्धी जर जागी असेल तर रोजच्या जीवनातले किती तरी अप्रिय आणि अडचणीचे प्रसंग हसत हसत गमतीने टाळता येतील. समजा, तुम्ही नाटक पाहावयाला गेलात, आणि तुमच्या समोरच्या खुर्चीवर एक भला लठ्ठ आणि उंच माणूस डोक्यावर पागोटे घालून बसलेला तुम्हांला आढळला, तर तुम्ही काय कराल? तुम्ही जर त्याला दरडावून सांगितलेत की, "अहो, आम्हाला नाटक दिसत नाही. तुमच्या डोक्यावरचे पागोटे काढून टाका!" तर तो माणूस तुमचे म्हणणे ऐकेल असे तुम्हांला वाटते? मुळीच नाही. उलट, तो तुम्हाला तितक्याच जोराने उत्तर देईल की, "मी काही फुकट आलो नाही. पैसे खर्च करून आलो आहे. ही जागा माझी आहे. एवढेच नव्हे तर या जागेवरची छता-पर्यंतची सर्व पोकळी माझ्या मालकीची आहे. मी डोक्यावर पागोटे तर घालीनच घालीन, पण त्यावर आणखी एक उपरणेसुद्धा बांधीन!" या मार्गाने काही हा प्रश्न सुटावयाचा नाही. पण ह्याच्याऐवजी जर तुम्ही त्या माणसाला हसून मोठ्या अदबीने म्हणाल की, "अहो आजोबा, समोर नाटकात जे काही चालले आहे ना ते आम्हांला मधूनमधून मागे वळून सांगत जा बरे का!" तर तो माणूस ताबडतोब आपले पागोटे काढून खाली मांडीवर घेईल.

समाजाला सुधारण्याचे जबरदस्त सामर्थ्य विनोदात आहे. ही गोष्ट महाराष्ट्रात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी आधी ओळखली. अनेक वर्षांपासून समाजाच्या अंगात अगदी हाडीमासी शिरून बसलेले दोष मोठ्या युक्तीने आणि कौशल्याने नाहीसे करावयाचे झाल्यास त्यावर विनोदाचेच शस्त्र सोडावयास पाहिजे हे त्यांना कळून चुकले आणि म्हणून त्यांनी आपल्या 'सुदाम्याच्या पोह्यां'ना विनोदाची खमंग फोडणी देऊन ते समाजाला

९५१३८



खावयाला दिले. या पोह्यांचा समाजाच्या प्रकृतीवर योग्य तोच परिणाम झाला. हिंदु धर्मातील आणि समाजातील अनेक वेडगळ समजुतीचे आणि चालीरीतींचे कोल्हटकरांनी आपल्या विनोदी लेखांमध्ये सुंदर विडंबन करून त्या काळातल्या समाजाच्या डोळ्यांत चांगले चरचरीत अंजन घातले यात मुळीच शंका नाही. कोल्हटकरांचीच ही परंपरा गडकऱ्यांनी पुढे चालविली. हिंदू समाजात मुलींची लग्ने ठरविताना त्यांच्या बापांना आणि आतांना नानातऱ्हेच्या किती लटपटी खटपटी कराव्या लागतात आणि किती आपदा अन् मानभंग सहन करावे लागतात ह्याचे अत्यंत मार्मिक आणि हृदयस्पर्शी चित्र गडकऱ्यांनी 'रिकामपणच्या कामगिरी'त रेखाटले आहे. गडकऱ्यांची 'ठकी' कुरूप आहे ही गौण गोष्ट आहे. पण ती जरी शकुंतलेसारखी सुंदर असती तरीदेखील तिचे लग्न ठरविण्यासाठी तेवढीच उरस्फोड आणि यातायात करावी लागली असती यात काही संशय नाही. मुलगी सांगून आली म्हणजे मुलाच्या बापाला केवढा जोर चढतो आणि त्या भरात 'यंदा कर्तव्य नाही' असे म्हणावयाच्याऐवजी 'या जन्मात कर्तव्य नाही' असे सांगण्यापर्यंत त्याची कशी मजल जाते, लग्न जमविण्याच्या मोहिमेवर जाणाऱ्या मुलीच्या आतांना कच्ची काळजे असता कामा नयेत म्हणून बाळकरामाचे मूळचे काळीज काढून एका दरवडेखोराचे उलटे काळीज त्या ठिकाणी सुलट करून कसे घालावे लागते, ही वर्णने वाचत असताना 'डोळ्यांत आसू आणि ओठात हासू' अशी वाचकांची मोठी केविलवाणी स्थिती होते. उत्तम विनोदाचे हे लक्षण आहे की त्यामुळे त्याच्या विषयाचा तिरस्कार न वाटताना त्याबद्दल अधिक सहानुभूती आणि जिव्हाळा वाचणाराच्या किंवा ऐकणाराच्या अंतःकरणात निर्माण व्हावयाला पाहिजे. चार्लस् डिकन्स, मार्क ट्वेन आणि चार्लस् चॅप्लीन ह्यांच्या विनोदाचे हेंच प्रमुख वैशिष्ट्य आहे. हास्य आणि अश्रू एकाच वेळीं निर्माण करण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या विनोदात आहे. उत्कृष्ट विनोदाची ही परिसीमा समजावयाला हरकत नाही. अव्वल इंग्रजी अमदानीत निर्माण झालेला अतिविद्वान माणूस हा लोकशिक्षणाचे कार्य करण्यास किती नालायक होता ह्याचे एक हृदयंगम चित्र प्रो. कोटिबुद्धे ह्यांच्या रूपाने गडकऱ्यांनी रंगवून ठेवलेले आहे. केवळ मनोरंजनासाठी म्हणून पुष्कळच विनोद गडकऱ्यांनी लिहून ठेवला असला तरी समाजहित हाच त्यांच्या विनोदाचा खरा आत्मा

आहे. समाजाला सुधारण्याचे आणि आनंद देण्याचे विनोद हे एक अत्यंत सूक्ष्म आणि प्रभावी शस्त्र आहे. ते वापरणारा हातही अतिशय कोमल आणि कलावंत असावा लागतो. विनोदाशी दंगामस्ती आणि धसमुसळेपणा करून भागायचे नाही. त्यामुळे विनोदाला हास्यापद आणि तिरस्करणीय स्वरूप प्राप्त होण्याची मात्र भीती आहे. कृत्रिम उपायांनी, जबरदस्तीने आणि वेड्यावाकड्या साधनांनी विनोद निर्माण करणाऱ्या गावंढळ लोकांचा आणि लेखकांचा एक फार मोठा वर्ग प्रत्येक समाजात असतो. ही मंडळी विनोदाची सर्वांत जास्त बदनामी करतात. हास्य उत्पन्न करणे हाच मुळीं ज्या विनोदाचा हेतू, त्यालाच उलट वेडावण्या दाखवून का कुठे हास्य निर्माण होते? विनोदाची प्रतिष्ठा वाढविणाऱ्या लोकांपेक्षा विनोदाची बेअब्रू करणाऱ्या लोकांची समाजात अधिक संख्या असल्याने सामान्य माणसाच्या मनात विनोदाबद्दल गैरसमजाची आणि अनादराची भावना असल्यास त्यात नवल नाही. म्हणूनच मूर्ख, मठ्ठ आणि गंभीर माणसांना समाज डोक्यावर घेऊन नाचतो आणि प्रतिभाशाली विनोदी लेखकाचा मात्र समाजात उपहास होतो. विनोदी लेखक हा एक समाजाचा मित्र आणि उपकारकर्ता आहे अशा आपलेपणाच्या आणि कृतज्ञतेच्या भावनेने समाज त्याच्याकडे ज्या दिवसापासून पाहावयाला लागेल तो सुदिन!

# गंधर्वकन्ये, काय बोलू ?

**वि. स. खांडेकर**

आज देवलांचे ' शापसंभ्रम ' नाटक चाळण्याचा योग आला. त्याची पहिली सातआठ पाने वाचली न वाचली तोच मन चिमणे झाले. भुर्कन उडाले. या चिमणीने अर्धशतकाचा विस्तीर्ण कालसागर एका क्षणात ओलांडला. माझे कुमारवय माझ्या भोवती पिंगा घालू लागले. गणपतीच्या देवळाजवळचे ते आमचे माडीचे घर, घरावर चवऱ्या ढाळणारे ते कडुलिंबाचे झाड, त्या झाडावरल्या गोड लागणाऱ्या पिक्या निंबोण्या, ती बुधवार शनवारची नाटके, सारेसारे आठवू लागले.

त्या वेळचा एक दिवस माझ्या डोळ्यांपुढे चित्रपटातल्या दृश्याप्रमाणे हळूहळू उलगडू लागला. उशिरा उठलो होतो मी त्या दिवशी!– आदल्या रात्रीच्या नाटकाच्या जाग्रणामुळे. पण त्या जाग्रणाने मला गळल्यासारखे अगर आळसावल्यासारखे वाटत नव्हते. वायुलहरींच्या हिंदोळ्यावर बसून आपण झोके घेत आहोत, कुठल्यातरी अपरिचित पण अद्‌भुतरम्य सुगंधाने आपल्याला धुंद करून सोडले आहे, असा मला सारखा भास होत होता.

तो सारा दिवस माझ्या कुमारमनाने त्या धुंदीतच काढला. ती धुंदी ' शापसंभ्रमा 'तल्या गोड गाण्यांची होती. ' मधुर किती कुसुमगंध सुटला ', ' ये अशी बैस मजसरसि ', ' मित्रा मम जन्मकथा पुशिलि का तिने ? ', ' तेथेच उभी की आले ', ' धाडुनि दिधले दासीसह मी ', ' सज्ज करुनि चाप मदन येत मागुनी ' अशा कितीतरी ओळी काही अर्धवट, काही पूर्ण, माझ्या कानांत गुंजारव करीत होत्या, मनाला पुनः पुन्हा गुदगुल्या करून जात होत्या. मला ही पदे पाठ येत नव्हती. मग अभ्यासाची पुस्तके गुंडाळून ठेवून ही सारी पदे पाठ करून टाकावीत अशी तीव्र इच्छा मनात निर्माण झाली होती.

छे ! त्या दिवशीची ती धुंदी केवळ देवलांच्या प्रसन्न, मधुर आणि प्रवाही

गीतरचनेची नव्हती. बाणभट्टाच्या कल्पकतेचाही तिच्यात मोठा भाग होता. देवलांच्या गीतांइतकीच पुंडरीक आणि महाश्वेता यांच्या लोकविलक्षण प्रेम-कथेनेही माझ्यावर मोहिनी घातली होती. प्रथमदर्शनी जडणारे आणि काव्य-पूर्ण रीतीने व्यक्त होणारे प्रेम हे कुमार-मनाच्या पूजेचे स्थान असते. त्यामुळेच की काय, शाकुन्तलाच्या पहिल्या अंकाइतकाच 'शापसंभ्रमा'चा पहिला अंकही मला आवडला होता.

इतकाच ? छे ! अधिक ! याला कारणही तसेच होते. 'शापसंभ्रमा'तला नायक पुंडरीक हा खराखुरा स्वप्नाळू प्रेमिक आहे. 'शाकुन्तला'तल्या दुष्यंताच्या व्यवहारी मनाचा त्याला स्पर्शही झालेला नाही. एखाद्या बालका-सारखे त्याचे मन अजाण आहे. महाश्वेतेला पाहताच तो प्रेमात पडतो. प्रीतीचा हा जितका मोहक तितकाच दाहक असा अनुभव त्याला सर्वस्वी नवीन आहे. म्हणूनच तो उत्कट आहे. पण त्याचे मन महाश्वेतेकडे ओढ घेऊ लागताच त्याच्यातला तपस्वी जागा होतो. तो या प्रेमिकाला बजावतो, "विषयासक्त जनाप्रमाणं स्त्रीविषयक गोष्टींचा इतका विचार करून तुझ्यासारख्या विरक्ताला कोणता लाभ होणार ?" त्या तपस्व्याचे हे बोलणे ऐकताच पुंडरीक डोळे मिटून ध्यानस्थ बसतो.

पण ध्यानाकरता डोळे मिटले म्हणून माणसाचे मन थोडेच स्थिर होते ! पुंडरीकाची मोठी पंचाईत होते. तो स्वतःशीच म्हणतो, "सच्चिदानंद स्वरूपाचं ध्यान करण्याकरता मी तर डोळे मिटून बसलो, परंतु या कुमारीचीच नखशि-खान्त मनोहर मूर्ती दृष्टीसन्मुख उभी राहते, हे का ? कदाचित हिचं अद्वितीय लावण्य पाहून या नेत्रांची तृप्ती झाली नसेल म्हणून असा प्रकार होत असावा ! तर या डोळ्यांची एकदा तृप्ती करून सोडतो. या सुंदरीकडं नुसतं अवलोकन केल्यानं काय होणार ?"

पुंडरीक डोळे उघडून महाश्वेतेकडे पाहू लागतो. आश्रमात लहानाचा मोठा झालेला आणि वेदाध्ययनात सर्व काळ कंठीत आलेला बिचारा भोळा ब्रह्मचारी ! मदनाने त्याच्याकरता पसरलेल्या या नाजुक, अदृश्य जाळ्याची त्याला कुठून कल्पना असणार ? महाश्वेतेकडे टक लावून पाहत असताना तो उद्गारतो-"अरे, हा काय चमत्कार ? ही मघापेक्षा आता अधिकच सुंदर दिसू लागली." त्याने डोळे उघडलेले पाहून महाश्वेता त्याला नमस्कार

करते. तिला आशीर्वाद देतादेताच पुंडरीक स्वतःशी म्हणतो, "नमस्कार करताना हिनं आपला पदर सारखा केला. त्या पदराचा वारा अंगाला लागून जर मला इतका आनंद होतो, तर प्रत्यक्ष हिच्या अंगस्पर्शानं तो किती होईल ?" त्याचे मन अनावर होते. तो उठून महाश्वेतेला म्हणतो," ये अशी। बैस मजसरसि। उगिच का भीशि। नाहि कुणि दुसरे। दे सोडुनि अवघी शंका बिंबाधरे।"

प्रीतीच्या उन्मादक प्याल्यातल्या पहिल्या घुटक्याने बेभान झालेला पुंडरीक महाश्वेतेचा हात धरू लागतो. इतक्यात दुरून एक हाक ऐकू येते, "पुंडरीका!" ही हाक कपिंजलाची असते. ती ऐकताच पुंडरीक दचकतो, घाबरतो, मागे सरकतो. तो पुटपुटतो, "अरेरे! घात झाला. हा सर्व प्रकार माझ्या मित्राने चोरून पाहिला वाटतं ?"

लहानपणी 'शापसंभ्रम' पाहताना या कपिंजलाचा मला फार राग येई. तो मुळचाच अरसिक आहे असे वाटे. अगदी अवेळी पुंडरिकाला हाक मारून साऱ्या रंगाचा भंग करण्याचे त्याला काय कारण होते ? 'शाकुन्तला'च्या पहिल्या अंकात नायकाचा असला मूर्ख मित्र नाही! तिथे नायिकेच्यां मैत्रिणी आहेत. पण त्यांच्यामुळे दुष्यन्त आणि शकुंतला यांच्या प्रेमप्रवाहाला अडथळा येत नाही; उलट शकुंतलेच्या या मैत्रिणी तिला शेवटपर्यंत सर्वपरींनी साहाय्य करीत असतात. या तुलनेमुळेच की काय, त्या वेळी 'शापसंभ्रमा'तला कपिंजल मला एखाद्या खलपुरुषासारखा भासत असे. त्याच्या नावातल्या पहिल्या दोन अक्षरांचा फायदा घेऊन मी मित्रमंळीत त्याची कधी टर उडवली नाही हे त्याचे भाग्य!

पण आज अर्धशतक उलटून गेल्यावर 'शापसंभ्रम' पुन्हा वाचताना या कपिंजलाचे अगदी भिन्न असे दर्शन मला होत आहे. या नाटकाच्या पहिल्या अंकात पुंडरीक व महाश्वेता यांचे प्रेम जडते. दुसऱ्या अंकात ते विजेच्या वेगाने वाढते. तिसऱ्या अंकात विरहाने व्याकुळ झालेल्या प्रियकरापाशी महाश्वेता पोचण्याच्या आधीच पुंडरीक मृत्यू पावतो. पुंडरिकाला एकदाच भेटलेली, आणि मस्तकावर मंगलाक्षता न पडलेली महाश्वेता विरक्त तपस्विनी होऊन दिवस कंठू लागते. या सर्व कथाभागात प्रथम पुंडरिकाची खरडपट्टी काढायची व तो विरहव्यथेने विकल होताच महाश्वेतेकडे जाऊन ते सांगायचे

एवढेच कपिंजलाचे काम आहे असे मला पूर्वी वाटत असे. पण पन्नास पावसाळे उलटून गेल्यावर, प्रियजनांच्या मन पोखरून टाकणाऱ्या मृत्यूपासून मनाला धीर देणाऱ्या निरपेक्ष स्नेहापर्यंतच्या असंख्य आठवणींनी हृदय भरून गेल्यावर, जीवनातले नानाविध कडूगोड अनुभव चाखल्यावर, माणसाच्या मनाचा गोफ किती चित्रविचित्र धाग्यांनी गुंफलेला असतो याची तीव्र जाणीव झाल्यावर, आणि केवळ सुखदुःखांच्याच नव्हेत तर जीवनाची उंची, खोली, विस्तार आणि विकास यांच्यासंबंधीच्या सर्व कल्पनाच बदलून गेल्यावर कपिंजलाचा आज प्रथमतः मी विचार करीत आहे. मला नकळत मी त्याच्याशी समरस होत आहे. त्याच्या अंतरंगात प्रवेश करून त्याचे दुःख मी समजावून घेत आहे.

पुंडरीक आणि महाश्वेता यांचे प्रेम दुर्दैवाने सफल होत नाही. प्रियकराला सर्वस्व दान करण्याकरता गंधर्वकन्या महाश्वेता अपरात्री आपल्या वाड्यातून बाहेर पडते. पण ती वनात पोचते तेव्हा पुंडरिकाचे निर्जीव शरीर तेवढे या हतभागिनीच्या दृष्टीला पडते. या निरागस प्रेमिकांचे हे दुःख आपल्याला व्याकुळ करून सोडते. कपिंजलाचे दुःख असे सहज लक्षात येणारे किंवा क्षणार्धात मनाला विकल करून टाकणारे नाही. पण तेही तितकेच उत्कृष्ट आहे, सनातन आहे. नियतीच्या लहरीपेक्षा मनुष्याच्या स्वभावाशी ते निगडित झाले आहे. कपिंजल तापट असला, तरी पुंडरिकावर त्याचे खरेखुरे प्रेम होते—सख्ख्या भावापेक्षाही अधिक! त्याचा मित्रभाव अगदी बावनकशी होता. आपल्या बुद्धिमान् आणि वैराग्यशील मित्राने एक सुंदर तरुणी दिसताच तिच्या प्रेमात पडावे हे त्याला सहन होत नाही. हा आपला स्वतःचा – किंबहुना जगातल्या साऱ्या तपस्येचा पराभव आहे, असे त्याला वाटते.

हा सारा प्रसंगच हृदयंगम आहे. पुंडरिकाच्या कानांवर असलेल्या स्वर्गीय मंजिरीचा सुवास महाश्वेतेला आकृष्ट करतो. हे लक्षात येताच पुंडरीक ती मंजिरी तिच्या कानांवर ठेवतो. ती ठेवता ठेवता त्याचे मन इतके चंचल बनते की, आपल्या डाव्या हातातून जपाची स्फटिकमाळ गळून पडली आहे हेही त्याला कळत नाही. महाश्वेता मिस्किलपणाने ती माळ उचलते आणि चालू लागते. कपिंजलाला फसविण्याकरता पुंडरीक म्हणतो, "मित्रा कपिंजला, तू भलत्याभलत्या शंका घेऊन मला व्यर्थ दूषणं देत आहेस. माझ्या हातून झालं काय

ते तरी सांग " कपिंजल रागाने विचारतो, " झालं काय ? अरे कामांधा, त्या पोरटीनं तुझी स्फटिकमाळ नेली, ती तर तुला दिसली नाहीच ! आता ती तुझं हृदय घेऊन चालली आहे ते तरी आवरून धर !"

कोपिष्ट कपिंजल सद्हेतूने पुंडरिकाला ताडताड बोलतो. पुंडरीक महाश्वेतेवर रागावल्याचे नाटक करतो. महाश्वेता ते पाहून भ्याल्याचे नाटक करीत परत येते. स्फटिकमाळ म्हणून गळ्यातला मोत्यांचा हार काढून ती तो पुंडरिकाला देते. " ही आणली पाहा स्फटिकमाळ " म्हणून पुंडरीक कपिंजलापुढे तो हार करतो. आता कपिंजलाचा संताप अनावर होतो. " विचारशून्य कामांधा ! धर्ममार्गपराङ्मुखा। दुराचारा भ्रष्टचित्ता। नको संबंध यापुढे ॥ " अशी आपल्या मित्राची निर्भर्त्सना करीत तो निघून जातो.

पण कपिंजलाचे मित्रप्रेम उत्कट आहे, जातिवंत आहे. मातृप्रेमापेक्षाही ते निरपेक्ष आहे. तो रागारागाने पुंडरिकाला सोडून निघून जातो खरा ! पण जिवलग मित्राचा विरह त्याला सहन होत नाही. " माझा प्राण बाहेर गेला आणि हे शरीर त्याला शोधीत वनात चोहोकडे भ्रमण करीत आहे " असे त्याला वाटत राहते. तो पुंडरिकाला शोधून काढतो. त्याची नाना प्रकारांनी समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. " असा कोण रे मदन तो वारि त्याते। काय भीसी तया पामराते ? " असा उपदेश करून पुंडरीक ज्या जाळ्यात सापडला आहे त्याचे पाश तो तोडू पाहतो. पण मदनाला पामर म्हटल्याने त्याचे बळ थोडेच कमी होते ! अनंग असूनही तो प्राणिमात्राला अंकित करीत असतो. पुंडरिकाच्या हृदयावर कपिंजलाच्या बुद्धिवादाचा काही परिणाम होत नाही. उफाळलेले मनोविकार शाब्दिक उपदेशाने कधी शांत झाले आहेत का ?

कपिंजल स्वभावतः संयमी आणि कठोर आहे. मदन त्याचा पराभव करू शकला नव्हता. पण आता मित्रप्रेमाने तो पराभव त्याला मान्य करावा लागतो. पुंडरिकाला महाश्वेता मिळाल्याशिवाय त्याचे प्राण वाचणार नाहीत हे त्याच्या लक्षात येते. कर्मठ आणि कठोर कपिंजल मुकाट्याने आपली पावले गंधर्वनगरी-कडे वळवितो. तो महाश्वेतेच्या मंदिरात जातो. तिने दिलेल्या आसनावर बसतो. " काय बोलायचं असेल ते खुशाल बोलावं " असे महाश्वेता त्याला मोठ्या आदराने म्हणते. कपिंजल उत्तरतो, " गंधर्वकन्ये, काय बोलू ? लज्जेनं माझी

वाणीच चालत नाही. ” पण असे म्हणत असतानाही तो प्रेमविव्हल पुंडरिकाची स्थिती वर्णन करून सांगतो. तो महाश्वेतेपाशी मित्राच्या प्राणांची भीक मागतो. मात्र या वेळीही त्याचा स्वाभिमान जागा असतो. तो म्हणतो, “ आता अशा स्थितीत त्याच्या भेटीला योग्य, आमच्या येण्याला शोभेल आणि तुला स्वतःला रुचेल असं करायला तू समर्थ आहेस. माझा मित्र वनातल्या लतामंडपात एकटा आहे, म्हणून मी तुझा निरोप घेतो. माझ्या मित्रावर दया कर. त्याला प्राणदान दे. हात जोडून हीच भिक्षा मी तुझ्याकडे मागत आहे. माझी दुसरी काही इच्छा नाही. ”

महाश्वेतेपुढे पदर पसरून पुंडरिकाच्या प्राणाची भिक्षा मागताना कपिंजलाच्या मनाला मरणप्राय वेदना झाल्या असतील. तो स्वभावतःच वैराग्यशाली होता. तो आणि पुंडरीक गंधर्वनगरीजवळच्या वनात फिरत फिरत आले, तेव्हा दैवाने आपल्यापुढे कोणते ताट वाढून ठेवले आहे याची त्याला काडीमात्रही कल्पना नसेल! पुंडरीकही आपल्याइतकाच विवेकी आणि संयमी आहे अशी त्याला कल्पना होती. बिचारा कपिंजल! सदैव नाकासमोर जाणारा आणि जीवनाच्या संमिश्र स्वरूपाची कल्पना नसणारा एक तपस्वी! दैवाची वाट किती वाकडी असते, मदनाचे जाळे किती सूक्ष्म आणि चिवट असते, याचा त्याला अनुभव नव्हता. असल्या गोष्टींचा त्याने कधी विचारही केलेला नाही. पुंडरिकाचा तो बाळमित्र. असे असूनही त्याने पुंडरिकाला पूर्णपणे ओळखले नव्हते!

पुंडरीक भावनाप्रधान आहे, विकारशील आहे. तो तुमच्या-आमच्यासारख्या लाखो माणसांचा प्रतिनिधी आहे. वैराग्याच्या लगामाने त्याने आपले मन ताब्यात ठेवले आहे, असे कपिंजलाला वाटत होते, पण—पण घोडा चौखूर उधळतो. तेव्हाच लगामाची वादी किती बळकट आहे याची परीक्षा होत असते! महाश्वेता दृष्टीला पडताच पुंडरिकाच्या कफनीचा भगवा रंग क्षणार्धात गुलाबी होतो, या घटनेत अस्वाभाविक असे काय आहे? बाणभट्टाने कल्पिलेली ही नाजुक प्रणयकथा पिढ्यान्‌पिढ्या लोकप्रिय होऊन राहिली, याचे कारण तिच्यात सर्वसामान्य माणसाच्या यौवनसुलभ भावनांचे आणि जीवनातल्या चैत्रपालवीचे प्रतिबिंब पडले आहे. तरुणतरुणींची योगायोगाने दृष्टभेट किंवा गाठभेट व्हावी आणि पुष्पबाणाने ही संधी साधून त्यांच्यावर

शरसंधान करावे ही गोष्ट मानवजातीच्या प्रारंभापासून घडत आली आहे. आजही ती सर्वत्र घडत आहे. जगाच्या अंतापर्यंत ती अशीच घडत राहील. दुष्यंत-शकुंतला, पुंडरीक-महाश्वेता, रोमिओ-ज्यूलिएट, जयन्त-लीला, देवदास पार्वती यांच्यासारख्यांची जीवने प्रतिभाशाली कवी वर्णन करतात; आणि घडीघडीला नवे शोध लागत असले, जीवनक्रम विजेच्या वेगाने बदलत असला, तरी जग या प्रेमकथांची पारायणे करीत राहते! याचे कारण एकच आहे. या कथांत जीवनांतले एक सनातन सत्य अंतर्भूत झाले आहे. स्त्री-पुरुषांचे प्रेम ही काय चीज आहे हे जेव्हा मला नीट कळतही नव्हते, अशा वयात मी 'शापसंभ्रम' पाहून या कथेवर मोहित झालो होतो. पुंडरीक आणि महाश्वेता यांच्या भावना व्यक्त करणारी गोड गाणी गुणगुणत होतो, याचेही कारण हेच असावे! कुठल्याही सनातन सत्याचे आकर्षण सर्वांना सहज होऊ शकते.

पण सनातन सत्यातही दोन जाती असतात. प्रीती, वात्सल्य इत्यादी निसर्गातून उगम पावणाऱ्या भावना निराळ्या, आणि मैत्री, करुणा इत्यादी निसर्गाशी निकटचा संबंध नसलेल्या भावना निराळ्या! या दुसऱ्या भावना मानवी संस्कृतीच्या निदर्शक असतात. पहिल्या प्रकारच्या भावनांचा आवेग तुफान किंवा झंझावात या सृष्टीतल्या गोष्टींप्रमाणे मोठा असतो. त्यामुळे कोणत्याही वयात माणसाला त्याचे आकलन होते. दुसऱ्या प्रकारच्या भावना त्या मानाने शांत असतात, संथपणे वाहतात. त्यांचे स्वरूप कळायला जीवन जगावे लागते. जीवनातल्या उन्हाचे चटके खावे लागतात. मुसळधार पावसात चिंब भिजावे लागते. थंडीच्या कडाक्यात गारठून जावे लागते. प्रसंगी संकटांच्या निखाऱ्यावरून फरफटत जाण्याची पाळी येते. प्रसंगी कंटकातून येणाऱ्या सूक्ष्म सुगंधात स्वर्ग शोधावा लागतो! म्हणूनच जीवन जगल्याशिवाय या दुसऱ्या प्रकारच्या भावनांची किंमत कळत नाही, त्यांचा खोलपणा जाणवत नाही. रुक्ष आयुष्याला त्यांच्यामुळे जो ओलावा येतो, त्याची जाणीव होत नाही. किंबहुना मानवी जीवन जितके अर्थपूर्ण तितकेच अर्थशून्य आणि जितके विकृत तितकेच उदात्त आहे, हे मुळी लक्षातच येत नाही.

कपिंजल हा पुंडरीक आणि महाश्वेता यांच्या प्रेमाआड येणारा एक माथे-फिरू तापसी आहे, अशीच माझी लहानपणी समजूत झाली होती. त्या वेळी

मी त्याच्याकडे तुच्छतेने पाहत होतो. पण आता पन्नास वर्षांनी त्याची आणि माझी भेट होत आहे, आता मी त्याच्याकडे उपहासाने किंवा तिरस्काराने पाहू शकत नाही. जीवनातल्या एका चिरंतन अनुभूतीचा आविष्कार त्याच्या रूपाने झाला आहे. असे मला वाटते. आता पुंडरीक आणि महाश्वेता यांची बनातली ती उन्मादक पहिली भेट मला पूर्वीइतकी आकृष्ट करीत नाही. प्रथमदर्शनी जडणारे प्रेम अजूनही मला खोटे वाटत नाही. पण आता ते माझ्या मनाला गुदगुल्या करू शकत नाही. माझ्या अंतःकरणात पुंडरीक आणि महाश्वेता या दोघांच्या लाजऱ्याबुजऱ्या उद्‌गारांचे गोड प्रतिध्वनी पूर्वीइतकेच उमटत नाहीत. कथानकातला एक दुवा एवढीच पूर्वी मी कपिंजलाची किंमत मानीत होतो. हे मूल्यमापन किती चुकीचे होते हे आज मला कळत आहे. कपिंजलाची मैत्री ही महाश्वेता-पुंडरीक यांच्या प्रीतीइतकीच मला नाट्यपूर्ण वाटत आहे. विश्वाच्या या विशाल पटावर माणसांच्या सोंगट्या किती विचित्र रीतीने नाचविल्या जातात याची जाणीव होऊन मन एका बाजूने विस्मयाने भरून जात आहे, दुसऱ्या बाजूने भयाने भारावून जात आहे.

स्वतःसाठी काही मागण्याकरता कपिंजलाने प्रत्यक्ष परमेश्वरापुढेसुद्धा तोंड उघडले असते असे मला वाटत नाही. असा प्रसंग त्याच्यावर आला असता तर आत्महत्या हे पाप आहे हे शास्त्रवचन ठाऊक असूनही, त्याने कुठल्यातरी सरोवरात समाधी घेतली असती. पण पुंडरिकाच्या बाबतीत त्याची स्थिती मोठी चमत्कारिक झाली. तो संतापी होता, स्वाभिमानी होता, वैराग्यशील होता. परंतु त्याचबरोबर मैत्रीच्या वज्रकठोर पण कुसुमकोमल अशा पाशाने तो पुंडरिकाशी बांधला गेला होता. “ भोग आपल्या कर्मांची फळं ! ” म्हणून पुंडरिकाला बनात सोडून त्याला कुठेही दूर निघून जाता आले असते. तपस्वी जीवनाचे नियम लक्षात घेता त्यात काही गैर आहे असे कुणीच म्हटले नसते. पण कपिंजलाला ते जमले नाही. “ यापुढे तुझा संबंध नको ” म्हणून पुंडरिकाला सांगून तो दूर जाऊ लागला. पण त्याचे पाय त्याला पुढे नेत होते आणि त्याचे मन त्याला मागे ओढीत होते ! बाह्यतः उग्र भासणाऱ्या या कठोर तपस्व्याच्या रक्ताचा कण आणि कण मैत्रीच्या जिव्हाळ्याने फुललेला होता. ते रक्त त्याला थोडेच पुढे जाऊ देणार ? तो मुकाट्याने पुंडरिकाकडे परत आला. इतकेच नव्हे तर स्वप्नातही त्याच्या हातून जे घडणे शक्य नव्हते,

ते करायला तो प्रवृत्त झाला. महाश्वेतेच्या दारी तो गेला—एखाद्या याचकासारखा ! " गंधर्वकन्ये, काय बोलू ? " असे म्हणाला. पण दुसऱ्याच क्षणी भडभडून त्याने आपल्या मित्राची सारी कर्मकहाणी तिला सांगितली. तो अहंकार विसरला, अभिमान विसरला, संताप विसरला, वैराग्य विसरला, तापसी जीवनाचे सारे यमनियम विसरला ! जणू जगातल्या सर्व गोष्टींची त्याला विस्मृती पडली. त्याला दिसत होती फक्त एक गोष्ट. वनात, लतामंडपात तळमळत पडलेला आपला प्रिय मित्र पुंडरीक. काही करून त्याचे प्राण वाचविले पाहिजेत या एका जाणीवेखेरीज त्याच्या इतर सर्व संवेदना बधिर झाल्या होत्या. म्हणून तर ज्या महाश्वेतेला तो एरवी शाप द्यायला निघाला असता, तिच्यापुढे पदर पसरून त्याने मित्राच्या प्राणांची भिक्षा मागितली.

किती विलक्षण नाट्य आहे हे ! जितके विलक्षण तितकेच करुण ! नियतीने पुंडरीक व कपिंजल यांना मैत्रीच्या पाशाने बांधून टाकले. या मैत्रीतून आपली कसोटी पाहणारा प्रसंग पुढे निर्माण होणार आहे याची कपिंजलाला कधीच कल्पना आली नसेल ! पण तो त्या कसोटीला उतरला. त्याचे मोठेपण या प्रसंगाने उजळून निघाले.

हे मोठेपण मला लहानपणी समजले नव्हते, उमजले नव्हते. पण आज 'शापसंभ्रम' चाळताना मला पुनःपुन्हा वाटत आहे, बाणभट्टाच्या कपिंजलाचे आणि गडकऱ्यांच्या सिंधूचे जवळचे नाते आहे. अस्थिर, असंयमी सुधाकराशी सिंधूची सांगड घालणाऱ्या दैवानेच कपिंजलाला पुंडरिकाच्या मैत्रीच्या पाशाने बांधून टाकले. नियती नेहमीच असे खेळ खेळत असते. जणू माणसाची सत्त्वपरीक्षा पाहण्याकरताच तिच्या या क्रूर क्रीडा चालतात ! तिच्या कठोर कसोटीला ज्या व्यक्ती उतरतात – मग त्या कल्पित असोत वा सत्य असोत – त्यांना आपल्या मनातल्या देवघरात स्थान मिळते. कपिंजल ही अशा व्यक्तींपैकी एक आहे. जगात पुंडरीक पुष्कळ भेटतात ! पण आपली व कपिंजलाची भेट मात्र क्वचितच होते. पण ज्याला जीवनाच्या खाचखळग्यांनी भरलेला प्रवास धीराने करायचा आहे, कार्यकारणभाव नसलेल्या अनेक दुःखांचे विष हसतमुखाने प्यावयाचे आहे, त्याला पुंडरिकाची सोबत फार वेळ उपयोगी पडत नाही. त्याने कपिंजलाचीच ओळख करून घ्यायला हवी. या एकाकी पण प्रेमळ तपस्व्याच्या अंतरंगात हळुवारपणाने प्रवेश करायला हवा. जगातल्या उदात्ततेचे दर्शन त्याला तिथे होईल.

८

# वाङ्मयातील सत्य, शिव व सौंदर्य

वा. ल. कुलकर्णी

सत्य, शिव व सौंदर्य ह्यांच्या मुळाशी असणारी तत्त्वे मूलतः एकच आहेत. सत्याच्या मुळाशी जी तत्त्वे आहेत तीच शिवाच्या मुळाशी व तीच सौंदर्य-कल्पनेच्या मुळाशी आहेत. सत्य म्हटले म्हणजे तेथे कार्यकारणाची सुसंगती, अनुमान व अनुभव यांची सुसंगती, दिसणे व असणे यातील सुसंगती, इत्यादी अनेक सुसंगतींचा समावेश होत असतो. सत्य म्हटले म्हणजे जिला कोठल्याही प्रकारची अन्तर्गत विसंगती टाऊक नाही असली सुसंगती असे म्हटले असता वावगे होणार नाही. सुसंगती, सर्वच बाबतीत सुसंगती हेच सत्याचे मुख्य लक्षण आहे. सत्याला असत्य खपत नाही, अन्तर्विरोध खपत नाही ह्याचा अर्थ त्याला कोठल्याही प्रकारची विसंगती खपत नाही असाच आहे. ते अथपासून इतिपर्यंत अन्तर्बाह्य सुसंगत असते; त्याला जर नाद असेल तर त्या नादातील सगळे सूर एकमेकांशी पूर्ण संवादी असतात; त्याला जर रूप असेल तर त्या रूपातील सर्व आकार हे एकमेकांना पूरक आहेत, मारक नाहीत असेच दिसून येते; व त्याला जर रंग असेल तर त्या रंगातील प्रत्येक छटा ही तिच्या जवळपासच्या छटेपेक्षा कितीही वेगळी असली तरी परिणामी त्या सर्व छटा संवादी आहेत, एकत्वसूचक आहेत, असेच आढळते. सुसंवाद, सुसंगती, सुरूपता, सुरेलता हेच सत्याचे भावगुण आहे; त्यांनीच सत्याची प्रकृती बनविलेली आहे.

शिवाच्याही बुडाशी हीच सुसंगती आढळत नाही का? शिव म्हणजे कल्याण, मानवांचे हित, मानवांचे अकलंकित सुख, मानवांचा निर्लेप चिरंतन असा आनंद. मानवांचे हित हे सुस्थितीत, सुव्यवस्थेत, सुसंगतीत सुसंवादित्वातच सामावलेले आहे. शिवाचा विचार करिताना आपण ज्या समाज-स्थितीचा विचार करितो त्या समाजाच्या अवस्थेत सर्वत्र सर्वांमध्ये सुसंवाद

नांदेल अशीच आपली अपेक्षा असते; ह्या आदर्श समाजव्यवस्थेत कोठेही विसंवाद दिसू नये, अन्तर्विरोध निर्माण होऊ नये, वेसूर कानांवर पडू नयेत अशीच आपली इच्छा असते; व ह्या इच्छेला अनुसरूनच आपण आजपर्यंत मानवोपयोगी समाजव्यवस्थांचा विचार करीत आलो आहोत. कटू, दुःखदायक, बोचक अशी विषमता नाहीशी व्हावी व सर्वत्र समता प्रस्थापित व्हावी म्हणून आपले प्रयत्न चालू आहेत; कवी 'बी' म्हणतात त्याप्रमाणे जगातील 'वैषम्य' आज आपणांस असह्य होऊ लागलेले आहे व त्याचे जागी 'साम्यता' स्थापन करण्यासाठी आपण धडपडत आहोत; पूर्णत्वापासून ढळलेले असे हे जग पूर्णत्वाकडे जाण्याची सदैव धडपड करीत आहे; हे पूर्णत्व गाठणे, ही चिररमणीय सुसंगती साधणे हे आपले ध्येय आहे. शिवाचा विचार करिताना आपणांस ह्याच गोष्टीची जाणीव होत असते. आपण शिवाशी नीतीचा संबंध जोडतो, तो बरोबरच आहे. नीतीचा जन्म ह्या सुसंगतीच्या इच्छेमधूनच झालेला आहे; नीतिनियमांची योजना ही अंतिम सुसंगती, हा अंतिम सुसंवाद, हे अंतिम चिरसुखदायी पूर्णत्व साधले जावे एवढ्याचसाठी मानवाने केलेली आहे. समाजाची धारणा व्हावी म्हणून नीतीची बंधने निर्माण झालेली आहेत, असे म्हणण्याऐवजी ज्या समाजव्यवस्थेत सर्वत्र सुसंवाद नांदेल अशा निर्दोष समाजव्यवस्थेप्रत स्वतःला नेण्यासाठी मानव जी धडपड करीत आहे तिच्यातून ही नीती उत्क्रान्त होते आहे, असे म्हणणे अधिक सयुक्तिक आहे. या दृष्टीने नीती ही शिवाकडेच अंगुलीनिर्देश करीत आहे; ती शिवाचे साधन आहे; परंतु शिवाप्रमाणे तिच्या मागचेही प्रेरक तत्त्व सुसंगती हेच आहे. शिवाचा उल्लेख केल्याबरोबर जशी नीतीची आठवण होते, तशीच सौजन्याचीही आठवण होते. वामन मल्हारांनी आपल्या समग्र लिखाणात शिवाच्या ऐवजी हाच शब्द वापरला आहे. सौजन्य हा शब्द शिव ह्या शब्दापेक्षा अधिक परिचित असा आहे. त्यात सामावलेली कल्पना ओळखीमुळे सहज लक्षात येईल अशी आहे व तशी ती लक्षात येतेही. परंतु सौजन्याची कल्पना शिवाच्या कल्पनेत अन्तर्भूत आहे : शिवाचा विचार करिताना आपण ज्या समाजव्यवस्थेचा विचार करितो त्या समाजव्यवस्थेचा सौजन्य हा प्राण आहे. ही सुजनताच, जीवनव्यवहारातील ही सुसंगतीच आपल्याला साधावयाची आहे; नीतीचे कार्य तेच आहे व त्यातच शिवाला स्थान आहे. तेव्हा शिव शब्द वापरला काय, नीती

शब्द वापरला काय किंवा सौजन्य शब्द योजला, काय त्यांच्या बुडाशी जे ध्येय-तत्त्व आहे ते सुसंगती, सुसंवाद, सुरूपता, सुरेलता, हे आहे असेच दिसून येते.

आता सौंदर्याबाबत बोलायचे; सौंदर्य हे तर बोलूनचालून सौंदर्यच; तेव्हा त्याचा आत्मा सुसंगती, सुसंवाद, प्रमाणबद्धता हाच असावा यात आश्चर्य ते कसले? सौंदर्य व सुसंगती ह्या दोन कल्पनांचे परस्परांशी एवढे साहचर्य आहे की सुसंगती, सुसंवाद, समप्रमाणता यांनाच सौंदर्य हे दुसरे नाव तर दिले नाही ना, अशीच शंका जाणत्यांच्या मनात यावी. सौंदर्य हे वस्तुनिष्ठ आहे की दृष्टिनिष्ठ आहे ह्या प्रश्नाचा निकाल काय लागायचा असेल तो लागो; परंतु एवढे मात्र खरे की ज्या ज्या ठिकाणी ज्या ज्या कोणाला सौंदर्याचा आभास होतो वा साक्षात्कार होतो, त्या त्या ठिकाणी त्याला काहीतरी अननुभूत अशी सुसंगती, सुसंवाद, सुरेलता जाणवलेली असते यात संशय नाही. सौंदर्याच्या कल्पनेचा संबंध नाद, रंग, रूप, आकार इत्यादींशी आज शतकानुशतके आपण लावीत आलो आहोत व त्याच दृष्टीने आपण त्याचे भजन, पूजन, चिंतन करीत आलो आहोत : त्याची उपासना ह्याच मार्गाने आपल्या हातून बरीचशी घडलेली आहे; परंतु त्यांच्या सर्व रूपांच्या बुडाशी असणारे ध्येयतत्त्व मात्र तेच ते आजही अबाधित आहे : सौंदर्य म्हणजे सुसंगती, सौंदर्य म्हणजे निर्दोष अशी संपूर्णता व स्वयंपूर्णता; सौंदर्य म्हणजे अंतर्बाह्य सुसंवाद, प्रमाण-बद्धता हेच ते तत्त्व होय.

सौंदर्याच्या कल्पनेच्या बुडाशी हे तत्त्व आहे याची अनेकांना जाणीव आहे, इतकी त्या तत्त्वात व सौंदर्याच्या कल्पनेत अभिन्नता आहे; प्रश्न जो येतो तो सौंदर्याच्या बुडाशी असणाऱ्या ह्या तत्त्वाबाबत येत नाही; किंवा शिव व सत्य ह्यांच्या बुडाशी असणाऱ्या ह्या तत्त्वाबाबत येत नाही, तर सत्य, शिव व सौंदर्य ह्यांचे परस्परसंबंध स्पष्ट करण्याबाबत येतो. सुसंगती, सुसंवाद हे एकच तत्त्व जर ह्या तिन्ही कल्पनांच्या बुडाशी असेल तर त्यांचे परस्परसंबंध हे एकमेकांना उपकारक, पूरक, परिपोषक असेच असावयास पाहिजेत, हे सहजच लक्षात येईल. परंतु हा विचार मनात येतो न येतो तोच दुसरा एक विचार मनात येतो : तो असा की सुसंगती, सुसंवाद हे तत्त्व जरी ह्या तिन्ही कल्पनांत आढळत असले तरी त्यावर खराखुरा अधिकार कोणाचा आहे? ते व्यवच्छेदक असे लक्षण कोणाचे ठरते? सत्याचे, की शिवाचे सौंदर्याचे? व मग ह्या प्रश्नाचे

उत्तर शोधू लागलो की असे दिसून येते की सुसंगती हे जरी ह्या तिन्ही कल्पनांचे प्रमुख लक्षण असले, तरी ते सौंदर्याचेच व्यवच्छेदक लक्षण ठरते; सत्य हे सुसंगत असते, शिवालाही संवादित्व अभिप्रेत असते, हे खरे असले तरी जे सुंदर ते सुसंगत असते असे म्हणण्याऐवजी जेथे जेथे सुसंगती तेथे तेथे सौंदर्य हे आढळतेच असे म्हणणे अधिक रास्त ठरते; व ह्या दृष्टीनेच पुढे विचार करू लागलो म्हणजे सत्य हे सुसंगत असते, अतएव तेही सुंदर ठरते हे लक्षात येते. सुसंगती, सुसंवाद, प्रमाणबद्धता हे सौंदर्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून मान्य केल्याबरोबर जेथे जेथे ह्या गोष्टी आढळतात तेथे तेथे सौंदर्याचे अधिष्ठान असते हे लक्षात येते; व सत्य, शिव व सौंदर्य ह्या तिन्ही कल्पनात अभेद आहे असे जे म्हटले जाते, ‘Truth is Beauty, Beauty Truth’ असे जे कीट्स् म्हणतो ते ह्या सुसंगती-सुसंवादाच्या परमतत्त्वाच्या व समानतत्त्वाच्या आधारावर हेही लक्षात येते. मग प्रश्न पडतो तो हा की ह्या तिन्ही तत्त्वांतील परस्परसंबंध एवढे जिव्हाळ्याचे आहेत, एवढे परस्परपूरक व पोषक आहेत हे जर आपणाला पटले तर मग वाद कोठे आहे? वाद जो आहे तो सत्य हे नेहमी शिवस्वरूप असतेच की नाही ह्याबाबत आहे; सत्य व शिव किंवा सत्य व नीती ह्यांत अभेद मानावयाचा काय ह्याबाबत आहे. त्याचप्रमाणे सत्य हे नेहमीच सुंदर असते काय व सौंदर्य हे सदैव सत्स्वरूपच आढळते काय हेही प्रश्न विचारले जात आहेत; जे सत्याबाबत तेच शिवाबाबत : शिव हे नेहमीच सुंदर असते काय व सौंदर्य हे नेहमीच शिवस्वरूप असते काय हा ह्या वादातील तिसरा प्रश्न होय. हेच प्रश्न कला, नीती, वाङ्मय इत्यादी सौंदर्य, सत्य व शिव ह्या अर्थाचे दुसरे शब्द वापरून एकसारखे विचारले जात आहेत व त्यांची समर्पक व निर्णायक उत्तरे शोधून काढणे ही एक अत्यंत कठीण गोष्ट होऊन बसली आहे.

ही गोष्ट एवढी कठीण होऊन बसण्याचे एक कारण असे आहे की अंतिम दृष्ट्या वर दाखविल्याप्रमाणे सत्य, शिव व सौंदर्य ह्या तिन्ही कल्पनांच्या मुळाशी एकच एक समानतत्त्व असले व त्या दृष्टीने त्यांतील अभेद आपणांस पटत असला तरी प्रत्यक्ष जीवनव्यवहारात ही तत्त्वे त्यांच्या विशुद्ध स्वरूपात आपल्या डोळ्यांपुढे फारशी येत नाहीत, तर त्यांच्याशी संबद्ध असलेला तपशील तेवढा आपल्यापुढे येत असतो. आपल्यापुढे **सत्य** नसते तर ज्याच्या द्वारा ते प्रतीत

व्हावयाला हवे ते **प्रत्यक्ष** असते–जे डोळ्यांना दिसते, कानांना ऐकू येते, इंद्रियांना जाणवते ते असते. शिव नसते तर काही निर्बंध असतात, कायदे असतात, काही नियम असतात, नियंत्रणे असतात, आचार असतात; व सौंदर्य नसते तर नाना प्रकारचे आकार, नाद, रंग, रूपे ही असतात. ह्या सर्व गोष्टी म्हणजे सत्य, शिव व सौंदर्य ह्या तत्त्वांचे तपशील होत; ही तत्त्वे नव्हत; व ह्या तपशीलाचीच आपला सतत संबंध येत असल्यामुळे त्यांचा परस्परांशी संबंध कसा जोडायचा, त्यांचे एकमेकांशी नाते काय, त्यांच्यांत सुसंवाद आहे, की विसंवाद आहे, विसंवाद असल्यास तो कोठे दिसून येतो इत्यादी अनेक प्रश्न आपणांस भंडावून सोडतात; व जेवढा तपशील तेवढाच ह्या प्रश्नांच्या व्याप्तीचा विस्तार असल्यामुळे त्यांची निर्णायक उत्तरे शोधून काढणे हे अत्यंत कठीण व आपल्या आवाक्याबाहेरचे काम होऊन बसते.

ह्या प्रश्नाच्या काठिण्याचा विचार करिताना जी आणखी एक गोष्ट ध्यानात येते ती अशी की, जे जे सत्य व शिव ते अंतिम दृष्ट्या सुसंगत अतएव सुंदर ठरत असले तरी सत्य व शिव यांचा जितक्या झटकन् उपयुक्ततेशी संबंध पोहोचतो, त्यांचा विचार करू लागताच उपयुक्ततेची कल्पना जितक्या लवकर आपल्या मनाची पकड घेते, तितक्या लवकर ती आपण सौंदर्याचा विचार करू लागल्यास आपल्या मनास शिवत नाही; सत्य हे साधन आहे की साध्य आहे हा प्रश्न जितक्या लवकर सत्यासंबंधी विचार सुरू झाल्याबरोबर आपल्या मनात स्फुरतो तितक्या लवकर तसला प्रश्न सौंदर्याच्या बाबतीत स्फुरत नाही. याचे कारण काय असावे ? याचे कारण असे दिसते की, सौंदर्य हे सत्यापेक्षा व शिवापेक्षा अधिक स्वयंपूर्ण आहे, अधिक स्वयंसिद्ध, अधिक स्वयंशासित असे आहे. एवढ्यासाठी स्वयंपूर्ण व संपूर्ण सुसंगती हे त्याचे खास व्यवच्छेदक लक्षण म्हणून आपण मानले. त्याचा संबंध ज्या आनंदाशी पोचतो त्या आनंदाला स्वार्थपर विचारांचा स्पर्शही सहन होत नाही. सौंदर्याचा अवतार कशासाठी तर सौंदर्य सिद्धीसाठी, सुसंगतिदर्शनासाठी, अशीच कल्पना सौंदर्याच्या उत्पत्तीचा व स्थितीचा विचार करू लागलो असता आपल्या मनात येते; आणि मग प्रश्न असा येतो की, सत्याच्या व शिवाच्या कल्पनांत जर अर्थपर–मग तो स्वार्थपर असो वा परार्थपर असो–असा भाग येत असेल व सौंदर्याच्या कल्पनेत जर तो त्या प्रमाणात येत नसेल तर ह्यांचे एकमेकांशी जमायचे कसे ?

त्यामुळे त्यांच्यांत थोडाफार तरी विरोध निर्माण झाल्यावाचून कसा राहील ?

अशा रीतीने तिन्ही तत्त्वांच्या तपशीलांचा एकमेकांशी मेळ कसा घालावयाचा ह्या अडचणीमुळे व सौंदर्याच्या ह्या विशिष्ट प्रकृतीमुळे वर दर्शविलेल्या प्रश्नांची अत्यंत समाधानकारक उत्तरे शोधून काढणे हे कठीण जात आहे. ह्या प्रश्नांचा केवळ वाङ्मयापुरताच म्हणजे केवळ वाङ्मयात्मक सौंदर्यापुरताच विचार करिताना कोणकोणत्या गोष्टी नजरेसमोर येतात ते पाहण्याचा प्रयत्न करू.

प्रथमदर्शनीच जी गोष्ट ध्यानात येते ती ही की वाङ्मय हे जरी मूलतः सौंदर्यस्वरूपी असले, सौंदर्यनिर्मिती हाच त्याचा जीवनहेतू असला, सौंदर्यसिद्धीच्या नियमांनुसार जरी त्याचा अवतार सिद्ध होत असला, व सौंदर्यदर्शनाने लाभणारा निरपेक्ष आनंद वाचकांना प्राप्त करून देण्याचा त्याचा प्रधान हेतू असला तरी त्याचा मालमसाला, त्यांचे शरीर, त्याची घटना, त्याची सिद्धी ही सत्यातूनच झालेली असते. सत्यातील ' सौंदर्य ' म्हणजेच सुसंगती शब्दांच्या द्वारा व्यक्त करणे वा साक्षात करणे म्हणजेच वाङ्मय निर्माण करणे होय असेच म्हणता येईल. परंतु यावर अशी शंका विचारता येते की सत्य हेच जर मुळात सुसंगत व सुरूप असते तर मग ते प्रगट होत असता सुरूप भासणारच; मग वाङ्मय ते वेगळे काय करिते ? ह्या प्रश्नाचे उत्तर सापडल्यास वाङ्मयाचे कार्य अधिक स्पष्ट होईल. ह्या प्रश्नाचे उत्तर असे दिसते की सत्य हे जरी मुळात सुसंगत व सुरूप असले तरी ते आपणास ज्या प्रत्यक्षातून, ज्या तपशीलातून गोचर होते – नव्हे, व्हावयाला हवे असते तो सर्व तपशील – जे जे दिसते ते, जे जे ऐकू येते ते, जे जे भावते ते सुसंगत सुरूप असतेच असे नाही. हा तपशील, हे प्रत्यक्ष म्हणजे सत्याचा मालमसाला आहे, सत्य नव्हे. ह्या तपशीलाच्याच आधाराने वाङ्मयाला सुरूप, सुसंगत अशा सत्याचा आविष्कार करावयाचा असतो; त्याचाच उपयोग करून, त्याचीच योजना करून, वाङ्मयाला त्यातून सुसंगत अशा सत्याची प्रतीती घडवावयाची असते. मग त्याकरिता त्याला ह्या तपशीलातून, हे जे दिसते त्यांतून, हे जे ऐकू येते व भावते त्यातून निवड करावी लागते. जो जो तपशील ह्या सुरूप सत्यदर्शनाचे दृष्टीने विशेष अर्थपूर्ण असतो अशाचीच निवड वाङ्मय करिते व जेणेकरून ही अंतिम सुसंगती संपूर्णपणे व्यक्त होईल अशा रीतीने त्याची अभिव्यक्ती करून त्यातून सौंदर्य

निर्माण करिते व सत्यदर्शन साधते. हे साधताना वाङ्मय वेगवेगळ्या रीतींचा अवलंब करते : काही वेळा – नव्हे पुष्कळ वेळा, जीवनातील केवळ विसंगतींचे कठोर दर्शन घडवून वाङ्मय हे त्यातून कोणत्या प्रकारची सुसंगती जन्माला यावयाला पाहिजे ते सुचवीत असते, विषमतेचे चित्र रेखाटून त्यातून समतेचे सुरूप व्यक्त करीत असते, दुर्जनता रेखाटून सुजनतेची कल्पना आणून देते, अन्याय व पारतंत्र्य ह्यांतील विसंगतींच्या दर्शनातून न्याय व स्वातंत्र्य ह्या कल्पनांतील सुसंगती प्रगट करीत असते. वाङ्मय सत्यातील सौंदर्य, सत्यातील सुसंगती शब्दद्वारा व्यक्त करिते असे जे वर म्हटले ते ह्या अर्थाने.

ह्या प्रत्यक्षाची वा तपशीलाची निवड करून वाङ्मय सत्यदर्शन घडविते म्हणजे काय करिते ह्याचा अधिक खोलवर विचार करिता येणे शक्य आहे : वाङ्मय नाना तऱ्हेची सत्ये प्रगट करीत असते. त्यांतील काही नादसत्ये असतात, काही आकारसत्ये असतात, काही रंगसत्ये असतात, काही भावसत्ये असतात, काही ह्यापेक्षा अधिक व्यापक व अधिक सूक्ष्म अशी -- ज्यांचे वर्गीकरण करून त्यांना विशिष्ट नाव देता येणार नाही असली – जीवनसत्ये असतात; आपल्या कानांवर नानाप्रकारचे नाद सतत पडत असतात; ते सर्वच सुसंवादी असतात असे नाही; त्यांत विसंवादच अधिक असतो. परंतु त्यांतूनच अनेक सुसंवादी सुरांची निवड करून उत्तम गवई अशी नादसत्ये निर्माण करीत असतो की ज्यांतील सुसंवाद, ज्यांतील 'संगीत' आपल्याला मोहून टाकते. आपल्या डोळ्यांसमोर नाना तऱ्हेचे रंग व नाना तऱ्हेचे आकार तरळत असतात, परंतु त्यांतील रंगसत्ये व आकारसत्ये एखादा उत्तम चित्रकारच आपल्या नजरेला आणून देऊ शकतो; त्याच्या कुंचल्यामध्येच ती रंगांतील आणि आकारांतील विलक्षण सुसंगती प्रगट करण्याचे कौशल्य असते. एखादा कवी वा कथालेखकही केवळ शब्दांच्या द्वारा ही नादसत्ये, रंगसत्ये, आकारसत्ये व्यक्त करू शकतो; काही कवींच्या ठिकाणी ही रंग, रूप, नाद व स्पर्श ह्यांतील सुसंगती व्यक्त करण्याचे अभिजात कौशल्य असते. आपल्याकडे कवी श्री. बा. भ. बोरकर यांच्या काव्यात ते विशेष जाणवते. नाद, रंग, आकार यांच्यांतील ही सुसंगती व्यक्त करण्याचे खरे कार्य म्हणजे गायकांचे, चित्रकारांचे, शिल्पकारांचे; कारण त्या सुसंगतीच्या अभिव्यक्तीला आवश्यक ती साधने त्यांना सुलभ असतात; परंतु बोरकरांसारखा एखादा कवी जेव्हा केवळ शब्दांच्या द्वारा ही नादसत्ये, रंगसत्ये

व आकारसत्ये प्रगट करू शकतो त्या वेळी वाङ्मयाचे ठिकाणी सत्यदर्शन घडविण्याचे केवढे प्रभावी सामर्थ्य असते, त्याची थोडी कल्पना येऊ शकते.

वाङ्मय जी सहजतया प्रगट करू शकते ती भावसत्ये होत. भावसत्ये म्हणजे काय याची फोड करिता येणे मोठे कठीण आहे. वाङ्मयाचे कार्य भावनिर्मिती हे असते असे सांगण्यात येते. एखाद्या जीवनव्यवहाराच्या दर्शनाने, चिंतनाने व मननाने जे भाव कवीच्या मनात निर्माण झालेले असतील तेच भाव तितक्याच उत्कटतेने तो जेव्हा आपल्या वाचकांच्या मनांत उत्पन्न करू शकतो त्या वेळी त्याच्या कार्याची फलश्रुती होते असे आपण समजतो; परंतु हे जे भाव कवीच्या मनात उत्पन्न झालेले असतात व जे तो वाचकांच्या मनात तितक्याच उत्कटतेने निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो, त्या भावांचे स्वरूप जर न्याहाळले तर त्यांत ही अन्तर्बाह्य सुसंगती दिसून येते; ते भाव आपल्या हरघडीच्या अनुभवांतून उत्पन्न होणाऱ्या आपल्या सर्वसामान्य भावांसारखे नसतात. त्यांत व्यक्तिगत, खाजगी, म्हणजे स्वार्थपर व म्हणूनच थोडाफार विसंगत असा उरलेला भाग नसतो. ते त्या कवीच्या, एका व्यक्तीच्या मनातील भाव असले, तरी त्यांना विश्वात्मकता आलेली असते; ते सुसंगत बनलेले असतात : विश्वभावांशी सुसंगत बनलेले असतात म्हणजेच त्यांतील तपशीलाचा भाग, व्यक्तिगत असा भाग, हिणकस, क्षणजीवी असा भाग नाहीसा झालेला असतो व केवळ विश्वात्मक, शाश्वत, अत्यंत सुसंगत, सर्व दृष्टींनी संवादी असा भाग तेवढा शिल्लक राहिलेला असतो. म्हणजेच त्यांना सौंदर्य प्राप्त झालेले असते, त्यांत एक प्रकारची विलक्षण सुसंगती अवतरलेली असते; तेच त्या भावांचे भावसत्य होय. त्यात एक प्रकारची स्वयंपूर्णता दिसून येते. बरे, हे भावसत्य कवी ज्या कल्पनाचित्रांच्या ( Images ) द्वारा सूचित करतो, ज्या प्रतिमांच्या द्वारा व्यक्त करितो त्यांतही एक विलक्षण सुसूत्रता व सुसंगती असते; ही त्यांतून जाणवणारी भावसंगती असते; ह्या सर्व कल्पनाचित्रांतून व प्रतिमांतून ते एकच एक भावसत्य सुसंगतपणे प्रतीत होत असते व मग त्या काव्याच्या वाचनाने वाचकाला जो आनंद होतो तो ही विलक्षण भावसंगती जाणवल्याने, या विलक्षण भावसत्याची व म्हणूनच भावसौंदर्याची प्रतीती आल्याने उत्पन्न झालेला असतो. म्हणूनच कवी आपल्या मनात उत्पन्न झालेले भाव आपल्या वाचकांच्या मनात तितक्याच उत्कटत्वाने प्रगट करण्याचा प्रयत्न करीत असतो,

निर्माण करिते व सत्यदर्शन साधते. हे साधताना वाङ्मय वेगवेगळ्या रीतींचा अवलंब करते : काही वेळा – नव्हे पुष्कळ वेळा, जीवनातील केवळ विसंगतींचे कठोर दर्शन घडवून वाङ्मय हे त्यातून कोणत्या प्रकारची सुसंगती जन्माला यावयाला पाहिजे ते सुचवीत असते, विषमतेचे चित्र रेखाटून त्यातून समतेचे सुरूप व्यक्त करीत असते, दुर्जनता रेखाटून सुजनतेची कल्पना आणून देते, अन्याय व पारतंत्र्य ह्यांतील विसंगतींच्या दर्शनातून न्याय व स्वातंत्र्य ह्या कल्पनांतील सुसंगती प्रगट करीत असते. वाङ्मय सत्यातील सौंदर्य, सत्यातील सुसंगती शब्दद्वारा व्यक्त करिते असे जे वर म्हटले ते ह्या अर्थाने.

ह्या प्रत्यक्षाची वा तपशीलाची निवड करून वाङ्मय सत्यदर्शन घडविते म्हणजे काय करिते ह्याचा अधिक खोलवर विचार करिता येणे शक्य आहे : वाङ्मय नाना तऱ्हेची सत्ये प्रगट करीत असते. त्यांतील काही नादसत्ये असतात, काही आकारसत्ये असतात, काही रंगसत्ये असतात, काही भावसत्ये असतात, काही ह्यापेक्षा अधिक व्यापक व अधिक सूक्ष्म अशी -- ज्यांचे वर्गीकरण करून त्यांना विशिष्ट नाव देता येणार नाही असली – जीवनसत्ये असतात; आपल्या कानांवर नानाप्रकारचे नाद सतत पडत असतात; ते सर्वच सुसंवादी असतात असे नाही; त्यांत विसंवादच अधिक असतो. परंतु त्यांतूनच अनेक सुसंवादी सुरांची निवड करून उत्तम गवई अशी नादसत्ये निर्माण करीत असतो की ज्यांतील सुसंवाद, ज्यांतील 'संगीत' आपल्याला मोहून टाकते. आपल्या डोळ्यांसमोर नाना तऱ्हेचे रंग व नाना तऱ्हेचे आकार तरळत असतात, परंतु त्यांतील रंगसत्ये व आकारसत्ये एखादा उत्तम चित्रकारच आपल्या नजरेला आणून देऊ शकतो; त्याच्या कुंचल्यामध्येच ती रंगांतील आणि आकारांतील विलक्षण सुसंगती प्रगट करण्याचे कौशल्य असते. एखादा कवी वा कथालेखकही केवळ शब्दांच्या द्वारा ही नादसत्ये, रंगसत्ये, आकारसत्ये व्यक्त करू शकतो; काही कवींच्या ठिकाणी ही रंग, रूप, नाद व स्पर्श ह्यांतील सुसंगती व्यक्त करण्याचे अभिजात कौशल्य असते. आपल्याकडे कवी श्री. बा. भ. बोरकर यांच्या काव्यात ते विशेष जाणवते. नाद, रंग, आकार यांच्यांतील ही सुसंगती व्यक्त करण्याचे खरे कार्य म्हणजे गायकांचे, चित्रकारांचे, शिल्पकारांचे; कारण त्या सुसंगतीच्या अभिव्यक्तीला आवश्यक ती साधने त्यांना सुलभ असतात; परंतु बोरकरांसारखा एखादा कवी जेव्हा केवळ शब्दांच्या द्वारा ही नादसत्ये, रंगसत्ये

व आकारसत्ये प्रगट करू शकतो त्या वेळीं वाङ्मयाचे ठिकाणी सत्यदर्शन घडविण्याचे केवढे प्रभावी सामर्थ्य असते, त्याची थोडी कल्पना येऊ शकते.

वाङ्मय जी सहजतया प्रगट करू शकते ती भावसत्ये होत. भावसत्ये म्हणजे काय याची फोड करिता येणे मोठे कठीण आहे. वाङ्मयाचे कार्य भावनिर्मिती हे असते असे सांगण्यात येते. एखाद्या जीवनव्यवहाराच्या दर्शनाने, चिंतनाने व मननाने जे भाव कवीच्या मनात निर्माण झालेले असतील तेच भाव तितक्याच उत्कटतेने तो जेव्हा आपल्या वाचकांच्या मनांत उत्पन्न करू शकतो त्या वेळीं त्याच्या कार्याची फलश्रुती होते असे आपण समजतो; परंतु हे जे भाव कवीच्या मनात उत्पन्न झालेले असतात व जे तो वाचकांच्या मनात तितक्याच उत्कटतेने निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो, त्या भावांचे स्वरूप जर न्याहाळले तर त्यांत ही अन्तर्बाह्य सुसंगती दिसून येते; ते भाव आपल्या हरघडीच्या अनुभवांतून उत्पन्न होणाऱ्या आपल्या सर्वसामान्य भावांसारखे नसतात. त्यांत व्यक्तिगत, खाजगी, म्हणजे स्वार्थपर व म्हणूनच थोडाफार विसंगत असा उरलेला भाग नसतो. ते त्या कवीच्या, एका व्यक्तीच्या मनातील भाव असले, तरी त्यांना विश्वात्मकता आलेली असते; ते सुसंगत बनलेले असतात : विश्वभावांशी सुसंगत बनलेले असतात म्हणजेच त्यांतील तपशीलाचा भाग, व्यक्तिगत असा भाग, हिणकस, क्षणजीवी असा भाग नाहीसा झालेला असतो व केवळ विश्वात्मक, शाश्वत, अत्यंत सुसंगत, सर्व दृष्टींनी संवादी असा भाग तेवढा शिल्लक राहिलेला असतो. म्हणजेच त्यांना सौंदर्य प्राप्त झालेले असते, त्यांत एक प्रकारची विलक्षण सुसंगती अवतरलेली असते; तेच त्या भावांचे भावसत्य होय. त्यात एक प्रकारची स्वयंपूर्णता दिसून येते. बरे, हे भावसत्य कवी ज्या कल्पनाचित्रांच्या ( Images ) द्वारा सूचित करतो, ज्या प्रतिमांच्या द्वारा व्यक्त करितो त्यांतही एक विलक्षण सुसूत्रता व सुसंगती असते; ही त्यांतून जाणवणारी भावसंगती असते; ह्या सर्व कल्पनाचित्रांतून व प्रतिमांतून ते एकच एक भावसत्य सुसंगतपणे प्रतीत होत असते व मग त्या काव्याच्या वाचनाने वाचकाला जो आनंद होतो तो ही विलक्षण भावसंगती जाणवल्याने, या विलक्षण भावसत्याची व म्हणूनच भावसौंदर्याची प्रतीती आल्याने उत्पन्न झालेला असतो. म्हणूनच कवी आपल्या मनात उत्पन्न झालेले भाव आपल्या वाचकांच्या मनात तितक्याच उत्कटत्वाने प्रगट करण्याचा प्रयत्न करीत असतो,

असे म्हणण्याऐवजी त्याला जाणवलेली भावसंगती, त्याला जाणवलेले भावसत्य, त्याला जाणवलेले भावसौंदर्य व त्यापासून त्याला झालेला सुसंगतीदर्शनाचा म्हणजेच सौंदर्यदर्शनाचा व सत्यदर्शनाचा आनंद, ह्या सर्वांचा एकसमयावच्छेदेकरून अनुभव वाचकाला यावा अशी त्याची इच्छा असते व एवढ्याचसाठी त्याची धडपड असते, असे म्हणणेच अधिक सयुक्तिक ठरते. कवी भावसत्य प्रगट करतो म्हणजेच भावसौंदर्य प्रगट करितो, असे जे वर म्हटले ते ह्या अर्थाने.

ह्याच दृष्टीने अधिक खोलवर जाऊन पाहिले की हेच कार्य वाङ्मयाच्या इतर शाखांतही कसे चाललेले असते ह्याची थोडीफार कल्पना येऊ शकते. कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, इत्यादी वाङ्मयाच्या सर्व शाखांचा उद्देश जीवनव्यवहारातील नाना अंगोपांगांतील ही नानाविध सत्ये ज्या प्रत्यक्षातून जाणवतात, त्यातील अत्यंत सूचक, संबद्ध व अर्थपूर्ण अशा तपशीलाच्या मदतीने ती व्यक्त करणे, त्यांतील संगती, त्यांतील सौंदर्य हे वाचकांच्या, श्रोत्यांच्या, प्रेक्षकांच्या नजरेला आणणे हाच असतो. ह्या वाङ्मयात्मक सत्यदर्शनाने जसा सुरूपदर्शनाचा आनंद होतो तशीच भावनिर्मितीही होते; परंतु ही भावनिर्मिती एखाद्या पट्टीच्या वक्त्याचे भावनांना हलवून सोडणारे भाषण ऐकून होणाऱ्या भावनिर्मितीपेक्षा वेगळ्या स्वरूपाची असते; तेथे श्रोत्यांना कार्यप्रवण करण्याचीच वक्त्याची इच्छा असते व भावनांचे उद्दीपन त्याच दृष्टीने झालेले असते; येथे मूळ हेतू वाचकांना कार्यप्रवण करणे हा नसतो, तर आपणाला जाणवलेली विशिष्ट भावसंगती वाचकांना जाणवेल अशा रीतीने प्रकट करणे हाच प्रधान हेतू असतो; त्यामुळे येथे संगतीदर्शनाला व त्याच्या जाणिवेपासून होणाऱ्या विशिष्ट सुखाला महत्त्व अधिक असते; अर्थात भाव निर्माण होतात व प्रत्येक भावनेच्या पोटी कार्यप्रवणता असल्यामुळे ते भाव वाचकांना थोडेफार कार्यप्रवणही करितात; नाही असे नाही; परंतु हे भाव वाचकांना कार्यप्रवण करण्यासाठी निर्माण झालेले नसल्यामुळे, त्यांत विशिष्ट सुसंगतींची प्रतीती घडविणे आणि तज्जन्य आनंद देणे हाच प्रधान हेतू असल्यामुळे, त्यांच्यांतील कार्यप्रवणता ही वक्त्याच्या भाषणाने उत्पन्न झालेल्या भावांच्या ठिकाणी आढळून येणाऱ्या कार्यप्रवणतेपेक्षा कितीतरी पटीने कमी उत्कट असते. वाङ्मयाचे सामर्थ्य अजमावताना आपणांस ह्या सर्व गोष्टी नीट लक्षात घ्याव्या

लागतात.

वाङ्मय हे जीवनातील नानाविध सत्यांतील सौंदर्य व्यक्त करिते हे खरे असले तरी वाङ्मय हे मानवांनी मानवांकरिताच निर्माण केलेले असल्यामुळे त्यातील जी सत्ये मानवी जीवनाशी अधिक संलग्न असतात, त्यांतील संगतीदर्शन हे मानवांना विशेष महत्त्वाचे वाटावे हे स्वाभाविकच आहे. त्यामुळे केवळ नादसंगती, रंगसंगती वा रूपसंगती ज्यातून व्यक्त होते ते वाङ्मय वाचकांना एवढे महत्त्वाचे वाटत नाही, तर ज्यामध्ये जीवनव्यवहारातील अत्यंत व्यापक, सखोल व अत्यंत सूक्ष्म अशी भावसत्ये, विचारसत्ये, जीवनसत्ये प्रगट झालेली असतात ते वाङ्मय त्यांना विशेष महत्त्वाचे वाटते; तेच श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय होय असा निर्णय सर्वसामान्य वाचक कालमुखाने देत असतो. येथे थोडीशी उपयुक्ततेचीच कसोटी वाङ्मयाला लावली जाते हे खरे; परंतु ही उपयुक्तता संकुचित अर्थाने लक्षात घेतलेली नसते, तर अत्यंत व्यापक अर्थाने. जीवनाचा अर्थ समजून घेण्याची, जीवनातील खोलवर दडलेली नानाविध सत्ये जाणण्याची, जीवन कसे जगले असता ते खऱ्या अर्थाने अधिक सुखदायी होईल हे कळून घेण्याची मानवाची जोपर्यंत इच्छा आहे व त्यासाठी जोपर्यंत त्याची धडपड चालू राहणार आहे, तोंपर्यंत ज्या वाङ्मयातून जीवनातील अत्यंत व्यापक व अत्यंत सूक्ष्म अशी जीवनसत्ये प्रगट होत असतात, त्या वाङ्मयाला तो सर्वश्रेष्ठ समजल्याशिवाय कधीही राहणार नाही. असल्या वाङ्मयातून प्रगट होणाऱ्या ह्या जीवनसत्यांच्या, ह्या विविध सुसंगतीच्या जाणिवेने तो जरी तत्काल कार्यप्रवृत्त झाला नाही तरी त्याच्या एकंदर मनोव्यापारांवर होणारा त्या जाणिवेचा परिणाम हा शिवस्वरूपी ठरल्याशिवाय राहणार नाही. जीवनातील सत्ये, जीवनातील नाना अंगोपांगांमधील सुसंगती, संवादित्व, त्याला जसजसे अधिकाधिक जाणवेल तसतसा तो त्या अंतिम सुसंगतीच्या, अंतिम ध्येयस्थितीच्या, पूर्णत्वाच्या म्हणजेच शिवाच्या जवळ जवळ जाऊ लागेल. जीवनाचा अर्थ त्याला जसजसा अधिक सुसंगतपणे लागत जाईल तसतसे शिव हे त्याला अधिकाधिक साध्य होईल हे उघडच आहे. वाङ्मय हे संवादित्वाचे, सुसंगतीचे, सौंदर्याचे, समतेचे, समप्रमाणतेचे, सुरूपतेचे जीवनातील खरेखुरे स्वरूप आपल्या लक्षावधी वाचकांना प्रगट करून दाखवीत असते व त्यांचे ठिकाणी असणारी सुसंगतीची, सुरूपतेची आवड पुरवीत असते व वाढवीत असते.

वाङ्मयाच्या सतत परिचयाने ज्याच्या अन्तःकरणात ही खऱ्याखुऱ्या सुरूपतेची आवड उत्पन्न झालेली आहे त्याला कोठल्याही प्रकारची विसंगती, कोठल्याही प्रकारची विरूपता, सहन होणे कदापीही शक्य नाही. मग ती राजकीय क्षेत्रातील असो, सामाजिक क्षेत्रातील असो, सांस्कृतिक क्षेत्रातील असो वा धार्मिक क्षेत्रातील असो. ह्या विसंगतीबद्दल एक प्रकारची चीड त्याचे मनात तत्काळ निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही. ज्या प्रमाणात वाङ्मय हे जीवनातील नाना सुसंगती, नानाविध सत्ये उघड करून अब्जावधी वाचकांच्या मनांत ही सुरूपतेची व सुसंगतीची खरीखुरी आवड उत्पन्न करीत जाईल, त्या प्रमाणात रूढी, परंपरा, संकेत, दास्य इत्यादींनी निर्माण केलेल्या अनेकविध विसंगतींच्याबद्दल त्यांच्या मनांत विलक्षण तिरस्कार अधिकाधिक उत्कटतेने निर्माण होत जाईल व त्यांचे निर्दालन करण्याकडे त्यांची साहजिकच अधिकाधिक प्रवृत्ती होत जाईल. तेव्हा वाङ्मयाने ही सुसंगतीची, सुरूपतेची हजारो मानवांच्या मनांत सुप्त असलेली आवड पुरविण्याचे व सतत वाढविण्याचेच आपले कार्य करीत राहणे अत्यंत अगत्याचे आहे. "असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणे व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचे संस्थापन करणे, हे आपले अवतारकृत्य आहे...आपली वाङ्मयात्मक तपश्चर्या या ध्येयाला अनुसरून झाली तर, तुष्टी, पुष्टी व शांती यांचा लाभ आपणांस व जगास मिळून दैवी संपत्तीचे जगात साम्राज्य होईल व उच्चतम कलाविलासात रममाण होऊन अलौकिक अशा सात्विक आनंदाचे आपण वाटेकरी होऊ" हा वामन मल्हारांनी वाङ्मयसेवकांना दिलेला संदेश ह्याच दृष्टीने महत्त्वाचा आहे. तोच लक्षात ठेवून सत्याची, सुसंगतीची म्हणजेच शिवाची व सौंदर्याची उपासना व जोपासना करीत राहण्याचे कार्य वाङ्मयसेवकांनी सतत करीत राहावे. त्यातच त्यांचे समाधान व वाङ्मयाचे हित आहे.

१

४११२६ निबंध
१८७५ १५।१।६८

# कोंडलेले क्षितिज

**दुर्गा भागवत**

अश्वत्थाम्याची मूर्ती आठवली की मला गुदमरल्यासारखे होते. खूप मोठा बिलोरी आरसा असावा आणि त्याची मोजता येणार नाहीत अशी शकले शकले व्हावीत आणि तरीही प्रत्येक भंगलेल्या तुकड्यात आजूबाजूचे मावेल तेवढे प्रतिबिंब मात्र सारखे दिसत राहावे, आणि एकेरी प्रतिबिंबांचा एकमेकांशी ताळमेळ नसला तरी त्या सर्वांतून एकाच गोष्टीचे रूप बिंबलेले दिसावे, तसेच अश्वत्थाम्याच्या व्यक्तिमत्वाचे झाले आहे. द्रोण, पांडव, युधिष्ठिर या साऱ्यांत तो दुभंगला. युद्धाने साफ भंगलेली व्यक्ती जर कुणी असेल तर हीच. युद्धाने याचे सारे व्यक्तिमत्वच तिरकस झाले. रुद्र, भयानक आणि तरीही अती खंतावलेला दुसरा कुणी पुरुष महाभारतात याच्यासारखा नाही. त्याच्या विदीर्ण व्यक्तिमत्वाच्या कणांना सांधणारा एकच मानसिक दुवा आहे : तो म्हणजे सरलतेचा. बालभावाचा. तो शेवटपर्यंत बोढाळ मूलच राहिला. तो वीर झाला, पण जाणता झाला नाही. मोठा झाला नाही. योद्धा झाला, पण पुरुष झाला नाही. तो नपुंसक नव्हता, पण पौगंडदशेच्या पलीकडे त्याचे मन पोचू शकले नाही. अपरिपक्व नवयुवकाचे मन एकदा आदर्शवादाने पछाडले म्हणजे ज्या विकृती भोगते, त्याच विकृती—बऱ्या आणि वाईट—अश्वत्थाम्याच्या वाट्याला आल्या. त्या जाज्वल्य वृत्तींना मनोरम आकार देणे, आदर्शवादाला युक्त स्वरूप देणे त्याला जमले नाही. हा मुलगा स्वप्नेही नीट पाहणारा नव्हता आणि वास्तवाशीही त्याचे नीटसे नाते कधी जमले नाही. सदा बावरलेला, भित्रा नसूनही गडबडलेला तो दिसतो. स्वतःचे हरवलेले काही तरी कावरेबावरे पणाने शोधीत राहतो. कुणी पाहिले तर जागच्या जागी संकोचून उभा राहतो. संकट सामोरे आले तरच तो ताठ उभा राहतो आणि निकराने आणि विश्वासाने ते दूर करतो. बोलणे सहसा याला माहीत नाही. पण जगाकडे पाहण्याची

दृष्टी चौकस नसली तरी मायाळू. स्वसंरक्षणाविषयी हा जागरूक आहे. पित्याने दिलेल्या ब्रह्मशिर-अस्त्रामुळे वास्तविक ब्रह्मांडाला जाळील, बारा वर्षे पृथ्वी निर्बीज करील, असे कोणाचाही थरकाप करणारे अस्त्र त्याला विद्यार्थीदशेतच मिळाले होते. मुळातच हा अंतर्मुख; पण अंतर्मुखाला गूढ सत्याचा आविष्कार झाला नाही. कारण त्याची कल्पनाशक्ती अधू होती. त्याची वासना रसरंगहीन होती. त्याच्या पौरुषाची क्षितिजे मुळातच त्याच्या बापाने वात्सल्याच्या विपरीत उद्रेकात कोंडून टाकली होती. वात्सल्याच्या या उफराट्या कोंडीतून अश्वत्थामा कधीही मुक्त झाला नाही.

योगायोगाने युद्ध आले. थोरामागे थोर सेनानी पडले, आणि उडत्या प्राणांचे क्षीण कण धुळीत मिसळणाऱ्या दुर्योधनाच्या इच्छेचा अंकुर अश्वत्थाम्याच्या वैशिष्ट्यपूर्ण युद्धकृतीत स्फुरला. धूळ, रक्त, गिधाडे, कोंडलेल्या काळोखी दिशा, असंयत वैर, कमालीचे वैराग्य आणि निराशा, या सर्वांचा अर्क त्याच्या सेनापतीच्या भूमिकेत आढळतो. वास्तविक सेनानीची भूमिका ही मुळी अश्वत्थाम्याची नैसर्गिक भूमिकाच नव्हे. भीष्म, द्रोण, कर्ण वगैरेंना ती साजेशी होती. या भूमिकेला लागणारे सुसंस्कृत, प्रगल्भ व टवटवीत व्यक्तिमत्व आणि कल्पकता ही त्याच्यामध्ये नव्हती. पण थोरांमागे थोर पडले आणि हे माडाएवढे वाढलेले थोराड, निष्ठावान, बलिष्ठ पोर केवळ प्रसंगामुळे सेनानी झाले. ते पायघोळ, ढिगाळ पद त्याच्या व्यक्तिमत्त्वाला केवढे तरी पुरून उरणारे होते. या योद्ध्याचे स्नायू आणि रक्त ही युद्धाने स्फुरली, पण मन यत्किंचितही तरल झाले नाही. ते झिंगले; पण कोणत्याही दृश्याने हलून नव्हे. बापाच्या मृत्यूच्या प्रसंगाने तो हादरला. पण त्या हादऱ्याने त्याला कैफ आला तो केवळ अजाण दुःखाचा. त्यातून उद्‌भवले ते मूढ क्रौर्य. आणि क्रौर्यात असायचा तेवढा रिक्तपणा, वांझोटा मोठेपणाही अश्वत्थाम्याच्या वाट्याला आला.

अश्वत्थाम्याचे जीवन सारे धुक्याने व्यापलेले वाटते. त्याच्या जीवननाट्यातले चार प्रसंगच काय ते व्यासाने प्रकट केले आहेत. आणि हे अपुरे नाटक त्याने कुठेही जोडणी न करता तसेच विस्कळितपणे बाजूला सारून दिले आहे. मनासारखा न जमलेला डाव त्याने उधळून टाकला आहे. आणि म्हणूनच अर्धवट असला तरी हा विस्कटलेला डाव पुन्हा मांडणे कुणाला जमण्यासारखे नाही. पहिल्या प्रसंगात दूध मिळत नव्हते तेव्हाचे बाळपणचे दृश्य आहे. दरिद्री

बापाचे दुधाकरिता लालचावलेले मूल पीठ कालवलेले पाणी दूध समजून पिते आहे आणि आनंदाने ' मी दूध प्यालो ! ' म्हणत थयथय नाचते आहे. याप्रसंगात बाळपणातले निरागसपण हे कुठेही केव्हाही आढळणारेच आहे. व्यक्तीचा विशेष असा काही नाही. दारिद्र्यावरचे ते एक दारुण भाष्य आहे. अविस्मरणीय असे. पण यात विशेष हाच की हे वैषम्याचे भाष्य याच मुलाच्या अनुसंधानात अमर वाणीत उच्चारले गेले. त्या अमर वाणीमुळे अश्वत्थाम्याच्या जीवनाची पार्श्वभूमी रेखाटली गेली. या पार्श्वभूमीमुळे आजूबाजूला धुके पसरले असले, तरी बिंदूबिंदूंनी इथे-तिथे रेखाटलेली अश्वत्थाम्याची आकृती कल्पनेने अजमावता येते.

दुसरा प्रसंग त्याच्या विद्यार्थिदशेतला, पण दोन दृश्यांत विभागलेला आहे. द्रुपदाशी वैराची प्रतिज्ञा करून आलेला द्रोण मुलाबाळांसहित द्रुपदाला नाहीसे करण्याची मनोमन प्रतिज्ञा करतो. त्या प्रतिज्ञेच्या पालनाचा प्रारंभ तो मुलाला विद्या देऊन करतो. कौरव-पांडव नंतर आले. अश्वत्थाम्याच्या स्वतंत्र सहज वर्तनाचे अत्यंत ओझरते, एका वाक्यात मावणारे एकच मनोज्ञ चित्र व्यासाने रेखाटले आहे. हे कौशल्य म्हणावे की गफलत हे मला समजत नाही. पण हे टाकण्यासारखे खचित नाही, याचा उमज व्यासाला नव्हता असे कसे म्हणावे ?

द्रोण नव्यानेच हस्तिनापुरी आलेला. आपले नावगाव गुप्त राखूनच तो कृपाचार्यांकडे तेव्हा राहत होता. पांडव तिथे आसपास खेळायला यायचे. चोरून अश्वत्थामा त्यांच्यांत मिसळायचा. पांडवांवर त्याचे मन जडले आणि त्या भाबड्या सरळ मुलाने अर्जुनाला—आपल्या लाडक्या मित्राला—आपणाला अवगत असलेली युद्धाची विद्या शिकवली. राजपुत्राची मैत्री म्हणजे केवढी भाग्याची गोष्ट. त्या भाग्याचे उतराई होण्यासाठी त्याने विद्या दिली का ? गरिबी त्याला आतून टोचीत होती का ? पण एवढे मात्र खरे की जे दिले ते अश्वत्थाम्याने भरलेल्या मनाने, उदारपणाने, लाजाळू वृत्तीने आणि खेळाच्या पवित्र्यात दिले. कुणाला न कळता मैत्रीचे ऋणप्रदान त्याने केले. चिमणीच्या दाताने खाऊ दुसऱ्याला द्यावा तसे. आणि हा खेळ कुठे जरा आकाराला येतो न येतो, तोच पित्याच्या आक्रमक धोरणाने अश्वत्थाम्याला हे स्वरूप आखडते घ्यावे लागले. तो संकोचला. द्रोणाने कौरव-पांडवांना शिकवण्याचे काम उघड पत्करले. हा क्षण अश्वत्थाम्याच्या सहजतेला मारक झाला.

अश्वत्थाम्याचा भोळा प्रेमळपणा, त्याचा ऋजुपणा अर्जुनाला आठवतो. ही गुरुपुत्राबद्दलची भक्ती नाही. माणसाने माणसाला ओळखण्याची ग्वाही आहे. मैत्रीच्या शुद्धतेचे द्योतक आहे. अर्जुन द्रोणाच्या मरणाने फार तळमळला. विशेषतः युधिष्ठिराने अश्वत्थाम्यासारख्या भाबड्या जिवाशी असे कपट करावे याची त्याला फार चीड आली. युधिष्ठिराला या असत्य कर्माबद्दल दोष देताना अर्जुन म्हणाला, " अश्वत्थामा अलौकिक आहे. साऱ्या प्राणिमात्रावर तो लोभ करतो. " आणि ऐन युद्धप्रसंगातसुद्धा पांडवांबद्दलची अश्वत्थाम्याची भावना दुर्योधनाच्या मृत्यूपर्यंत सौहार्दाचीच होती. घटोत्कचाला तो ' वत्सा ' अशी हाक मारतो. " माझे तुझ्याशी वैर नाही " म्हणून सांगतो.

कर्णाचा मुलगा मेल्यावर कर्ण व अर्जुन यांचे युद्ध जुंपते. तेव्हा अश्वत्थामा दुर्योधनाला म्हणतो, " दुर्योधना, पांडवांबरोबरचे वैर थांबव. युद्धाचा धिक्कार असो. मी व कृप अवध्य आहो. तू पांडवांबरोबर राज्य कर. मी सांगितले तर अर्जुन शांत होईल. युद्ध करणार नाही. कृष्णसुद्धा विरोध इच्छीत नाही. युधिष्ठिर भूतहितात रत आहे. भीम व इतर भाऊ त्याचे अंकित आहेत. शांती कर. समेट कर. "

दुर्योधन ऐकत नाही म्हणून अश्वत्थामा रागावतो देखील. परंतु युधिष्ठिराच्या भूतहिताच्या वृत्तीचा फायदा मिळत नाही तो मात्र एकट्या अश्वत्थाम्यालाच. त्याच्या उद्गारांतला व प्रत्यक्ष घटितांतला विरोधाभास महाभारतात अजोड आहे. या विरोधामुळेच पुढे अश्वत्थाम्याच्या क्रौर्याला प्रतिपक्षियांच्या विश्वासघाताची स्वाभाविक बैठक मिळते.

द्रोण मरेतोवर बापलेक एकत्र होते. शरीराने व मनाने. पण हे मनाचे एकत्वच अश्वत्थाम्याच्या विकासाच्या आड आले. त्याचे गोड, उदार व लाजाळू व्यक्तिमत्व लोपून गेले. मुळात त्याचा स्वभाव महत्त्वाकांक्षी नव्हे; बापाने आकांक्षा त्याच्यावर लादली. पांडवांवर दोघांचे प्रेम. पण तरीही विद्येबद्दलचा पक्षपात द्रोणाने केला. अश्वत्थामाही बापाच्या इच्छेप्रमाणे सगळ्या कुमारांबरोबर पाणी भरायला जायचा. त्याला मोठ्या तोंडाचा कुंभ बाप द्यायचा. त्याचे काम अर्थातच लवकर आटपे. आणि तो मग घरात आला की त्याला अगोदर बोलावून द्रोण त्याला अधिक शिकवी. बापाची आकांक्षा त्याला माहीत होतीच. बापा्‍याच मानसिक संघर्षाचे प्रतिबिंब मुळात या वयातच पडले

असावे काय ? बापाच्या पक्षपाताला अश्वत्थाम्याने विरोध केला नाही. मुकाट्याने तो सांगेल तसे केले. प्रेमळ पण करारी पित्याचे कोणतेही मूल ऐकते, तसेच त्याने केले. कदाचित वाढत्या वयाबरोबर द्रोणाची जरबही त्याला बसली असावी. या प्रसंगातला त्याचा मानसिक संघर्ष कुठेच दाखविलेला नाही. त्यावरून एवढेच समजायचे की अश्वत्थाम्याच्या मनात वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नव्हती. उत्कृष्ट योद्धा शिस्तीचा भोक्ता असतो. याच शिस्तीने अश्वत्थाम्याला गिळले. त्यातल्या त्यात जीवन सुखाचे होते. सुरक्षित होते. राजघराण्याला चिकटून राहण्यातच काय ते या ब्राह्मण पिता-पुत्र योद्ध्यांचे श्रेय होते. परशुरामाची स्वतंत्र युद्धप्रतिभा दोघांतही नव्हती. आश्रितांच्या पेशातला सुस्थितपणा आणि लाचारी यांच्या आहारी दोघेही गेले होते. यानंतर वर्षेच्या वर्षे जातात. अश्वत्थामा जणू सुस्थितीत पुरला जातो. तारुण्याचा पहिला बहर येतो आणि जातो. त्या वेळीं तो काय करतो, कसा वागतो, त्याची मनःस्थिती कशी असते, कौरव–पांडवांच्या सदा वाढत्या वैरात त्याची स्थिती कशी होते— काही काही व्यासाने सांगितलेले नाही. तो गृहस्थ होता, सुखी संसारी होता, एवढेच आपल्याला कळते.

आणि मग एकदम त्याचे दर्शन होते ते युद्धाचा वणवा पेटल्यावर. त्याचा आवाज कर्कशपणे उंच ऐकू येतो तो बापाच्या मृत्यूनंतरच. हा जन्मला तेव्हा घोड्यासारखा म्हणे खिंकाळला. इतक्या जोराने हे मूल रडले, ते मोठे बळकट म्हणूनच. आणि म्हणूनच त्याचे नाव अश्वत्थामा पडले. पण हे कर्कश ओरडणे अक्राळविक्राळ आक्रंदनात, क्रूर गर्जनेत उमटले ते फक्त युद्धाच्या वेळी. याचा स्वभाव रागीट. संतापला की मग त्याला सुमार राहायचा नाही. त्यात आणखी मनाने घेतले तर वाटेल ते अघोर कृत्य करायला हा माघार घ्यायचा नाही, अशीही त्याची ख्याती होतीच. बापाचा वध धृष्टद्युम्नाने व पर्यायाने पांडवांनी अधर्माने केला हे पाहून अश्वत्थाम्याचा संताप अनावर झाला. आता वैर हे भाडोत्री वैर राहिले नाही;—अगदी स्वतःचे झाले. त्या वैराला कर्ण, भीष्म व दुर्योधन यांच्या वधाच्या वेळी पांडवांनी केलेल्या कपटाची बैठक. ते कपट आठवून अश्वत्थाम्याने त्यांना अभद्र शिव्या मोजल्या. कृष्णाला त्याने पापात्मा म्हटले. बापाची प्रतिज्ञा हेच त्याचे उद्दिष्ट झाले.

दुर्योधन त्याचा राजा आणि सखा. त्याची अखेरची इच्छा हे त्याचे

कर्तव्य झाले. बाप व राजा यांच्या इच्छेत प्रथमच त्याची स्वतःची इच्छाही एकरूप झाली. आणि तो सेनानी झाला. हा तिसरा प्रसंग व्यासाने खूप विस्ताराने रंगवला आहे. परंतु विस्तारातच त्याने जिज्ञासूला चांगलेच चकविले आहे. या विस्तृत प्रसंगाभोवती, आणि नंतरच्याही, जे धुके त्याने भरले आहे त्याला तोड नाही. म्हटले तर दृश्यावर खूप प्रकाश आहे, म्हटले तर सारेच सावरल्यासारखे दिसावे, अशी खुबी केली आहे त्याने. व्यासाचे हे वाङ्मयीन मयगृहच आहे म्हणा ना! उलटे सुलटे एक झाले आहे. प्रमाणे हरवली आहेत. रेखा इतक्या ठळक की त्यांनी चरेच चरे उत्पन्न केले आहेत. किंबहुना हे चरेच अश्वत्थाम्याच्या त्या वेळच्या मनोवृत्तीचे व कृतीचे प्रतीक असावेत. विसंगती हाच या दोन्ही प्रसंगांचा आधार. आणि सर्वात मोठा चमत्कार हा की, ही विसंगती तत्त्वज्ञानाच्या सुसंगततेच्या आधाराने साधली गेली आहे. भगवद्गीतेतला तो रोमहर्षक प्रसंग आणि तेच ते तत्त्वज्ञान पार उफराट्या रीतीने इथे वापरले आहे. वस्तूची छाया असते तसे. त्या दृष्टीने पाहिले तर या प्रसंगात सेनानी अश्वत्थामा अर्जुनाची भुतासारखी सावलीच वाटतो. तसे न वाटते तरच आश्चर्य होते. क्रांतदर्शी व्यासाची प्रतिभा व प्रज्ञा वास्तवाच्या दर्शनाच्या मिषाने, खऱ्याखुऱ्या व्यक्तीच्या आधाराने, अज्ञेयाचे चित्रण करू धजते. आकृती वास्तवाची, पण रंग अवास्तवाचे. शब्द व दृश्ये परिचित. भयानकाची आगाऊ सूचनाही आलेलीच असते. दुर्योधनाचे मरण म्हणजे वास्तविक एका बाजूचा सर्वनाश. तिथेच युद्ध थांबायला हवे. पण नाही. दुर्योधनाचा प्राण एकदम गेला नाही. किती तरी वेळ, दोन-चार दिवस, तो तगून होता. हा काळ हा या प्रसंगात नाट्यमय ताण उत्पन्न करणारा काळ आहे. या ताणाचा वेग अश्वत्थाम्याच्या विलक्षण गतीत व प्रचंड शक्तीने भारावलेल्या कृतीत आहे. पण ही गती व कृती कोणत्याही जयिष्णू प्रेरणेने भरलेली नाही. तिचे स्वरूप संपूर्णपणे अभावात्मक आहे. विनाशाचा वेग तिच्यात आहे. मृत्यूतला व जीवनातला प्रत्येक विकट आविष्कारच तिच्यात भरलेला आहे. अश्वत्थाम्याला पराभवाने चेतवले; अहंकाराने नव्हे. त्याचा द्वेष प्रचंड मृत्युमय आंधळ्या शक्तीशी जोडला गेला. स्वतःचा बचाव त्याला करायचा नव्हता. त्याला मालकाचे राज्य राखायचे नव्हते. त्याला फक्त सूड घ्यायचा होता. धृष्टद्युम्नाचा आणि पांडवांचा. आणि या उन्मनस्क स्थितीत त्याने

शब्द उच्चारले ते देहाच्या नश्वरतेचे आणि आत्म्याच्या अमरत्वाचे. हे रणांगणोचित तत्त्वज्ञान कृष्णाने युद्धाच्या सुरुवातीला, आपल्या लोकांशी आपण युद्ध कसे करावे, या संभ्रमात पडलेल्या हाडामांसाच्या अर्जुनाला सांगणे वेगळे आणि पिशाचमनोवृत्ती बनलेल्या अश्वत्थाम्याने कृप, वगैरे अर्धमेल्या झालेल्या मूढ लोकांना युद्धाच्या अखेरीस सांगणे वेगळे. दैवाधीन असलेल्या माणसाची लीन मूढताही यात नाही. तत्त्वज्ञानाला आवश्यक अशी कोणतीच उभारी यात नाही. चौकट केवळ स्वामिभक्तीची.

पण या तत्त्वज्ञानाच्या आविष्काराहूनही अधिक चमत्कार पुढेच आहे. स्वतः पिशाचवत बनलेल्या अश्वत्थाम्याला भुतांच्याचच दर्शनाने उलटसुलट हादरे बसतात. या हादऱ्यांचा प्रारंभदेखील फार भयाण असून व्यासाने त्याला प्रतीकही फार समर्पक योजले आहे. अश्वत्थाम्याचा पराभव पांडवांकडून झाल्यावर त्याला रात्री कावळ्यांच्या अंड्यांचा व पिलांचा नाश करणारे घुबड झाडावर दिसते. त्यावरून त्याला धृष्टद्युम्न व द्रौपदीचे मुलगे यांना झोपलेले असताना मारावे ही कल्पना सुचते. अधू कल्पनेच्या माणसाला कल्पना सुचली तर ती त्याला पूर्णपणे ग्रासते. अश्वत्थामाही कृपाने निषेध केला तरी आपले म्हणणे सोडीना. आणि त्याची ती इच्छा इतकी बलवत्तर झाली की शेवटी कृपही तिच्या आहारी गेला.

अश्वत्थाम्याला धृष्टद्युम्नाच्या शिबिराच्या तोंडाशी भूत दिसले. अक्राळ-विक्राळ, तेजस्वी, आणि भव्य. त्याला भुताचा भास न होणेच कठीण. ज्या मनःस्थितीत अश्वत्थामा होता त्या स्थितीत अश्वत्थाम्याच्या घुम्या स्वभावाचे उलटे प्रतीकच ते होते. हे भूत बोलणारे नव्हते. अश्वत्थाम्याप्रमाणेच ते भूत क्रियाशील मात्र होते. क्रियाशील या अर्थाने की अश्वत्थाम्याने शस्त्रे टाकली की ते ती गडप करी. अश्वत्थाम्यावर उलट प्रहार त्याने केला नाही. ते भूत पाहून अश्वत्थामा घाबरला नाही किंवा आश्चर्यचकितही झाला नाही. होणतीही भयंकर गोष्ट पाहून घाबरण्याच्या स्थितीपलीकडे तो केव्हाच गेला होता. जोपर्यंत त्याचे शरीर सुदृढ होते तोपर्यंत अश्वत्थामा भीतीपासून मुक्त होता.

भुताने सारी आयुधे गडप केली, तेव्हा अश्वत्थाम्याने शिवाची आराधना केली. शिव प्रकट झाला आणि त्याने अश्वत्थाम्याला सांगितले की, "कृष्ण मला प्रिय असल्याने त्याचा आदर करण्यासाठी मी धृष्टद्युम्न, द्रौपदीचे मुलगे व

पांचाळ यांना काही काळ संरक्षण दिले. पण वास्तविक ते काळाच्या जबड्यात सापडलेले आहेत. त्यांचा मृत्यू अटळ आहे. हा मृत्यू घडून यावा म्हणून मी तुला मृत्युंजय असे शस्त्र देतो." विराट स्वरूपात कृष्णाच्या कराल दाढात सापडलेल्या योद्ध्यांच्या दर्शनाची व उक्तीची ही फिकट आवृत्ती आहे. मात्र हे दर्शन अश्वत्थाम्याला आश्वासक असले तरी विश्वरूपदर्शनाप्रमाणे प्रेरक नाही. युद्धातले संहाराचे अखेरचे माप पूर्ण करण्याच्या दृष्टीने ते घडून आले. आणि तसे आले ते भक्त व ईश्वर यांच्या नैसर्गिक उमाळ्यामुळे नव्हे. अश्वत्थाम्याच्या उग्र आत्माहुतीच्या निश्चयाच्या आव्हानातून ते निघाले. ईश्वर करुणेने भक्ताकडे वळला नाही, तर दैवाने मृत्यू जिथे घडवला तिथे त्याला फार काळ थोपवून धरण्यात अर्थ नाही, या दैववादी चिंतनातून हे घटित निर्माण झाले आहे. या दर्शनात व शस्त्रदानात अश्वत्थाम्याला वांछित वस्तू व शक्ती मिळाली. मोल देऊन वस्तू घ्यावी तशी. पण त्याला करुणा, शुद्धी, मुक्ती, शांती, यांपैकी काही काही मिळाले नाही. त्याचे मन शत्रूंना मारल्यावरसुद्धा वैराने भरलेलेच राहिले. धृष्टद्युम्नाला मारताना त्याने तो झोपेत असताना पायाला स्पर्श करून त्याला जागे केले. त्याला सावरायलाही अवसर दिला नाही. इतकेच नव्हे तर त्याने त्याला शस्त्राने मारण्याचे नाकारले. वीरोचित मृत्यू त्याला येऊ नये म्हणून त्याने त्याला पशूसारखे मारले. पायांनी तुडवून मारले. तो स्वतःही त्या वेळी पशूच बनला.

दुर्योधनाला त्याने आपण पांडवांकडील या वीरांचा निःपात कसा केला ते सांगितले. पांडवांकडचे सात व कौरवांकडचे तीन योद्धे बाकी राहिले. युद्धाची ही समाप्ती दुर्योधनाने ऐकली. अश्वत्थाम्याने सूड घेतला, हेच त्याचे व अश्वत्थाम्याचे समाधानाचे एक स्थान.

शिवदर्शनाच्या वरात व्यासाने पुढचे अशुभ भवितव्यच जणू सूचित केले आहे. इथेही कृष्णाकडून अश्वत्थाम्याला अधर्माचा बोल लावून त्याच्या मस्तकातला मणी त्याने कापून घेतला. अश्वत्थाम्याने पांडवसंहारासाठी ब्रह्मशिर-अस्त्राचा वापर केला. द्रोणाने 'हे अस्त्र कधी वापरू नको', असे सांगितले असतानासुद्धा त्याने ते वापरले. इथेच अश्वत्थाम्याचे पित्याशी असलेले नाते तुटते. पतंग गहाळ झालेल्या दोरीप्रमाणे अश्वत्थाम्याची स्थिती होते. सूडाचे पिशाच त्याला अनावर होते. पांडव नाहीत तर उत्तरेच्या गर्भा

घेऊन तो ते अस्त्र कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे आवरतो. त्याचा मणी गेला. ज्या मण्यामुळे भूक, तहान, भयभीती—सारे जाते तो मणी द्रौपदी मागते व कृष्ण तिला देतो. या मण्याच्या उल्लेखाने एक लहान विसंगती व्यासाने निर्माण केली आहे. अश्वत्थाम्याजवळ हा मणी जन्मतः होता. मग लहानपणी दूध हवे हा भुकेचा आक्रोश कसा? मण्याबाबतचे काही तरी घटित हरवले आहे. पुसून टाकले गेले आहे. मणी गेला. (आणि ही विसंगती सोडली तर) अश्वत्थाम्याची बाळपणाची क्षुधा परतली. आता तो पूर्णपणे भूकतहानेच्या आहारी गेला. लाचार झाला. दुबळा झाला. आणि कळस म्हणजे व्यासानेच मणिदानाची आज्ञा त्याला केली. व्यास स्वामी. त्याची आज्ञा तो कशी सोडणार? स्वामिभक्तीचेच वलय काय ते त्याच्याभोवती उलट्यासुलट्या प्रकाराने फिरत राहिले. उत्तरेच्या गर्भाचा नाश हा लहानात लहान नाश करून अस्त्र परत येईल असे अश्वत्थाम्याने म्हटले व त्याप्रमाणे घडले. आणि जरी उत्तरेचे मूल कृष्णाने जिवंत केले तरी त्या अस्त्राच्या वापराबद्दल सजा म्हणून त्याने अश्वत्थाम्याला रक्तपितीचा शाप दिला. अश्वत्थाम्याने शस्त्रे टाकली. जखमी व अती दीन होऊन तोंड झाकून तो रडत रडत रानाकडे पळून गेला आणि दिसेनासा झाला.

कृष्णाने सांगितले त्याप्रमाणे अजून शापित अश्वत्थामा पृथ्वीवर भटकतोच आहे. सात चिरंजिवांपैकी अभागी चिरंजीवित्व याच्याच वाट्याला आले. बळीला देवानेच पाताळात गाडला तरी तो पुण्यात्मा होता. अजून दिवाळीच्या वेळी बळी घरोघरी धान्याधुन्याची लयलूट करीत अदृश्य रूपाने हिंडतो असे म्हणतात. मारुती चिरंजीव. तो विविध रूपांनी भक्तांना पावतो. बाळंतिणींची सुटका करतो. स्मशानात प्रेतांची राखण करतो. चेटक्यांचा नाच तिथे अवसे-पूर्णिमेला पाहतो. मांत्रिकांना सिद्धी देतो. नाना तऱ्हा करतो. इतर चिरंजीव माणसांच्या जीवनात लुडबूड करीत नाहीत. पण अश्वत्थामा मात्र दुनियेतल्या हरएक माणसाच्या दुःखदैन्याची मूर्तिमंत निशाणीच झाला आहे. एकटा, परित्यक्त, दीन, याचक असा हा महारोगी खेडोपाडी भटकतो. डोकीतली जखम म्हणे दाखवतो आणि तेल व चिंध्या मागत हिंडतो. त्याची लोकांना अजून भयंकर दहशत आहे. तेल न देईल त्याला तो शापतो. महारोगी जगाला कसलेच वरदान देऊ शकत नाही. हे भयंकर व्यवहारी सत्य, अश्वत्थामा चिरंजीव आहे या समजुतीच्या रूपाने भारतात घरोघरी शेकडो वर्षे फिरते

आहे.

रोग भोगताना व्यथेच्या पोटात दडलेले एक नाजूक सत्य असते. परम नम्रतेचे सत्य आर्तांच्या भक्तिभावात कृष्णाने उल्लेखिलेले आहे. आर्तांचे निमूट सोशिकपण विशिष्ट सौंदर्याने भरलेले असते. हे सौंदर्य आकलन झाले म्हणून का अश्वत्थामा मृत्यूच्या वराची अपेक्षा करीत नाही ? त्याला मृत्यूचे वरदान न देण्यात व्यासाने शेवटचा एक कलात्मक गूढ पेच निर्माण केला आहे मृत्यू नाही, धन्यता नाही, शांती नाही, वैर नाही, सूड नाही. आहे ती फक्त खरखरच. शारीरिक वेदनांची अपार जाणीव. या न मिटणाऱ्या वेदनेत, मृत्यूच्या भव्यतेला आपल्याहून लहान करण्याची शक्ती आहे हे त्याला कुणाची साथ-सोबत नसलेल्या जीवनयात्रेत, अती हीन अवस्थेतदेखील सुचवायचे आहे का ? सूक्ष्म व भव्य दोन्ही टाळूनही असल्या रणरणत्या अवस्थेच्या कायमपणातही तोंडदेखल्या दयेला दूर ठेवणारे काही तरी विलक्षण व आकर्षक आहे यात संशय नाही. पण ते इतके विलक्षण आहे, आणि इतके जरबेने भरलेले आहे की त्याला नाव देणे शक्य नाही. फक्त कधीकधी त्याचा किंचित प्रत्यय मात्र, जिथे अती दुरवस्था आणि दैन्य आहे तिथे होतो. तोच अश्वत्थाम्याच्या चिरंजीव व्यथेचा व व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार. मोकळ्या आकाशाखाली धरणीवर संचार करीत असतानादेखील अनुभवांचे हाताशी असलेले विश्व बुद्ध्याच बाजूला लोटून अश्वत्थामा चारी क्षितिजे जवळ ओढतो. स्वतःला कोंडून घेतो. कोंडून घेण्याची, गुदमरण्याची त्याची ही सवयही सुटत नाही. बापाचे नाते तुटले. स्वामीची स्मृतीही संपली. आणि या अखंड कोंडलेल्या मनोमय जगात अक्षय संचार करण्याचा निर्धार मात्र प्राक्तनाच्या रूपाने स्वीकारून अश्वत्थामा फिरतो आहे. कोणताही संदेश त्याला द्यायचा नाही. अमरत्वाला अंकुर नसतात, त्यात स्त्रष्टेपणा नसतो, हे त्याला दाखवायचे आहे काय ?

# १०

# नानी

**वि. द. घाटे**

परवा नागपंचमी होती. रात्रीचे जेवण झाल्यावर मी वर आलो. दिवा मालवला आणि रेडिओ लावला. डोक्याखाली दोन्ही तळव्यांची उशी करून बिछान्यावर स्वस्थ ऐकत पडलो. मन अगदी मोकळे होते. कशाचेही स्वागत करायला तयार होते. रेडिओने नागपंचमीच्या लोकगीतांचा कार्यक्रम सुरू केला.

एक जण म्हणाली,

**" चल ग सये, वारुळाला... "**

दुसरीने सूर झेलला,

" चल ग सये, वारुळाला... "

पहिली म्हणाली,

**" नागोबाला पूजायाला... "**

दुसरीने उचलून धरला,

**" नागोबाला पूजायाला... "**

त्या साध्याभोळ्या गाण्याचे सूर कानात शिरले आणि कानांतून खोल खोल मनाच्या वारुळापर्यंत जाऊन भिडले. वारुळात खळबळ उडाली. साठ वर्षांपूर्वी ऐकलेले आणि साठ वर्षे विसरलेले गाणे तेथे वळवळ करू लागले. जागे झाले. गाणे तेच. नुकतेच ऐकलेले. पण सूर वेगळे होते, फार जिव्हाळ्याचे होते.

रेडिओच्या गाण्यावरचे माझे लक्ष उडाले. मन सैरभैर झाले. मनोगर्तेतला भावसागर खाली-वर ढवळला गेला. हिंदकळू लागला आणि खोल खोल दडलेल्या, झोपलेल्या जुन्या संवेदना खदखदू लागल्या. त्या पूर्वसंचितावर साठ वर्षांच्या जीवनाचे थरांवर थर साचले होते. परंतु नागपंचमीच्या फेराच्या त्या गाण्याने गारुड्याच्या पुंगीची किमया केली. मनाच्या वारुळातून त्या संवेदना सळसळत वर उसळी मारून आल्या—आकार न घेतलेल्या, कोवळ्या गर्भा-

आहे.

रोग भोगताना व्यथेच्या पोटात दडलेले एक नाजूक सत्य असते. परम नम्रतेचे सत्य आर्तांच्या भक्तिभावात कृष्णाने उल्लेखिलेले आहे. आर्तांचे निमूट सोशिकपण विशिष्ट सौंदर्याने भरलेले असते. हे सौंदर्य आकलन झाले म्हणून का अश्वत्थामा मृत्यूच्या वराची अपेक्षा करीत नाही ? त्याला मृत्यूचे वरदान न देण्यात व्यासाने शेवटचा एक कलात्मक गूढ पेच निर्माण केला आहे मृत्यू नाही, धन्यता नाही, शांती नाही, वैर नाही, सूड नाही. आहे ती फक्त रखरखच. शारीरिक वेदनांची अपार जाणीव. या न मिटणाऱ्या वेदनेत, मृत्यूच्या भव्यतेला आपल्याहून लहान करण्याची शक्ती आहे हे त्याला कुणाची साथ-सोबत नसलेल्या जीवनयात्रेत, अती हीन अवस्थेतदेखील सुचवायचे आहे का ? सूक्ष्म व भव्य दोन्ही टाळूनही असल्या रणरणत्या अवस्थेच्या कायमपणातही तोंडदेखल्या दयेला दूर ठेवणारे काही तरी विलक्षण व आकर्षक आहे यात संशय नाही. पण ते इतके विलक्षण आहे, आणि इतके जरबेने भरलेले आहे की त्याला नाव देणे शक्य नाही. फक्त कधीकधी त्याचा किंचित प्रत्यय मात्र, जिथे अती दुरवस्था आणि दैन्य आहे तिथे होतो. तोच अश्वत्थाम्याच्या चिरंजीव व्यथेचा व व्यक्तिमत्वाचा साक्षात्कार. मोकळ्या आकाशाखाली धरणीवर संचार करीत असतानादेखील अनुभवांचे हाताशी असलेले विश्व बुद्ध्याच बाजूला लोटून अश्वत्थामा चारी क्षितिजे जवळ ओढतो. स्वतःला कोंडून घेतो. कोंडून घेण्याची, गुदमरण्याची त्याची ही सवयही सुटत नाही. बापाचे नाते तुटले. स्वामीची स्मृतीही संपली. आणि या अखंड कोंडलेल्या मनोमय जगात अक्षय संचार करण्याचा निर्धार मात्र प्राक्तनाच्या रूपाने स्वीकारून अश्वत्थामा फिरतो आहे. कोणताही संदेश त्याला द्यायचा नाही. अमरत्वाला अंकुर नसतात, त्यात स्त्रष्टेपणा नसतो, हे त्याला दाखवायचे आहे काय ?

१०

# नानी

## वि. द. घाटे

परवा नागपंचमी होती. रात्रीचे जेवण झाल्यावर मी वर आलो. दिवा मालवला आणि रेडिओ लावला. डोक्याखाली दोन्ही तळव्यांची उशी करून बिछान्यावर स्वस्थ ऐकत पडलो. मन अगदी मोकळे होते. कशाचेही स्वागत करायला तयार होते. रेडिओने नागपंचमीच्या लोकगीतांचा कार्यक्रम सुरू केला.

एक जण म्हणाली,

"चल ग सये, वारुळाला..."

दुसरीने सूर झेलला,

"चल ग सये, वारुळाला..."

पहिली म्हणाली,

"नागोबाला पूजायाला..."

दुसरीने उचलून धरला,

"नागोबाला पूजायाला..."

त्या साध्याभोळ्या गाण्याचे सूर कानात शिरले आणि कानांतून खोल खोल मनाच्या वारुळापर्यंत जाऊन भिडले. वारुळात खळबळ उडाली. साठ वर्षांपूर्वी ऐकलेले आणि साठ वर्षे विसरलेले गाणे तेथे वळवळ करू लागले. जागे झाले. गाणे तेच. नुकतेच ऐकलेले. पण सूर वेगळे होते, फार जिव्हाळ्याचे होते.

रेडिओच्या गाण्यावरचे माझे लक्ष उडाले. मन सैरभैर झाले. मनोगर्तेतला भावसागर खाली–वर ढवळला गेला. हिंदकळू लागला आणि खोल खोल दडलेल्या, झोपलेल्या जुन्या संवेदना खदखदू लागल्या. त्या पूर्वसंचितावर साठ वर्षांच्या जीवनाचे थरांवर थर साचले होते. परंतु नागपंचमीच्या फेराच्या त्या गाण्याने गारुड्याच्या पुंगीची किमया केली. मनाच्या वारुळातून त्या संवेदना सळसळत वर उसळी मारून आल्या—आकार न घेतलेल्या, कोवळ्या गर्भा-

सारख्या. खंडाळ्याचा घाट चढून आपण वरघाटी येतो आणि राजमाची पॉइंटवरून खाली डोकावतो; खालाटीतून धुक्याच्या लाटांवर लाटा वर येत असतात. त्यांना आकार नसतो. रंग नसतो. फक्त गती असते. तशीच माझ्या मनाची गती झाली. त्या जाग्या झालेल्या संवेदना एकीमागून एक वर येत होत्या, एकमेकीत मिसळत होत्या, एकमेकींना घुसळीत होत्या, आणि त्यांच्याबरोबरच, बये ! तूही वर आलीस—त्यांच्यासारखीच, निराकार आणि धूसर !

होय, आठवला तो दिवस. नागपंचमीचाच दिवस होता तो. आमच्या बंदिस्त वाड्यात तुझा जीव गुदमरला होता. खरे ना ? तुझ्या गावच्या मोकळ्या, स्वच्छंद वाऱ्यासाठी—त्या शांत, उघड्या आणि निर्मळ आकाशासाठी—तूं आसुसली होतीस. तुला त्या मोकळ्या आकाशाची ओढ लागली होती. होय ना ? तू—त्या आकाशासारखीच निर्मळ आणि सोज्ज्वळ !—तू मला उचललेस, कडेवर घेतलेस आणि पचंब्याच्या पटांगणाकडे धाव घेतलीस. तेथे माळणी, साळणी, कुंभारणी जमल्या होत्या. मोठ्या प्रेमाने तू त्यांचे हात धरलेस, फेर धरलास आणि गळ्यातून मोकळा भरदार सूर काढलास,

“ चल ग सये, वारुळाला...”

सयांनी तो उचलून धरला,

“ चल ग सये, वारुळाला...”

तुझा सूर चंडोलाप्रमाणे सरळ वर चढत गेला,

“ नागोबाला पूजायाला...”

सयांनी तो झटकन झेलला,

“ नागोबाला पूजायाला...”

बये, आयाबायांनी तुझे कौतुक केले. फेरात त्या रंगल्या. पण सर्वांत जास्त तू रंगली होती. मी इवलासा होतो. पण पाहत होतो. अनुभवीत होतो. आठवते मला ते सारे. आज आठवणींचा बांध फुटला आहे. तू मला इतर मुलांच्या मधोमध बसविले होतेस आणि आमच्या भोवती तुझा फेर चालला होता—बेभान आणि बेबंद !

आठवले. बये, सारे आठवले. आज मी भानात नाही. भूतकाळात, फार जुन्या भूतकाळात विरलो आहे. तुझ्या नादवलयात गुरफटलो आहे. आज तुझ्यासाठीच हे माझे म्हातारे हृदय आक्रंदत आहे. तुझ्याच आठवणी

टिपीत आहे.

तू मला कुंची घातली होतीस; खरे ना ? होय ना ? तुझी ती कुंची अजून जपून ठेवली आहे. माझ्या प्रत्येक मुलाच्या, प्रत्येक नातवंडाच्या डोकीवर, देवी, तुझे छत्र चढले आहे. आमच्या तीन पिढ्यांनी बारशाला तुझ्या मायेची ती ऊब अनुभवली आहे. किती तरी वेळा ट्रंकेतून ती कुंची काढून मी वेड्यागत तिच्यावरून जपून हात फिरविला आहे—बये, जसा तू एकदा, अनेकदा फिरविला असशील. बालमाते, माझ्या या वृद्ध हातांना तुझ्या त्या बालस्पर्शाची जवळीक लाभली आहे. मन परत शैशवात शिरले आहे.

तू फेर धरला होतास. तुझी गती वाढत होती, आणि सूर उंचावत होता. मी भांबावून घाबऱ्या भिरभिऱ्या नजरेने तुझ्याकडे पाहिले असेल—सुखाने, आश्चर्याने आणि कौतुकाने. कारण तो सूर—तो मोकळा भरदार सूर—घरी कधी कानी पडला नव्हता.

बस्स. एवढेच आठवले. मनातल्या भावसागरातून लक्ष्मीप्रमाणे प्रगट झाली ती तुझी नादमूर्ती होती. ती तुझी गती होती. फार प्रयत्न केला, मनात खोल खोल उड्या मारल्या; पण बये, तू मला दिसत नाहीस ग. फक्त ऐकू येतेस. तुला आकार नाही. रूप नाही. केवळ नाद आहे, केवळ गती आहे.

आठवले, बये, आठवले. या लाटा सारख्या उसळत आहेत. माझ्या मना-भोवती त्यांचे धुंद थैमान माजले आहे. एक लहानशी फेसाळ लाट वर उसळली आणि तुझे डोळे घेऊन आली—टपोरे आणि मोकळे. तुझ्या गाबाभोवती भिरभिर फिरणाऱ्या वाऱ्यासारखे. त्या डोळ्यात काय काय भरले होतेस, काय काय साठवले होतेस ? दिसतात, मला ते डोळे आणि त्यांतले भाव—काही अपेक्षा—काही आकांक्षा—समर्पणाची आतुरता—थोडा हटेलपणा आणि वैफल्याचे असीम औदासीन्य !

आणि नानी…नानी ?—होय नानीच. होय आठवले. तुझे नाव आठवले. साठ वर्षे विसरलो होतो. किती मी अभागी ! इतकी वर्षे तुझे नावसुद्धा ध्यानात नव्हते. कसा विसरलो मी ? नानी, होय नानीच. पकडले ते. आता नाही सोडणार. तू चंद्रभागा होतीस; पण माझी नानी होतीस—खरं ना ? आणखी आठवले. ही एक दुसरी लाट उसळून वर आली. काय मौज आहे. काय गंमत आहे. ननन्.

आठवले, ननन्. तू मला भाताचे खिमट खाऊ घालायचीस. खिमट खाऊन झाल्यावर ताटाला ओशट ननन् लागलेले असायचे. मला ते फार आवडायचे. मी हट्ट करायचा, मला नुसते ननन् दे. खिमट नको. खरे ना? नानी— ननन्. नानी—ननन्. काय गंमत आहे !

नानी, तू काय काय सोडून आली होतीस ग? भातुकली सोडून आली होतीस. लपाछपीचा खेळ अर्धाच टाकून आली होतीस. आणि बये, तोच खेळ तुला नव्याने मरेपर्यंत खेळावा लागला. नऊ वर्षे! आणि शेवटी तो खेळ अर्धवटच राहिला. कदाचित—कदाचित तुझ्या पुढच्या पिढीने—पुढच्या पिढ्यांनी—तू जेथे थांबलीस तेथून पुढे चालविला असेल. कदाचित. कोण जाणे .....

नानी, तुझ्या त्या खेडेगावी तू कशी होतीस? काय काय करीत होतीस? माझ्या डोळ्यांना सारे दिसते. तुझा मुलगा असलो तरी तुझ्या आज्यासारखा आहे. नानी, मी फार पाहिले आहे. फार शोधले आहे. पुष्कळ सोसले, गमावले आहे. मी जाणतो. मी जाणतो.

भल्या पहाटेस तू आपल्या कपिला गायीची धार काढीत होतीस. आणि खडीसाखरेच्या खड्याबरोबर गरम धारोष्ण पीत होतीस. कपिलेची मान खाजवीत होतीस. न्याहरीला तू कोवळी दुधाळ कणसे खात होतीस. निंबोणीच्या झाडाखाली झिम्मा खेळत होतीस. गावाबाहेरच्या देवीच्या देवळाच्या आवारात लपाछपी खेळत होतीस. विहिरीकडे जात होतीस. मोट वर येत असता तिच्या नाड्यावर हेलकावे खात होतीस आणि खदखदा हसत होतीस. मोट वर आली म्हणजे ती आपल्या वासलेल्या काळ्या सोंडेतून थारोळ्यात चांदरस ओतीत होती, आणि दर खेपेला नव्या नवलाईने तू तो जीवनाचा खळखळाट डोळ्यांनी टिपीत होतीस. तुझ्या हृदयसंपुटीत तू किती नाद साठवले होतेस. सकाळची जात्यावरची गाणी, संध्याकाळी परत येणाऱ्या गाईंचा घंटानाद, वासरांचे हंबरणे, वावरातील पाखरांची किलबिल, पलीकडच्या झऱ्याची संथ आळशी झुळझुळ, आणि माळावरून मोकाट सुटलेल्या पिसाट वाऱ्याचा सांद्र आणि आर्त घूत्कार !

नानी, या सगळ्यांना घेऊन आपल्या उमलत्या बालदेहासह भरल्या चुड्यांनी तू आमच्या घराण्यात आणि घरात आलीस. म्हातारी माणसे परवापरवापर्यंत

तुझ्या लग्नाच्या वरातीची वर्णने मोठ्या कौतुकाने सांगत असत. वरात अर्धा-मैल लांब होती. पुढे कलावंतिणी नाचत चालल्या होत्या. बँड वाजत होते. बार उडत होते. भुईनळे फुटत होते. वारा प्यालेल्या तुझ्या कालवडीसारखी तू आमच्या घरात प्रवेश केलास. गृहलक्ष्मी झालीस. घाट्यांच्या घरावर चंद्रकळा झळकलीस.

बये, तू घाबरलीस? भांबावलीस! डोळे पाणावले? त्या डोळ्यांना दत्त नीट दिसले का? का तुझ्या डोळ्यांसमोर अजून तुझे गाव, तुझ्या मैत्रिणी, तुझी गाय, तुझे देवीचे देऊळ होते? वेडे, का घाबरलीस विनाकारण? घाट्यांचे घर हे सुनांचे माहेर असते; तुला माहीत नव्हते? एक माहेर सोडून त्या दुसऱ्या माहेरी येतात आणि पहिल्या माहेरी परत जायला तयार नसतात; तुला माहीत नव्हते?

तू नवी नवरी. तू उंबरा ओलांडून घरात आलीस. माझ्या आजीने तुला पोटाशी धरले असेल. पाठीवरून हात फिरवला असेल. पदराने डोळे पुसले असतील. तुझ्या तोंडात साखर घातली असेल. खरे ना? होय ना? बये, त्या दिवशी तुला नवी आई लाभली. काय म्हणाली ती? "आजवर होती तुमची. आता झाली आमची." नानी, झालीस का आमची तू?

पण आमचे घर वेगळे होते. फार वेगळे होते. पिंजऱ्यात शुकसारिका असत्या तर त्यांनी तुला कालिदास-भवभूतींचे श्लोक ऐकवले असते. आमच्या घरी संस्कृत आणि मराठी काव्य पाणी भरीत होते. माझ्या आजीने तुला कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे 'मेघदूत' खडखडाट ऐकवले असेल. "कोण्या एका यक्षे केले अलक्ष अपुल्या कामात" ही ओळ आणि "शरण मी जगन्नाथा, पदी ठेवियला माथा" ही माझी आवडती आरती तूसुद्धा कितीदा तरी ऐकली असशील.

दत्त आणि तू. दोघेही पोरे. पोरांचा संसार—भातुकली. पोरांचे प्रेम आणि पोरांचे आराधन. आम्हांला ती गंमत माहीत नाही. "आविवहसमयात् गृहे वने। शैशवे तदनु यौवने पुनः" आम्हांला म्हणता येणार नाही. तुमचा जमानाच वेगळा होता. वडील माणसांसमोर बोलणे गैर होते. तुम्ही जाता-येता खुदकन हसत असाल, डोळ्यांनी बोलत असाल. आम्हांला ते समजत नाही. आम्ही निबर झाल्यावर प्रेम केले आणि लग्न केले. लपंडावही आमच्या परीने

खेळलो. पण तो वेगळा होता. पण ते जाऊ दे. कदाचित तू लपकन दत्तांच्या हातात आवळा ठेवून स्वयंपाकघरात पळाली असशील. तुला कोहळा मिळाला का? आवळा तरी मिळाला का? तुमचा तो लपंडाव होता. आणि त्यात तू सराईत होतीस. पण गडे, तुझा गडी तुला सापडला नाही. सापडण्याच्या बेतात आला होता. खरे ना? होय ना? पण तो सटकला—मृत्यूचा हात धरून. डाव तुझ्या अंगावर आला. बये, जाणतो. सारे जाणतो मी. आज मी भानात नाही. तुझ्यासाठी—केवळ तुझ्यासाठीच आज रडत आहे.

दत्त आणि तू. दत्तांची भेट होण्यापूर्वी त्यांच्या सतारीची भेट झाली, खरे ना? दत्त किती गोड सतार वाजवीत असत. किती नाजुक हात. किती नखरेल करामत. मी 'दत्तांच्या कवितें'त लिहिले होते: "दत्तांची सतार, अत्यंत नाजुक भावांनी कंपायमान होणाऱ्या दत्तांच्या संवेदनाकुल मनाप्रमाणे अत्यंत नाजुक स्पर्शाने थरथरणाऱ्या तारांमधून मूक वेदनांचे अभिनव आणि गूढ स्पंदन हवेत सोडीत असे." दत्त माडीवर खिडकीखाली सतार छेडीत बसत. सतारीतून अनेक राग, अनेक नाद प्रगट होत असत. कधी गंभीर तर कधी शांत. कधी बेफाम, तर कधी संयत. कधी जोरकस धीट, तर कधी नाजुक, हळवे आणि भित्रे. बये, तू जिन्याखालून ऐकत होतीस का? ऊर दाबून धरला होतास का? बापडे, उराशी काही आशा, आकांक्षा उद्भवल्यास का? तुला ते वरून येणारे सूर समजले का?

नानी, तुला दत्तांच्या हातातली सतार व्हायचे होते? सतार होणे म्हणजे काय काय होणे, हे जाणले होतेस? सतारीची शरणागती आणि त्या शरणागतीतून मिळणारे साफल्य तू हेरले होतेस? तू ती सतार नीट पाहिली होतीस? तिच्यातून निघणारे ते अमूर्त सूर तू ऐकले होतेस. ते तुला आवडलेही असतील. पण ती सतार तू हाताळली होतीस? भाबडे, त्या अमूर्त, तरल नादापाठीमागे तारा होत्या—जड धातूच्या. त्यांच्या पाठीमागे खोके होते—निर्जीव लाकडाचे. त्याला चुलीत घातले असते तर ते मुकाट्याने गेले असते. सतारीचे शरीर व्हायला ते तितक्याच मुकाट्याने तयार झाले होते. ही निपचित शरणागती तुला मानवली असती?

बये, उपमा अर्धवट असतात, आणि म्हणून फसव्या असतात. काव्यातही तसली फसवणूक करू नये. दोन भिन्न जातींच्या वस्तूंना आपण एकत्र आणतो. जवळजवळ बसवतो. आपल्याला भासणाऱ्या त्यांच्या साधर्म्याचे कौतुक करतो.

पण आपण कधी त्यांना विचारतो का : " हा वर्णसंकर तुम्हांला मंजूर आहे ?" नानी, सतार ती सतार. तू स्त्री होतीस. रानकिशोरी होतीस. डोळे मिचकावून मिटून मागे सरायचे अन् सावज ओढायचे नागर कसब तुझ्यात नव्हते. पण तू तेजस्वी होतीस. स्वाभिमानी होतीस. थोडीशी हटेलही होतीस. खरे ना ? तू शरणही गेली असतीस; गेली असशीलही, पण तुझ्या मर्यादेत—तुझ्या अटीवर. दत्तांनी तुझे समर्पण तुझ्या स्वाभिमानासह स्वीकारलेही असेल—पण त्यांच्या अटीवर, त्यांच्या मर्यादेत.

एका इंग्रजी कवीची एक ओळ जन्मभर माझा पाठपुरावा करीत आली आहे :

" Our hermit spirits range apart."

आपली बंदिस्त मने तुटकपणे, पृथक्पणे भटकत असतात. योग्यांप्रमाणे आपापल्या गुहांत बंदिस्त असतात. आपण म्हणतो, " माझे तुझ्यावर निस्सीम प्रेम आहे." ते म्हणणे खरेही असते. पण पुढे जाऊन आपण म्हणतो, " आपण आता एक झालो." ते म्हणणे खोटे असते. आपण एक होत नाही, कितीही प्रयत्न केला तरी एक होत नाही. " अवर हर्मिट-स्पिरिट्स् रेंज अपार्ट." एक होण्याची कल्पना गोड असेल, पण ती कल्पना आहे. जीवन इतके ढिसूळ, लवचिक नाही. जिकडेतिकडे गुहा आहेत. जितकी माणसे, जितकी मने, तितक्या गुहा. प्रत्येक मनाची वेगळी गुहा ! तीही अंधेरी.

नानी, तुझ्या जमान्यात तर त्या गुहा किती खोल होत्या. किती काळोख भरला होता त्यांच्यांत. अगदी जवळचे, शेजारचे, प्रेमातले मनसुद्धा दिसत नव्हते. आम्ही म्हणतो, आम्हांला ते दिसते. पण आम्हांलाही ते दिसत नसते. आणि आम्हांला ते दिसत नसते हे आम्हांला समजत नसते. ईव्हने ते अहंतेचे, अस्मितेचे फळ चाखले तेव्हापासून असेच चालले आहे. पुढेही असेच चालणार. आम्ही आज म्हणतो, आम्ही आमच्या गुहांबाहेर मोकळ्यात, प्रकाशात, एकमेकांच्या सामोरे, एकमेकांच्या जवळ आलो आहोत. बरेचसे खरे आहे ते. पण तितकेसे खरे नाही. एका गुहेतून आम्ही दुसऱ्या गुहेत शिरलो आहोत. आम्हांला ते समजत नाही. पण आम्ही धडपडत आहोत, प्रकाशात येऊ पाहात आहोत, हे मात्र खास. पण आमचे जाऊ दे.

दत्त आणि तू. तुझी साधना चालू होती. तुझे निरागस, असंस्कृत आणि

हटेल मन दत्तांच्या आसनाभोवती घुटमळत होते, जवळ जात होते, परत येत होते, तारा जुळत चालल्या होत्या. पण गत बाहेर पडत नव्हती. दत्तांनी त्या सतारीवर परिश्रम घेतले, तसे या सतारीवर घेतले नाहीत. तिच्याशी समरस झाल्याखेरीज तिच्यातून संवादी सूर निघणे कठीण होते. पण साधना चालू होती. यशही मिळाले असते. कदाचित. कोण जाणे. सांगता येत नाही. मी कसे सांगू? मी तुम्ही दोघांचाही मुलगा, दोघांहूनही वडील आणि जाणता. कसे सांगू?

एका सकाळी बडोद्याहून तार आली, "दत्त अत्यावस्थ, ताबडतोब या." तू भिंतीचा आसरा घेतला असशील, मटकन खाली बसली असशील, डोळयांपुढे अंधारी आली असेल. ऊर भरून दाटून आला असेल. आणि तशीच तू बांधा-बांध केली असशील. तू निघणार तो दुसरी तार येऊन थडकली, "सारे आटोपले!" तुझे सारेच आटोपले. तुझी पूजा वाया गेली. तुझ्या रानफुलांचे निर्माल्य झाले. जाणतो, बये, मी जाणतो. मी तुझाच मुलगा ना?

दत्त गेल्याची खबर ज्या खोलीत समजली त्याच खोलीतून दीड-दोन वर्षांनी तुझे प्रेत बाहेर पडले—अस्थिपंजर झालेले. तुझा मनोनिग्रह जबर. त्या तशा कोवळ्या वयात तू आम्हांला टाकून दत्तांच्या मागोमाग गेलीस. जिवंतपणी सहजीवन, सहगमन लाभले नाही, ते मरणात तू मिळवलेस!

नानी, तुझ्यावर—तुझ्या पिढीवर नियतीचा शाप होता. तुम्ही साऱ्या जणी सती गेलात. मुकाट्याने, ओठ दाबून. पण तुमच्या मरणातून आम्हांला जीवन लाभले तुमच्या एकांगी निष्फळ साधनेतून आम्हांला साफल्य मिळाले. आम्ही आमच्या प्रेमजीवनात ठेचाळलो. आमच्याही गुहा होत्या. पण आमच्या ठेचा वेगळ्या, गुहा वेगळ्या. आमचा मार्ग तुम्ही सोपा केला—कमी दुःसह केला.

नानी, तू गेली नाहीस, मेली नाहीस. सती कधी मरत नसते. तुझा जीवन-प्रवाह अखंड वाहत आहे. अनेक धारांनी वाहत आहे. माझ्या मुलांच्या, त्यांच्या मुलांच्या जीवनातून वाहत आहे. आमच्या रक्तात तू अमर झाली आहेस. आमच्या रक्तात, आमच्या जीवनात तुझ्या निग्रहाचा, तुझ्या व्यथेचा तुझ्या साधनेचा वारसा आला आहे—तुझा आणि दत्तांचा. माझ्या उषेची मुशाफरी तू थांबलीस तेथून पुढे चालली आहे. माझी यशोधरा प्रेमाच्या

आवेगाने बिलगते; त्या आवेगात तुझी झेप आहे. माझ्या भारतीच्या भाबड्या डोळ्यांतून, हे कामरूपिणी, तूच डोकावत असतेस. माझी ऊर्मिला पहाटेस माझ्या खोलीत नाचत नाचत येते, नाचऱ्या डोळ्यांनी हसते आणि एक वेळूट लकेर छेडते. अपराजिते, ती तुझीच लकेर आहे—पुढच्या सप्तकातली. आणि सुजाता? ती तर तुझी भावमूर्ती—तुझी इच्छापूर्ती! तुला जसे व्हायचे होते पण होता आले नाही तशी ती झाली आहे.

देवी चंद्रभागे, माझ्या बालमाते, या तुझ्या वृद्ध पुत्राचे तुला शतशः दंडवत!

अनुक्रम ८१९२६ वि: निबंध
क्रमांक १७७५ नों. दि: १५।१।६७

# ११

# एक अपूर्व संध्या

**न. वि. गाडगीळ**

साध्या गोष्टीसुद्धा प्रसंगाने आणि परिस्थितीने असाधारण आणि असामान्य होतात. मानवी जीवनातच हे होतें असें नाही, तर सृष्टीमध्येही हे घडत असते. दोन नद्या एकत्र आल्या, संगम झाला, ही अगदी साधी गोष्ट आहे; पण यातच एक असाधारण भावना उत्पन्न होते. मानवी मनात तिचे प्रतिबिंब उतरते. संगम म्हणजे क्षेत्र ही समाजाची धारणा होते. मग तो संगम समोरासमोर झाला की मनुष्य त्या गोष्टीला अधिक महत्त्व देतो. त्या संगमाचे महत्त्व अधिक मानतो. नद्या अनेक आहेत; पण प्रत्येकीला मनुष्य काही पुण्यसलिला मानीत नाही. वास्तविक प्रत्येक नदी, प्रत्येक नाला यांचे कूळ एकच. आकाशातून पडलेले पाणी समुद्राप्रत जाते; आणि या प्रवासात ज्या प्रमाणात त्या त्या नदीचा व्याप व विस्तार वाढतो, त्या प्रमाणात ती पवित्र मानली जाते. "तीरींच्या पादपांचे" वर्धन करीत जाते, तीरावरल्या भूमिभागाला समृद्ध करीत जाते, काठांवर बसलेल्या मानवांच्या जीवनात आनंद पसरीत जाते, आणि मग अशा विशाल नदीच्या तीरांवरील प्रदेशांतून अज्ञात काळात कुणी तप केल्याच्या कथा प्रसृत होतात. पुराणे मग इतिहास बनतात, आणि सामान्य गोष्टीसुद्धा प्रेरक आणि उत्साह देणाऱ्या ठरतात.

वास्तविक सृष्टी हे एक महाकाव्य आहे. या काव्याला अंत नाही. त्यात किती खंड आहेत, हे कुणी सांगू शकत नाही. पर्वत आणि नद्या, लहानमोठी सरोवरे, सागर आणि महासागर ही सर्व त्या महाकाव्याची पर्वे आहेत, असे म्हटले आहे. पर्वताच्या गुंफांत आणि नद्यांच्या संगमांच्या सान्निध्यात मानवाची बुद्धी सृजनशील होते. अथांग रत्नाकराकडे, विशाल महासागराकडे पाहून तीच गोष्ट अनुभवाला येते. प्राचीन ऋषीमुनींनी आपले धर्मग्रंथ याच वातावरणात निर्माण केलेले आहेत. या व असल्या सृष्टीच्या मनोहर सान्निध्यात

काव्य सुचले नाही, असा मनुष्य विरळाच ! मधुर संगीताने, सुभाषिताने आणि ' युवतीनां च लीलया ' ज्याचे चित्त द्रवत नाही, अशा माणसाची यथायोग्य संभावना सुभाषितकारांनी केलेली आहेच ! पण या सुभाषितात सृष्टीतील सौंदर्य-स्थळांचीही भर घालावयास पाहिजे, असे मला वाटते. अशाच एका सौंदर्य-स्थळाच्या सान्निध्यात प्रस्तुत लेखाची प्रेरणा आहे.

पाणी योजना कमिटीच्या संदर्भात, दक्षिणेतील राज्यांत ताडतोब काय करता येईल, याची चौकशी करून, त्यासंबंधी शिफारसी करण्याचे काम भारत सरकारने एका समितीवर सोपवलेले होते. त्या समितीचा प्रमुख या नात्याने त्या वेळी मी केरळ राज्यात गेलो होतो. केरळ प्रदेशाची सौंदर्यविषयक कीर्ती मी लहानपनापासूनच ऐकत होतो. ' केरळ-कोकीळ ' या नावाचे एक मासिक अगदी लहानपणी, म्हणजे सुमारे ५० वर्षांपूर्वी अवलोकनात येत असे; आणि त्यातील लेखक ' महाराष्ट्रभाषाचित्रमयूर ' यांचे लिखाण पण वाचनात येत असे. तरुणपणी राजा रविवर्म्याची चित्रे,-काही अस्सल आणि काही छापील अशी,—पाहण्याचा योग आला होता; आणि केरळातील हा कलावंत माझ्या आदराचे एक स्थान झाला होता. ज्या भूमीत जे सर्जन होते, ते त्या भूमीतील गुणद्रव्याचे थोड्याबहुत प्रमाणात प्रतिबिंब असते. परिस्थितीने पुरुष बनतो. म्हणजे त्याचे जीवनदर्शन, त्याचा वर्तनक्रम, ही कमीजास्त प्रमाणात परिस्थितीची निर्मिती असते, आणि या दृष्टीने या कलावंताच्या रचनात्मक स्थितीत—ज्या स्थितीत त्याचे आदर्श आकार घेऊ लागले त्या स्थितीत--केरळातील सृष्टिसौंदर्याने खास मोठा परिणाम केला असला पाहिजे, असे माझे मत होते व आहे.

केरळातील स्त्रीपुरुष स्वच्छ, टापटिपीचे, नीटस आणि देखणे असतात असे त्यांचे वर्णन महात्माजींनी केलेले आहे. आद्य शंकराचार्य हेही केरळ-भूमीचे सुपुत्र. त्यांची जन्मभूमी पहावी. ही फार दिवसांची इच्छा होती. मंत्रिमंडळात असताना कामानिमित्त तिकडे जाण्याची संधी अनेक वेळा आली होती, पण ते घडले नाही. तसेच, कै. वल्लभभाईंनी केरळला भेट दिली होती, तेव्हा त्यांनीही आग्रह केला होता. परंतु त्याही वेळेस जाणे घडले नाही. तात्पर्य, लहानपणापासून इच्छा असूनही साठी उलटल्यानंतर ही घटना घडायची हा ईश्वरी संकेतच असला पाहिजे !

त्यामुळे सांगण्यात आलेले काम तात्बडतोब स्वीकारून पहिल्या प्रथम केरळ राज्याला भेट देण्याचे ठरवले. कार्यक्रम निश्चित झाला. पाटबंधाऱ्यांसंबंधीच्या ज्या योजना चालू होत्या, त्यांची पाहणी करायची, हे मुख्य काम. पण माजी मंत्री आणि विद्यमान समिति-प्रमुख या नात्याने भेट होणार असल्यामुळे, स्वागताचे अनेक समारंभही त्या कार्यक्रमात प्रविष्ट करण्यात आले होते. तथापि दैव मला सर्वस्वी अनुकूल होते. मी त्या ठिकाणी पोहोचण्याच्या आधीच ७-८ दिवस विषबाधित अन्नाच्या प्रकारात काही माणसे दगावली! त्यामुळे बहुतेक समारंभ छाटले गेले, आणि काही २-३ समारंभ घडून आले, त्यामध्ये कुठेही साखरेचा अगर गव्हाचा पदार्थ नव्हता. काकवी मिश्रित चहा पिण्याचे अपूर्व भाग्य लाभले; आणि जेवण म्हणजे यथार्थतया भातुकलीच होती! पण इच्छा व्यापक होती. इष्ट मर्यादित ठेवणे आवश्यक होते.

ता. १५ मे रोजी अगदी ब्राह्म मुहूर्तावर मुंबईतील सांताक्रूझ विमानतळाहून "अथवा विमानमार्गेण" निघालो. गेल्या १४ महिन्यांत माझ्याइतका विमानाचा प्रवास विमानहाके सोडून दिल्यास कुणीही केला नसेल! त्यामुळे या प्रवासाच्या बाबतीत मी इतका निगरगट्ट झालो होतो की, विमान मला लागायच्या ऐवजी मीच विमानाला लागणे अधिक संभवनीय होते! मला वाटत होते, वैशाख महिना असल्यामुळे दक्षिण दिशेला जाताना डाव्या बाजूने अखंड प्रवास करणारा सूर्य माझ्यासारख्या महान व्यक्तीला मुजरा करण्यास येईल; आणि त्याच्या प्रकाशात पश्चिम किनाऱ्यावरील कोकण प्रांतातील सृष्टिसौंदर्य, जलदुर्ग पाहत-पाहत मी जाईन. तथापि सूर्याऐवजी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून धुके आणि ढग आमच्या मार्गावर जणू सत्याग्रह करताना दिसू लागले! विमान डाकोटा असल्यामुळे ते फार उंचावर जाऊ शकत नव्हते. नाही तर व्हायकौंटप्रमाणे २० हजार फुटांवरून प्रवास केला असता; आणि वामनाने पददलित केलेल्या पृथ्वीला, वराहाने तुच्छ लेखलेल्या पृथ्वीला मीही तुच्छ लेखले असते. तथापि मला ही संधी मिळायची नव्हती. म्हणूनच की काय, पहिला तासभर प्रवास अत्यंत त्रासदायक झाला. खुर्चीचे पट्टे बांधा आणि सोडा, हीच कवायत करीत बसावे लागले!

सुमारे १॥-१॥। तासाने परिचित भू-भाग दिसू लागला; आणि थोड्याच वेळात बेळगावच्या विमानतळावर उतरलो. सीमेच्या वादात हा भाग परिचित

होता; कारण म्हैसूर आणि मुंबई यांतील सीमा म्हणजे हा विमानतळ अशी सूचना करण्यात आली होती. विमानतळावर उपहारगृहही नव्हते आणि बसावयास प्रशस्त जागाही नव्हती. तथापि वातावरण प्रसन्न होते आणि आकाशही निरभ्र होते. १५ मिनिटांत पुनः विमान सुरू झाले आणि तासाचे आत मंगलोरच्या घाटमाथ्यावरील विमानतळावर आम्ही उतरलो. हा विमानतळ म्हणजे एक अपूर्व गोष्ट आहे. अन्य विमानतळ सामान्य भूमीवर आहेत; हा मात्र डोंगरपठारावर आहे. या विमानतळावर येण्यापूर्वी गोव्याची भूमी दुरून दिसत होती. गोव्याच्या भूमीवरून जावे अशीही इच्छा होती, पण ते मना आहे असे पायलटने सांगितले! त्यामुळे डोकेदुखीचा प्रश्न झालेला गोवा उजव्या बाजूला ठेवून, क्षणभर त्याला उजवी घालून आम्ही मंगलोरला आलो. तेथून कोचीनच्या विमानतळावर येताना सर्वत्र पाण्याचे प्रवाह, नारळाची झाडे आणि त्यांच्या कुशीत लपलेली लहान लहान कौलारू घरे असा देखावा वरून दिसत होता. वरून पाहताना सर्वत्र पाणीच पाणी दिसत होते. विमानतळ कुठे आहे हे पाहण्याची उत्सुकता वाटत होती. पण तो नीटसा दिसेना. मग मात्र भीती वाटू लागली. या सगळ्या जलप्रवाहाशी पाठशिवणीचा खेळ खेळताना विमान एखादवेळीं पाण्यावर तर नाही ना उतरणार? आणि तसे झाले तर काय करायचे याची योजना, योजनाप्रिय हिंदुस्थानचा एक नागरिक या नात्याने मी लागलीच तयार केली. चष्मा आणि घड्याळ यांचे रक्षण केलेच पाहिजे हा निश्चय झाला, पण पेनविषयी निश्चित मत होईना. कटिवस्त्र ठेवून अंगावरील बाकीचे कपडे सोडावयाचे हाही निर्णय घेताना अडचण पडली नाही! तथापि असे काही घडायचे नव्हते; आणि अगदी अरसिक रीतीने आमचे विमान कोचीन विमानतळावर उतरले. तिथे औपचारिक स्वागत झाले; आणि १५ मिनिटांत आम्ही त्रिवेंद्रमच्या विमानात बसलो; १ वाजता मुक्कामावर पोहोचलो. 'सरकारी पाहुणा' या नात्याने सर्व व्यवस्था होतीच. अर्थात अनुभव चिमणरावांपेक्षा निराळा आला!

"कन्याकुमारीला भेट द्यायची आहे का?" असे त्रिवेंद्रमच्या इंजिनियरने विचारले आणि मी तत्काळ होकार दिला. नेमलेल्या कामाबाहेर काहीतरी केलेच पाहिजे, हे मंत्र्याचे धोरण स्वीकारले! त्यामुळे ता. १६ रोजी सकाळी मुख्य मंत्री श्री. नंबुद्रीपाद यांचे स्वागत स्वीकारून आम्ही मोटारने कन्या-

कुमारीला जायचे ठरविले.

या जवळजवळ १०० मैलांच्या प्रवासात आपण जणू एखाद्या शहरातून जात आहोत असा भास होत होता. एक वस्ती संपली, की लागलीच दुसरी सुरू. दुतर्फा घरे. वाक्यात स्वल्पविराम असावा, तशी उपहारगृहे; अर्धविरामाप्रमाणे शाळागृहे; आणि पूर्णविरामाप्रमाणे एखादा कालवा, असे होत होते. एखाद्या महापुरुषाच्या दर्शनार्थ लोकांनी गर्दी करावी, तशी नारळीच्या झाडांनी दुतर्फा गर्दी केलेली होती. एखाद्या नटव्या स्त्रीने गळ्यात जडजड मण्यांची माळ घालावी आणि लोकांना ती दिसावी म्हणून पदर किंचित बाजूला सारावा' त्याप्रमाणे या वृक्षांची स्थिती झालेली दिसत होती. वृक्षांना नारळच नारळ लागलेले दिसत होते. रस्त्यातील उपहारगृहाजवळ जणू काही तसेच दृश्य दिसत होते. माणसांची टोळकीच्या टोळकी एकत्र येऊन, हातात वर्तमानपत्र घेऊन चर्चा करीत होती. स्त्रीपुरुष स्वच्छ, नीटनेटके आणि व्यक्तिमत्व असलेले दिसत होते. सहज चौकशी करता असे समजले की देवीकोलम मतदारसंघातील मतदानाचा तो दिवस होता. केरळातील ८० टक्के जनता साक्षर आहे. हिंदू, मुसल्मान, हरिजन आणि ख्रिश्चन या चार जमातींचा संगम तिथे झालेला आहे. तिथल्या ख्रिश्चन जनतेने दुसऱ्या शतकापासून तो धर्म स्वीकारला; काहींच्या मते तर जीझसच्या मृत्यूनंतर ५–१० वर्षांतच ती ख्रिश्चन झालेली आहे. आजच्या जमान्यातसुद्धा धर्मच तिथे प्रभावीही दिसत होता, आणि अर्थशून्य दिसत होता! जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आता आर्थिक होऊ लागलेला आहे, असे अनेकांनी मला सांगितले. सकाळी भेटलेल्या वृत्तपत्रप्रतिनिधींनीही तेच सांगितले होते. मोठ्या पुढाऱ्याला भेटणे हे वृत्तपत्रकारांचे काम असते. पण ते आपण होऊन न आल्यास त्यांना बोलावून आणणे हे लोकशाहीतील पुढाऱ्यांचे कर्तव्य असते! त्यामुळे ते मला भेटायला आले नसते, तर मीच त्यांना बोलावले असते, हे निश्चित! त्यांनीच मला या निवडणुकीबद्दलची कल्पना दिली होती. म्हणूनच या शांत आणि सुंदर वातावरणातून प्रवास करीत असताना मी जागजागी गाडी थांबवीत असे, आणि चहाचा शोध करून मिळवलेल्या कॉफीत संतोष मानीत, तिथे जमलेल्या मंडळींशी थोडीबहुत चर्चाही करीत असे. निदान ७–८ ठिकाणी असे केले असेल. "व्यक्ती तितक्या प्रकृती" या न्यायाने विविध दृष्टिकोन नजरेस आले; पण

एक गोष्ट मात्र निर्विवादपणे आढळून आली. ती म्हणजे विद्यमान मंत्रिमंडळातील सदस्यांच्या वैयक्तिक चारित्र्याबद्दल लोकांना वाटत असलेला नितांत आदर! तात्पर्य, या प्रवासात सृष्टीचे सौंदर्यनिरीक्षण आणि मानवी संघर्षाचा विचार करीत मी पुढे-पुढे चाललो होतो. योजना अशी होती की, संध्याकाळ होण्यापूर्वी निदान अर्धा तास तरी कन्याकुमारीस पोचायचे, आणि सूर्यास्त झाल्यानंतर तेथून परत निघायचे. कारण मार्गदर्शक इंजिनियरने सांगितले होते की, कन्याकुमारीतली संध्याकाळ म्हणजे एक अलौकिक सृष्टिसौंदर्याचा नमुना असतो.

सुमारे ५ वाजता आम्ही कन्याकुमारीला पोचलो. तिन्ही बाजूला समुद्र होता. हिंदुस्थानच्या नकाशात दाखवल्याप्रमाणे भूप्रदेश निमुळता होत गेला होता, आणि शेवटला बिंदू तर अवघा फर्लांग दोन फर्लांगांइतका दिसत होता. मोटार समुद्रापासून १०० यार्डांवर ठेवून आम्ही दक्षिणाभिमुख चाललो होतो. डाव्या बाजूला बंगालचा उपसागर जणू काही भारतभूमीची पूजा करण्यासाठी तरंगरूपी पुष्पांजली वाहत होता. किनाऱ्यापासून २०० यार्डांवर एक लहानसे बेट दिसले. तिथे स्वामी विवेकानंदांनी काही दिवस तप केले होते, अशी आख्यायिका सांगण्यात आली. जिथे जमिनीचा शेवटचा बिंदू होता, त्या ठिकाणी एक लहानसा घाट, आणि त्याच्या अलीकडे कन्याकुमारीचे देऊळ होते. प्राचीन काळीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत राज्य करणारा भरत-नामक एक राजा होता. त्याच्या मुलीचे नाव कुमारी होते. राजाने आपले राज्य मुलांत आणि मुलींत वाटले होते. ( तेव्हा या दृष्टीने विचार करता हिंदू कोडातील मागणी किती यथार्थ आहे, हे सहज ध्यानात येईल! ) या भागात तिचे राज्य असताना त्याला ' कुमारीनाड्ड ' म्हणजे कुमारीचे वसतिस्थान असे नामाभिधान प्राप्त झाले. अशीही आख्यायिका सांगतात की, विश्वातील पराशक्ती कुमारीच्या रूपाने येथे तप करीत होती.

आसपास अनेक तीर्थे आहेत. गायत्री, सावित्री, सरस्वती, मण्डन अशी अनेक तीर्थे तिथे आहेत. त्यातले एक स्थाणू तीर्थही आहे. त्यासंबंधीची आख्यायिका मोठी सुरस आढळली. बाणासुर राक्षसाचा वध करून देशावरले संकट निवारावे, म्हणून एक यज्ञ करण्यात आला होता. या यज्ञातून पराशक्ती कुमारी म्हणून बाहेर आली. तिचा विवाह झाला, तर बाणासुराचा वध होण्या सारखा नव्हता. म्हणून भानगडी करण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या नारदमुनींनी

एक क्लृप्ती शोधून काढली. "डोळे नसलेला नारळ, पेरे नसलेला ऊस आणि शिरा नसलेले विड्याचे पान जो आणील, त्याच्याशी तू विवाह कर!" असा कानमंत्र त्याने तिला दिला. पण इतके करूनही एका राजपुत्राने ते सारे काही आणले! त्यामुळे नारदाने आणखी काही युक्त्याप्रयुक्त्या लढवल्या आणि अखेरीस तो राजपुत्र त्या ठिकाणी स्थाणू राहिला. त्याचेच आज तीर्थ झाले आहे. सौंदर्यस्थळांच्या अनुरोधाने आख्यायिका नेहमीच निर्माण होत असतात. त्याचा प्रत्यय इथेही आला!

अशा ठिकाणी बहुतेक यात्रेकरू भक्तिभावाने येतात. आम्ही मात्र भक्तिभावाने आलो नव्हतो. सौंदर्योपासक म्हणून आलो होतो. सत्य, शिव आणि सौंदर्य यांपैकी सौंदर्याची प्रेरणा निदान माझ्या मनात तरी प्रभावी होती. सूर्योदय आणि सूर्यास्त कोणत्याही स्थळी मानवी मनाला सदैव आनंद देतात. पण ह्या स्थळी मनात काही विशेष भाव उत्पन्न होतात. पूर्वेस बंगालच्या समुद्रातून वर येणारा सूर्य बारा तास आपली कामगिरी करून पश्चिम महासागरात विलीन होतो. हे दोन्ही कालबिंदू इथे अत्यंत प्रेक्षणीय असतात. दोन्ही दृश्ये मनोहारी. अपूर्व प्रभात आणि अपूर्व संध्या!

आम्ही पोचेपर्यंत सहस्ररश्मी पश्चिम सागराच्या वर १०–२० हात कललेला होता. असे सांगतात की, चैत्र शुद्ध पौर्णिमेला पूर्व समुद्रातून चंद्राचा उदय आणि पश्चिम समुद्रात सूर्याचा अस्त एकाच वेळी होताना दिसतो. एकाच वेळी अस्त आणि उदय हे सौंदर्य, सौंदर्य तर खरेच. पण त्याबरोबर ते एक नैतिक सुविचार प्रकट करणारेही आहे. लोकशाही युगामध्ये हा देखावा चैत्र पौर्णिमेला दिसत नसेल, पण निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर एका मंत्रिमंडळाचा अस्त आणि दुसऱ्याचा उदय या स्वरूपात तो दिसून येतो! जगाच्या रहाटगाडग्यातील रिकामे पोहोरे भरून वर येतात, आणि भरलेले रिकामे होतात, हे आपण नेहमीच पाहत असतो.

अशा प्रकारचे विचार डोक्यात चालू होते. तेवढ्यात आमच्या वाटाड्याने सांगितले की, पलीकडचा वाळूचा ढिगारा जलदगतीने ओलांडून गेले पाहिजे; म्हणजे सूर्यास्ताचा देखावा स्पष्टपणे पाहता येईल! आमच्या समितीतील बहुतेक लोक साठी उलटलेले होते. लालसिंग तगडे खरे, पण हृदयाच्या विकारामुळे तेसुद्धा जलद चालण्यास नाखूष होते. त्यांनी वाळूतच बैठक मारली.

म्हैसूरचे नरसिंहैय्या म्हणजे लहानशी मूर्ती. पण सर्वांत तेच जलदगती ठरले, आणि त्यांच्या पाठोपाठ हा मर्द मराठा कुठेही न थांबता जात होता! रेताडातून झपाट्याने पावले उचलीत जाणे मोठे जिकिरीचे असते. पण मानवी मन असेच आहे की, कुणाच्या उत्कर्षापेक्षा अवनतीकडेच त्याचे लक्ष अधिक वेधते! त्यामुळे सूर्याचा अस्त पाहण्यासाठी आम्ही अधीर झालो होतो. आमच्या पायांना क्षणभर हरणाची गती प्राप्त झाली होती. शंख आणि शिंपले ओलांडीत, तुडवीत आम्ही भराभर पुढे जात होतो. समुद्रापासून ९–१० पावलांवर पोचेपर्यंत आम्ही अगदी थकून गेलो होतो.

आकाश निरभ्र होते. सूर्यबिंब लाल झाले होते. पण ती पराक्रमाची लाली वाटत नव्हती. श्रेष्ठ व महान पुरुष आपत्काळीसुद्धा विलक्षण धैर्याने वागतो. त्या वेळी त्याच्या मुखावर जी एक अपूर्व शोभा झळकत असते, तशीच ही शोभा वाटत होती. क्षणभरसुद्धा विसावा न घेता, कसल्याही फळाची आकांक्षा न धरता, जगाची एवढी सेवा करणारा हा कर्मवीर जगातील कृतघ्नतेच्या जाणिवेमुळे जणू काही कष्टी झालेला आहे, असे वाटत होते. जगाचा कोनाकोपरा आपल्या प्रकाशाने उजळणारा, अनंत जीवांना प्रेरणा—नव्हे, जीवनतत्त्वे देणारा प्रवासी एक मुक्काम तयार करून दुसऱ्या मुक्कामाकडे जायला निघाला होता. एखादा वर्तमानपत्राचा बातमीदार बातम्या देण्यासाठी घाईघाईने आपल्या कार्यालयाकडे धावपळ करीत जाताना दिसतो, त्याप्रमाणे जगातील सर्व घडामोडींचा साक्षीदार जगाचे इतिवृत्त विश्वनिर्मात्याकडे रुजू करण्यासाठी जात असावा. त्याने काय पाहिले असेल, काय ऐकले असेल, याची संपूर्ण कल्पना कुणालाही येऊ शकत नाही. मनुष्य जे-जे काही करीत असतो, त्याचे साक्षीदार सृष्टीतील प्रभावी द्रव्ये असतात. चंद्र, सूर्य आणि ही भूमी या सर्वांना, मनुष्य शरीराने जे करतो आणि मनाने जे चिंतितो, ते सारे अवगत असते, असे धर्मशास्त्र सांगते. हे खरे असेल काय? आणि तसे असेल, तर माझ्या मनातले विचार हा सूर्यनारायण खास जाणीत असला पाहिजे.

आणि त्याच क्षणी एकाएकी आठवण झाली. याच स्थळी, अशाच एका सूर्यास्ताचे वेळी पूज्य विनोबाजींनी जाहीर प्रतिज्ञा केली होती: "जीविताचा उरलेला प्रत्येक क्षण या भारतभूच्या द्वारे सर्व जगाच्या सेवेसाठी खर्च करीन!"

त्या प्रतिज्ञेची आठवण होताच एक निराळेच वातावरण उत्पन्न झाले. ती

संध्या मग मामुली संध्या उरली नाही. मनात निराळेच भाव निर्माण होऊ लागले. क्षणभर पार्थिव अस्तित्व विसरून गेलो. क्षणभर निराळ्याच एका सृष्टीत वावरू लागलो. सूर्य कलेकलेने समुद्राच्या पाण्याखाली अदृश्य होत आहे, हे पार्थिव डोळ्यांना दिसत होते. पण मनात निराळाच प्रकाश उमटत होता; कधीही कमी न होणारा, क्षणोक्षणी वाढत जाणारा प्रकाश मनात उमटत होता.

तेवढ्यात कुणीतरी ' परतण्याची वेळ झाली ', असे म्हटले; आणि पार्थिव सृष्टीशी तुटलेला संबंध पुनः एकदा जोडला गेला !

बुडत्यास हात द्यावा, ही नेहमीची जनरीत आठवली आणि धावत जाऊन सूर्याला घट्ट पकडावे, बुडण्यापासून वाचवावे, अशी पोरकट कल्पना मनात आली. प्रस्तुत संदर्भात ती पोरकट खचितच नव्हती ! पण मी तसे केले नाही. तसे झालेही नसते, याची जाणीवही तत्काळ झाली. पण हाच भावजीवनाचा प्रधान हेतू असावा, हेच त्या अपूर्व संध्येतील अध्यात्म बरोबर घेऊन मी परत फिरलो.

१२

# शरावती

७५९३२

रा. भि. जोशी

गोकर्ण सोडून गिरसप्पाच्या वाटेला लागल्यावर मोटारी वेगाने चालल्या. जसजसे अंतर कापत चालले तसतसे आसमंताचे स्वरूप पालटत चालले. शेते आणि तुरळक झाडीचे मोकळे माळ मागे पडत. तांबडालाल रस्त्याचा पट्टा कधी सखल जागेतून, कधी डोंगराच्या कडेवरून, तर कधी झाडांच्या गर्दीतून अगदी रानाचा गाभा कापून वाट काढीत चालला होता. आम्ही उंचावर असलो म्हणजे खाली खोऱ्यात मैलचे मैल नुसत्या सुपारीच्या बागा दिसत. वेताच्या छडीसारखे लवचीक आणि कातून काढलेल्या खांबासारखे सरळ असे त्यांचे भुरकट–करडे बुंधे आणि त्यावरची हिरवी, किरणांसारखी पसरलेली पाने पाहिली म्हणजे उंचाड्या अष्टवक्रांसारखे जेमतेम तोल सावरून धरणाऱ्या माडांची आठवण होऊन हसू येई. कवायतीला उभ्या राहिलेल्या मुलींसारखी त्यांची रेखीव रचना मन आकर्षून घेत आहे तोच मोटार दाट अरण्यात शिरे आणि तिथली झाडांची गर्दी स्तिमित करून टाकी. गुडघ्या-एवढ्या खुरट्या काटेरी झुडपांपासून आभाळाला उचलून धरणाऱ्या प्रचंड वृक्षांपर्यंत सर्वांना सारख्याच आवेगाने कवटाळणाऱ्या विवेकशून्य आश्रयातुर वेली; आकाशाच्या दुध्यानिळ्या पार्श्वभूमीवर काळी जाळी कोरणारी कळकीची राक्षसी वेटे, तीन तीन पुरुष उंचीची केवड्यांची झाडे, इतर ओळखीची आणि अनोळखी झाडेझुडपे – किती पाहावे आणि कुठे पाहावे, अशी मनाची स्थिती होई.

वाटेत एका ठिकाणी लाल–शेंदरी रातांबे पडलेले दिसले, ते खाऊन कपडे आणि तोंडे रंगवून घेतली. पुढे एका ठिकाणी श्रावणात पारिजातकाच्या फुलांचा सडा पडावा तसे आंबे पडलेले दिसले. चांगले पाडाला आलेले, हिरवे-पिवळे, पण लहान किती ? श्रीवर्धनी रोठ्यांइतपत ! आम्ही आधाशीपणाने

पुष्कळसे भरून घेतले. पण चोखून पाहतो तो काय ? आंबा म्हणजे निव्वळ आंब्याची व्याख्या – मूळ प्रकृती – होती. साल, रेषा, कोय आणि चिकाळ आंबट गोडी. तेव्हा मग सगळी फळे ' इदं न मम ' म्हणून धावत्या गाडीतून ओतून वनदेवतांना परत दिली.

मधून एखादी वेल दाखवून आमचा ड्रायव्हर सांगे, " ही मिऱ्यांची वेल, ही विडयाच्या पानांची, ही गुंजेची—" आणि आम्ही नवल करीत कर्तव्यदक्ष ' हुंकार ' देत असू. दोन डोळ्यांनी पाहायचे किती आणि साठवायचे किती ? एवढ्या दाट अरण्यातून जात असताना काही जनावरे दिसली तर किती बहार होईल असे मनाशी म्हणतच होतो, तो पाच–सात रानडुकरांची एक मातड माळ रस्त्यावरून आडवी मुसंडी मारून गेली. तेव्हा मात्र खरे रान पाहिल्यासारखे वाटले. अर्थातच चपळ सडपातळ नीलगाई, मस्त थोराड रानरेडे, जबरदस्त सुस्त अजगर, एखादा वाघ किंवा वाघरू असे काही दृष्टीला पडले असते तर रानाचा रानपणा अधिक ठसला असता. पण हे आता म्हणायला ठीक आहे, त्या वेळी खरोखरच असे काही दिसते तर ' सीदन्ति मम गात्राणि । मुखं च परिशुष्यति ' अशीच अवस्था झाली असती. भर दुपारची वेळ होती म्हणूनच असा प्रसंग येण्याचा फारसा संभव नव्हता. तिन्हीसांजची किंवा रात्रीची वेळ असती तर तो आलाच असता. मध्येच एखाद्या ठिकाणी झाडीने झाकळलेला पाणवठा किंवा डोह दिसला म्हणजे रात्रीच्या प्रहरी तिथे कसला देखावा दिसत असेल ह्याचा विचार येऊनच आतल्या आत थरकापल्यासारखे होई. कारवारला येताना अमर्याद आणि अथांग निळा समुद्र पाहिला, हा हिरवा समुद्रच होता. त्या समुद्राच्या पृष्ठभागावरून तरंगत आलो होतो आणि ह्याच्या पोटातून वाट कापीत चाललो होतो. दोन्ही सारखेच मनुष्याला एकाकी आणि क्षुद्र वाटायला लावणारे !

ऐन दुपारी तिन्हीसांजचा आभास उत्पन्न करणाऱ्या त्या अरण्यातून जाताजाताच खरोखरची तिन्हीसांज जवळ येत चालली. असूर्यंपश्या देवदारांसारखे जपून जोपासून वाढविलेल्या वेलदोडयांच्या आणि सुपाऱ्यांच्या राशींनी भरलेली शिर्सीची बाजारपेठ डावलून आम्ही पुढे चाललो होतो.

बराच वेळ गेल्यावर जंगलातच एका ठिकाणी गाडी थांबवून ड्रायव्हरने आम्हांला विचारले,

" ऐकू येतं काही ? "

" काय ? " आम्ही थोडेसे घाबरतच उलट प्रश्न केला. वाटले, कशाबद्दल विचारतो आहे !

" धबधब्याचा आवाज. इथून दोन मैलांवर आहे. "

जिवात जीव येऊन आम्ही कान दिल्यासारखे केले. ऐकू येत होता खरा. आता आम्ही अधिकच उत्सुक झालो. पंधरा-वीस मिनिटांत मुंबई बंगल्याशी जाऊन पोचलो, मुंबई बंगल्यात राहायची सोयही होती. पण चारी धबधब्यांचा सगळा देखावा म्हैसूर-बंगल्याकडून अधिक चांगला दिसतो. शिवाय त्या बाजूने खाली जायलाही अधिक चांगला रस्ता आहे. तेव्हा मुक्कामाला म्हैसूर बंगल्याकडेच जायचे ठरवावे लागले. धबधब्याच्या रोखाने थोडेसे खाली उतरलेले आम्ही तसेच परतून मोटारीत बसलो. आणि धबधब्याच्या वरच्या अंगाला मैल-दोन मैलांवर तर आहे तिकडे निघालो. आम्ही पोचलो तो सहा वाजून गेले होते आणि तर सहालाच बंद होते. आमच्यासारखेच आणखीही काही लोक खाजगी मोटारीने पलीकडे जाण्यासाठी आले होते. तरवाल्याने आम्हांला पलीकडे न्यायचे नाकारले. आम्ही त्याच्याशी हुज्जत घातली. आमची अडचण समजावून सांगितली. थोडासा रुबाब दाखवून पाहिला. बक्षिसाची आशा दाखविली. पण तो हू की चू करीना. आम्ही ड्रायव्हरला विचारले, " काय करायचे ? " तो म्हणाला, " स्वस्थ बसा, सर्व व्यवस्था लागेल. " त्याच्यावर विसंबून आम्ही स्वस्थ बसून राहिलो. आणि उगीच येरझारा घालू लागलो. त्या भागात नारळी-पोफळीची झाडे दिसत नव्हती. देखावा देशावरच्यासारखा होता. आम्ही बसलो होतो तिथून जवळच एका ठिकाणी काही फुले दिसली. त्यांचा तुरेदार आकार आणि तांबडा-पिवळा रंग फार मोहक वाटला. आम्ही थोडीशी तोडून घेतली. कुणी तरी म्हटले,

" ह्याचं नाव काय असेल ? "

" कोण जाणे. "

" आपण काय नाव देणार ? "

" काका कालेलकरांनी हे पाहिलं असतं तर त्याच्या रंगावरून त्यांनी त्याला ' सोहागफूल ' किंवा ' सौभाग्यपुष्प ' नाव दिलं असतं. "

आम्ही ती ' सौभाग्यपुष्पे ' निरखून पाहू लागलो. त्यांचे नामकरण झाल्या-

मुळे त्यांना आता व्यक्तित्व आणि वैशिष्ट्य आले होते. आम्ही त्यांचे कौतुक करतो आहो तो ड्रायव्हर आला आणि सांगू लागला,

" चला तरीवर जायचं. "

ती दुसरी मोटारवाली मंडळी कंटाळून परत मुंबई-बंगल्याकडे गेली होती. ती जायचीच तरवाला वाट पाहत होता. त्याने आमच्या बॅगा एका तरीवर चढवल्या, आम्ही एका होडीत चढलो. इथे शरावतीचे पाणी एखाद्या तळ्यातल्यासारखे, शांत होते. दोन्ही बाजूंना झाडीने झाकलेले डोंगराचे उंचवटे होते. खाली मैल-दोन मैलांवर नऊशे फुटांचा धबधबा आहे हे कुणी सांगूनही खरे वाटले नसते. एव्हाना सूर्य मावळून गेला होता. वर काळे-निळे आभाळ, खाली संथ-शांत काळे-निळे पाणी, दोन्ही अंगांना काळे तट, सगळ्या निळ्या-काळ्या रंगाच्या गंभीर छटा आणि सगळे निःशब्द. आम्हांला नदी ओलांडण्याला पाच-सात मिनिटे लागली असतील. पण त्या तेवढ्या वेळात असे वाटले जणू आम्ही अनंत कालाची यात्रा करतो आहो. जणू काल थांबला आहे. भूत-भविष्याला काही अर्थ नसून सबंध काल वर्तमानच आहे आणि आम्ही असेच प्रवास करीत राहणार आहो. आम्ही कुठून आलो नाही आणि आम्हांला कुठे जायचेही नाही. चार-दोन क्षणच, पण आम्ही 'आम्ही' राहिलो नव्हतो...तर परतीराला लागली, आम्ही पुन्हा आम्ही झालो. प्रवास चालू झाला. काळाला गती मिळाली.

म्हैसूर-बंगल्यावर पोचून अंगणातल्या कठड्याशी स्वस्थपणे जाऊन बसलो तो रात्रीचे साडेआठ-नऊ झाले होते. बंगला, तळे आणि अंगणातले, दृष्टीला अडथळ्यासारखे वाटणारे दिवे काही वेळाने विझले आणि मग खाली खोऱ्यातल्या अंधार आणि वर कृष्णपक्षातल्या रात्रीची धूसरता एवढेच राहिले. त्या धूसरतेत धबधबा नुसता ऐकूच येत होता. आणि कड्याच्या माथ्याशी फेसाळ असे प्रचंड काही तरी खालच्या दिशेने झेप घेताना दिसत होते.

आम्ही कारवारहून निघालो तेव्हा बरेच लोक आम्हांला म्हणाले होते, " ह्या दिवसांत गिरसप्पाला कशाला जाता तुम्ही ? ह्या दिवसांत तिथे पाहण्यासारखं काही नसतं. गिरसप्पा पाहायचा तर डिसेंबर ते फेब्रुवारी ह्या दिवसांत पाहावा. "

पण आम्ही आमच्या मनाशी ठरविले होते, की ह्या प्रवासात गिरसप्पाला गेल्यावाचून राहायचे नाही. मग तिथे गेल्यावर कोरड्या पात्रातले दगड-गोटे पाहावे लागले तरी हरकत नाही. त्या भव्य-भीषण स्थळातले दगड-गोटे सुद्धा पाहण्यासारखे असले पाहिजेत आणि ते तसे दृश्य पाहणे ही देखील एक संस्मरणीय घटना ठरेल.

पण 'पुरा यत्र स्रोतः' असे दृश्य पाहण्याचा प्रसंग आमच्यावर आला नाही. धबधब्याच्या खालच्या बाजूला म्हैसूर सरकारचा वीज-कारखाना आहे. त्यासाठी शरावतीच्या वरच्या बाजूला धरण बांधले आहे. त्यामुळे प्रवाह अजिबात कोरडा कधीच होत नाही. किंबहुना, उन्हाळ्यातसुद्धा धबधब्यात अधिक पाणी सोडता येते. आम्ही तिथे गेलो त्याच्या दुसऱ्याच दिवशी मद्रासचे की म्हैसूरचे एक मंत्री येणार होते. त्यांच्यासाठी धबधब्यात मुद्दाम अधिक पाणी सोडणार होते असे कळले. धबधब्यावर ताबा मिळवून त्याचा तोटीचा नळ करणारा मनुष्य कर्तबगार खरा. पण ऐकून बरे वाटले नाही. माणसाळलेला धबधबा हे शब्द उच्चारायला जीभ धजावेना. त्यातल्या त्यात समाधान एवढेच, की वीज काढण्यासाठी म्हैसूर सरकारने धबधब्याला खांबा-सांखळ्यांच्या वेढ्यांनी विद्रूप केले नाही.

तो फेसाळ कडेलोट पाहत आणि धबधबा ऐकत असताना मध्यरात्र केव्हा उलटली ते कळले नाही.

सकाळी सगळे दृश्य बदललेले होते. आधल्या रात्रीच्या काळोख्याच्या दरीच्या जागी, हिरव्या-पिवळ्या रानाने झाकळलेली काळ्या-पिंगट दगडा-कपारींची दरी पसरलेली दिसत होती. समोर 'राजा' नऊशे फुटांवरून ओळंबा धरल्यासारखा सरळ खालच्या कुंडात कोसळत होता. त्याच्या शेजारी रॉकेटचा प्रवाह मधल्याच एका खडकावर आपटून सहस्रशः विदीर्ण होऊन-वर उडी घेऊन खाली सूर मारीत होता. आणि त्याच्या डावीकडे, त्या तीन दगडांपासून जरा बाजूला, 'ला दाम ब्लॉक' (गौरी) एखाद्या सलज्ज कुलवती-प्रमाणे संकोचाने अंग सावरीत खाली उतरत होती. तिच्या त्या उतरण्याला धबधबा म्हणणे म्हणजे तिचा उपमर्द होईल. हिरकण्यांच्या पडद्यासारखा तिचा प्रवाह आधी एका कपारीवर, तिथून खालच्या दुसऱ्या कपारीवर, तिथून तिसरीवर असा घरंगळत होता. पश्चिमेकडून जेव्हा तिसऱ्या प्रहराचे ऊन

तिच्या अंगावर पडत असेल तेव्हा तिचे उज्ज्वल रूप देवांनी खाली उतरून पाहण्याच्या योग्यतेचे असेल आणि खालीदेखील तिचे कुंड, राणीवशाची स्नानाची पुष्करणी वेगळी असावी तसे, वेगळे होते. नदीला पूर आला म्हणजे मग मात्र गर्दीत जसे सभ्य-असभ्य, नाजूक-आडदांड असे भेद ठेवणे अशक्य होऊन सगळे एकमेकांत मिसळतात तसे हे प्रवाह बरेचसे एकमेकांशी अंगे घाशीत उड्या घेतात. पण ह्या वेळी जो तो आपले वैशिष्टय आणि वेगळेपण संभाळून होता आणि कधी कधी किंचित कृश झालेल्या स्त्रीचे लावण्य जसे वेगळीच रेखीव शोभा धारण करते तशी 'गौरी' ह्या वेळीं सुंदर दिसत होती. जिथून ती खाली उतरत होती, तिथेच कड्याच्या टोकाशी उभा राहून एक चाफा तिचे लावण्य निरखीत होता. तिच्या दर्शनाने तो इतका बेहोष झाला होता, की आपल्या अंगावरली पाने गळाल्याचे त्याला भान नव्हते. आपल्या शुचिस्मिताने आपण वातावरण प्रसन्न करीत आहो ह्याचेही त्याला भान नसेल आणि तो इतका वाकला होता, की कड्याच्या कपारीत त्याचे पाय जखडले गेले नसते तर तिचे रूप अखेरपर्यंत पाहण्यासाठी त्याने खाली उडीही घेतली असती.

दोन्ही कुंडांच्या मधला कडा बराच पुढे आलेला आहे. त्याच्या पायथ्याकडला काही भाग प्रचंड अशा कासवाच्या वर उचललेल्या डोक्यासारखा दिसत होता. जणू समुद्रमंथनाचे काम संपल्यावर, अमृत पिण्यासाठी आणि रत्नांच्या वाटणीसाठी उत्सुक झालेले देव, गरज सरो आणि वैद्य मरो या न्यायाने, मंदराचलाखालच्या कासवाला तिथेच विसरले होते, आणि शरावतीच्या पायाखालच्या त्या विवरातून ते बाहेर येऊ पाहत होते. डोके वर आले आणि शरीर खाली राहिले ते राहिलेच. कल्पान्तानंतर पुन्हा जेव्हा देवांना अमृताची गरज लागेल तेव्हा त्यांना कासवाची आठवण होऊन त्याचा शिलोद्धार होणार. तोपर्यंतचा काळ त्याला कासवाच्या सोशिकपणानेच कंठावा लागेल.

वरून कोसळलेले आणि खालून मोकळे झालेले हत्तीएवढाले प्रचंड खडक खाली कुंडाच्या आसपास पसरलेले आहेत. त्यावर उभे राहून वर पाहिले. 'यतो वाचो निवर्तन्ते' असे रौद्र दृश्य होते. ज्यांच्या प्रवाहामध्ये शेकडो फुटांचे खरोखर अंतर ते धबधबे वर एकमेकांना खेटलेले दिसत होते. कड्याच्या टोकांवरच्या प्रचंड वृक्षांना वृंदावनातल्या तुळशीच्या रोपट्यांचा

आकार आला होता. गंगावतरणाच्या वेळीं आकाशातून कोसळणाऱ्या गंगेकडे पाहताना भगीरथाला आणि शिवाच्या गणांना कसे वाटले ह्याची कल्पना मन करू लागले.

खाली कुंडातले काळे-हिरवे पाणी, वरती शेवाळलेले पिंगट-काळे कडे आणि त्यावरून सहस्रावधी वर्षे अविरत कोसळत आलेले ते प्रचंड प्रवाह. खालून वर, वरून खाली फिरताना दृष्टी स्वधर्म विसरून जाते, विवश होते, भ्रमते. पांढऱ्या शुभ्र कबुतरांसारख्या दिसणाऱ्या शेकडो पक्ष्यांचा कळप त्या धबधब्याच्या आत-बाहेर मधूनच गर्रकन गिरकी घेऊन जाताना दृष्टीस पडला, म्हणजे मग त्या घोर-गंभीर दृश्याला उज्ज्वल नाजुकपणाचा स्पर्श होऊन जातो आणि दृष्टी परत भानावर येते.

गिरसप्प्यापेक्षा अधिक उंच, अधिक रुंद किंवा अधिक मोठे धबधबे जगात इतरत्र आहेत, पण भव्यता आणि सौंदर्य ह्यांचा असा संयोग इतरत्र नाही असे म्हणतात. उन्हाळ्यात त्या क्षीण प्रवाहातही एवढी भव्यता होती, मग पावसाळ्यानंतरच्या दोन-चार महिन्यात जेव्हा प्रवाह पुष्ट असतो तेव्हाचे त्याचे रूपवैभव अलौकिकच असले पाहिजे. त्या वेळीं सबंध दरी घोषरवाने निनादून तुषारांनी दाटून जात असेल. त्यावर उन्हाची तिरीप पडली म्हणजे इंद्रधनुष्ये उमटून "घोषाच्या कुंडी। नाद चिमांची रूपडी। प्रणयाचिया मोडी। रेखिली ऐसी॥" दिसू लागत असतील; आणि पाहणाऱ्याला, क्षणमात्र का होईना, योगिजनांना कष्टसाध्य समाधीनेच लाभणारा दिव्यत्वाचा साक्षात्कार होत असेल. हे अनुपम दृश्य आम्हांला पाहायला मिळाले नाही. पण ते स्थानच असे आहे, की जे पाहिले तेही 'यदल्पमपि तद् बहु' असेच वाटावे.

## १३

# उध्वस्त विजयनगर

**गंगाधर गाडगीळ**

विजयनगर तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर आहे. ह्या तुंगभद्रेचे पूर्वीचे नाव म्हणे पंपा. मुस्लिम आक्रमणाचा खैबर खिंडीतून घुसलेला लोंढा गंगायमुनांच्या तीरांवर अडला नाही, विंध्याद्रीच्या पायथ्याशी थबकला नाही, यादवांच्या देवगिरीने त्याला टक्कर दिली नाही. तो अखेर या कृश तुंगभद्रेच्या तीरावर थोपला. दोनशे वर्षेपर्यंत तो लोंढा विजयनगरच्या दगडी तटांवर आदळत होता आणि गुरगुरत निरुपायाने मागे सरकत होता. आणि ह्या दोनशे वर्षांच्या काळात विजयनगरमध्ये हिंदू संस्कृतीच्या द्राविड शाखेचा असा काही उत्कर्ष झाला, शिल्पाचे आणि स्थापत्यकलेचे असे भव्य व संपन्न विलास झाले, कलांचा असा अद्‌भुत विकास तेथे झाला आणि वैभवाची अशी भांडारे तेथे जमा झाली की, मुसलमानांनी केलेल्या अपूर्व आणि क्रूर विध्वंसानंतरही, त्या संस्कृतीची स्मृती इतिहासात कायमची कोरलेली राहिली आहे. त्या विनाशाच्या ढिगाऱ्यावर विजयनगरची विजयपताका अजून फडकते आहे. कायमची फडकत राहणार आहे.

विजयनगरचा इतिहास रामायणकालापर्यंत पोहोचतो. ती म्हणे पूर्वीची किष्किंधा. निदान तिथल्या लोकांनी आम्हांला असे सांगितले आणि ते खरे असावे. पंचवटीहून रामेश्वराकडे जाणाऱ्या मार्गावरच ही भग्न नगरी आहे. आणि तसे पाहिले तर अजूनही मोठी वानरसेना येथे क्रीडा करताना आढळते! ह्याच किष्किंधेत वाली आणि सुग्रीव ह्यांचे युद्ध चालू असताना रामाने वालीचा वध केला. ते युद्ध चालू असताना त्यांनी परस्परांवर फेकलेल्या प्रचंड शिला अजून येथे इतस्ततः पडलेल्या आहेत. हनुमानाच्या निरुपम सेवाधर्माचा येथेच प्रारंभ झाला. ‘हा सीते! हा सीते!’ असा विकल आक्रोश करणाऱ्या रामचंद्राचे पवित्र अश्रू ह्या तुंगभद्रेत पडले असावे. सुग्रीवाच्या व हनुमानाच्या

मदतीने लंकाधीशाचे पारिपत्य करण्याचा घोर निश्चयदेखील रामचंद्राने येथेच केला असावा. नाही तर परकीय आक्रमण थोपविण्याचे सामर्थ्य ह्या इवल्याशा तुंगभद्रेला प्राप्त झाले नसते आणि ह्या भूमीत कृष्णदेवरायासारखे पराक्रमी व निश्चयी राजे निर्माण झाले नसते.

विजयनगरची आठवण झाली की माझे मन भावनाधीन होते. इतिहासाच्या अभ्यासकाच्या शास्त्रीय वृत्तीला मी काहीसा पारखा होतो. माझ्या मनातल्या काही खोल निष्ठा जागृत होतात. त्या नगराच्या वेशीवर मी नंगी तलवार घेऊन उभा राहतो आणि गर्जना करतो, "या! ह्या तलवारीचे बळी व्हायचे असेल तर पुढे या. ह्या देहात प्राण असेपर्यंत ह्या वेशीपलीकडे तुम्ही जाऊ शकणार नाही!"

शाळेत असताना हातातल्या पट्टीची तलवार करून मी असे म्हणत असे, आणि आजही तसेच म्हणावेसे वाटते. तेव्हा असे म्हणण्याची माझी नालायकी मला जाणवत नसे. आता मात्र तीव्रतेने जाणवते आणि मन खट्टू होते.

ह्या वैभवशाली नगरीचे वर्णन अनेक प्रवाश्यांनी करून ठेवलेले आहे. मुसलमान, युरोपियन, सारेच ह्या नगरीच्या वैभवाची प्रशंसा करताना आढळतात. अबदुर रझाक हा प्रवासी म्हणतो की, अवनीतलावर अशी नगरी कोणी नजरेने पाहिलेली नाही आणि अशी दुसरी नगरी असल्याचे ऐकिवात नाही. एकाच्या आत एक अशा सात तटबंद्यांत ही नगरी वसवलेली होती. तिचा दक्षिणोत्तर विस्तार जवळ जवळ सात ते आठ मैल होता आणि पूर्व-पश्चिम विस्तार देखील तितकाच होता. तिच्या बाहेरच्या तीन तटबंद्यांत शेते, बागबगीचे, घरे होती. आणि आतल्या तटबंद्यांत बाजारांची आणि दुकानांची नुसती रीघ लागून राहिली होती. अगदी मध्यभागी राजाचे निवासस्थान होते. नगरीत ठिकठिकाणी बगीचे, देवालये आणि मन प्रसन्न करणारे जलाशय होते. तुंगभद्रेला बांध घालून दगडी पन्हाळातून शहरात आणि विशेषतः राजप्रासादात पाणी खेळवलेले होते. राजवाड्याचे वर्णन करताना तर त्या प्रवाश्याची लेखणी अडली. राजवाडयातील एक दालन तर नुसते हस्तिदंताचे होते आणि त्यातले नक्षीकाम केवळ अप्रतिम होते. राजवाडयातली भांडीकुंडी सगळी सोन्याचांदीची होती. आणि काहींचा आकार नुसता अजस्र होता. राजाच्या खजिन्यात ओतीव सोन्याने भरलेल्या गुहा होत्या म्हणे!

टॅक्सीतून जात असताना, उन्हाच्या झळी, तहानेचा शोश, ड्रायव्हरची बडबड, सारे काही मी क्षणभर विसरलो. इतिहासात पुन्हा पुन्हा वाचलेली त्या नगराची अनेक वर्णने मला आठवत होती. आणि क्षणभर मला असा भास झाला की, ते वैभवशाली नगर अजून तसेच अस्तित्वात आहे, जीवनाने गजबजलेले आहे आणि मी विसाव्या शतकातला प्रवासी, कृष्णदेवरायाला प्रणाम करायला जात आहे.

उत्तरेस तुंगभद्रा, भोवती डोंगर आणि मध्ये विजयनगर अशी रचना असल्याचे मोटरमधून जाताना आमच्या ध्यानात आले. त्या उध्वस्त नगराकडे जाण्याचा मार्ग दुर्गम, खडकाळ आणि चढउतारांचा होता. मार्गात अनेक प्रचंड शिला वेड्यावाकड्या, अस्ताव्यस्त पडल्या होत्या. काही ठिकाणी त्यांचे ढीग होते आणि त्यातल्या काही तर इतक्या निसटत्या आधारावर उभ्या होत्या की, त्या कोसळतील असे सारखे भय वाटत होते. त्यांतल्या काही शिला मोडक्या तटबंदीच्या वगैरे असतील. पण तो एकंदर प्रदेशच असा शिलांनी भरलेला असावा असे मला वाटते.

त्या विखुरलेल्या शिलांच्या राशी पाहून मला वाटले की, कोण्या राक्षसाने ह्या शिला इतस्ततः फेकून देण्याचा खेळ केला असावा. ती भयानक क्रीडा पाहायला मिळाली असती तर बरे झाले असते, असे वेडे कुतूहल मला वाटू लागले.

मला प्रश्न पडला की, अशा दुर्गम, भकास, खडकाळ ठिकाणी एका बलिष्ठ साम्राज्याची राजधानी का बरे वसवली असावी ? शत्रूचा शिरकाव होऊ नये अशी जागा शोधणे अवश्य होते हे कोणालाही पटण्यासारखे होते. सिंहगड, रायगड हे देखील दुर्गम आहेत. पण तेथील वनश्री आणि त्याची ठेवण मनाला प्रसन्न करणारी आणि स्फूर्ती देणारी आहे. विजयनगरच्या आसमंतात मला तसे स्फूर्तिदायक, प्रसन्न असे काहीच आढळले नाही. एक मोठे साम्राज्य उभारण्याची कल्पना ह्या शिलांच्या राशीत सुचावी हे मला अजब वाटले. त्याचा उलगडा मला होईना.

कुठे तटबंदी दिसेल, कुठे पडक्या घरांच्या रांगा दिसतील, अशा अपेक्षेने मी मोटारीतून टकटका चौफेर पाहत होतो. पण तसे काहीच दिसेना. क्वचित कुठे तरी पडके अवशेष दिसत होते. आणि मग काही अर्धवट तर काही

पूर्णपणे उभ्या असलेल्या इमारती, देवालये, मूर्ती वगैरे अंतराअंतरावर दिसू लागल्या. बस्स ! त्या प्रचंड नगराचे अवशेष म्हणून इतकेच शिल्लक राहिले होते. मी इतकेच म्हटले खरे ! पण ते देखील नीटपणे एकदाच पाहायचे तर चार दिवस तेथे काढायला हवेत. ह्यावरून मूळ नगराच्या विस्ताराची कल्पना येईल.

राजाच्या निवासस्थानाचा चौथरा आणि विस्तीर्ण आवारच काय ते आता दृष्टीस पडते. एखादी ढासळलेली भिंतदेखील आता तेथे उभी नाही. कल्पनेने त्याची पुनर्रचना करता येईल इतकेदेखील अवशेष तेथे नाहीत. जिथे प्रवेश मिळण्याचे भाग्य लाभावे म्हणून मोठाले उमराव झटत असतील, तेथे आता चिटपाखरूदेखील जायला तयार नव्हते. जेथे कृष्णदेवरायाचे निर्भर हास्य घुमले, जेथे मोठाल्या सल्लामसलती झाल्या, जेथे नृत्यसंगीताच्या मैफली झडल्या, तेथे भकासपणा प्रेतासारखा पडला होता. का कोण जाणे, पण त्या जागी वावरताना मला चोरट्यासारखे वाटत होते.

राजवाड्याची जरी अशी दशा झाली असली तरी राण्यांच्या निवासस्थानाचे काही अवशेष अजून आहेत. ह्या अंतःपुराला चारी बाजूंनी उंच तटबंदी आहे आणि तटबंदीच्या कोपऱ्यांवर रक्षकांकरिता एक एक मिनार आहे. त्या मिनारांवरून भोवतालचे दृश्य चांगले दिसते. जवळच असणारी एक सुंदर घुमटांची आणि कमानदार दरवाजांची इमारत पाहून आम्ही विचारले, " हा कुठचा महाल ? "

ड्रायव्हर म्हणाला, " छे, हा महाल नाही. हा राजाचा हत्तीखाना आहे."

अशा इमारतीत रहाणाऱ्या त्या हत्तींचे नशीब थोर ह्यात शंका नाही. बहुधा बेटे मधात बुडवलेला चारा खात असावेत.

अंतःपुरात ' कमल महाल ' नावाची मोठी सुबक इमारत अजून शाबूत आहे. कमळाच्या पाकळ्यांसारखा नाजूक लालसर रंग त्या इमारतीचा आहे. कमलदलांचा नाजूकपणा त्या इमारतीच्या रचनेत, कमानीत आणि घुमटात पुन्हा पुन्हा जाणवतो. इमारतीत शिल्पकलेचे विलास नाहीत. पण नुसते रचनेचे सौंदर्य मनाला मोह घालण्यास समर्थ आहे. ज्या नगरीत सारे भव्य, अजस्र आणि शिल्पकृतींनी मढलेले आहे, तेथे ही नाजूक, साधी इमारत आपल्या निराळ्या सौंदर्याने स्मरणात रहाते.

ह्या अंतःपुरापासून थोड्या अंतरावर राजस्त्रियांचे स्नानगृह आहे. स्नानगृहाच्या दगडी भिंती उंच आहेत. त्यामुळे त्या राजस्त्रियांची क्रीडा कोणी चोरून पाहिली असेल असे वाटत नाही. स्नानगृहाच्या मध्यभागी स्नान करण्याचा हौद आहे. भोवती सुंदर नक्षीकाम केलेले सज्जे आहेत. त्या सज्ज्यात बसून आपल्या सख्यांची जलक्रीडा राजस्त्रिया पाहत असतील, पाण्याचे सपकारे एकमेकींवर उडवीत असतील.

किती तरी पाहायचे होते. मिनिटामिनिटाला ड्रायव्हर मोटर थांबवीत होता आणि हे पाहा, ते पाहा, असे सांगत होता. लवकर पाहून घ्या, आणखी पुष्कळ पाहायचे आहे, असे म्हणत होता. आम्ही एक एक ठिकाण फार वेळ पाहातो, असे म्हणत होता. बाकीचे लोक म्हणे मोटरीतून उतरतदेखील नाहीत. मोटरमधून वाकून पाहतात आणि म्हणतात, " पाहिले. चलो आगे ! "

आपण अमके अमके पाहिले असे लोकांना सांगता यावे, एवढाच बहुधा त्यांच्या यात्रेमागचा हेतू असावा !

उशीर होत होता आणि आमची फार धांदल होत होती, त्यात फोटो घेण्याकरिता प्रधान ज्या उड्या मारीत होता त्यामुळे भर पडत होती. निदान तसा भास होत होता. त्या धावपळींत त्याने एका दगडी नंदीवर स्वार होण्याचा मोका सोडला नाही आणि मी अर्थातच त्याचा फोटो घ्यायची संधी दवडली नाही.

वासंतीचे पाय दुखू लागले. त्यामुळे ती मोटरीतून बसूनच " अहाहा ! काय ग्रँड आहे ! " असे साविर्भाव म्हणू लागली.

आम्हांला सगळ्यांनाच तहान लागली होती. पण आता त्या ओसाड नगरीत पाण्याचा घोट मिळणे अशक्य होते. आणि एके काळी तुंगभद्रेतले पाणी तेथे दगडी पन्हाळातून कसे झुळझुळत असे त्याची कल्पना करणे सुखदायक असले तरी त्यामुळे काही आमची तहान भागत नव्हती.

आम्ही आ वासून तेथल्या अप्रतिम शिल्पाकडे पाहत असताना आमचा ड्रायव्हर शांतपणे सरपण गोळा करून मोटरीच्या मागच्या बाजूला भरत होता !

विजयनगरमध्ये अनेक देवालये आहेत आणि सगळी आपापल्या परीने सुंदर आहेत. काहींची बरीच मोडतोड झाली आहे, काही चांगल्या अवस्थेत आहेत. पुष्कळ देवळांतल्या मूर्ती नष्ट झाल्या आहेत. हजार रामस्वामी देवा-

लयात सगळे रामचरित्र कोरलेले आहे. मातंग ऋषींच्या टेकडीवर एक देवालय दिसते. टेकडी कसली, ओक्याबोक्या अणकुचीदार शिलांची रासच ती. उन्हात तापलेल्या आणि तहानेने गळून गेलेल्या आम्हांला त्या टेकडीवर चढण्याइतका उत्साह वाटू शकला नाही. वासंती खालूनच "किती ग्रँड आहे!" असे पुन्हा पुन्हा म्हणू लागली. त्यामुळे जाण्याचा बेत रद्दच झाला.

ह्या टेकडीवर म्हणे मातंग ऋषी तपश्चर्या करीत असत. वाली आणि सुग्रीव ह्यांचे भांडण झाले तेव्हा सुग्रीवाने पळून जाऊन ह्या ठिकाणी आसरा घेतला होता. कारण वालीने एका राक्षसाचा वध करून त्याचे प्रेत तेथे भिरकावून दिले असल्याकारणाने मातंग ऋषींनी चिडून त्याला शाप दिला होता आणि त्यामुळे त्या टेकडीवर येणे वालीला शक्य नव्हते. ह्या टेकडीवर एक देवालय आहे. त्यात काळ्या पाषाणाची परशुरामाची मूर्ती आहे, असे ड्रायव्हर म्हणाला.

का कोण जाणे, वाली आणि रावण ह्या दोघांविषयी मला सहानुभूती वाटते. वाली महापराक्रमी होता. त्याने सुग्रीवाची बायको आपल्या घरात नेली हे खरे, पण ती तेव्हाची पद्धतच होती. वालीला मारल्यावर सुग्रीवाने तेच केले. अशा पराक्रमी वालीला रामाने आडून शरसंधान करून मारावे हा त्याच्या चारित्र्यावरचा मोठा डागच समजला पाहिजे.

येथे एक जमिनीखाली सापडलेले देवालय आहे. नाग पकडताना म्हणे ह्याचा ठावठिकाणा लागला आणि मग त्याचे उत्खनन करण्यात आले. देवालयात खाली उतरून जावे लागले. देवालयाच्या मंडपात वगैरे फिरता येते. पण आतला भाग पाण्याने भरलेलाच असतो. तेथे जिवंत पाण्याचा झरा आहे. मी कडेच्या एका दाराने आत डोकावून पाहिले. आत अंधार होता, आणि पुसट प्रकाशात आत भरून राहिलेले पाणी दिसत होते, त्या दालनाचे खांब पाण्यात उगवल्यासारखे वाटत होते आणि आतले पाणी सावकाशपणे हलले की, पोटातही काहीतरी डुचमळत होते. आत पाय दुमडून नंदी शिवाच्या आज्ञेची वाट पाहत सामोरा बसलेला आहे. भिंतीवर मला एक नाग दिसला. मी जरा चमकलोच. पण ताबडतोब ध्यानात आले की, ती शिल्पाकृती आहे! आत गाभाऱ्यात तर नुसता काळोख दाटला आहे. तेथे प्रवेश होणे कठीणच. तेथल्या वातावरणात अद्भुतता दरवळत होती. मला गुहेतून वाहणाऱ्या नदीतून

तरंगत गेलेल्या सिंदबादची आठवण झाली. आणि वाटले की आपण जर पाण्यावर तरंगत ह्या गाभाऱ्यात प्रवेश केला तर थेट नागलोकात जाऊन पोहोचू आणि तेथे हिऱ्यामाणकाच्या लखलखाटात एका निराळ्या, अद्‌भुत जीवनातील विलासांचा अनुभव घेऊ !

विजयनगरला पाहण्यासारखी दोन महत्त्वाची देवळे म्हणजे एक विठ्ठल-स्वामींचे आणि दुसरे विरूपाक्षाचे.

त्यांतले विठ्ठलस्वामींचे आम्ही आधी पाहिले आणि मला ते अधिक आवडले.

दक्षिणेत विष्णूची देवालये पुष्कळ आहेत. कधी तो अनंतशयनम् असतो, तर कधी रंगनाथ असतो. पण आम्ही मराठे विष्णूला विठोबा ह्या नावाने ओळखतो, विष्णू म्हटल्यावर चटकन आमच्या नजरेसमोर ते ध्यान येते. देवावर माझा विश्वास नाही. पण ह्या विठ्ठलाच्या चरणी तुक्याने जी अभंग-वाणी वाहिली, तिचे आजही उठणारे पडसाद ऐकले की, माझे मन सद्‌गदित होते. सिनेमातदेखील 'झाला महार पंढरीनाथ' असे ऐकले की, हृदय कसे भरून येते, अशा महार होणाऱ्या विठ्ठलाचे देवालय पाहायचे म्हटल्यावर माझे मन उत्सुक झाले होते. त्या देवालयाच्या दर्शनाने ती उत्सुकता निवली. त्याच्या सौंदर्याने हृदय तोषले.

असे म्हणतात की, पंढरीच्या विठोबाकरिता हे देवालय इथल्या राजांनी बांधले. त्यात पंढरीची मूर्ती नेऊन बसवायची असा त्यांचा हेतू. आपल्याकरिता बांधले जाणारे हे नवे देवालय पाहायला देव पंढरीहून आले. देवांनी देवालय पाहिले आणि ते म्हणाले, "हे निवासस्थान फार भव्य आहे, सुंदर आहे, पण मला रुचण्यासारखे हे नाही. माझे पंढरपूरचे साधेसुधे निवासस्थानच मला पसंत पडते. तेथेच मी निवास करीन."

महार होणाऱ्या महाराष्ट्राच्या दैवताने असे बोलावे हेच महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. आणि देव जर विजयनगरला गेले असते, तर त्यांना सुंदर निवासस्थान मिळाले असते खरे, पण मग तुकयाच्या दिव्य भक्तीला देव मुकले असते. आणि हा महाराष्ट्राचा विठोबा तर 'भावाचा भुकेला' म्हणून प्रसिद्ध आहे.

ह्या देवालयाच्या सभोवती दगडी तट आहे आणि त्याच्या तीन बाजूंना सुंदर गोपुरे आहेत. गोपुरे म्हणजे प्रवेशद्वारे. पूर्वी आर्यांच्या गावाच्या भोवती

लाकडी कुंपण असे आणि त्या कुंपणातून चरायला जाणाऱ्या गाईंसाठी एक द्वार असे. ह्या द्वाराला गोपूर म्हणतात. त्या साध्या गोपुरातून दक्षिणेतील देवालयांच्या ह्या भव्य गोपुरांचा विकास झाला. हे गोपूर म्हणजे मोठे दगडी प्रवेशद्वार असते आणि त्या प्रवेशद्वाराच्या वर उंचच उंच, निमुळते होत गेलेले विटांचे बांधकाम असते. ह्या उंच होत गेलेल्या रचनेच्या प्रत्येक मजल्यावर देवादिकांच्या आणि त्यांचे अवतारकार्य दर्शविणाऱ्या अनेक शिल्पाकृती कोरलेल्या असतात. डोंगराच्या उतारावर जसे झाडांचे जंगल माजलेले असते तसे हे शिल्पाकृतीचे जंगलच गोपुराच्या निमुळत्या होत गेलेल्या बाजू भरून टाकते आणि त्याच्या भव्यपणात व रचनेच्या प्रमाणबद्धतेत भर टाकते. देवाच्या दर्शनाला येणारा माणूस त्या उंच आकाशात गेलेल्या रचनेकडे आश्चर्याने व आदराने पाहतो. देवांच्या अवतारकार्याच्या त्या कोरलेल्या दर्शनाने पुनीत झालेली त्याची नजर वर वर जाते. वरच्या आकृती दिसाव्या म्हणून तो डोळे ताणतो. पण सारे अस्पष्ट होऊ लागते. नजरेचे सामर्थ्य संपते, पण परमेश्वराचे अस्तित्व संपत नाही. परमेश्वराच्या गूढतेचा त्याला साक्षात्कार होतो. गोपुराचे निमुळते झालेले टोक ह्या भांबावून सोडणाऱ्या विविधतेतील एकता अधोरेखित करते आणि मग पाहणाऱ्याची नजर अनंत आकाशात नेऊन सोडून देते.

अशा ह्या गोपुराच्या दर्शनाने माणूस विनम्र होतो आणि मग देवालयात प्रवेश करतो. आम्ही पुढे जी गोपुरे पाहिली त्या मानाने विठ्ठलस्वामींच्या देवालयाची गोपुरे लहान होती. पण म्हणून काही त्याचे सौंदर्य उणे नव्हते. मुख्य गोपुरातून आत गेल्यावर तटाच्या कडेकडेला धर्मशाळेच्या स्वरूपाच्या ओवऱ्या आहेत. आणि समोर मोकळ्या प्रांगणात एक सुंदर दगडी रथ आहे. पाहताना असे वाटते की, एकाच प्रचंड शिलेतून हा कोरलेला असावा. पण खरोखर त्याकरिता अनेक शिला वापरण्यात आलेल्या आहेत. त्यांचे सांधे अशा काही सफाईने बसविण्यात आलेले आहेत की, वरवर पाहणाऱ्याच्या नजरेला ते उमगू नयेत. आम्हांला ते उमगले नाहीतच.

ह्या मोडतोड झालेल्या देवालयाच्या चार बाजूंना चार मंडप आहेत आणि मध्यभागी देवालय आहे. ह्या मंडपातील व देवालयातील शिल्पाचे वैपुल्य, सौष्ठव व सौंदर्य पाहून माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसाचेदेखील भान हरपले. हे देवालय नव्हते. हे अनुपम शिल्पाचे एक दाट जंगल होते. एकेका खांबात

इतके अद्‌भुत सौंदर्य असू शकते ह्याची मला तोपर्यंत कल्पनाच नव्हती. किती विविध प्रकारचे खांब होते तेथे! आणि एकेक खांब म्हणजे एकेक काव्य होते. त्या खांबांनी देवालय सावरले आहे, देवालयाच्या रचनेत त्यांचे काही कार्य आहे, हे विसरायला होत होते आणि त्यांच्या सौंदर्यातच गुंगून जायला होत होते. शब्द वाकवताना आमची किती त्रेधा उडते. मग ह्यांनी पाषाणाला कसे वाकवले असेल? आपल्या कल्पना त्यात कशा उमटवल्या असतील?

माणसांचे आणि देवतांचे सारे जीवन ह्या शिल्पात व्यक्त झालेले आहे. ऐहिक जीवनाला, सुखोपभोगांना, पराक्रमाला, कलेच्या धुंदीला ह्या देवालयात (नव्हे, दक्षिणेतल्या कुठल्याच देवालयात) अटकाव नाही. ऐहिक आणि पारमार्थिक ह्यांना वेगळे करणारी कृत्रिम रेषा येथे नाही. परमेश्वराच्या द्वारात सारे मानवी जीवन फुलताना येथे पाहिले आणि धर्माविषयीची माझ्या मनातील अढी कमी झाली. हिंदू धर्माची नजर नेहमी परलोकावर लागलेली, ह्या कल्पनेला धक्का बसला, आणि जीवन स्वच्छंदपणे, उत्साहाने जगणाऱ्या आणि ते पाषाणावर कोरून अमर करू पाहणाऱ्या विजयनगरच्या लोकांविषयी आदर वाटू लागला.

त्या देवालयाचा असा एक कोपरा नव्हता की, ज्यावर शिल्पकारांनी आपल्या कलेचे संस्कार केले नव्हते. सुंदर शिल्पाचे ते वैपुल्य पाहून मन भांबावून जात होते. जणू शिल्पकलेला तेथे महापूर आला होता. जणू परमेश्वराच्या सान्निध्यात ती मुक्त झाली होती. काय बघावे आणि काय बघू नये ते कळत नव्हते.

सिंह आणि हत्ती हे पुन्हा पुन्हा त्या शिल्पाकृतीत दिसत होते. पराक्रमाची, सौंदर्याची आणि भव्यतेची जणू प्रतीकेच असलेले वनराज ह्या पराक्रमी लोकांना प्रिय असावेत ह्यात नवल ते काय? ह्या वनराजांच्या ज्या शिल्पाकृती मी पहिल्याने पाहिल्या त्या सगळ्या नटलेल्या आणि सुशोभित केलेल्या अशा आढळल्या. राजदरबारात वावरलेल्या एखाद्या सेनापतीने आसनस्थ व्हावे तशी सिंहाची बैठक! त्याच्या चेहेऱ्यावर सुसंस्कृत गांभीर्य दिसत होते आणि आपल्या आयाळीला बहुधा त्याने पर्मनंट शेव्ह करून घेतला असावा आणि मग ती पोमेड लावून चापून चोपून बसवली असावी!

ह्या सुशोभित केलेल्या शिल्पाकृती आपल्या परीने सुंदर होत्या. पण पंडित नेहरूंनी दागदागिने घालून हिंडावे, बस्स, तशा त्या दिसत होत्या! ह्या

प्राण्यांच्या वास्तव आकृती पाहायला मी उत्सुक झालो. आणि मला शंका आली की ह्या शिल्पकारांना अशा वास्तव आकृती काढता येत नव्हत्या की काय ? वास्तवातले सौंदर्य दिसू शकत नव्हते की काय ?

पण माझ्या ह्या शंकेला ताबडतोब उत्तर मिळाले. सोंड उभारून उधळलेल्या हत्तीची आकृती मी पाहिली. त्या गजराजाचा मोकाट उधळणारा उन्माद, त्या निर्जीव शिलेवरच्या स्थिर आकृतीत व्यक्त झाला होता आणि मग शिकार करणाऱ्या सिंहाची आकृती पाहिली आणि नजर तोषली.

संतुष्ट होऊन आणि दमून भागून आम्ही बाहेर पडलो. विठ्ठलस्वामींच्या देवालयाचे मी हे जरा विस्ताराने वर्णन केले. इतर देवळेदेखील अशीच सुंदर होती. त्यांतल्या अनेक शिल्पाकृती माझ्या नजरेसमोर अजून तरळत आहेत, स्मृतीत गोंदल्या गेल्या आहेत. नर्तिकांच्या कृश कटिभागातील विविध भाव, मृदंग वाजविणाऱ्या कलाकाराच्या चेहेऱ्यावरील वेहोषी आणि त्याचा ठसका व ढंग, शंख वाजविणाऱ्या माणसाचे फुगलेले गाल—बोटांनी ते दाबावे असा मोह होत होता. लढाया आणि शिकारी. हातातल्या काठीवर रेलून उभा राहिलेला, डोक्यावर घोंगडी घेतलेला गुराखी पोर. मत्स्यकन्या आणि तपश्चर्या करणारे मुनी. वळवळणारे नाग !

विरूपाक्षाचे देवालय हे हंपीतले सर्वांत जुने आणि महत्त्वाचे आहे. अजून ते वापरात आहे. त्याच्यासमोर दुतर्फा दगडी इमारती असलेला एक जुन्या काळचा रस्ता आहे. तेथे म्हणे पूर्वी बाजार होता. तेथल्या इमारती अजून काही अंशी शाबूत आहेत. आता तेथे कोणीच राहत नाही. पण विरूपाक्षाची यात्रा भरली म्हणजे ह्या जुन्या घरांतून यात्रेकरू वास्तव्य करतात. देवालयासमोर दोन प्रचंड लाकडी रथ आहेत. त्यांची भरीव चाकेच माणसाइतकी उंच असावी. विजयनगरच्या साम्राज्याच्या कालात तेथे आलेल्या पेज ( Paes ) ह्या प्रवाशाने ज्या मोठ्या यात्रेचे वर्णन केले आहे, तीच अजूनही चालू आहे, ह्या गोष्टीचे कौतुक वाटते. कालाच्या उतरंडीवर उभ्या राहिलेल्या अनेक पिढ्यांनी संस्कृतीचे हे लोण पुढच्या पिढ्यांच्या हातांत दिले आहे आणि परंपरेच्या ह्या भव्य कमानींनी आपण आपल्या पूर्वजांशी जोडले गेलो आहोत.

देवाच्या दारी क्षुधाशांतीची सोय आहे असे कळताच आमचा विरूपाक्षाविषयीचा आदर द्विगुणित झाला. विजयनगरच्या कालातील एका दगडी

घराच्या अंगणात बसून आम्ही कॉफी प्यालो, ह्याबद्दल आम्हांला स्वतःचे कौतुक वाटले खरे, पण कॉफीला काही चहाची चव आली नाही. चहा अगर कॉफी काही मनुष्य नुसताच पीत नाही. त्याबरोबर उपमा आणि म्हैसूरपाकाच्या वड्या आम्ही खाव्या हे साहजिकच होते. एवढ्यावरच आम्ही थांबलो ह्याचे कारण त्याच्याकडे आणखी काही चांगले नव्हते.

विरूपाक्षाचे देवालय मोठे आहे. त्याच्या भव्य गोपुराची उंची दीडशे फुटांहून अधिक आहे. आत शिल्पकलेचा विपुल विलास आहेच; पण वर चुना फासटून त्या सौंदर्याला अकारण उणेपणा आणला गेला आहे. देवळाच्या आवारात सुग्रीवाचे वंशज पुष्कळ आहेत. त्यांची लीला पाहण्यात आमची थकलेली मने रमली. देवाचे दर्शन घ्यायला गेलो. पण तेथे दर्शनाचे दोन आणे, नारळाचे दोन आणे व आणखी कसले तरी सहा आणे, असा सौदा आम्हांला अडवून जेव्हा पुजारी करू लागला तेव्हा चिडून मी मागे फिरलो. बापडा विरूपाक्ष गंगाधराच्या दर्शनाला मुकला !

ही निरनिराळी स्थळे पाहण्याकरिता मोटरीमधून इकडे तिकडे जात असताना आम्हांला मध्येच पडलेले अवाढव्य दगडी दरवाजे दिसले. प्रचंड दगडी पन्हळ कोणीतरी फेकून दिल्यासारखे, तिरके होऊन पडले होते. मधून मधून दगडी चक्क्या दृष्टीस पडल्या. आणि राजे स्वतःची सुवर्णतुला करीत असत तो तराजू सावरणारी दगडी चौकट दिसली.

मध्येच आम्हांला एक अखंड शिलेचे प्रचंड शिवलिंग दिसले. त्याची उंची दहा फूट तरी असावी. त्याच्यावर अभिषेक करायचा म्हणजे वरच्या मजल्यावर जावे लागते. अशीच एक दुसरी गणपतीची मूर्ती आहे. आपले अगडबंब लोंबणारे पोट गणरायाने पोटाभोवती एक नाग गुंडाळून सावरून धरले आहे. ह्या गणपतीला उपरोधाने कानडीत राईएवढा गणेश म्हणतात. उग्र नरसिंहाची जी मूर्ती तेथे आहे, तिच्या भव्यतेने तर डोळे फिरतात. तिची उंची बावीस फूट आहे म्हणे. ह्या नरसिंहाच्या मस्तकावर सहा तोंडाच्या शेषाने आपली फणा धरली आहे. त्याचे विचकलेले जनावरासारखे तोंड आणि त्याचे बाहेर लोंबणारे डोळे पाहून भीतीच वाटते. त्याची थोडी मोडतोड झाली आहे. आणि पुराणवस्तुखात्याने त्याला एक लोखंडी आधार दिला आहे. वासंती त्याच्या मांडीवर बसली तेव्हा एखाद्या खेळण्यासारखी दिसली. आणि मला वाटले की,

हा चटकन हिला उचलून तोंडात टाकीलदेखील !

संध्याकाळ झाली. सूर्य मावळला. पण आमचे पाहणे संपले नव्हते. विशेषतः चक्रतीर्थ पाहायचे राहिले म्हणून मनाला चुटपुट लागली. तेथे म्हणे तुंगभद्रा मोठे वळण घेते आणि दोन टेकड्यांमधल्या अरुंद फटीतून तिचे पाणी वेगाने वाहत जाते. प्रवाहाच्या वेगाने म्हणे येथे किनाऱ्याच्या दगडात गुहा निर्माण झाल्या आहेत. आमच्या पूर्वजांनी नेहमीच्या पद्धतीप्रमाणे हे तीर्थस्थान ठरवून टाकले आहे. गांधींच्या रक्षेचे विसर्जन येथेही झाले असे समजले.

संधिप्रकाशाचे सारवण त्या भग्न अवशेषांवर पडू लागले आणि ते ठिकाण अधिक भयाण व एकाकी वाटू लागले. विजयनगरच्या साम्राज्याचा जेथे अंत झाला ते स्थल सूर्यनारायण रोज असे संधिप्रकाशाने सारवतो आणि मग त्यावर आकाशातल्या पणत्या तेवत असतात.

काळोख पडू लागला तशा पाकोळ्या फडफडू आणि चित्कारू लागल्या. आणि वाटू लागले की, त्या भग्न अवशेषांतून आता भुतेखेते बाहेर पडतील, आणि चारशे वर्षांपूर्वी विनाशाचे जे भयंकर नाटक त्या नगराच्या रंगभूमीवर झाले ते पुन्हा एकदा साग्रसंगीत करतील. त्या भयानक स्मृतींच्या बंधनातून मुक्त होईपर्यंत ते पुन्हा पुन्हा करणे हेच त्या भूतांचे जीवितकार्य असेल. त्या किंचाळ्या, त्या रक्ताच्या चिळकांड्या, ती कत्तल, ती जाळपोळ, ती लुटालूट–सारे पुन्हा तेथे घडून येईल. ज्वालांच्या लळलळणाऱ्या जिभा माणसांचा आणि वित्ताचा स्वाहाकार करून आकाश चाटू लागतील, तरवारीच्या टोकावर लहान अर्भकाचे ‘ छानसे ते आतडे ’ लोंबू लागेल. किंचाळ्यांच्या चिळकांड्यांनी हवा माखून जाईल. हातांत पहारी घेऊन जे सुंदर दिसेल त्याचा नाश करीत उन्मत्त जेते फिरू लागतील. ज्या देवांच्या भव्य रथाखाली चिरडून मरावे अशी इच्छा शेकडो भाविक मनात बाळगीत असतील त्यांचा कपाळमोक्ष करायला दुसरे शेकडो भाविक आसुरी ईर्षेने धावतील. ज्यांच्या पायाला धूळ लागू नये म्हणून बहुमोल वस्त्रांच्या घड्या घातल्या जात, त्यांची रक्ताने भरलेली शरीरे धुळीने माखतील. ज्यांनी राज्य केले ते हत्तीवर संपत्ति लादून चोरासारखे पळून जातील. मानवी इतिहासातला एक मोठा प्रलय होईल.

पश्चिम तांबडी झाली होती. भूभाग काळवंडला होता आणि आमची मोटर वेगाने त्या अवशेषांपासून दूर जात होती. माझ्या डोक्यातले विचारचक्र गर-

गरत होते. अदृश्यपणे ते दृश्य पाहत माझी कल्पना भिरभिरत होती.

मग थंड वाऱ्याच्या झुळका येऊ लागल्या आणि हॉस्पेटचे दिवे दिसू लागले. आणि पुन्हा जेवण, गाड्या, तिकिटे ह्यांचे विचार मनात डोकावू लागले.

आणि तरी पण पुन्हा चारशे वर्षांपूर्वीच्या त्या लोकांच्या जीवनावरून दृष्टी वळवता येत नव्हती. कसे असतील ते लोक? पराक्रमी!

त्या पराक्रमाच्या विश्वासानेच त्यांनी दगडांच्या त्या दुर्गम प्रदेशात आपली राजधानी वसवली आणि दगडांवर मात करून त्यांतून सौंदर्य खोदले, कोरले, बांधले. कोणाला वाटेल की, परकीय आक्रमणाचा लोंढा अडविणारे हे लोक भीतीने नेहमी शंकित झालेले असतील आणि त्या भीतीच्या छायेत खुरटलेले जीवन जगत असतील. पण त्यांच्या कलाकृतींचे अवशेष निराळी गोष्ट सांगतात. त्यांत पराक्रम आणि आवेश पाय रोवून उभे आहेत, उत्साह फुसांडत आहे. पुन्हा पुन्हा त्यांच्या मंदिरांत जर कुठच्या आकृती दिसत असतील, तर सोंड उभारून एक पाय वर उचलून उधळत आलेल्या हत्तीच्या, सिंहांच्या आणि मागल्या दोन पायांवर उभ्या राहिलेया उमद्या घोड्यांवर तरवार उपसून स्वार झालेल्या सैनिकांच्या. शत्रूंच्या भूमीवर, छातीवरदेखील, त्या उचललेल्या टाचा रोवीत आणि उगारलेल्या खड्गाने त्याला कंठस्नान घालीत हा शिल्पात अमर झालेला विजयनगरचा सैनिक सबंध दक्षिणेत दौडला असेल. पुन्हा पुन्हा तुंगभद्रा ओलांडून शत्रूच्या छातीवर त्याचा घोडा थयथय नाचला असेल.

अजस्र, भव्य असे जीवन जगण्याची त्या लोकांची मनीषा असेल. म्हणूनच त्यांनी अशा अजस्र व भव्य कलाकृती निर्माण केल्या. एखाद्या पर्वताच्या उतारावर वाढणाऱ्या जंगलात ज्या प्रकारची संपन्नता व विपुलता असते, तिची त्यांना हौस असावी. नाही तर ती हौस त्यांच्या कलाकृतीत ओतली गेली नसती. आजची आपली दळभद्री जीवनविमुख वृत्ती त्यांच्यांत खात्रीने नसावी. जीवन ते जगले असावेत. जीवन त्यांनी भोगले असावे. ती अद्‌भुत रतिक्रीडा दगडात अमर झाली आहे.

असे निष्कर्ष काढणे ऐतिहासिक दृष्ट्या धोक्याचे आहे हे मला समजते. एखाद्या कालातील कला आणि त्या कालातील जीवन ह्यांचे संबंध फार गुंता-

गुंतीचे असतात.

पण सांगितले ना ? विजयनगर हे माझे एक स्वप्न होते आणि त्याचे अवशेष पाहून त्याचे रंग आता अधिक गहिरे झाले आहेत.

वि. ..................
नोंद दि. ..................

# १४

## पुस्तकांची दुःखे

**मं. वि. राजाध्यक्ष**

...म्हणजे लेखकांची दुःखे नव्हेत. ती आहेतच. युगानुयुगे त्यांची कर्मकथा आपण ऐकत आलो. त्या व्यथा आणि वेदना आता तोंडवळणी पडल्या. ते रक्त आणि अश्रूंचे रंगीत रसायन आता आंबून गेले. मी बोलत आहे पुस्तकांविषयी : कागद, शाई, पुठ्ठा, डिंक इत्यादी द्रव्यांनी बनलेल्या वस्तूंविषयी : तिचे पितृपद, परमार्थाने, एका (किंवा क्वचित, अनेक) इसमांकडे असेल; पण, म्हणून, त्या पुस्तकाला अलग अस्तित्वच नाही का ? की पित्याची सुखदुःखे तीच अपत्याची ? आनुवंशिकतेचा अतिरेकच आहे यात जरा. इतकी इमानी वारसदारी बरी नव्हे. त्या पुस्तकाचीही यथाकाळ नाळ कापून त्याला निराळे जगू द्यावे; आपल्या पायांवर उभे राहू द्यावे; की जन्मभर अंगावर आवाळू उठल्यासारखे त्याने लेखकाला चिकटून राहायचे, लोंबायचे ? आणि त्याच्या एवढ्यातेवढ्या खोकल्याने याने ठुसठुसायचे ? जन्मभर म्हणजे अर्थातच लेखकाच्या जन्मभर; कारण त्याचा अवतार संपला म्हणून पुस्तकाचा संपत नाही. मग कोठे ते आपल्या जिवाने जगू लागते—निदान बरेचसे. पोरके झाले की त्याला स्वतःची प्रतिष्ठा येते. पण तोपर्यंतचा, म्हणजे ऐन उमेदीतला, परावलंबीपणा वाईटच. एकंदरीने जरा नामुष्कीचाच. हे कोणत्याही स्वाभिमानी पुस्तकाचे मोठे दुःख. मुख्य म्हणजे पुस्तकाला आपले स्वतःचे दुःख असू शकते—त्याचा लेखक अगदी सुखाने तुस्त झाला असला तरीही. ज्या दिवशी हे आपल्याला, विशेषतः लेखकांना, पटेल तो पुस्तकाचा सुदिन!

आणि लेखकाची दुःखे म्हटली की ती शारीरिक नव्हेत असा आपला संकेत. तो खरा नाही; त्याला ती इतरांपेक्षा चार जास्तच. त्याचे सदैव काही तरी दुखत खुपत असते. त्याला हे सोसत नाही; ते बाधते. शिंकेशिंकेने विव्हळतो बापडा. पहिली भूक पथ्यपाण्यातच जिरली तरी दुसरी भूक प्रबळ. पण या

सर्वांविषयी कोणी सहसा लिहीत नाही–अगदी त्याचे खाजगी उणे काढण्यासाठी टपलेला दुसरा लेखक सोडून ! एकंदरीने वेशीवर टांगायची असते ती त्याच्या काळजाची व्याधी. कलावंताचे काळीज म्हणजे जरा लिबलिबीतच; कशानेही हालते, झिरपते आणि दुखावते. बऱ्याचशा साहित्याची ती सार्वजनिक गंगोत्री. निम्म्या कथा आणि पाऊण कविता त्याच तोटीतून आलेल्या असतात. सगळा हुरहुरीचा, आसवांचा आणि उसाशांचा उपसा. पण त्याचा केवढा डंका! त्याला हळवेपणा म्हणायचे—आणि (भाव) भावना वगैरे. खरे म्हणजे हा सगळा बुळेपणा, दुबळेपणा; पण त्याच्यावर शिक्का असतो : ‘ आत्मिक आणि अथवा आंतरिक; जपून हाताळा. ’ लेखकाचा आत्मा हा दुसऱ्यांहून निराळा, खास बनावटीचा असे आपण पाठ केलेले. असेलही बेटा. येथे आपल्याला त्याच्याशी कर्तव्य नाही.

पुस्तकाला दोन्ही तऱ्हेची दुःखे असतात हे मात्र खरे. फक्त त्याला ती बोलून दाखविता येत नाहीत. त्याचा वाचाळपणा दुसऱ्याच्या वतीने अशीलाचे कज्जे प्राणपणाने लढविणाऱ्या फडर्या वकिलाने घरातले घोर अन्याय तोंड दाबून सहन करण्यासारखा अथवा मळकट कपड्यांतल्या परटासारखा आहे. ती दुःखे आपण जाणून घेतली पाहिजेत. ‘ ग्रंथ हे आपले गुरू होत ’ हे सद्वचन असले तरी थोडे व्यवहारात आणावे. हे छापील गुरू कसल्या गोठ्यात खितपत पडतात, त्यांची काय दैना उडते हे पाहिले पांहिजे. शाळामास्तराची लक्तरे नाही का आपण ‘ गुरुजीं’च्या पायघोळ कफनीने झाकू पाहात ? अशा अनेक सोयिस्कर कफन्या आपल्या बासनांत असतात. फार कशाला, पुस्तकाला तोंड भरून ग्रंथ म्हणायचा आणि मग त्याची वास्तपुस्त करायची नाही हे त्यांतलेच. एकंदरीने संस्कृत शब्द सोंग सजवायला चांगले असोत. आपण पुस्तकाला ठीक पुस्तकच म्हणू या !

प्रथम पुस्तकांची शारीरिक दुःखे. खरे म्हणजे ती उघड्या डोळ्यांना दिसावीत; पण नेहमीच दिसतात असे नाही. ती तऱ्हेतऱ्हेची असतात. केवळ मनुष्यप्राण्यानेच निर्माण केलेली नव्हेत, तर खालच्या (समजल्या जाणाऱ्या,) प्राण्यांनीही. आणि सजीव सृष्टीप्रमाणे निर्जीव सृष्टीनेही. एकूण सृष्टीचे पुस्तकांशी जमत नाही म्हणायचे. पुस्तके आपली निराळी ( कलात्मक, आदर्श-वादी वगैरे ) सृष्टी निर्माण करतात या भाबड्या बकव्यामुळे ही तेढ निर्माण

झाली असेल कदाचित! नाही तरी निसर्ग दुबळ्याशी जरा शिरजोर असतोच! माणसाला (किंवा 'मानवाला') उघडा निसर्ग मानवतो, तो त्याच्या भौतिक आणि आध्यात्मिक अशा उभय प्रकृतींना हितावह, हे बऱ्याचशा पुस्तकांचेच ठाशीव तात्पर्य असते—पण पुस्तकांना तो मानवत नाही. ऊन सोसत नाही; वाऱ्याने त्यांची पाठ धरते. धूळ हा निसर्गाचाच भाग; धरतीमातेचा घराघरातून वावरणारा अंश. त्यानेही पुस्तके घुसमटतात. मग पाऊसपाण्याचे काय? त्याने पुस्तकाचा पाहता पाहता लोळागोळा होतो. पण तो सांगूनसवरून तसा झालेला पुरवला. या मुंबईत बाहेर पाऊस पडला (किंवा पडला नाही) तरी माणसाप्रमाणे पुस्तकांची चिकचिक होते. माणूस ती धुऊनपुसून काढतो. पुस्तकाची परवड मात्र तेथे थांबत नाही. त्याला बुरशी चढते; ती पुसण्याचा खटाटोप केला तर पुठ्यावर हिरवट पांढुरके चट्टे उठतात. त्याची सगळीच कळा हरवते, आणि बापडे पुस्तक खंगत जाते. अशी या दमट हवेची कर्तबगारी; निसर्गदेवतेचीच म्हणा. तिला साथ उंदीर, झुरळे, वाळवी व अन्य कृमिकीटकांसारख्या आपल्या निसर्गबांधवांची. यातील प्रत्येक बंधुभगिनीचे वळण आणि तंत्र निराळे असते. उंदराचे काहीसे पेंढारीपणाचे; गरज लागेल तेव्हा 'ब्लिट्झ' पद्धतीचा एकदम हल्ला—पण एकस्थाने, टोळधाड नव्हे. जमेल ते कुरतडून वसूल करून, मागल्या पायी पसार. पुन्हा नामानिराळा. तसा एखादा भुरटा, उपरा, अकुलीन उंदीर सोडून द्या, पण प्रतिष्ठित उंदीर कधी पुस्तकांच्या आसपास वस्तीला राहावयाचा नाही. कुळाबिळाचा अभिमान त्याच्या रोमारोमात भिनलेला असतो; त्यालाही परंपरा आहेच! तेच आपल्या परीने इतर कुळांचेही; आचारधर्म निराळा असेल, पण त्यावरील निष्ठा तेवढीच जाज्वल्य. त्यांचा बारीक अभ्यास एखाद्या संस्कृतिशास्त्र्याने करावयास हवा. झुरळांसारख्या प्राणिशाखात "हे विश्वचि माझे घर"ची व्यापक आणि उदात्त दृष्टी जन्मादारभ्य असावी. झुरळांना कुळाचार पाळायलाही आडोसा चालतो; तेथे ती पितृऋण फेडतात. पुस्तकांच्या बांधणीच्या खाचीत, कपाटांच्या सांध्यांत जेथे कोन घडत असेल तेथे अंडी घालून वंशसातत्य टिकविण्याची ती कोशीस करतात. त्यातही काहीशी "मा फलेषु कदाचन"ची निर्मम, निष्काम वृत्ती असतेच. हे माझे, हे तुझे, अशी झुरळ-भगिनीत चुरस आणि हक्कदारी असेल असे नाही वाटत. पुस्तक नीट झटकले तर अंड्यांची आख्खी रांग

परलोकाची वाट धरते. त्याचा व्यर्थ शोक नाही. पुस्तक विद्वत्तापूर्ण, आणि सरसकट उच्च, (म्हणजे अगदीच 'ग्रंथ') असले तर हे भ्रूणहत्येचे किंवा गर्भहत्येचे पातक टळण्याचा संभव अधिक; कारण त्याला सहसा कोणी हात लावत नाही. पुस्तकांमुळे विद्वान निपजतात हा गौरव; पुस्तकातून पुस्तके निपजतात हा स्वतंत्र बुद्धीच्या दृष्टीने दोष. पण ही निपज लाक्षणिक अर्थाने. अक्षरशः पुस्तकातून प्राणिमात्र निपजावेत हे जरा लाजिरवाणेच. पुस्तकाचे प्रसूतिगृह होऊ नये.

पण उंदीर सोडल्यास, उपर्युक्त प्राणिविशेषांना पुस्तकाचे मरण अभिप्रेत असेल असे वाटत नाही. त्यांच्या खेळात पुस्तकाचा जीव कासावीस होत असेल; पण तो काहीसा अजाणतेपणे. उलट, जाणूनबूजून पुस्तकाला 'लाग-णारी' आणि लागल्यावर त्याचा निर्धाराने अंत पाहणारी, कसर ही पुस्तकाची परम-वैरिणी होय. ही खल-स्त्री पुस्तकाच्या आरपार आणि मागेपुढे जाऊन त्याची चाळण करते. पुन्हा विनयशील; सहसा दृष्टीस पडायची नाही. "कपड्यास, कागदास, भातास, पिठास, तांदुळास वगैरेस खाणाऱ्या कसरीच्या आळ्या भिन्न भिन्न जातींच्या असतात.", असे कोणी एक जीवशास्त्रज्ञ सांगतात. या सर्व आळ्यांची आक्का म्हणजे साहित्यिक आळी असावी—कागदाला लाग-णारी. संस्कृतीला पोशाखी ( अथवा कपड्यापुरती ) असे अहवलेनेने म्हणतात; अन्नधान्य तर तिच्या दृष्टीने कःपदार्थ! पण कागद हे तिचे वाहन. उद्या कागदाचे कारखाने थांबले तर संस्कृती लुळीपांगळी होईल अशी भीती. असा हा संस्कृतीचा आधारस्तंभ पोखरणारी, तिची सगळी गुह्ये जाणणारी जी कसर तिची महती काय वर्णावी? कसरींच्या मंडळात तिचा टेंभा मोठाच असणार. पण काही पुस्तके अशी असतात म्हणे की, त्यांना कसरसुद्धा लागत नाही. ही पुण्याई लेखकाची की कागदाची याबाबत संशोधन झाले पाहिजे.

रोग म्हटले की औषधे आलीच. पुस्तकांसाठी चूर्णे-तेले न निघती तरच आश्चर्य! त्यांनी पुस्तकांचे खरोखरच रक्षण होते तरीही आश्चर्यच! उगाच पुस्तके कसल्या पांढऱ्या भुकटीने माखून निघतात आणि डागळतात. रूप जाते आणि कसले भलते वास येतात. कोऱ्या पुस्तकाला जो छान गंध असतो तो केव्हाच उडून जातो. एरवी धडधाकट असलेली जुनी पुस्तके कित्येकदा उगाच केविलवाणी दिसतात. ती या उडालेल्या वासाच्या आठवणीने का?

अर्थात ही विरूप करणारी वैद्यकी माणसाचीच. रोग पुरवला पण वैद्य आवर असे पुस्तके पुटपुटत असतील. खुद्द वैद्यच रोगापेक्षा जालीम धिंडवडे करतो. गबाळा, बेफिकीर, धसमुसळा वाचक पुस्तकाचे जे हाल करतो त्या मानाने कसर मऊ म्हटली पाहिजे. वास-डागाचेच घ्या. वामकुक्षीसाठी पुस्तक वापरण्याची सवय लागलेली गृहिणी आपल्या डोक्याचा शिक्का आणि वास पुस्तकाला हटकून देते, आणि वाचता वाचता गृहकृत्ये उरकण्याइतकी तिची साहित्यभक्ती असली तर त्या वासा-डागांत विलक्षण वैचित्र्य येते. यजमानीण-बाईच्या वाचनातील पुस्तक निरखून तिने वाढलेल्या पदार्थांची कृती अजमावणाऱ्या चतुर स्त्रिया असतात म्हणे.

पुस्तके धसमुसळेपणाने वापरण्याकडेही स्त्रियांचाच अधिक कल असतो असा माझा अनुभव आहे. पुस्तके दुमडून वाचणे, आपण कोठपर्यंत वाचले आहे हे जरा वेळाने आठवण्याची खात्री नसल्यामुळे पुस्तक उघडून उपडे ठेवणे, अथवा पानाचा कोपरा दुमडणे, अथवा दुसऱ्या कोणी घेऊ नये म्हणून गादी-खाली दडवणे असल्या अपौरुषेय क्लृप्त्यांनी कसल्याही पुस्तकाचा चोळामोळा होतो. पुरुषांप्रमाणे पुस्तकांतही जी अगदीच स्त्रैण असतील ती सोडल्यास इतरांना यात केवढी मानखंडना वाटत असेल. अशी, मुखपृष्ठे फाटलेली-खिळखिळी झालेली बापुडवाणी पुस्तके घरोघर दिसतील...

तसाच बाल हट्टाचा प्रताप. मग पुस्तकाचे नाकडोळे ओरबाडले जातात; अवयव अलग होतात, आणि या चिरफाडीतील चलाखपणाचे आई-बापे भरल्या गळ्याने कौतुक करीत असतात. चांगल्या प्रौढ पुस्तकाची बाहुली होणे ( किंवा बालवाङ्मय होणे ) लाजिरवाणे आहे—त्या पुस्तकाला ! बाळ-लीलांच्या वरच्या इयत्ता आहेतच. आपण साक्षर झाल्याचा साक्षात्कार होताच चिरंजीव, बालवॉशिंग्टनच्या कैफात, पानापानांवर ते हत्यार चालवतात. पुढें कुमारपणाच्या पहिल्या कुतूहलात इतिहासाच्या पुस्तकातील नूरजहाँला मिशी कोरून जहांगीरची सूरत आणण्याची धिटाई येते किंवा सचित्र पौराणिक कथांतील अकार बायकी दिसणारा राम सीतेहून भिन्न नाही हे सिद्ध करण्याचा मोह होतो. ही चित्रकलेची पहिली पावले असतील, पण त्यांचे डाग बिचाऱ्या पुस्तकांच्या उरावर का ?

याला निदान पोरपणाची धिटुकली सबब आहे; पण भल्या निबर माणसाने पुस्तकावर रंगीबेरंगी चिताडकाम करावे म्हणजे काय? आणि तेही आपल्या ज्ञानलालसेचे प्रदर्शन करण्यासाठी. ओळींओळींखाली बटबटीत रेघा मारणे, समासात चमत्कारिक खुणा करणे आणि, कहर म्हणजे, शेरेबाजी करणे. असल्या विकृत विद्वत्तेने पुस्तकांच्या अंगावर काटा उभा राहत असेल. माझे एक अती चिकित्सक स्नेही आहेत. त्यांचा प्रत्येक पुस्तकातील प्रत्येक विधानाशी ठाम मतभेद असतो व ते कटाक्षाने तो बाजूला नमूद करून ठेवतात; परिणामी छापील मजकुराइतकेच त्या हस्तलिखित गिचमिडीचे ओझे पुस्तकाला वागवावे लागते. त्याला दुसरे एखादे नितळ आणि निर्मळ पुस्तक पाहिल्यावर शरमल्यासारखे होत असेल; तोंड फिरवत असेल ते.

तसे म्हटले तर, वाचकाच्या लेखनकर्मासाठी, पुस्तकाच्या आरंभी, व क्वचित शेवटीही, एकदोन पृष्ठे कोरी सोडण्याची दूरदृष्टी दाखवलेली असते. त्यांचा उपयोग पुस्तकावरील मालकी-हक्क पुकारण्याकडे सहसा केला जातो. हा पुकार तऱ्हेतऱ्हेचा असतो. संपूर्ण नाव—कधी नवेपणासाठी मध्यमपदलोपी रूपात; पदव्यांचा, कधी कंसांकित तपशीलांसह, विस्तृत उल्लेख; संपूर्ण पत्ता, कधी घरच्याप्रमाणे बाहेरचाही; पुस्तक केव्हा आणि कोठे विकत घेतले याची नोंद; पुस्तक केव्हा आणि कुठे वाचले याचाही कष्टाळू लेख कोरणारे आत्मतुष्ट वाचक मला माहीत आहेत. आणि कधी नुसतीच सही, कमीजास्त फर्डी, कमीजास्त दुर्वाच्य; विशीतली नखरेल, विशेषतः शाळकरी मुलीची (अथवा तत्सम प्रकृतीच्या मालकीची) अधिक नक्षीदार. यातील काही तपशील असा आहे की तो केव्हा कोरड्या व्यवहारबुद्धीने, केव्हा भपक्यासाठी तर कित्येकदा भावनेच्या तात्पुरत्या उद्रेकाने आलेला असतो. ती भावना बहुधा शाईमागोमाग वाळून गेली तरी तिचा रेंगाळणारा वास काही काळ आठवणीला गुदगुदल्या करीत राहतो. असल्या 'भावनिक' तपशीलाचा एक विशेष दिखाऊ प्रकार म्हणजे आद्याक्षरे अथवा लाडकीं सांकेतिक नावे इत्यादी वापरून लिहिलेली भेटपत्रिका. एका कवितेच्या पुस्तकावर मी पुढील मजकूर पाहिला, तो उदाहरणादाखल : "'ई ला'' बू 'कडून. खोल दडलेल्या झिम्प्रीच्या दाढीसाठी. हिरवी संध्याकाळ ७४१". म्हणजे उगाच वाचणाऱ्याची कल्पना आणि संशय चाळवायचे; आणि बरेचसे वाचक तेवढेच वाचून पाहण्यासाठी पुस्तक घ्यायचे! यात त्या

पुस्तकाला बरे कसे वाटणार? बिचारे निमित्तमात्र होऊन बसते.

अशी आणखी पुस्तकांची किती शारीरिक दुःखे सांगू? माळ्यावर अडगळींत टाकलेली, गंजलेल्या मोडक्या ट्रंकांतून कोंबलेली, केरासारखी-कपाटाखाली सारून ठेवलेली—असल्या पुस्तकांची काय अवस्था असेल? उद्या कसला साहित्यसोहळा उभा राहिला तर याच पुस्तकांविषयी आपण गहिवरून बोलू. हे ढोंग त्यांना अधिक बोचत असेल. पुस्तके रद्दीवाला खुषीने घेत नाही म्हणून; नाही तर त्यांची तशी वासलात केव्हाच लागली असती. अर्थात, जुन्या पुस्तकांचा बाजार आहेच; पण तेथे स्वतःची पुस्तके कोणी फारसा देत नाही. पुस्तकांच्या दुर्दैवाच्या दशावतारांपैकी एक म्हणजे फूटपाथवर उन्हातान्हात 'वे वे आना'च्या समानतेत भलत्याभलत्यांशी भागीदार होणे. तेथे गीतारहस्याशी गुलबकावली सलगी करते आणि रागिणी सगनभाऊ आणि वात्स्यायन यांच्यामध्ये अंग चोरून बसते. हे दुःख म्हटले तर शारीरिक म्हटले तर आंतरिक; उन्हात पानांचे पापड भाजले जात असतात, आणि कुसंगतीमुळे आतून पोळत राहते पुस्तक.

आपल्या अनेक शरीर-व्याधी आणि वैगुण्ये यांना जन्मदाते जबाबदार असतात, तसेच पुस्तकांचेही. त्यांचे खरेखुरे जन्मदाते म्हणजे मुद्रक आणि प्रकाशक आणि त्यांचे साहाय्यक. त्यांच्या घिसाड-करणीने पुस्तकांचे काय होते ते आपण वारंवार पाहतो. बटबटीत छपाई, बेडौल मांडणी, भडक मुखपृष्ठ, विसविशीत बांधणी, असल्या उपाधी घेऊन जे पुस्तक जन्माला आले त्याला सुख कसे लागणार? असले जन्मदाते म्हणजे वैरीच!

पण ही सगळी दुःखे भाग्याने टळली, सुदृढ अंगे लाभली आणि रेखीव रूप, मालक मोठा टापटिपीचा आणि संपन्न मिळाला, तरी पुस्तक सुखी होईलच असे नाही. भौतिक गरजा म्हणजेच सगळे नाही, आत्मिक शांतीसुद्धा हवी, असा गजर होत राहिला आहे तो काय उगाच? पुस्तकालाही 'व्यक्तित्व' असते, त्याची जोपासना झाली पाहिजे, ते फुलले-उंचावले पाहिजे, त्याच्या आध्यात्मिक प्रेरणांना अनिर्बंध वाव हवा, इत्यादी.

या सगळ्या, कानांत भरणाऱ्या, शब्दांचा भावार्थ असा की, दुःखे केवळ देहाची नसतात; आत मनालाही काही गोष्टी खुपतात. मन हा शब्द साधा, अगदीच गद्य, झाला......पण अर्थाला ताठ आहे तो; आणि कामाला बळकट.

मग पुस्तकाच्या मनाचे वैरी कोण? त्याला आतून छळणारे हे छुपे गनीम कोण?

त्यांतील अव्वल गनीम म्हणजे टीकाकार. तसे पाहिले तर टीकाकार या शब्दाचा लौकिक फारसा चांगला नाही. छिद्रान्वेषी, अहंमन्य आणि प्रतिभाशून्य प्राणि अशी त्यांची व्याख्या त्यांच्या टीकाकारांनी सात्त्विक संतापाने वारंवार केलेली आहे. आणि टीका म्हणजे असलेच काही तरी हा साधारण वाचकाचाही विश्वास. त्याला जे चांगले वाटते ते वाईट कसे हे पटवून देते ती टीका असा त्याचा अनुभव. टीकाकाराचे त्याचे मनोमय चित्र असे : मुरलेल्या अग्निमांद्यामुळे तोंडाची रुची गेलेला, निस्तेज डोळ्यांचा ( म्हणून जाड भिंगाचा ) दुर्मुखलेला, थोडाफार विद्वान दिसणारा (थोडाफार) माणूस. उणी काढणे हा जणू त्याचा शरीरधर्मच. तो खळखळून हसणार नाही की आनंदाने नाचणार नाही. थोडक्यात टीकाकार म्हणजे निंदक. असल्या माणसाकडून पुस्तकाला उपजल्यापासूनच भय असते हे पुस्तकांचा ब्रह्मदेवच बोलून चुकला आहे. पण अगदी मनातले सांगायचे म्हणजे मी पुस्तक असतो तर थोडा धीर करून म्हटले असते, " हा निंदक पत्करला, मग तो कितीही दुष्ट, अनुदार आणि बथ्थड असो. लोकांना त्याची रीतभात चांगली ठाऊक आहे. आणि दोष दाखविले म्हणून काही भोके पडत नाहीत. उलट, त्याने चार दोष दाखविले आणि त्यांतला एकच खरा असला तरी ते दुरुस्तीला बरे. पण सांगूनसवरून स्तुती करायला बसलेला सज्जन टीकाकार नको. " असल्या सज्जनांच्या जाती दोन. पहिली नेहमीची पण तुलनेने निरुपद्रवी. नियतकालिकाची पोटभरू पाने भरण्यासाठी पोचट, गुळगुळीत अभिप्राय लिहून हरएक पुस्तकाची एकसाची तारीफ करणारे. पुस्तक न वाचायला त्यांना घाईची लाचार सबब असते. दुसरी जात : सखोल विवरण आणि अचाट रसग्रहण करण्यासाठी हट्टाने मांडी ठोकून बसलेला कलावंत-टीकाकार. हरएक पुस्तकाचे गुह्य आपण जाणतो अशा आविर्भावाने तो त्याची चिरफाड करतो. प्रतिभेचा झटका येऊन लेखक काही लिहून जातो; आपल्या हातून काय घडले हे त्यालाच उमगत नाही; टीकाकाराला मात्र ते स्वच्छ दिसते. लेखकाच्या अंतर्मनाचा नकाशा तो सगळ्या आडवळणासह सराईतपणे काढतो. लेखकाला अंतर्दृष्टी असल्याचा आजवरचा गैरसमज आता दूर झाला. ती टीकाकाराची मिरास. हरपलेले सगळे त्याला

चटकन गवसते, आणि बसल्या जागी. त्या खुळ्या लेखकाला आपले काही हरपले होते हेसुद्धा—टीकाकाराने ते लक्षात आणून देईपर्यंत—कळलेले नसते. त्याने वापरलेल्या शब्दामागील विशाल अर्थ त्यालाच बजावून सांगितला जातो. काय कशाचे प्रतीक हे गणित त्यालाच समजून घ्यावे लागते. ज्या शास्त्रांच्या अस्तित्वाचीही त्याला पुरेशी बातमी नव्हती त्यातील प्रमेयांच्या आधारे आपली लेखनप्रक्रिया घडल्याचे त्याला कळून चुकते. आपण करायला गेलो काय आणि शेवटी झाले काय असे त्याला होत असावे. बरे वाटते—आपण एवढे मोठे आहोत हे कळल्यावर थोडे गरगरायलाही लागते आणि वाईटही वाटते—यात आपली आणि आपल्या लेखनाची कुतरओढ होत आहे असे वाटून. टीकाकाराला प्रतिभेचे अजीर्ण असले—आणि ती चिघळली की तिचा लेखकाला उपद्रव. या दोन प्रतिभांच्या झगड्यात टीकाकाराची सरस ठरते. कवितेपेक्षा तिचे रसग्रहण दसपट गूढ होताच वाचक म्हणतो, " हा टीकाकारच खरोखर दसपट कवी. " ज्या पुस्तकाचे हे असे होते त्याला किती मानखंडना वाटत असेल ? ' मला वाचवा, ' अशीच ते करुणा भाकील.

मग इतर टीकाकार आहेतच. जुन्या पद्धतीचे जडजंबाल घ्या. त्यातील काहींना तुलनात्मक लिहायचे व्यसन जडलेले असते; मूळ पुस्तक बाजूलाच राहते. किंवा आपला तंत्राची मोजमापे पाठ करून ती पुस्तकाला लावणारा टीका-कारागीर; किंवा तुच्छतेच्या एका फटकाऱ्यात पुस्तकाचे कंबरडे मोडणारा उच्च टीकाकार किंवा पुस्तकाऐवजी लेखकाच्या वर्मावर अचूक बोट ठेवणारा मार्मिक किंवा पुस्तक न वाचताच त्याविषयी चुरचुरीत लेख लिहिणारा चलाख लेखणीबहाद्दर—हे व आणखी किती तरी प्रकार आहेत टीकाकारांचे. कधी त्यांतील दोघांतिघांची एखाद्या पुस्तकावरून जुंपते आणि त्यांच्या उमट उखाळ्यापाखाळ्यांना कोणी हुषार संपादक जागा पुरवतो. वाचक ती गरम चर्चा उत्सुकतेने, आदराने, वाचतात; ती कोणत्या पुस्तकावरून पेटली हे त्यांना आठवतेच असे नाही. झुंजणाऱ्या कोंबड्यांवर सगळे लक्ष असते; ते बहुतेक तुरेवाले असतात. मग बघे लोक मोजदाद करतात. कोणाची किती पिसे उपटली गेली याची. ती ज्या दाण्यासाठी, तो कोठे हिरमुसला पडून असतो. अर्थात, तोही तसलाच क्षुद्र पोकळ दाणा असला तर ती पिसे खोवून मिरवील. पण टणक आणि कसदार असला तर दुःखाने पिचेल......

आड-गिऱ्हाइकी विद्वत्तेचे इतरही कु-प्रकार असतात. कोणी त्यांतील उतारे पाठांतरासाठी काढतो; कोणी त्यावर चर्चा घडवितो; तीत पुस्तकांपेक्षा चर्चिकांचेच माहात्म्य अधिक ठसते. कोणी त्याचे अन्य तऱ्हेने पाट काढतो. एकूण चांगल्या पुस्तकाचे जिणे बरे नव्हे हेच खरे.

चांगल्या पुस्तकाचे कौतुक चुकीच्या कारणासाठी होणे हीसुद्धा खंत वाटण्यासारखीच गोष्ट नव्हे का? "विवाहप्रसंगी भेट देण्यालायक" अशी आपली जाहिरात झाल्याचे समजले, तर कोणतेही स्वाभिमानी पुस्तक शरमेने मान खाली घालील. भल्याभल्या पुस्तकांचे असे झालेले आहे. तेच पारदर्शक वेष्टनाआडून चिथावणाऱ्या मुखपृष्ठावरील बहुरंगी बाईच्या आमिषाने खप वाढल्याचे कळले तर. पण बाजारात बसलेल्या प्रकाशकाला आणि लेखकाला त्याचे काय होय? पुस्तक ही विक्रीची वस्तू एवढेच ते जाणतात, मग त्याच्या आत उदात्त विचारांचा कितीही खच पडलेला असो! कोण जाणे! फारच चिकित्सा केली तर कदाचित असे दिसायचे की टीकाकाराच्या खालोखाल पुस्तकाचा वैरी म्हणजे याचा लेखक! तो हपापलेला असतो पैशाला, कीर्तीला; आणि त्या हपापाच्या आवेगात पुस्तके जन्माला घालतो. पाने भरण्यासाठी मजकूर फुगवतो. 'संग्रह' पुरा व्हावा म्हणून लेख पिळून काढतो. खूपखूप शब्द भरतो. असली पोटफुगी पुस्तके जन्मभर दुबळी राहतात. लेखक मात्र माजतो. हा 'शब्दोदरा'चा विकार जुनाच आहे. पण नव्यात तो नव्या ढंगाने आहे, इतकेच.

पण जोपर्यंत प्रत्येक पुस्तकाला स्वतंत्र अस्तित्व आहे, व्यक्तित्व आहे... आणि ते त्याच्या पोटभरू, शब्दबाज, सोंगाड्या लेखकापेक्षा अलग आहे हे आपण ओळखणार नाही तोपर्यंत पुस्तके अशीच झुरणार, सुकणार आणि तळमळणार...आणि आपण असेच साहित्य आणि साहित्यिक यांविषयी पोकळ बडबड करणार....

पुस्तकाचा बचाव करायचा तो नुसता झुरळ-कसरीपासून नव्हे. ते दुखणे बरे करता येईल; करता आले नाही तर सोसता येईल. पण वरून आश्रयदात्याचा आणि कसला कसला आव आणणारे हे 'उच्च' वैरी नकोत. त्यांच्यापासून ताप होतो त्यावर उतारा नाही. तो असह्य असला तरी मुकेपणाने सोसायचा, आणि वर हसून प्रसंग साजरा करायचा. अशी पुस्तकांची कर्मकथा.

१५

# मी नाही विसरलो

पु. ल. देशपांडे

लहानपणी काही काही शब्द विलक्षण कुतूहल जागवतात. प्राथमिक वर्गात ' देवा तुझिया चरणी नमितो– अंतऽऽस्करणी तुज आठवितो। ' ह्या कोण्या अनामिकाच्या, शाळाखात्याने मंजूर केलेल्या कवितेनंतर, ' उमाळ्यावरी येतसे सूर्य जेव्हा। नभी होतसे चंद्र निस्तेज तेव्हा॥ तुझे चंद्रराया सरे राज्य आता। प्रतापी महाराज हा सूर्य येता॥ ' अशी एक कविता पाठ करावी लागत असे.

वास्तविक चंद्रमौली उदाराने अत्यंत औदार्याने गंगेच्या जोडीला डोक्यावर चंद्रालाही पोट-भाडेकरू ठेवून, त्याला भलतेच स्थान दिले आहे. त्या भोला-नाथानंतर समस्त कविजनांनी चंद्राला अक्षरशः डोक्यावर घेतले आहे. ( आणि इतरांचे डोकेही उठवले आहे ! ) परंतु हा सरकारी शाळाखात्याने मंजूर केलेला असा एक कवी निघाला की, त्याने काही कारण नसताना सूर्याची नेमणूक झाल्यावर चंद्राला निष्कारण हिणवून ठेवले. सरकारी शाळाखात्यात त्या वेळी असल्या मंजुरीलायक कविता कोण लिहीत असेल देव जाणे ! त्या तिचाऱ्या श्रेष्ठ कलावंतांनी भारतीय संस्कृतीच्या करून सवरून नामानिराळे राहण्याच्या परंपरेला अनुसरून, अजंठा-वेरूळच्या कलावंतांप्रमाणे कवितेखाली आपले नावही दिले नाही—! ' वाहवा वाहवा चेंडू हा ' आणि—' भो पंचम् '—ही हातवारे करून म्हणायची काव्ये लिहिणाऱ्या ' मिस् मेरी भोर 'चे नाव सोडल्यास, त्या वेळी निदान मराठी चौथीपर्यंत तरी एकाही कवीने अगर धडे लिहिणाऱ्याने कुठल्या तरी धड्याखालचे ' जयपाळ ' आणि ' कीर्तने ' ( चू. भू. द्या. घ्या. ) ही नावे सोडून स्वतःचे नाव गाव कधी दिले नाही. ' मिस् मेरी भोर ' हा देखील कवितेतलाच एक भाग आहे, असे त्या वेळी वाटे. ' हा आला हा धरिला–' पासून " मिस् मेरी भोर " पर्यंत कविता आहे

असा प्रामाणिक समज होता. पुढे भारतीय संस्कृतीच्या अनामिकतेशीं परिचय झाल्यावर ही मेरी आपली नसावी, म्हणून तिने नाव घातले असावे, असे स्वतःचे समाधान करून घेतले. परंतु पुढे केव्हातरी मिस् मेरी भोर ही गोरीभोर नसून काळीभोर होती असे कळल्यावर थोडे दुःख झाले. मुद्दा मात्र ह्यातला कुठलाच नाही. मुद्दा आहे काही अविस्मरणीय शब्दांचा !

'देवा तुझिया चरणी नमितो'—बद्दल फारसे कुतूहल नव्हते. चार ओळींची कविता अंतःकरणाचा ठाव नाही घेऊ शकली. पण 'उमाठ्यावरी येतसे सूर्य जेव्हा,' तेव्हा मात्र डोळ्यांपुढे चित्र उभे राहिले आणि पहिली ठेच लागली ती उमाठ्यावर ! —

आयुष्यात हा 'उमाठा' त्या वेळीं जो आला त्यानंतर पुन्हा कधीच भेटला नाही.

माझ्या बालपणी सूर्य यायचा तो गावदेवीच्या पलीकडल्या इमारतींच्या छपरावरून, त्यामुळे उमाठा हे प्रकरण काय आहे, याची उगीच हुरहूर लागून राहिली होती ! त्यानंतर डोळ्याखालून लाखो शब्द गेले पण 'उमाठा' काही पुन्हा भेटला नाही. चंद्राला हिणवण्याचे कारण कळले नाही. ह्याचे बालपणी दुःख नव्हते. पण हा उमाठा कुठं असतो, हे मात्र कित्येक वर्षे कळले नव्हते, त्यानंतर वाङ्मयात उमाळे आले, इतिहासात उमराठे आले, उंबरठेही ओलांडले, पण इन्फंटीनंतर किंवा कदाचित पहिली नंतर 'उमाठा' जो एकदाचा नाहीसा झाला तो पुन्हा भेटला नाही. पण मी उमाठ्याला विसरू शकलो नाही. विसरणार नाही.

उमाठ्यासारखीच 'सज्जन' नावाच्या एका शब्दाने अशीच हुरहूर लावली होती. ह्याच उमाठ्यावर सूर्य आल्यानंतर, 'कोल्हे तसे चोर वनी' दडत असत आणि मग 'कामे करूं सज्जन हे निघाले !' राणीच्या बागेत कोल्हा पाहिला होता. 'करावे तसे भरावे'मध्ये विहिरीच्या काठावर बसलेले पिन्या आणि काळ्या हे चोरही पाहून परिचित झाले. परंतु कामे करू निघणारे 'सज्जन' काही आढळत नव्हते. कित्येक दिवस सकाळी उठल्याबरोबर 'सज्जन' पाहावा म्हणून चाळींच्या कठड्यापाशी मी उभा असे. पण रस्त्यातून पेपरवाले, दूधवाले भय्ये, किंवा सकाळच्या वेळी विरुद्ध दिशेला निघालेली शेजारची नारूचे बाबा, रेगेकाका, अण्णा देव वगैरे मंडळी दिसायची. त्यांना सज्जन

म्हणवत नसे. सज्जनाची मूर्ती डोळ्यांपुढे उभी राह्यची ती कोल्हे आणि चोर वनात दडल्यावर कपाळाला गंध लावून, रुमाल बांधलेल्या, लांब डगला घातलेल्या जंगलातून चाललेल्या माणसाची! तसला 'सज्जन' अजूनही काही सापडत नाही त्यामुळे 'मना सज्जना भक्तिपंथेची जावे,' हा श्लोक पहिल्यांदा पाठ करायला घेतला, तेव्हा हा 'मना' नावाचा सज्जन कामे करू निघालेल्या सज्जनांच्या कुटुंबातला असावा, असे उगीचच वाटले!

असाच आणखी एक शब्द कित्येक वर्षे भेटला नाही. 'परोपकारी संभूची' आठवण बरीच मंडळी विसरली असतील. पण मी नाही विसरलो.

कारण तो संभू 'विरळा' होता. हा 'विरळा' आता फारच विरळा होत चाललेला आहे. आता 'विरळा' येतो तो 'क्वचित्' होऊन! पण 'विरळ्या'ची मजा क्वचितला क्वचितच येते! कवीमधी भेटलाच तर संभूची आठवण देऊन जातो. डाळे कुरमुरे आणि उसाचा रस आणणारा भडभुंजाचा रामू (बहुतेक रामू) जसा डाळे कुरमुरे किंवा उसाचा रस दिसला की माझी स्मृती चाळवून जातो, तसाच हा संभू! जुन्या शब्दासारखी ही काही जुनी मंडळीदेखील हुरहूर लावून गेली आहेत.

"काका उठा, दार उघडा हा रामा आला..." ह्या धड्यात काकाला उठवणाऱ्या ह्या पुतण्याचे नाव काय असेल याची तो धडा वाचल्या दिवसापासून मला रुखरुख लागून राहिली आहे. सामान्यतः जुन्या एकत्र कुटुंबात पहाटे पोरांना उठवण्याचे कार्य वडील मंडळी करायची. पण 'हा रामा आल्यानंतर' देखील डाराडूर झोपून राहिलेले 'काका' आणि त्यांना 'उठा—दार उघडा' अशी 'ऑर्डर' देणारा हा पुतण्या भलताच धीट वाटायचा! पुतण्याचे नाव आणि पत्ता गुलदस्तात ठेवून लिहिलेली ही जुनी नवकथा धूसर वातावरण ठेवण्याच्या बाबतीत 'आद्य' ठरावी! 'काका उठा!'—ह्या वाक्याने ओसरीवर घोरत पडलेले काका आणि त्यांचे पांघरूण ओढणारा पुतण्या ह[illegible] प्रतिमा डोळ्यांपुढे येतात.

तसाच तो पाटावर बसलेला मुरलीधर. अजूनही मुरलीधर नावाचा कोणीही इसम भेटला की, दुधाची वाटी आणणारी सगुणा नावाची त्याला बहीणही असावी असे आपले उगीचच वाटते! वाङ्मयाचा चिरकालीन परिणाम राहतो म्हणतात तो हाच असावा. अशीच दुसरी बहीण—भावंडे मनाला चटका लावून

गेली ती ' मोरू आणि काशी ! ' दसऱ्याला आपट्याच्या पानाबरोबर सायंकाळी सोने लुटून आलेल्या मोरूची आठवण येते. भावबंधनांतला अंगभर सोने चढवून अलेला मोरू प्रथम पाहिला तेव्हां मी ह्या सोने लुटणाऱ्याला मोरूच्या आठवणीने गहिवरलो होतो. आणि त्याला दारी येऊन ओवाळणारी काशी !— देशमुखांच्या घरी सकाळीच सुरू झालेला चौघडा. आणि हातपाय धुऊन देवाच्या पाया पडायला लावणारा मोरूचा बाप ! थोडक्यात, शरद्बाबू, हरिभाऊ यांच्यासारख्यांनी निर्माण केलेल्या खूप व्यक्तींचा परिचय झाला. पण मोरू, काशी, मुरलीधर, सगुणा, मोरूचा बाप, परोपकारी संभू , काळ्या आणि पिऱ्या हे अनुक्रमे बुडून आणि मिठाई खाऊन मेलेले चोर, शहर पाहण्यासाठी आलेले होनप्पा आणि सातप्पा हे कोष्टी, रामा धार काढायला आला तरी घोरत पडलेले काका, ह्यांची सृष्टि शंकरमामंजी, श्रीकांत, गणपतराव, यशवंतराव, भावानंद, वंदना, विप्रदास, या साऱ्याहूनही मनात अधिक पक्के ठाण मांडून बसली आहे.

ही माणसे काय किंवा ते शब्द काय, डोळ्यांपुढे अजून मूर्त होऊन येतात.

माझ्या लेखी मोरूची शेंडी बनातीच्या टोपीतून बाहेर आली आहे... ओवाळणाऱ्या काशीचे नाक टोचून काडी घातली आहे आणि तिला नाकपुडीवर लालसर पुळी आली आहे. संभूने धोतराचा काचा मारून पायात कोकणी वहाण घातली आहे. मुरलीधराच्या कानात भिकबाळी आहे आणि सगुणा दुधाची वाटी आणताना, बेंबीजवळ परकर खोचून चालत येते आहे. पिऱ्या आणि काळ्या हे दोन चोर चोरीचा धंदा करण्यापूर्वी आगगाडीच्या इंजिनात कोळसे घालणारे फायरमन असावेत आणि मोरूचा बाप चकणा असावा असे त्या वेळी जे मी ठरवले होते, त्यात अजूनही बदल होऊं शकत नाही ! शाळेतल्या पोरांना लाकडाच्या मोळ्या आणायला लावणारा सांदीपनी आम्हांला विड्या आणायला सांगणाऱ्या छत्रेमास्तरांसारखा मला अद्यापि वाटतो. सर्वांचे चेहरे-मोहरे पक्के आहेत.

मी खरा चोर पाहिला त्यावेळी आठनऊ वर्षांचा होतो. बेड्या घालून एक चोर पोलिसांनी रस्त्यातून चालवला होता आणि मधले बोट धरून वडलांनी मला रस्त्यातून चालवले होते. त्या चोराने माझी स्वप्नसृष्टी पार ढासळून

टकली होती. चोर हा काळाच असला पाहीजे असा मी माझ्या मनाशी निर्णय केला होता. परंतु मी प्रथम पाहिलेला चोर पोलिसापेक्षा गोरा होता त्यामुळे पोलिसाने चौकीवर वर्दी द्यायला आलेल्या मालकालाच चोर म्हणून पकडले असावे, असे वाटून मी खिन्न झालो होतो! अजूनही ' असुनी खास मालक घरचा म्हणति चोर त्याला... ' ही ओळ ऐकली की मला तो गोरा चोर आणि काळा पोलिस आठवतो.

अशी स्वप्ने भंग पावण्याचे पाप चोराप्रमाणे डिपोटीनेही एकदा स्वतःच्या माथी घेतले आहे. ' दिपोटी ' हा उंच आणि लठ्ठ असतो आणि तो पगडी आणि फुलबूट घालतो ह्या व्याख्येत, मी पाहिलेला पहिला ' दिपोटी ' बसला नाही. तो नुसतीच काळीगोल टोपी घालून आला होता. आणि मास्तरांनी आम्हाला फसवले असावे, असे मला राहून राहून वाटले होते. एकदा मनात मांडलेल्या चित्रांची लगोरी पडली की पडली. ती पुन्हा उभी करणे मुष्किल होते. कारण त्यानंतर बऱ्याच वेळा दिपोटी आले. पगडी-फूलबूट घातलेले दिपोटी देखील आले. पण दिपोटी आणि चोर कसाही असू शकतो हे सत्य, ती लगोरी एकदा उधळून गेले ते गेलेच.

प्रत्येक विषय असा एक निरनिराळ्या जातीचे ठसे घेऊन येत असे.

काम–काळ–वेगात मजुरांची गणिते असायची. सगळ्या मजुरांना अ, ब किंवा क अशी एकाक्षरी नावेच असतात, असा माझा दृढ समज त्या गणितांनी करून दिला होता. अ हा मजूर सद्‌गुणी असायचा, ब थोडासा बावळट, धांदरट आणि क हा लुच्चा हे समीकरण मनात पक्के होते. मराठी शाळेतून इंग्रजी शाळेत शिरण्याच्या अवधीत उपनगरात आमचे घर बांधायला सुरुवात झाली आणि काळ-काम-वेगातले गोखल्यांच्या गणितात वस्ती करून राहिलेले मजूर प्रत्यक्षात पाहण्याचा प्रसंग आला, तेव्हा त्यांतले ' अ ' मजूर कुठले, ' ब ' मजूर कुठले, आणि ' क ' कुठले असतील, याचे अंदाज घेत मी माझ्या नव्या घराचे बांधकाम पाहायला जाऊ लागलो. बेडरूम-प्लिंथ आणि व्हरांडा ( हा शब्द मोठी माणसे बायकांच्या देखत कसा म्हणतात याचे मला कुतूहल होते! ) हे शब्द मी फार लहानपणी शिकलो. शेवटपर्यंत मला ' अ ' मजूर व ' ब ' मजूर किंवा ' क ' मजूर आढळले नाहीत. भीमण्णा नावाचा एक काटकोळा, काळारोम कामाठी मजूर मला आठवतो. माझ्या

' अ ' मजुराच्या चित्राशी त्याचे रूप जुळणारे होते. परंतु त्याचे नाव ' अ ' नसून भीमण्णा आहे हे मला कळले, तेव्हा मला उगीचच खट्टू झाल्यासारखे वाटले.

भूगोलाने संस्थाने पिवळी असतात असे शिकविले होते. साहेब लाल असल्यामुळे त्याचा मुलूख लाल असावा, ही पक्की समजूत होती. परंतु माझ्या पाहण्यात पहिले संस्थान आले ते कोल्हापूर. वयाच्या सातव्या किंवा आठव्या वर्षी मी कोल्हापूरला गेलो. आणि तिथली माती-रस्ते-इमारती-राजवाडा-कुठे कुठे म्हणून मला पिवळा रंग आढळला नाही. भूगोलावरचा माझा विश्वास उडाला! इतिहासात युद्ध चालू असेपर्यंत मी आनंदात असे. विशेषतः राक्षसतागडीची लढाई कोणाकोणांत झाली हे मला कधीच आठवले नसूनही ती लढाई ' राक्षसतागडी ' ह्या नावामुळे स्मरणात राहिली. आजमितीलाही मी आठवून पाहिले तरी राक्षसतागडीची लढाई कोणी केली हे मला स्मरत नाही. परंतु राक्षस आणि तागडी ही परस्परांशी अजीबात संबंध न येणारी मंडळी एकत्र कशी आली, ह्या विचारामुळे ते नाव डोक्यात राहीले.

खर्ड्याची लढाई, डभोई, प्लासी, वसई वगैरे गावे ' काय कोठे कशाविषयी प्रसिद्ध ' ह्या प्रश्नात हटकून यायची.

लढायांशी आपले भांडण नव्हते. पण ' तह ' हा शब्द मात्र अजीबात न आवडणारा. ' तह ' आला की कलमे आली. ' तहाची कलमे ' हा इतिहासातला एक कमालीचा तापदायक भाग. युद्ध परवडे पण ' तह ' नको वाटे! युद्धात मौज होती, तहात ' अभ्यास ' यायचा. अजूनदेखील ' तह ' म्हटले की भीती वाटते. हरलेल्या पक्षाने ' तैनाती फौज ' ठेवण्याचे आणि कुणीतरी कुणाला तरी मुलूख तोडून देण्याचे त्यांत कबूल केलेले असायचे. ' मुलूख तोडून दिला ' हा वाक्यप्रयोग आला की फौजेतले हरलेले भिडू भाले-तरवारी टाकून निमूटपणे हातात फावडी, कुदळी, कुऱ्हाडी घेऊन मुलूख तोडायच्या कामाला लागले आहेत, हे दृश्य अजून डोळ्यांपुढून हलत नाही. ' चौथाई आणि सरदेशमुखी वसूल करायचा हक्क ' देखील इकडून तिकडे जायचा! ही चौथाई सरदेशमुखीच्या जोडी जोडीनेच का जायची देव जाणे! कुणी कुणाला नुसतीच चौथाई दिल्याचे आठवत नाही. किंवा "तूर्त सरदेशमुखी घ्या चौथाईचे पुढल्या लढाईच्या वेळी पाहू." असे म्हटल्याचे स्मरत नाही! ह्या

तहाच्या ' वाटाघाटी ' नावाचा प्रकार होता; ह्या कशा होत असतील हेही एक कुतूहल होते. ते मात्र अजून आहे. दिल्लीला बडे पाहुणे आंतरराष्ट्रीय पातळीवर कशा चर्चा करतात हे देखील मला अजून सतावणारे कोडे आहे. समोर फुलदाण्या आणि सात आठ चित्रविचित्र पदार्थांनी भरलेली काचपात्रे ठेवून मंडळी आंतरराष्ट्रीय पातळीवर बासुंदीचा भुरका कसा मारीत असतील, हे एकदा ' याचि देहि याचि डोळा ' पाहिल्याशिवाय माझा शेवटचा दीस गोड होणार नाही !

भूगोलाच्या पुस्तकात ' व्यापारी वारे ' नावाचा प्रकार होता. हे बाणा-बाणांनी नकाशात दाखवलेले असत. ते नेमके केव्हा सुरू होतात हे आता मला आठवतात नाही. किंबहुना व्यापारी देखील दुकानदाराहून निराळा दिसणारा प्राणी असावा असा माझा समज होता, परंतु व्यापारी वाऱ्यांचे हे बाण आकाशात कधीतरी पाहायला मिळावेत, अशी एक बालपणी फार इच्छा होती. ती अजून तृप्त झाली नाही. तीच गोष्ट विषुववृत्ताच्या पट्ट्याची ! हा पट्टा एवढ्या मोठ्या पृथ्वीच्या पोटावरून ओढायचा खटाटोप करणारा कोण बरे हा महाभाग असेल त्याच्या चिंतेने मी बरीच वर्षे हैराण झालो होतो. आकाशातले सप्तर्षी मी प्रथम पाहिले तेव्हा त्यांपैकी एकाही ऋषीची दाढी न दिसल्यामुळे आपली काहीतरी फसवणूक करण्यात येत आहे, ही माझी ठाम समजूत होती. ' सप्तऋषींमध्ये सती बैसलीसे अरुंधती—लाडक्या ह्या आजीसंगे झिम्मा खेळू ये—' ही ओळ पाठ झाल्यावर अरुंधती स्वतःच्या समोर लहानशी बुरडीबुट्टी घेऊन कापूस पिंजण्याच्या धनुकलीने वातीसाठी कापूस पिंजत असावी, हे एकमेव दृश्य कित्येक वर्षे मी डोळ्यांपुढे बाळगून होतो. ह्याच कवितेतली एक ओळ मात्र मला अजिबात आवडत नसे. ' आकाशिंच्या ताऱ्यांसंगे झिम्मा खेळूये ! ' ही कविता लिहिणाऱ्या कवीने ताऱ्यांना ' शिंच्या ' का म्हटले हे मला कळूच शकले नव्हते ! ' आकाशिंच्या ' मधली ' आका ' आणि ' शिंच्या ' ह्या अक्षरांच्या गैर विभागणीतून हा गोंधळ झाला, हे कळायला मला फार दिवस लागले. असले काही शब्द वाचून मला थोडेसे जागच्या जागी लाजल्यासारखे होत असे. विशेषतः शिवाजीच्या तलवारीचे नाव ' भवानी ' किंवा तानाजीच्या घोरपडीचे नाव यशवंती हे मला जितके प्रिय होते तितकेच अर्जुनाच्या धनुष्याचे नाव वाचताना आपल्याला कुणी पाहिले

नाही ना, अशी भीतीदेखील वाटायची! संत मंडळीत रामदास हा अत्यंत प्रिय. कारण त्याने औरंगजेबाला 'बुडाला औरंग्या पापी' म्हणायचे श्रेष्ठ धारिष्ट जीवें धरले होते! रामदास शिवाजीमहाराजांना गुपचुप युक्त्या सुचवून जात होते, असा एक दृढ विश्वास होता. औरंगजेबाला 'औरंग्या' म्हणणाऱ्या ह्या समर्थांबद्दल भयंकर आदर वाटायचा. फक्त इतक्या समर्थ माणसाला 'कुबडी' कशाला लागते हे कळत नसे! पुढे माझ्या वर्गातल्या एका मित्राने त्या कुबडीत सुरा लपवलेला असे, हे गुह्य मला सांगितले तेव्हापासून तर 'असा चतुर पुरुष होणे नाही' असे मला वाटू लागले. बोहले हा शब्द मी प्रथम समर्थांच्या मनाच्या श्लोकाच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत वाचला. बोहोल्यावरून समर्थ पळाले, ह्या घटनेचा मनावर इतका काही परिणाम होता की कुठल्याही लग्नात बोहोले पाहिले की, समर्थांची आठवण व्हायची! ह्या महातेजस्वी ब्रह्मचाऱ्याची आठवण बोहोल्यापाशी निगडित व्हावी ही घटना योग्य नाही हे आज पटते. परंतु केवळ त्या शब्दाने केलेली ती किमया आहे.

आज कित्येक शब्द विस्मृतीच्या पडद्याआड गेले. जुन्या पगड्या जशा गेल्या तसे शब्द गेले. आता पूर्वीसारख्या अबला 'गर्तेत' कुठे पडतात? गर्ता पाहण्याची इच्छा राहून गेली. 'हरहर' 'अहह' वगैरे भारदस्त मंडळी आता चुकूनदेखील भेटत नाहीत. माणसाला हल्ली 'आनंद' होतो, परंतु 'संतोष' झाल्याचे आढळत नाही. 'इकडील सर्वत्रांनी क्षेम' असायचे सोडूनच दिले आहे. 'त्रिकालचरणी' मस्तक ठेवायला कुणाचे डोके ठिकाणावरच नाही! 'बालके राजारामाचा शि. सा. न.' हे वाचून राजाराम हे चांगले पंचेचाळीस वर्षांचे 'बालक' आहे हे पटत नसे. पण आता बालके राहिली आहेत कुठे? सर्व मंडळी एकदम 'प्रिय' झाली!

परवा कित्येक वर्षांनी एका विद्वानांच्या लेखात मला 'एकसमयावच्छेदेकरून' आढळला आणि जुना मित्र भेटल्याचा आनंद झाला. त्या वाक्यावर मी घोटाळलो. 'एकसमयावच्छेदेकरून'ला कडकडून भेटलो. हा भारदस्त गृहस्थ आता पूर्वीसारखा नाही भेटत. 'क्वचित', 'गमत', 'अजि', 'वर्तले' वगैरे नाटकी मंडळीचे दर्शनदेखील जुन्या स्त्रीपार्टी नटांच्या दर्शनाइतकेच दुर्मिळ झाले आहे! जुन्या नाटकांच्या पदातून ही मंडळी कंपन्यांच्या बिऱ्हाडी सदैव वस्तीला असायची. ऑथरच्या हाकेला 'ओ' देऊन यायची आणि

नटाच्या गळ्यापाशी लागायची. नाटक मंडळ्यांनी ऑर्गन-तबले उचलले आणि 'खचित', 'गमत' वगैरे उपेक्षेच्या अंधारात गेले. 'गम'ण्याने तर नाटकमंडळ्यांत कित्येक वर्षे मुक्काम ठेवला होता. मज गमे ऐसा जनक तो, गमते सदा मजला, गमली मना निज सावली, गमे सुखे आजि, (ही ऱ्हस्व 'आजी' देखील नाटकांतून आजि राधाबाला, आजि टाकु गडे धनवेषा, अशी खूप वेळा डोकावून जायची!) मम आत्मा गमला अशा नाना तऱ्हेने हा नाटकात गमला होता. आता कुठे लोपला कोण जाणे!

अशी खूप मंडळी लोपतात. सार्वजनिक स्मरण फार अल्पायुषी असते अशी इंग्रजीत म्हण आहे. वादळात सापडलेल्या त्या बिचाऱ्या सोमदत्ताला शेवटी कुठे आसरा मिळाला की नाही, अजूनही कळत नाही. 'वेरोळ्याने काय सांगितले?' ते आठवत नाही, पण वेरोळा आठवतो. 'धरा बुद्धि पोटी' हे पाठ करताना पडलेल्या, बुद्धी डोक्यातून पोटात कशी गेली ह्या कोड्याचे उत्तर सुटायचे आहे! फुलांस देऊन स्वागत करणारे सन्मित्र आता राहिले आहेत, ते केवळ आठवणींत. 'इतुके बोलुनि थकली-सुकली मुकली' इत्यादी जाईची दिव्य फुले भेंड्या लावताना 'इ' ह्या प्रारंभाक्षरामुळे अधिक प्रिय वाटत होती. 'कलंक मतिचा झडो-विषय सर्वथा नावडो' ही प्रार्थना शाळेत इतके विषय शिकवीत असताना मंजूर कशी झाली, ह्याचा अचंबा ओसरायला बरीच वर्षे लागली! 'लवथवती विक्राळा'तला 'लवथवती' फक्त गणपतीच्या दिवसात भेटतो. 'लवथवती'ला त्या आरतीखेरीज कुठेही लवथवयाला मिळाले का नाही? का ही उपेक्षा?

बालमनाच्या कोपऱ्यात या मंडळींनी एके काळी आपली इवलीशी चूल मांडली होती. जुने शेजारी अचानक भेटावे आणि त्या वेळी आपले फारसे पटत नसले तरी जुना शेजार आठवून क्षणभर अंतःकरणात काहीतरी पाझरल्यासारखे व्हावे, असे मात्र ह्या उमाळ्यावर उगवलेल्या आठवणींनी झाल्याशिवाय राहात नाही. मनाच्या खोल गुहेत त्यांनी आपला अजिंठा उभा केला आहे. काही चित्रे पुसली आहेत. काही ढेपाळली आहेत. ...पण पार वाहून मात्र गेली नाहीत. मी माझ्या ह्या कोवळ्या चित्रसृष्टीतल्या सौंगड्यांना नाही विसरलो!

# १६

## मनाच्या ढाली

---

**अनंत काणेकर**

अतिशय सुस्वभावी, परोपकारी वृत्तीचे असे माझे एक मित्र आहेत, पण त्यांच्या एका गोष्टीचं मला नेहमी आश्चर्य वाटतं. मला फक्त आश्चर्य वाटतं पण माझ्याइतकं त्यांना न ओळखणाऱ्या एखाद्या नव्या माणसाला ते गृहस्थ अगदी उलट्या काळजाचे आहेत असं केव्हा केव्हा वाटेल. ते वागतातच तसे केव्हा केव्हा. आमच्या परिचयाचे एक गृहस्थ त्यांचा दम्याचा विकार बळावून एकाएकी वारल्याचे एकदा आम्हांला कळलं.

त्याबरोबर माझे हे मित्र एकदम म्हणाले, 'हजार वेळा त्याला मी सांगितलं असेल की तेवढा विडीचा नाद सोड म्हणून. एक संपली की दुसरी पेटवायचा. शेवटी हे असं झालं.'

त्यांच्या कचेरीतील एक कारकून हृदयक्रिया बंद पडून असाच एकदा वारला. त्याची हकीकत सांगताना ते म्हणाले, 'हृदयक्रिया बंद पडून मरेल नाही तर काय? पाचव्या मजल्यावर राहायचा. रोज पाच जिने चढायचे नि उतरायचे म्हणजे काय थट्टा आहे? हृदयावर परिणाम होणारच.'

धावत्या बसमध्ये चढायचा प्रयत्न करताना त्यांचा पुतण्या हात सुटून पडला आणि पायाचं हाड मोडल्यामुळे तीन महिने त्याला इस्पितळात पडून राहावं लागलं.

'या लोकांचे पाय मोडायचेच. झाला एक दिवस ऑफिसात उशीर तर साहेब काय फाशी देणार आहे? सोडून द्यायची ती बस.'

कुणाला अपघात झाला किंवा कुणी मेला तर आमच्याप्रमाणेच आमच्या या मित्रालाही वाईट वाटतं. तो हृदयशून्य नाही याबद्दल माझी खात्री आहे; म्हणून तो असे काही उद्गार काढी तेव्हा मला आश्चर्य वाटे; पण एकदा एक प्रसंग घडला आणि त्याच्या असल्या उद्गारांचं मला आश्चर्य वाटेनासं

झालं. तो असं का बोलतो त्याचा छडा मला लागला. छडा लागला असं मला तरी वाटतं. कुणी आणखी काही वेगळं कारण सांगू शकेल; पण मला माझं कारण खरं वाटतं. माझा हा मित्र एका कचेरीत हेड्क्लार्क आहे. एकदा असं झालं की त्याच्या आजूबाजूच्या कचेऱ्यांतले दोन हेड्क्लार्क आठ-पंधरा दिवसांच्या अंतरानं काही ना काही होऊन कैलासवासी झाले. कित्येक दिवस माझा हा मित्र बेचैन होता.

'अरे, असा घाबरल्यासारखा काय दिसतोस अलीकडे तू?' मी त्याला विचारलं.

'तसं काही नाही रे', तो पुटपुटला, 'पण हेड् क्लार्कच एकामागून एक मरतात म्हणजे काय?'

त्याचे हे शब्द ऐकून माझ्या डोक्यात प्रकाश पडू लागला. त्याच्यासारखेच विडी-तंबाखू न ओढणारे, तळमजल्यावर राहणारे, चालत्या बसमध्ये चढण्याचा कधीही प्रयत्न न करणारे हेड् क्लार्क एकदम मरू लागले, तेव्हा तो घाबरून गेला. इथं मरण्याचं कारण काहीच देता येईना. एकच कारण दिसत होतं; ते म्हणजे माणूस हेड् क्लार्क असणं! तेव्हा आमच्या मित्राची घाबरगुंडी उडाली. माझ्या ताबडतोब ध्यानात आलं, कुणी मेला किंवा कुणी पडला की तो पटकन तसं काहीतरी का बोलत असे. याचं कारण तो दुष्ट किंवा उलट्या काळजाचा होता असं नव्हे; तर काही वाईट बातमी कळली की त्याला भीती वाटे आणि ती लपविण्याकरिता - स्वतःच्या भेदरून गेलेल्या मनाचं समाधान करण्याकरिता तो तसं काहीतरी बोलून जाई. मी विडीतंबाखू ओढीत नाही, तेव्हा मला दमा होऊन मी मरणं शक्यच नाही; मी तळमजल्यावर राहतो, जिन्यांची चढउतार मुळीच करीत नाही, माझी हृदयक्रिया कशी बंद पडेल? मी धावती बस पकडण्याचा कधी चुकूनही प्रयत्न करणार नाही, मला अपघात होणारच नाही; असं काहीतरी स्वतःच्या मनाचं समाधान तो करीत असावा; पण केवळ हेड् क्लार्क मरू लागले तेव्हा त्याची पाचावर धारण बसली!' बिचारा! दोन हेड् क्लार्क एकदम वारले, हा केवळ त्याच्या नजरेला पडलेला योगायोग. किती तरी प्रकारचे लोक एका दिवशी जगात मरत असतात. विड्या ओढ ओढ ओढणारे मरतात, तसेच विडीला स्पर्शही न करणारे दमा बळावून मरतात. तळमजल्यावर सारा जन्म काढणारेही हृदयक्रिया बंद पडून किती तरी

मरतात; आणि अगदी निश्चल बसमध्ये चढता चढताही पाय घसरून पडणारे आणि हाड मोडून घेणारे काही कमी नाहीत !

पण माणसाचा स्वभाव असा आहे खरा. आमचा तो मित्र फार वेळा तसं काही तरी बोलतो म्हणून ते लक्षात येतं; पण आपण सर्वच जण केव्हा ना केव्हा, कळत अगर नकळत असंच काहीतरी स्वतःचं समाधान करून घेत असतो. आपण वर्षानुवर्ष सकाळ ते संध्याकाळ घाम काढून काम करतो आणि जेमतेम पोटापुरते मिळवतो. एखादा काही तरी हातचलाखी करून एका दिवसात आपण जन्मात मिळवलं नाही इतकं मिळवतो आणि मग सुखानं राहात असलेला आपल्या दृष्टीला पडतो. आपण सर्व सभ्य पण दुःखी लोक लांब चेहरे करून गंभीरपणे एकमेकांना सांगतो, 'पचायचे नाहीत त्याला हे हरामाचे पैसे. शेवटी हाल हाल झाल्याशिवाय राहणार नाहीत. पापाचं प्रायश्चित्त मिळणारच.'

पुष्कळ वेळा सद्‌गुणी म्हणून नव्हे तर भित्रे म्हणून आपण पाप करीत नाही. पाप करणाराला जे सुख मिळालेलं असतं ते आपणाला हवं असतं; पण न मिळालेल्या द्राक्षांना आंबट म्हणणाऱ्या कोल्ह्याप्रमाणे त्या पाप करणाऱ्याला सुख मिळणार नाही; आणि आपण फार सद्‌गुणी असल्यामुळे पाप करू इच्छित नाही, असं ठासून स्वतःच्या मनाला सांगून आपण आपलं असह्य जीवन सुसह्य करीत असतो.

याला फसव, त्याला फसव असं करून चैनीत राहणाऱ्या एका माणसाबद्दल मला भेटेल तो सांगत असे, केव्हा ना 'केव्हा याचं बेंड फुटणार आणि हा फूटपाथवर पडणार पाहा.'

शेवटी मी त्या सर्वांना एकदा सांगितलं, 'हे पाहा, लांड्यालबाड्या करून चैनीत राहणाऱ्या कित्येकांची केव्हा ना केव्हा बेंडं फुटली असतील, पण ज्यांची शेवटपर्यंत फुटली नसतील असेही पुष्कळ होऊन गेले असतील. नाही नाही, म्हणता या माणसानंच पंधरा-वीस वर्षं तरी आतापर्यंत चारपांच जणांना टोप्या घालून मजेत काढलीच. फार तर आणखी पंधरा-वीस वर्षं त्याच्या आयुष्याची उरली असतील. कोट्यवधी माणसांनी भरलेल्या या अफाट जगात टोपी घालून घेणारे आणखी चारपाच बावळट त्याला सापडणार नाहीत की काय ?'

माझी ही मीमांसा ऐकून ते बिचारे अस्वस्थ झालेले दिसले. त्यांचं सात्त्विक

राक्षसच तो, त्याला काय? मारली उडी की आला कालच्या गोष्टीतून आजच्या गोष्टीत!' आणि नंतर अशाच अनेक शंकांना ठेचाळत ठेचाळत गोष्ट कशी तरी मुक्कामावर न्यावी लागते. बरं गोष्ट संपली तरी त्रास मात्र चुकत नाही. केवढीही गोष्ट सांगितली तरी माझ्या या बालश्रोत्यांना ती लहानच वाटते; किंबहुना गोष्ट संपते, हाच मुळी त्यांचा सर्वांत मोठा आक्षेप असतो. न संपणारी गोष्ट सांगण्याचाही मी एकदा प्रयत्न करून पाहिला. मोठ्ठी गोष्ट सांगा, मोठ्ठी गोष्ट सांगा, या मागणीला तोंड देण्यासाठी मी एक दिवस गोष्ट सांगायला आरंभ केला, 'एक श्रीमंत माणूस होता. त्याला प्रवासाचा भारी नाद. एकदा तो दिल्लीला जायला निघाला. स्टेशनवर जाऊन त्यानं तिकीट काढलं नि बसला जाऊन आगगाडीत. गाडीनं शिटी दिली गाडी सुरू झाली. आता दिल्लीला पोचायला तीन दिवस हवेत. त्यानंतर पुढची गोष्ट.' गोष्टीच्या या अनपेक्षित शेवटाने, मुले जरा बावरली. कुठे तरी, काही तरी, चुकल्याचं त्यांना लागलं; पण काय ते, त्यांना कळेना, माझा मोठा मुलगा थोडा वेळ विचार करून म्हणाला, 'हं! झाले आता तीन दिवस. पुढं सांगा.' काळ, काम, वेगाचे माझे प्रमाण अशा रीतीने, या श्रोत्यांनी अमान्य केले व शेवटी पाच मिनिटांत दिल्लीला पोचेल या वेगाने आगगाडी चालविणे भाग पडले. आजकाल माझ्या या अडचणीत एक नवीनच भर पडली आहे. ही मुलं आता शाळेत जाऊ लागली आहेत नि आपल्या शिक्षकाकडूनही त्यांना आता गोष्टी ऐकायला मिळू लागल्या आहेत. तुम्ही म्हणाल, माझा तेवढाच त्रास कमी झाला असेल! वस्तुतः तसं व्हायला हरकत नव्हती; पण झालाय तो प्रकार मात्र उलटा. शाळेत मुलांना गोष्टी सागणारे जे शिक्षक आहेत, त्यांच्या गोष्टीचा खाक्या असतो 'इसापनीती'तील गोष्टींचा. म्हणजे असं की त्यांच्या प्रत्येक गोष्टीला, 'सारांशा'ची गाठ मारलेली असते. गोष्टीचा सारांश सांगणे मला मुळीच आवडत नाही. 'सारांश' न सांगताच तो मुलांना कळावा असं मला वाटतं. पण मला वाटून काय उपयोग? गोष्टीला सारांश नको, असं मुलांना सांगायची सोय नव्हती; कारण मग 'मास्तर कसे सांगतात?' या त्यांच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागणार होते नि ते तर मोठे कठीण होते. 'मास्तर चुकतात' असं म्हटलं तर ही मंडळी वर्गात तसं सांगायला कमी करणार नाही; याचा मला विश्वास होता नि मग त्या शिक्षकांनी माझ्या

मताची जी संभावना केली असती तीही मला ऐकावी लागलीच असती. तेव्हा मीच नमतं घ्यायचं ठरवलं. गोष्ट सांगून संपली की मुले ओरडतात, 'आणि सारांश ?' 'सारांश' नसलेली गोष्ट बिनशेपटीच्या पतंगासारखी त्यांना ओकी ओकी वाटू लागली आहे नि म्हणूनच गोष्टीबरोबर तिचा सारांशही मला सांगणे भाग पडते. यालाही माझी विशेष हरकत नव्हती; पण होतंय काय की, गोष्टीचा सारांश मी सांगितला तरी या मुलांना पटत नाही नि त्यावर निघणाऱ्या अनेक शंकांना उत्तरे द्यावी लागतात.

काल असंच झालं, सर्वश्रुत अशी ती, शेखमहंमदाची गोष्ट मी मुलांना सांगितली, सारं काही सांगून झाल्यावर, अपेक्षित प्रश्न आला. 'सारांश ?' मी झटकन म्हणालो, 'सारांश, माणसाने मनोराज्ये करू नयेत.' मला वाटले आता तरी मुलांचे समाधान झाले असेल; पण क्षणभर थांबून एकाने प्रश्न केला, 'का करू नयेत पण ?' 'अरे त्या शेखमहंमदासारखं व्हायचं ! बघ ना, त्याचं सर्व काचेचं सामान नाही का फुटलं ?' इतक्यात दुसरे चिरंजीव उद्गारले, 'पण त्याने पितळेची भांडी का नाही ठेवली आपल्या दुकानात ?' या अनपेक्षित प्रश्नाने क्षणभर मीही अगदी गोंधळून गेलो. या शंकेला माझ्याजवळ काहीच उत्तर नव्हते. झोपेचं सोंग करून उत्तर देण्याचं मी टाळलं व मुलांना कसं तरी गप्प केलं; पण खरं म्हणजे, मुलं गप्प झाली तरी माझं मन गप्प झालेलं नाही. माझ्या मुलानं केलेला तो प्रश्न माझ्या मनात सारखा घोळत आहे. अगदी लहानपणापासून मी ती गोष्ट ऐकत होतो; पण आजवर असली शंका मला कधीच सुचली नव्हती. वाटलं, नवी पिढी अधिक चौकस नि हुषार निघू लागली आहे, याचा आणखी कसला पुरावा हवा ? मी विचार करू लागलो. काय बरं दाखवायचं असावं या कथेतून लेखकाला ? शेखमहंमदाच्या गोष्टीचा सारांश अगदीच फुसक्या दोऱ्यात ओवल्यासारखा मला वाटू लागला. बिचारा शेखमहंमद ! आपल्या भावी सुखांच्या कल्पनेत रंगून गेला, हाच ना त्याचा अपराध ! भविष्याच्या सुखस्वप्नांत रंगणे हा जर अपराध असेल तर कोण बरं सुटू शकेल या अपराधातून ? मनोराज्ये रचणे, कल्पनेच्या विश्वात रंगून जाणे, हा तर माणसाचा स्वभावधर्म आहे. कोणत्याही वयातील नि अवस्थेतील व्यक्ती असू दे, भविष्यकालाच्या कल्पनात ती कधी ना कधी तरी रंगून जाणार नाही; असे सहसा घडत नाही. आपल्या या

कल्पना कुणी बोलून दाखवितो नि कुणी दाखवीत नाही; एवढेच.

भविष्य अज्ञात आहे; पण म्हणूनच ते जाणण्याची मानवी आकांक्षा अदम्य आहे. या अज्ञात भविष्याचा संपूर्णपणे वेध घेण्याची शक्ती मानवात नसली, तरी कल्पनेच्या रंगरेखांनी आपल्या भविष्याचे हवे तसे चित्र मात्र त्याला रेखाटता येते नि रेखाटल्याशिवाय तो राहत नाही.

अशा केवळ कल्पना करण्यापासून लाभ कोणता? प्रत्यक्षात उतरणाऱ्या कल्पना किती असतात? मग व्यर्थ कल्पनाच करा कशाला? असे प्रश्न, एखादा रुक्ष व्यवहारवादी नि उपयुक्ततावादी टाकील याची मला जाणीव आहे. मला स्वतःला मात्र हा रुक्ष व्यवहारवाद अगदी चूक वाटतो. कमलाच्या कोशात, सायंकाळच्या वेळीं अडकून पडलेल्या भ्रमराचं एका संस्कृत कवीनं मोठं सुंदर वर्णन केलं आहे. भ्रमर मधुपानात दंग असतानाच ते कमळ मिटले नि तो त्यात अडकून पडला व कल्पना करू लागला, 'ही रात्र सरेल. पहाट होईल. सूर्य उगवेल नि मग हे कमल उमलेल. माझे पाश तुटतील. मी मुक्त होईन.' पण तेवढ्यात 'हा हन्त! हन्त! नलिनी गजमुज्जहार.' माणसाच्या सुखस्वप्नांची देखील पुष्कळदा अशीच स्थिती होते, याचीही मला जाणीव आहे. परंतु ही वस्तुस्थिती मान्य करूनही, मला असं वाटतं की कल्पनारंजन हे केवळ साहजिकच नव्हे तर आवश्यकही आहे. वर वर्णिलेल्या भुंग्याचंच उदाहरण घ्या ना! बिचाऱ्याची सुखस्वप्ने मूर्त होऊ शकली नाहीत हे खरं, पण त्याला आपल्या मुक्ततेची किती तळमळ लागली होती हे तर त्यावरून कळतं ना? आहे ती स्थिती बदलावी नि दुसरी चांगली स्थिती यावी, असं त्याला वाटत होतं; हे तर स्पष्ट होतं ना? आपल्या सुखस्वप्नांनी, मनोराज्यांनी, देखील नेमकी हीच गोष्ट घडत असते असं मला वाटतं.

मानवी जीवन परिपूर्ण असं कधीच नव्हतं. आजही नाही आणि पुढेही कधी काळी ते तसं होईलसं वाटत नाही; कारण पूर्णतेच्या कल्पनेला कसलीच मर्यादा नाही. अमकं मिळालं म्हणजे आपलं जीवन परिपूर्ण होईल; तमकं मिळालं म्हणजे ते परिपूर्ण होईल; या ज्या मर्यादा जाणवतात त्या समुद्रावरील क्षितिजाप्रमाणे आहेत नि हा पूर्णतेचा सागर मात्र अक्षरशः अमर्याद आहे. पण म्हणून काही माणसानं पूर्णतेचा ध्यास सोडलेला नाही आणि त्यानं तो सोडलेला नाही म्हणूनच बरं आहे; एरव्ही मनाचा विकास, त्याची

प्रगती सारं काही केव्हाच थांबलं असतं. जे हवंसं वाटतं पण मिळत नाही, त्यासाठी तर मानवाची सारी धडपड चालू असते. 'काठोकाठ कटाह भरा' असे प्रत्येकाला आपापल्या जाणीवेनुसार वाटतच असते. ही अपूर्णत्वाची जाणीव, ही पूर्णत्वाची ओढ हीच तर मानवी विकासाची खरी प्रेरणा! प्राप्त परिस्थितीतील उणीवांचीच जर जाणीव नसेल तर ती बदलावी असं कुणाला बरं वाटेल? मला वाटतं, माणसाच्या या जाणीवेतूनच त्याची सुखस्वप्ने निर्माण होतात.

माणसानं केलेली स्वर्गाची कल्पना, हे मानवाचं अत्यंत प्राचीन स्वप्न आहे असं म्हणायला हरकत नाही आणि स्वर्गाच्या या कल्पनेत मानवी जीवनाची चिरंतन शल्येच प्रगट झालेली आपणांस पाहावयास सापडतील. वार्धक्य नि मृत्यू ही दोन मानवी जीवनाची महान दुःखे! ही दुःखे त्याला नको असतात नि म्हणून तर, स्वर्गातील देव अमर आहेत, निर्जर आहेत. तेथील अप्सरांचे तारुण्य कधीही न ओसरणारे आहे. या जीवनात माणसाला जे हवं ते पुष्कळदा मिळत नाही. शिवाय इच्छा गरुडाच्या पंखांनी भराऱ्या मारीत असते नि परिस्थिती साध्या पावलांनी चालत असते. दोघींची धाव बरोबर कधीच नसते. पण म्हणूनच माणसाने स्वर्गात कल्पवृक्षाची स्थापना केली. या कल्पवृक्षातळी बसून नुसती इच्छा करावयाचा अवकाश की इच्छिलेले उपलब्ध होते. एकूण काय, तर जे या जीवनात नाही अथवा दुर्लभ आहे ते सारं काही या स्वर्गाच्या कल्पनेत सहज प्राप्त करून ठेवलं गेलं आहे. हा स्वर्ग खोटा असेल, पण या उणीवा नि त्या नष्ट व्हाव्यात ही माणसाची उत्कंठा! त्या तर खोट्या नाहीत ना? आणि मग त्या बिचाऱ्या शेखमहंमदावरच एवढा गहजब का? त्यानं देखील हेच केलं होतं. मानवी सहजप्रवृत्तीविरुद्ध त्यात काहीच नव्हतं.

माझ्या मनात असाही विचार आला की शेखमहंमदानं केलेलं मनोराज्य कितीही साहजिक असलं तरी, त्यातच रंगून जाऊन त्यानं जी लाथ मारली, ती मात्र समर्थनीय ठरविता येणार नाही. वास्तवाचा एवढा विसर माणसाला न पडायला हवा, हे खरं. पण त्याबरोबरच हा विसर का पडला याचाही आपण विचार करायला हवा आणि या दृष्टीनं विचार करता, शेखमहंमदाच्या मूर्खपणाच्या वाटणाऱ्या या कृत्याला आणखीही एक बाजू असल्याचं मला दिसून

आलं. आपल्याला हव्याशा वाटणाऱ्या सुखी जीवनाची ओढ त्याला इतक्या उत्कटतेने, तीव्रतेने लागलेली होती की, कल्पनेच्या विश्वाचं असत्यत्व त्याला भासलंच नाही. भक्तीची उत्कटता पायरीपायरीने वाढत गेली की शेवटच्या सायुज्जतेच्या अवस्थेत भक्त ईश्वराशी एकरूप होऊन जातो म्हणतात. शेख महंमदाच्या या कृतीतहीं, हीच सायुज्जता निराळ्या रूपात दिसून येते.

'बुडाला औरंग्या पापी–म्लेंच्छ संहार जाहला,
उदंड जाहले पाणी–स्नान संध्या करावया.'

असं जे आपल्या 'आनंदवन–भुवनाच्या' स्वप्नात श्रीसमर्थ रामदासांनी वर्णन केलं आहे, ते देखील अशा एकरूपतेतूनच, तादात्म्यातूनच निर्माण झालेलं आहेसं मला वाटतं. रामदासांनी जेव्हा वरील वर्णन केलं, तेव्हा ते न घडलेलंच होतं. रामदासांना जे घडावं असं वाटत होतं, तेच त्यांनी आपल्या या 'मनोराज्यात' घडल्याचं दाखविलं आहे; कारण ते घडावं असं त्यांना उत्कटतेनं वाटत होतं. रामदासांची ही उत्कटता, म्हणजे एक प्रेरक शक्ती होती.

सारखेपणाच्या आधाराने आपण एका वस्तूची उपमा दुसरीस देतो आणि या सारखेपणाची जेव्हा परमावधी होते तेव्हा भ्रांतिमान नावाचा अलंकार निर्माण होतो. 'पोपटांच्या लाल चोचींना पळसाची फुले समजून भुंगे त्यांवर रुंजी घालू लागले व त्या भुंग्यांना पिकलेली जांभळे समजून त्यांना गिळण्यासाठी पोपटांनी आपल्या चोची उघडल्या.' असं एक मोठं सुंदर उदाहरण नेहमी दिलं जातं या भ्रांतिमान अलंकाराचं. वरील वर्णन ऐकताना आपण काय बरं करतो? 'काय मूर्ख आहेत हे पोपट नि भुंगे!' असंच का आपण म्हणतो? मुळींच नाही. उलट त्यात वर्णिलेल्या वस्तूंच्या आत्यंतिक सारखेपणातील सौंदर्यावरच आपलं सारं लक्ष केंद्रित झालेलं असतं. अगदी याचा न्यायानं, शेखमहंमदाने लाथ मारल्यामुळे काय घडले यापेक्षा त्याला आपल्या सुखी जीवनाची किती उत्कटतेने तळमळ लागली होती; याकडेच आपण लक्ष पुरविले पाहिजे. शेखमहंमदाची ही उत्कट ओढ, मला तरी दूषणीय वाटत नाही; कारण आपल्या जीवनाला कसं वळण द्यायचं, याचं दिग्दर्शन आपल्यमनोराज्यांच्या उत्कट ओढीतूनच लाभत असतं.

'आधी कळस मग पाया रे!' असा एका आध्यात्मिक, गूढार्थाच्या कवनाचा

एक चरण मला इथे आठवतो. बाह्यतः विसंगत नि विपरीत वाटणारं, या चरणातील विधान, केवळ गूढार्थानेच नव्हे तर साध्या सरळ अर्थाने देखील सत्य आहे असं वाटतं मला. म्हणजे असं की, कळसाकडून पायाकडे, अशी मंदिराची बांधणी कधीच होत नाही हे खरं; पण त्याबरोबरच, पाया भरण्यापूर्वीच त्यावर उभारल्या जाणाऱ्या मंदिराची, निश्चित कल्पना, ते बांधणाराला असते हेही खरं! प्रत्यक्ष पाया भरण्यापूर्वीच आपल्या कल्पनेत त्यानं या मंदिरावर कळसही चढविलेला असतो नि म्हणून तर त्याचं विशिष्ट रूप आकारास येतं. प्रत्येकाच्या कल्पनेत बांधली जाणारी अशी किती तरी मंदिरे असतात. " आपलं स्वतःचं एक घर असावं. अगदी विस्तीर्ण असावं. त्याच्या भोवताली एक सुंदर बाग असावी. अभ्यासाला लिहीत बसायला एक स्वतंत्र, मोकळीचाकळी खोली असावी. या खोलीत, फिकट हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर श्रेष्ठ कलाकारांची चित्रे लावलेली असावीत. काचेच्या चमकदार शिसवी कपाटातून सुंदर बांधणीची उत्तमोत्तम पुस्तके गच्च भरलेली असावीत. आपलं हे घर, म्हटलं तर गावात, म्हटलं तर गावाबाहेर, अशा सीमारेषेवर असावं. घरापासून जवळच, आपलं स्वतंत्रच असं एक शेत असावं." असं माझं स्वतःचं एक मनोराज्य फार दिवसांपासून मी मनात घोळवीत आहे. अर्थात, यापैकी घोड्याचा एक नालही मला अजून गवसलेला नाही; मग उरलेले तीन नाल, लगाम, खोगीर नि प्रत्यक्ष घोडा यांची गोष्ट दूरच! तरी पण कल्पनेनं या वातावरणात मी अनेकदा विहार करीत असतो. या स्वप्नरंजनानं, अधिक काही साधलेलं नसलं तरी एवढं मात्र नक्की की, उद्या प्रसंग आलाच तर, काय करायचं, कसं करायचं, हे माझ्या मनानं आधीच ठरवून ठेवल्यानं माझा गोंधळ उडणार नाही. नाही तर परमेश्वर प्रसन्न झाला नि भटजींनी मागितलं काय तर तंबाखूला लावायला चुना, या हरदासी गोष्टीप्रमाणं व्हायचं एखादे वेळी! असं होऊ नये, आपलं इच्छित साधण्याला सतत प्रेरणा मिळावी म्हणून मला वाटतं, आपल्या भाविकालाच्या योजनांची मनोराज्ये आपण अवश्य रचावीत. योजना आखून मात्र हे काम होणार नाही. केवळ योजना कितीही तर्कशुद्ध असली तरी ती जोपर्यंत आपले मनोराज्य बनत नाही तोपर्यंत तिची तीव्रतेने ओढ लागणेच शक्य नाही. मला वाटतं, मनोराज्याच्या मानवी जीवनातील या महत्त्वाच्या स्थानाविषयी शेखमहंमदाची गोष्ट रचणारा अगदीच

अज्ञानी असावा. एरव्ही त्यानं बिचाऱ्या शेखमहंमदाची अशी विनाकारण बदनामी मुळीच केली नसती. 'मनोराज्य करणे वाईट' असं आधी गृहीत धरायचं नि मग ते सिद्ध करण्यासाठी शेखमहंमदाच्या दुकानात काचेच्या सामानाशिवाय दुसरं काहीही ठेवायचं नाही नि म्हणायचं काय तर, 'पाहा, मनोराज्य करणे कसे वाईट आहे ते!' हा काय न्याय झाला? शेखमहंमदावरील हा अन्याय मला तरी मुळीच मान्य करवत नाही. त्याने आपल्या कल्पनेचा स्वर्ग निर्माण केला, यात काही आक्षेपार्ह आहे, हेच मुळी मला पटत नाही. आक्षेप घ्यायचाच झाला तर, त्यानं निर्मिलेला स्वर्ग फार लहान होता, संकुचित होता, असा मात्र घेता येईल. पण या गोष्टीला त्याचा उपाय नव्हता. त्याचं सामर्थ्यच तेवढं. त्याच्या मनाची धाव या कुंपणापर्यंतच! ज्यांची जीवनदृष्टी विशाल, ज्यांच्या मनाची झेप मोठी, त्यांची मनोराज्येही तशीच असतात.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात्॥

या महान मनोराज्याचा निर्माता, अर्थातच अत्यंत विशाल दृष्टीचा, व्यापक सहानुभूतीचा असला पाहिजे. ज्ञानेश्वरासारख्या महात्म्यांनी जी मनोराज्ये रचिली ती देखील त्यांच्या विभूतिमत्त्वाला साजेशीच आहेत.

"दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्मसूर्यें पाहो।
जे जे वांछील ते ते लाहो, प्राणिजात॥"

हे ज्ञानेश्वराचं मनोराज्य याचीच साक्ष देत आहे आणि एवढा काळ लोटला असूनही ही मनोराज्ये अजून मनोराज्येच राहिली आहेत; प्रत्यक्ष जीवनात अजूनही त्यांचा आढळ झालेला नाही. पण म्हणून काय ती व्यर्थ मानायची? मानवाला कुठं जायचं आहे, हे दाखवून देण्याचं केवढं तरी महान कार्य या मनोराज्यांनी करून ठेवलेलं आहे!

मनोराज्याचं मूल्य, अशा रीतीनं ते करणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असणार यात शंकाच नाही. पण मुळात मनोराज्य करण्याची प्रवृत्तीच घातुक ठरवायची, हे मला मुळीच पटत नाही. मग सामान्य माणसांनी काय आपली सामान्य मनोराज्ये करूच नयेत? 'राजहंसाचे चालणे, जगती जालेया सिंहाणे, आणिके काय कोणे, चालोचि, नाये? या उक्तीत ज्ञानेश्वरांनीच याचं उत्तर

देऊन ठेवलंय्. माझं सामर्थ्य कमी असेल, माझी दृष्टी संकुचित असेल नि म्हणून जर माझी मनोराज्ये दुबळी असतील, संकुचित असतील तर मी म्हणेन, माझं सामर्थ्य वाढायला हवं, माझी दृष्टी विशाल व्हायला हवी. मनोराज्यच करायचं नाही यात काय अर्थ ? याच कारणाने मला वाटतं की, एका चुकीच्या तत्त्वाला, शेखमहंमद बळी दिला गेला आहे नि म्हणून मी आता ठरवून टाकलंय् की पुन्हा शेखमहंमदाची गोष्ट सांगायची संधी आली तर त्यावरील हा अन्याय साफ धुऊन काढायचा.

## १८

# निसर्ग आणि आम्ही

**म. ना. अद्वन्त**

कॉलेजमध्ये निघालो त्या वेळी आकाशात काळे ढग इतस्ततः फिरत होते. मधून मधून गर्जतही होते. पण तिकडे दुर्लक्षच केले. ' गर्जेल तो पडेल काय ? ' ही म्हण कदाचित त्या वेळी माझ्या मनात आली असावी. ते काहीही असो —छत्रीवर भिस्त ठेवून व ढगांच्या निष्क्रियतेवर भरंवसा टाकीत मी मधल्या मार्गाने घाईने कॉलेजात निघालो. कॉलेजचा निम्मा मार्ग सुरक्षित रीतीने आक्रमला. आता फक्त अर्ध्या मैलाचे अंतर उरले होते – तेवढे अंतर कापले की...

आणि तेवढ्यातच निसर्गाने आपला पवित्रा बदलला. मी केलेली उपेक्षा त्यांना जाणवली की ' गर्जेल तो पडेल काय ? ' या म्हणीला खोटे पाडण्याचा त्यांनी चंग बांधला कुणास ठाऊक ? – एकाएकी चोहोबाजूंनी काळेकुट्ट ढग जमून आले आणि कोणत्याही रीतीची पूर्वसूचना न देता त्यांनी टपोऱ्या थेंबांचा वर्षाव सुरू केला. त्यांना साहाय्य देण्यासाठी प्रचंड वेगाने वाराही धावून आला.

मी मोठ्या गडबडीने छत्री उघडली – आणि ती वाऱ्याच्या प्रचंड झोताने एकदम उलटी झाली. वाऱ्याचा आणि पावसाचा जोर इतका विलक्षण वाढला की कोणत्याही दणकट छत्रीचे या पावसापुढे काही चालेल असे वाटेना. माझी मोठी विलक्षण परिस्थिती झाली. माझ्यापुढे अर्धा मैल सपाट मैदान पसरले होते, मागे अर्धा मैल सपाट मैदान पसरले होते. आजूबाजूला झाडच काय, पण झुडूपही नव्हते. वादळात सापडलेल्या सोमदत्तासारखी माझी असहाय स्थिती झाली होती.

पण मला वाईट वाटत होते ते निराळेच. आमची सौभाग्यवती नको नको म्हणत असताना आज गरम वुलनचा चांगला कोट घालून मी बाहेर पडलो

होतो. तो आता भिजून चिंब होणार होता. माझ्या पिशवीत घेतलेली माझी आवडती पुस्तके आता भिजून जाणार होती – आणि माझ्या पायांतील सुंदर बुटांवर दोन दोन इंच खानदेशी चिक्कणमातीच्या चिखलाचा थर चढणार होता. मनातल्या मनात मी स्वतःला, पावसाला आणि मला चुकवून अगदी वेळेवर गेलेल्या बसला लाखोली वाहिली – पण आता स्वतःवर किंवा निसर्गावर चिडून काय फायदा होता ? पुढच्या किंवा मागच्या दिशेने पावले वळविणे आणि पावसाचा मार सहन करीत कॉलेज किंवा घर जवळ करणे क्रमप्राप्तच होते. कॉलेजमध्ये या अवतारात जाऊन व्याख्यान देणे अशक्यच होते – मी मागे वळून घराकडेच पावले वळविली.

कोटांची–पुस्तकांची–बुटांची आशा मी आता सोडूनच दिली होती. छत्री मिटवून टाकली व अपरिहार्यतेला तोंड देण्याच्या दृष्टीने मी पावले टाकायला सुरुवात केली. पावसाचा जोर वाढतच होता. वाऱ्यानेही आपला प्रभाव दाखवायला सुरुवात केली होती. सप–सप–सप–माझ्या चेहेऱ्यावर व अंगावर पावसाचा मारा होत होता. मी जात होतो ती पायवाट एका शेतातून जात होती. त्या ठिकाणचा चिवट चिखल इतका विलक्षण होता की, अनेक वेळा बूट चिखलातच रुतून राही आणि पाय फक्त बाहेर येई. पुन्हा पाय त्या बुटात घालून बुटासह तो पाय बाहेर काढणे म्हणजे एक प्रकारचे दिव्यच होते.

अर्धा फर्लांग गेल्यावर मी माझ्या चिडक्या मनोवृत्तीतून बाहेर आलो – या सर्व वादळी परिस्थितीतही मला अतिशय अननुभूत असा आनंद वाटायला लागला. आतापर्यंत मी जवळ जवळ चाळीस पावसाळे पाहिले होते – असे मुसळधार पावसाचे दृश्य तर शेकडो वेळा पाहिले असेन – पण अशा पावसात मनसोक्त भिजण्याचा आनंद मी पहिल्यानेच अनुभवीत होतो. पाऊस आला तर शक्य तो घरातून निघावयाचेच नाही – आणि मध्येच पावसाने गाठले तर शक्य तितक्या तातडीने आश्रयस्थान जवळ करायचे हा माझा आतापर्यंतचा शिरस्ता. पावसातून जाताना कपडे भिजू नयेत – अंगावर चिखल उडू नये म्हणून जास्तीत जास्त दक्षता घेण्याची काळजी. त्यामुळे निसर्गाच्या या आनंदाचे मी आतापर्यंत त्रयस्थपणाने व तटस्थपणानेच कौतुक करीत होतो. पण त्या निसर्गाच्या भव्य व प्रचंड आंदोलनात समरस होण्याचा, त्याच्याशी एकरूप होण्याचा आनंद केवढा मोठा आहे याची मला त्या दिवशी कल्पना

आली. पावसाचा माझ्या चेहऱ्यावर सपासप होणारा मारा मला अतिशय सुखावह वाटायला लागला – चिखलात होणाऱ्या घसरगुंडीत आणि कसरतीतही मोठी मौज वाटू लागली. माझ्या प्रतिष्ठेचे व हिशेबी वृत्तीचे ओझे दूर फेकून देऊन मी जणू निसर्गाच्या या क्रीडेत सामील झालो. सर्व कपडे चिंबभिजून गेले – शरीराला त्याचा होणारा गार स्पर्श मोठा सुखद वाटू लागला. पाण्याचे मोठमोठे ओहोळ शेतातून वाहत होते. त्यांतून अवखळपणाने पाणी उडवीत जाण्यात मोठ्या विलक्षण आनंदाचा अनुभव मी घेऊ लागलो. भोवताली मी पाहिले – आकाशातून जणू सहस्र धारांनी वर्षाव होत होता. सारी सृष्टी पाण्याने न्हाऊन निघाली होती. सृष्टीबरोबर मलाही अभ्यंगस्नान घडत होते. आणि त्या चिंब भिजून जाण्यात मला अननुभूत आनंद वाटत होता.

माणसाच्या मनावर असलेल्या प्रतिष्ठेच्या व व्यावहारिक गोष्टींच्या दडपणामुळे अशा प्रकारे किती आनंदाला तो मुकत असेल याची मला या वेळीं जाणीव झाली. आपण आपले जीवन अनेक वेळा रुपये-आणे-पै यांच्या हिशेबात बसविण्याचा प्रयत्न करतो. प्रतिष्ठेची आपणाभोवती खरी खोटी वलये निर्माण करतो आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या चाकोरीला जीवन असे नाव देऊन त्या जीवनातच आनंद मानण्याचा आपण प्रयत्न करतो. त्या चाकोरीच्या बाहेर जाणारे, हिशेबी वृत्तीला धक्का देणारे, प्रतिष्ठेच्या वलयातून बाहेर पडणारे थोडे जरी काही घडले, तरी आपण अस्वस्थ होतो. आणि काही तरी चुकल्याची, काही तरी अनिष्ट घडत असल्याची जाणीव आपण करून घेतो.

जीवनात किती वेळा आपण मनसोक्त पावसात भिजावयाचेच या कल्पनेने पावसात छत्री न घेता बाहेर पडलो आहोत ? ‘ आनंदी आनंद गडे ! जिकडे तिकडे चोहिकडे ! ’ असा बालकवी आपणाला संदेश देतात. पण निसर्गातील हा आनंद लुटण्यासाठी आपणापैकी कितीजण बाहेर पडतात ? संध्याकाळी घाईघाईने निघालेल्या एखाद्या गृहस्थास ‘ कुठे जातोस ? ’ असे आपण विचारले आणि ‘ –सूर्यास्त पाहावयास मी जातो आहे ’ असे त्याने उत्तर दिले तर आपण निश्चित ‘ आ ’ करून त्याच्याकडे पाहात राहू. अरुण, संध्या-रजनी, कौमुदी वगैरे सृष्टिदेवीची बालके शेवटी बालकवींच्या कवितेत राहतात. आणि आम्ही चांदण्या रात्री विजेच्या दिव्याच्या कृत्रिम प्रकाशात ‘ रमी ’ खेळण्यात रमून गेलेलो असतो. ‘ फुलराणी ’ शिकविताना मी साऱ्या विद्या-

थ्यांना गुंगवून सोडल्याचे मला आठवते. पण वेलीवरच्या कोमल कलिकेचे सौंदर्य पाहण्याला मी कधी थांबलो असल्याचे मला आठवत नाही. निर्झराच्या गोड गीतात बालकवींना दिसलेला अर्थ मी विद्यार्थ्यांना कितीदा समजावून सांगितला असेन. पण निर्झराच्या काठाशी त्याची अवखळ गीते ऐकत मी कधी उभा राहिल्याचे मला आठवत नाही.

याचे कारण एकच —जीवनाची एक चाकोरी मी ठरविली आहे, प्रतिष्ठेचे एक कवच माझ्या अंगावर मी चढविले आहे. रुपये-आणे-पै चा आवाज माझ्या कानात घुमतो आहे. अशा स्थितीत निसर्गाचा भव्य साक्षात्कार घ्याव-यास मला सवड कुठून मिळणार ? परवाच मी मुंबईहून जनता एक्स्प्रेसने पुण्यास जात होतो. पावसाळ्याचे दिवस होते. गाडी खंडाळ्याच्या घाटातून जात असताना सृष्टीने मोठे भयानक रूप धारण केले होते. मुसळधार पाऊस पडत होता—पाण्याचे मोठमोठे प्रवाह पर्वतशिखरावरून खाली कोसळताना अंधुक दिसत होते. गाडी जवळ जवळ ढगांतूनच जात होती. वर्षाऋतूचे चाल-लेले ते तांडवनृत्य खरोखर अलौकिक होते. पण मी मात्र खिडकी मिटून बसलो होतो—कारण काय तर खिडकी उघडली असती तर पावसाचे पाणी आत आले असते आणि माझा नवा सूट खराब झाला असता. शिवाय सर्वांनीच खिडक्या बंद केल्या होत्या—तेव्हा मीच माझी खिडकी उघडी ठेवून पावसाचा वर्षाव झेलला असता तर लोक माझ्याकडे कुतूहलाने आश्चर्याने आणि उपहा-सानेही बघू लागले असते. मला त्याचीच अधिक भीती वाटली आणि काचेच्या तावदानातून जेवढे निसर्गाचे सौंदर्य दिसत होते तेवढे पाहण्यात मी समाधान मानू लागलो. बाहेर टिपूर चांदणे पडले असतानाही काव्यातील किंवा कादंबरीतील चांदण्याची वर्णने विद्युद्दीपाच्या प्रकाशात मिटक्या मारीत वाचणारे रसिक आम्ही ! निसर्गाच्या भव्य सौंदर्याशी समरस होण्याची पात्रता आमच्या ठिकाणी नाही. आणि तशी इच्छाही नसते. आमची सर्व रसिकता कृत्रिम व नकली सौंदर्याचे कौतुक करण्यात गुंग होऊन गेलेली ! बोलपट-गृहाच्या काळो-खात पडद्यावर दिसणाऱ्या प्रचंड वादळाचे, रम्य चांदण्याचे किंवा गर्द वृक्ष-राजीचे कौतुक आम्ही भरपूर करू—पण बोलपट गृहातून बाहेर पडल्याबरोबर पाऊस येत असेल तर आम्ही कपडे सावरून, पावसाचा एकही थेंब अंगावर येणार नाही अशा बेताने आणि रस्त्यावरून वाहणारे नदीनाले चुकवीत लवकर

घराच्या आडोशाला जाण्याचा प्रयत्न करू. आणि घरच्या उवेत पावसात भिजून चिंब होणाऱ्या वसंतसेना व चारुदत्ताची चित्रे नजरेसमोर आणू, अशी आमची रसिकता.

निसर्गाच्या भव्यतेचा आणि सौंदर्याचा आम्हांला प्रत्यय येत असेल तर तो केवळ अपघाताने. पंचपंच उषःकाली सृष्टीत जे नवचैतन्य निर्माण झालेले असते आणि निसर्गाने जो अपूर्व सौंदर्याचा साज चढविलेला असतो त्याची वर्णने काव्यातून आणि कादंबऱ्यांतून मी अनेकदा वाचली असतील. ती त्या त्या वेळीं मला फार आवडलीही होती. पण प्रत्यक्ष उषःकालची सृष्टिशोभा पाहण्याचा योग मात्र प्रवासात आला. तोही गाडीत गर्दी खूप होती आणि झोपायला जागा नव्हती म्हणून. आम्ही त्यावेळी मुंबईला चाल्लो होतो. कसेबसे दाटीदाटीने आम्ही दोघेही खिडकीजवळ बसलो होतो. झोप न मिळाल्याने डोळे जड झाले होते. आणि प्रवासातील गप्पांची शिदोरी केव्हाच सरून गेल्याने आम्ही दोघेही बाहेर पाहत होतो. कसारा घाटातून त्या वेळी गाडी चालली होती. अर्धवट काळोखात आणि अर्धवट धुक्यात पर्वताच्या एकामागून एक रांगा मोठ्या भव्य दिसत होत्या. इतक्यात पूर्वेच्या क्षितिजावर प्रकाशरेषा दिसू लागली—हळूहळू अरुण रंगाने तो सर्व भाग माखून निघाला—क्षितिजाच्या जवळपास रेंगाळणाऱ्या ढगांचे रंग पटापट बदलू लागले— जणू एखादा चित्रकार आपल्या चित्रासाठी निरनिराळ्या रंगांची मिश्रणेच तयार करीत होता. आणि हळूहळू क्षितिजाच्या आडून काही चोरटे किरण वर आले, अरुण रंगाचे रूपान्तर पटापट-पिवळसर रंगात होऊ लागले, आणि सूर्याची एक तांबडीलाल कडा क्षितिजावर दिसू लागली. हळूहळू आमच्या डोळ्यादेखत सूर्य वरवर येऊ लागला. क्षणभर क्षितिजाच्या कडेवर ते लालभडक सूर्यबिंब टेकले आणि त्याने आपला प्रवास सुरू केला. जरा वर जाते न जाते तोच तेथे रेंगाळणाऱ्या एका ढगाचे पांघरूण त्याने घेतले. सारा मेघ तेजाने न्हाऊन निघाला—त्याला जणू चंदेरी झालर लावल्याचा भास होऊ लागला. हा सर्व देखावा आम्ही मुग्ध होऊन पाहत होतो. ‘ काय सुंदर देखावा आहे ! ’ असे उद्गार हा देखावा बघत असता कितीदा आमच्या तोंडून बाहेर पडत होते. असा देखावा दररोज दिसत असतो. या आनंदाला आपण आतापर्यंत मुकत होतो याची जाणीव आम्हांला झाली. पण याची फक्त जाणीवच झाली

त्यापलीकडे काही झाले नाही. त्यानंतर एकदाही सूर्योदयाचा किंवा सूर्यास्ताचा देखावा आम्ही रसिकतेने पाहिल्याचे आम्हांला स्मरत नाही.

चांदण्याचे सौंदर्यही अशाच अपरिहार्य रीतीने आमच्या नजरेला पडले होते. त्या दिवशी रात्री कॉलेजमध्ये नाटक होते. नाटक बारा वाजता संपले. बाहेर उभ्या असलेल्या बसेस अगोदर भरून गेल्या होत्या. आता दीड मैल चालत जाण्यावाचून गत्यंतर नव्हते. आम्ही सर्वजणांनी मनात कुरकुरत-चालत जाण्याचा निश्चय केला. आणि त्या वेळी बाहेर पसरलेल्या सृष्टिसौंदर्याची आम्हांला कल्पना आली. चांदणे अगदी टिपूर पडले होते, जिकडे तिकडे शुभ्र दुधाचा वर्षाव होत असल्याचा भास होत होता. पांढऱ्या शुभ्र तेजात चराचर सृष्टी न्हाऊन निघाली होती. अपूर्व सृष्टिशोभेने आम्ही अगदी मुग्ध होऊन गेलो. एखाद्या स्वप्नसृष्टीत विहार करावा असे आम्हांला रस्त्यावरून जाताना वाटू लागले. कुणाच्या तोंडून शब्द उमटत नव्हता. जो तो निसर्ग सौंदर्याच्या या अपूर्व विलासाचे निःशब्द कौतुक करीत होता. मला दत्तांच्या ‘ विश्वमित्रीच्या काठी ’ या कवितेची त्या वेळी आठवण झाली.

पाऊस बर्फाचा जणु पडतो
रजताचा जणु मेघ वितळतो
किंवा चंद्रमणी पाझरतो
न कळे काही। जिव वेडावुन हा जाई ॥

अशी अक्षरशः आमची स्थिती झाली. या मनःस्थितीत घर केव्हा आले हे कळलेही नाही. घर आल्याबरोबर स्वप्नसृष्टीतून एकदम जागे झाल्याप्रमाणे जागे होऊन अगदी अनिच्छेने आम्ही घरात प्रवेश केला.

निसर्गाशी समरस होण्याचे— त्याच्या सौंदर्याचा व भव्यतेचा आस्वाद घेण्याचे प्रसंग आमच्या जीवनात असे अपघातानेच येतात. निसर्गाच्या भव्य-तेचा साक्षात्कार त्या वेळी आम्हांला पटतो व त्याचा सतत आस्वाद घेण्याचा व त्याच्याशी समरस होताना—

“ दिव्यरसी विरणे जीव
जीवित हे त्याचे नाव ”

अशा वृत्तीचा अनुभव घेण्याचा पुन्हा पुन्हा आम्ही निश्चय करतो. पण व्यवहारी जीवनाच्या चाकोरीत सापडलो की ते सारे निश्चय विरून जातात

आणि रुपये-आणे-पै च्या नादावर मन धावू लागते.

आणि अशा रीतीने धावताना ते थकले व धापा टाकू लागले की या अपघाताच्या स्मृतीचा जो आनंद तोच आमच्या मनाचा खरा दिलासा !

आणि म्हणूनच पावसात चिंब भिजून परत येत असताना पावसात भिजल्याचा जो आनंद मी मिळविला आणि जो पुढील जीवनात स्मृतिरूप होऊन मला सततचे सौख्य देणार आहे, त्या आनंदापुढे वुलनचा कोट भिजल्याचे किंवा पुस्तके भिजून अगदी खराब झाल्याचे दुःख मी का मानावे ? या पार्थिव गोष्टी मी गमावल्या पण आनंदाचा केवढा ठेवा मी मिळविला ?

पण असे असले तरी पावसात भिजण्याच्या या आनंदाचा उपभोग घेण्यासाठी मी पावसात छत्री न घेता पुन्हा बाहेर पडेन काय ? नाव नको ! गोविंदाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे

"एकदाच अनुभव त्याचा
आरंभ अंत सौख्याचा ! एकदा ॥"

हे याही बाबतीत खरे असावे की काय कुणास ठाऊक ? काहीही असो—पावसात भिजण्याचा आनंद कितीही मोठा असला तरी पुन्हा मी पावसात भिजण्यासाठी बाहेर पडणार नाही हे खास ! कारण माझी प्रतिष्ठा, माझी व्यावहारिक दृष्टी, लोक काय म्हणतील याबद्दल वाटणारी भीती या सगळ्या गोष्टी मला मागे खेचतील; पण आजची पावसात भिजल्याची स्मृती मात्र घराच्या उबेत राहूनही मला पुनःप्रत्ययाचा आनंद देईल.

त्यासाठी मला वुलनच्या कोटाचे मूल्य द्यावे लागले तर मी कुरकुर का करावी ?

# १९

## न चुकणारी माणसें

**गो. वि. करंदीकर**

माझे बोलणे हे हरदासाच्या झग्यासारखे थोडे घळमळीत असते. भाषेच्या काठावर उभे राहून स्वतःचा तोल तासन्‌तास सावरीत बसणे हे मला सहसा साधत नाही. बोटांना माती न लावता दोन शब्दांच्या चिमटीने अर्थाचे सुवर्ण-कण तेवढे नेमके उचलणारांविषयी मला आदर वाटतो. पण तसाच प्रयत्न मी करू लागलो की हातात फक्त माती राहते आणि सुवर्णकण कुठे जातात ते कळत नाही. अर्थात घळमळीत भाषा वापरण्यात मी कुणालाच हार जाणार नाही. शिवाय ज्याची बुद्धी कृश आहे त्याला हा हरदासाचा झगा मोठा सोयिस्कर असतो! माझ्या शब्दांची उडी बहुधा वावभर इकडे किंवा वावभर तिकडे पडते. सामान्य माणसांची कल्पनाशक्ती लहान मुलाप्रमाणेच फार मोठी असल्यामुळे माझे शब्द त्यांच्या मनांत मावू शकतात; त्यांना अवघडल्यासारखे वाटत नाही; आणि मलाही ऐसपैस बसता येते. पण विद्वानांच्या समोर मला गोंधळल्यासारखे होते आणि आपल्याला भुतासारखे अदृश्य होता येत नाही याचे वाईट वाटते.

विशेषतः माझे विद्वान मित्र प्राध्यापक 'बिनचूक' (हे त्यांचे टोपणनाव आहे) धिमेपणाने आणि योजनापूर्वक आमच्या जिन्याची एक एक पायरी चढू लागले की माझे मनही त्या अलगर्जू जिन्याप्रमाणे डळमळू लागते. मी प्राध्यापकी ऐटीने मान ताठ करून बसतो खरा, पण आतून अगदी घाबरलेला असतो. बहुधा "शेवटी मी म्हणत होतो तेच झाले" किंवा "मी काल सांगितले तेंच खरे" अशी ठराविक नांदी म्हणत ते एखाद्या रविवारी उपस्थित होतात. त्यांच्या मुद्रेवर तोबातोबा गांभीर्य असते; आणि डोळ्यांमध्ये विजयाची झाक असते. "अहो, मी सांगितले तेच खरे" असे म्हणत ते सार्थ दृष्टीने व हनुवटी मागे खेचीत माझ्याकडे पाहतात. मी थोडासा भांबावून

त्यांनी पूर्वी काय सांगितले असावे याचा विचार करण्यात गुंतलेला असतो; पण त्या विपरीत मनःस्थितीत फार वेळ काढावा लागतो असे नाही. "अहो, त्या काव्याच्या प्रकाशनाचा दिनांक ७ जून १९१८; १९१९ नव्हे!" आम्ही केलेली चर्चा मला पुसटशी आठवते तरी पण काव्याचे नाव झटकन लक्षात न आल्याने मी विषय बदलण्याचा प्रयत्न करतो. "हां, त्या काव्याची तारीख ना? बरोबर ..पावसानं अगदी कहर केला बाबा. एका दिवसात काल दहा इंच पाऊस झाला!", "अहो, दहा इंच कसला अकरा इंच...वेधशाळेचा रिपोर्ट अकरा इंच आणि सात सेंट आहे." आवंढा गिळून मी सर्द मनाने ही आघाडी सोडून दुसऱ्या आघाडीवर पळ काढतो. "सौभाग्यवतींना नाही आणलंत...आता साडेतीनच्या लोकलनं आलात वाटतं?" "अहो, ती दोन तारखेपासून बंद झाली...मी आलो ही 'तीन सत्तेचाळीस'... हो, 'तीन सत्तेचाळीस.'" पण ते नुसते बोलून थांबत नाहीत. आपले म्हणणे बरोबर आहे हे पुराव्यानिशी शाबीत करण्यासाठी प्राध्यापकमहाशय आपल्या खिशातील वेळापत्रक शोधू लागतात; आणि या हवाबंद संभाषणातून बाहेर पडण्यासाठी सौभाग्यवतीला चहा टाकायला सांगून सुपारी आणण्याच्या निमित्ताने मी अदृश्य होतो. मी दहा मिनिटांनी उगवतो त्या वेळी चहा झालेला असतो. प्राध्यापक मजकुरांच्या हातांवर सुपारी ठेवल्याबरोबर कधीही न होणाऱ्या व्याख्यानाच्या निमित्ताने मी बाहेर पडतो. अशा वेळीं पत्नी डोळ्यांत प्राण आणून माझ्याकडे बघते; पण प्रत्येक माणसाला आत्मसंरक्षणाचा अधिकार आहे असे पुटपुटत मी निघून जातो—पार निघून जातो आणि पुन्हा चार तास घराचे तोंड पाहत नाही!

खरोखर या न चुकणाऱ्या माणसाइतका भयंकर मनुष्य उभ्या दुनियेत सापडणार नाही. मी स्वतः नरमांसभक्षक आदिमानवाला फारसा दुष्ट मानीत नाही. निरुपद्रवी व असहाय अशा अन्य प्राण्यावर ताव मारणारा सुसंस्कृत मनुष्य आणि उपद्रवी व संरक्षणक्षम अशा स्वजातींवर निर्वाह करणारा आदिमानव यांमध्ये विशेष फरक करणे म्हणजे स्वार्थी स्वयंकेंद्रित तत्त्वज्ञानाची परिसीमा आहे. आपल्याला ते मान्य नाही. पण या न चुकणाऱ्या माणसांची हिंसक वृत्ती काही अपूर्व असते. आपण बिनचूक आहोत याची जाणीव त्यांच्या प्रत्येक उच्चारातून व आचारातून प्रकट होत असते. त्यांच्या

स्वभावाची यथार्थ कल्पना करूनच त्यांच्याशी वागावे लागते. भोंगळ शब्दांनी त्यांचे मस्तक भडकते. अस्ताव्यस्त भाषेने त्यांचा अपमान होतो. प्रत्येक शब्दाची व्याख्या केल्याशिवाय ते आपल्याला पुढे पाऊल टाकू देणार नाहीत. आपण सर्व क्षेत्रात बिनचूक विचार करणारे आहोत याची त्यांना खात्री असते. 'मी चुकत नाही' हे ब्रिरुद मिरवीतच ते जगात प्रवेश करतात.

महाविद्यालये किंवा आश्रम यांची हवा त्यांना विशेष मानवते. पण नेह-नेहमीच ते सुशिक्षित असतात असेही नाही. ते जेव्हा बाजारात जातात तेव्हा बिनचूकपणे योग्य दुकानातच खरेदी करतात. ते खरेदी करतात तो माल मीच दर्जेदार असतो. त्यांचा न्हावीसुद्धा सगळयांहून जास्त कसबी असतो; आणि तो हुडकून काढण्यासाठी त्यांनी पद्धतशीर संशोधन केलेले असते. त्यांचा शिंपी सगळयांहून कापड कमी घेतो आणि सगळयांहून अधिक वक्तशीर असतो. त्यांचा गवळी आधी दुधात पाणीच घालीत नाही; घातलेच तर ते गाळून घालतो. त्यांची मुले शेजारच्या मुलांहून 'काही विशेष' असतात; आणि त्यांची शिस्त तर अन्यत्र कुठेच दिसण्यासारखी नसते. दुसऱ्या महा-युद्धाचा शेवट त्यांनी पूर्वी सांगितल्याप्रमाणेच घडलेला असतो; आणि त्या वेळी पहिल्या महायुद्धाच्या वेळी बरोबर ठरलेल्या त्यांच्या जुन्या अंदाजाची त्यांना आठवण होते. कोरियातील शस्त्रसंधीचे भविष्य त्यांनी पूर्वीच वर्तविलेले असते, बेरियाच्या अधःपातनाचे त्यांना आश्चर्य वाटत नाही, आणि अब्दुल्लाचेही शेवटी व्हायचे तेच झालेले असते! विनोबांच्या भूदानाला अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाले असे कोणी म्हटल्यास ते फक्त गालातल्या गालात हसतात. न चुकणारा मनुष्य हा सगळीकडेच 'बिनचूक' असतो. शेजारच्या बाळूकाकांना त्याने पूर्वी 'स्पष्ट' सांगितल्याप्रमाणे शेवटी हायकोर्टात अपयश येते; वामन-रावांचा खोकला अखेरीला भडभडे वैद्यांच्या औषधानेच साफ बरा होतो. एवढेच काय, पण सावित्रीबाईंची धडधडीत मंगळावर दिलेली मुलगी आपला अंदाज खरा करते की नाही याबद्दल त्यांना उत्कंठा लागलेली असते!

त्यांच्या बहुतेक वाक्यांचे अर्थदृष्ट्या दोन भाग पडतात; पहिल्या कर्तृपदाचा अर्थ 'माझे बरोबर आहे' असा असतो आणि कर्मपदामध्ये 'तुम्ही मूर्ख आहात' असा ध्वनी असतो. कर्मपदामध्ये समोर असलेल्या व्यक्तीच्या सामाजिक प्रतिष्ठेप्रमाणे थोडाफार फरक पडण्याची शक्यता नेहमीच असते; पण कर्तृपदाचा

अर्थ मात्र निरंतर एकच असतो; त्यामुळे सत्य आणि असत्य यांच्या मध्यावरील धुक्याच्या प्रदेशात वाट चुकण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधीच येत नाही. त्यांच्या मनात अस्पष्ट असे काहीच नसते. त्यांची भूमिती सरळ रेषेची असते. त्यांच्या सर्व आकृत्या एकाच पातळीत काढलेल्या असतात; आणि या बौद्धिक पातळीवर त्यांची नितांत श्रद्धा असते. आपल्याला पाय ठेवण्यासाठीच सबंध पृथ्वी परमेश्वराने आपल्या पायाखाली सरकवली असावी याबद्दल त्यांना संदेह नसतो आणि त्यामुळे त्यांची श्रद्धास्थाने अगदी अढळ राहतात.

न चुकणाऱ्या माणसांचे हे असे असते. आपल्या बुद्धीची झेप त्यांच्या पायथ्याशीसुद्धा पोचणारी नाही ही खात्री असल्यामुळे मी त्यांना टाळणेच पसंत करतो. त्यांच्या गाढ सान्निध्यात फक्त विदग्ध माणसेच जिवंत राहू शकतात. या भयंकर हिममानवापेक्षा हरघडी चुकणारी, चुकत चुकत उठणारी, पुन्हा पुन्हा धडपडणारी, आणि शेवटी एक दिवस चुकता चुकता कोलमडणारी दुबळी माणसे मला अधिक सत्य वाटतात. या सामान्य माणसांविषयी असा विलक्षण ओढा मला का वाटावा? त्या माणसांचे हेवेदावे, त्यांचे मानापमान, त्यांचे तंटेबखेडे हे तेवढे मला खरे का वाटावे? त्यांच्या माणुसकीवर चुकांचे शिक्कामोर्तब झालेले असते त्यांचा खोटेपणा आणि त्यांचा क्षुद्रपणा. त्यांच्या पदोपदी घडणाऱ्या चुका आणि त्या लपविण्याकरिता चाललेली केविलवाणी धडपड, त्या स्वतःला सुसह्य व्हाव्या म्हणून इतरांवर केलेले मिथ्यारोप आणि सर्वांच्या मुळाशी आणि शेवटी असलेले असमाधान—या सर्व गोष्टींमुळे ती माणसे मला माझी वाटतात. त्यांचे शब्द उर्मट असतात, पण नकली नसतात; त्यांचे वागणे गैरशिस्त असते, पण पोकळ नसते. ती रडतात त्या वेळी कळवळून रडतात आणि हसतात त्या वेळी त्यांचे शरीर खिदळल्यावाचून राहत नाही. ती दात दिसतील म्हणून तोंड उघडायचे टाळीत नाहीत. त्यांची संगत नेहमी सुखाची असते असे नाही; केव्हा केव्हा ती त्रासदायक ठरते—पण तेव्हाही ती जिवंत असते.

ही माणसे मला सह्य वाटतात याची कारणे नेहमी निर्मळ असतील असे मी म्हणत नाही. कदाचित माझे प्रतिबिंब पाहण्यातच मला आनंद वाटत असेल! मला स्वतःचा फोटो काढण्याची आणि तो टांगून ठेवण्याची विशेष आवड नाही; पण त्याच प्रवृत्तीचा हा छुपा प्रकार असणे असंभवनीय नाही. कदाचित

त्या माणसांच्या डोळ्यात पडणारे स्वतःचे प्रतिबिंब मला आवडत असेल. कदाचित त्यांच्या अपूर्णतेने माझी अपूर्णता मला अधिक सुसह्य होत असेल किंवा त्यांच्या अपयशाच्या आधाराने माझी आशा तोल सावरीत असेल. काय खरे असेल कुणाला ठाऊक; इथे तरी आपण ‘ बिनचूक ’ होण्याचा प्रयत्न काय म्हणून करावा ?

याचा अर्थ असा नव्हे की मला असल्या भोंगळ मंडळींविषयी आदर वाटतो ! आदर, पूज्यता, कृतज्ञता वगैरे तमाम मांगल्यसंवर्धक भावनांचे गाठोडे ‘ बिनचूक ’ माणसांच्या पायाशी ठेवायला मी नेहमी तयार असतो. त्यांच्या जुलमातून सुटण्यासाठी ही खंडणी भरीत राहणे आवश्यकच असते. आणि सामान्य माणसे आपल्या वाटेला जात नाहीत या गोष्टीचा त्यांनाही अभिमान असतो. या माणसांच्या तोंडात व्याख्या, डोक्यात ज्ञानकोश, आणि हातात फूटपट्टी असते. त्यांचे शब्द अर्थाचे बंद असतात. त्यांचा विचार सर्व संबंधित परिवार बरोबर घेऊन लवाजम्यासह मोठ्या समारंभाने प्रवेश करतो. त्यांनी प्रत्येक माणसाची लांबीरुंदी दशमान पद्धतीने मोजलेली असते. प्रत्येक विचाराचे स्वरूप निश्चित केलेले असते. त्यातील सर्व अंतर्विरोध नष्ट केलेला असतो. त्यांच्या सान्निध्यात माझ्या वैचारिक दुबळेपणाची मला पुरेपूर कल्पना येते.

माझा आजचा विचार उद्या कायम राहत नाही. कालच्या माणसाची ओळख आज पुन्हा करून घ्यावी लागते. आजचा ‘ मी ’ हा कालच्या ‘ मी ’ ला मानीत नाही. त्यामुळे सगळीकडेच ढिलेपणा येतो; अस्थिरता दिसते; फूटपट्टी घेऊन मापे काढीत फिरणाऱ्या पंडितांच्या कसबाचे मला कौतुक वाटते; त्यांच्या धैर्याचे आश्चर्य वाटते. जिवंत प्रवृत्तींची अगर माणसांची मापे कशी घेतात हे मला अजूनपर्यंत उमजलेले नाही. फूटपट्टी खाली ठेवून आकडा मांडीपर्यंत ती बदललेली असतात. एवढेच काय, पण पूर्वी काढलेली मापे पुन्हा तपासून पाहावयाचे ठरविले तर मध्यंतरीच्या काळात ती फूटपट्टीही थोडीफार झिजलेली असणे शक्य असते ! पण ‘ बिनचूक ’ माणसांना असल्या पोरकट संशयांची बाधा कधीही होत नाही. त्यांच्यापुढे असे काही बडबडण्याचे धैर्य न केलेले बरे. त्यांना खूष करावयाचे असेल तर प्रबंधासारखे काही तरी विराट कर्मच करावे लागेल ! आणि त्यातही चुका झाल्या म्हणजे सगळेच मुसळ केरात ! प्रबधलेखन हे प्रत्येक प्राध्यापकाचे सुखस्वप्न असते. माझेही मन

पुष्कळदा मोहात पडून या विचाराभोवती रुंजी घालते. पण माझ्या आसपासच्या 'न चुकणाऱ्या माणसां'ची आठवण झाली की मी लगेच शुद्धीवर येतो; आणि प्रबंधाकरिता घेतलेल्या कागदावर एखादी बोटभर कविता किंवा एखादा पोरकट लघुनिबंध लिहून आणखी एक आवढा गिळतो.

## परिचयात्मक टीपा

**विनोबा : ( १८९४ )**

विनायक नरहर ऊर्फ आचार्य विनोबा भावे. महात्मा गांधींचे पट्टशिष्य व भूदान आंदोलनाचे जनक म्हणून सारे जग त्यांना ओळखते. सर्वोदयी तत्त्वाचे ते उद्गाते आहेत. अत्यंत श्रेष्ठ तत्त्वचिंतक. त्यांचे निबंध ही त्यांनी वेळोवेळी दिलेली प्रवचनेच. त्यांच्या तत्त्वचिंतनशील वृत्तीतून स्फुरलेली ही प्रवचने त्यांच्या सखोल चिंतनाची, त्यांच्या कळकळीची आणि त्यांच्या ऋषितुल्य व्यक्तिमत्वाची साक्ष देतात. ही प्रवचने साने गुरुजी व त्यांच्या इतर शिष्यांनी वेळोवेळी उतरून घेतलेली आहेत. एका अर्थाने त्यांचे निबंध हे खरे 'वाङ्मय' आहे. 'मधुकर' या संग्रहातून निवडलेला हा उतारा त्यांच्या प्रसादपूर्ण शैलीची, आणि सखोल व्यक्तिमत्वाची साक्ष देईल. सहजता आणि प्रासादिकता या गुणांशी त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाचा झालेला मिलाफ़ मोठा रमणीय वाटेल.

**द. के. केळकर : ( १८९५ )**

मराठीमधील एक श्रेष्ठ विचारवंत. साहित्यशास्त्रावर ज्याप्रमाणे त्यांनी लेखन केले आहे त्याचप्रमाणे सामाजिक व शास्त्रीय विषयावरही त्यांनी लेखन केले आहे. दोन्ही तऱ्हेच्या लेखनात त्यांचा सखोल व्यासंग आणि तर्कशुद्ध विचार करण्याची पद्धती दिसून येते. 'काव्यालोचन' हा त्यांचा साहित्यविषयक ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची व मूलभूत दृष्टिकोनाची साक्ष पटवितो तर 'मराठी वाङ्मयाचे सिंहावलोकन' हा ग्रंथ त्यांच्या अभ्यासाची साक्ष देतो. 'संस्कृति-संगम' आणि 'उद्याची संस्कृती' हे दोन मौलिक ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. त्यांची निबंध-कार या दृष्टीने खरी ओळख होते ती 'वादळी वारे' या ग्रंथात. कोणत्याही

प्रश्नांचा सर्व बाजूने विचार करून त्या विषयावरील आपली मते तर्कशुद्ध रीतीने मांडण्याचे त्यांचे कौशल्य त्यांच्या निबंधातून दिसून येते. त्यांचा पिंड वैचारिक आहे व त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या निबंधवाङ्मयातून दिसून येते. 'स्वामित्वभावना विरुद्ध सौंदर्यकल्पना' यामध्ये त्यांचे पांडित्य तर दिसून येतेच पण त्याबरोबर विषयप्रतिपादनात एक प्रकारचा डौलही दिसून येतो. निबंधाची सुरुवातच त्यांनी लघुनिबंधाच्या ऐटीने केलेली आहे. आणि हळूहळू तो चिंतनात्मक होत गेला आहे. फुलपाखरू व टोळ या जोडीवरून ते स्वामित्व व सौंदर्यभावनेच्या व आजच्या जगाच्या विकृत संस्कृतीच्या विचाराकडे कसे वळतात हे पाहिले म्हणजे त्यांच्या चिंतनशील व्यक्तिमत्वाचा आविष्कार त्यांच्या निबंधातून कसा सहजतेने होतो हे लक्षात घेण्यासारखे आहे.

ग. त्र्यं. माडखोलकर : ( १८९९

नागपूर येथील 'तरुण भारता'चे विद्वान संपादक. मराठीतील नामवंत कादंबरीकार. संस्कृत, मराठी व इंग्रजी भाषेतील वाङ्मयाचा गाढ अभ्यास असल्याने त्यांच्या लेखनात पांडित्याचा डौल आहे. त्यांनी स्फुट लेखन बरेच केले. साहित्यविषयक लेखनात 'आधुनिक कविपंचक', 'माझे आवडते लेखक', 'वाङ्मयविहार', 'चिपळूणकर : काळ आणि कर्तृत्व', 'विलापिका' इत्यादी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'सांची येथील पाषाणपुरी' किंवा 'ध्येयवादी' सारखा त्यांचा निबंध त्यांच्या एका निराळ्याच पैलूची साक्ष देतो. त्यांच्या प्रबंधात्मक लेखनात पांडित्य आणि चिकित्सक दृष्टी आहे तर 'ध्येयवादी' सारख्या लेखनात त्यांचे विचारशील व्यक्तिमत्व आहे.

डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे : (१९०४)

आजच्या विचारवंत निबंधलेखकांतील आघाडीवरील लेखक. निबंध हा वैचारिक असावयास हवा व निबंधरचना आणि राष्ट्ररचना यांचा अन्योन्य जिव्हाळ्याचा संबंध आहे अशी त्यांची दृढ विचारसरणी. विज्ञाननिष्ठा व लोकशाही हे त्यांच्या आवडीचे विषय. 'स्वभावरेखन' हा त्यांचा साहित्यावरील सर्वमान्य प्रबंध. पण साहित्यापेक्षा सामाजिक व राजकीय विषयांवरच त्यांचे लेखन अधिक झाले आहे. त्यात त्यांची व्युत्पन्न बुद्धिमत्ता जशी आढळते

तसा अभिनिवेशही आढळतो. त्यांची वाणी ओजस्वी आहे, विषयप्रतिपादनात स्वमतप्रतिपादनाची धार आहे आणि त्या सर्वांमागे अन्यायाने जळणारे व तडफडणारे मत आहे. त्यामुळे त्यांच्या टीकेत जितके सत्य असते तितके सामर्थ्य असते. किंबहुना सत्य असते म्हणूनच सामर्थ्य असते. 'जीवनातील करार' या सारखा निबंध, किंवा 'माझे चिंतन' 'राजविद्या' 'पराधीन सरस्वती' या त्यांच्या संग्रहातील कितीतरी निबंध याची साक्ष देतील. त्यांच्या व्यक्तित्वाचे अनेक रंग त्यातून उजळले आहेत. पण म्हणूनच पुष्कळदा तो एकांगीही झाला आहे.

**ना. सी. फडके : ( १८९४ )**

मराठीतील प्रसिद्ध कादंबरीकार, कथाकार, लघुनिबंधकार या नात्याने सर्वांना सुपरिचित. त्यांनी 'गुजगोष्टी' लिहून लघुनिबंधलेखनाचे दालन मराठीत उघडले व त्या दालनात स्वतः अमोल भर घातली. हसत खेळत, वाचकाला विश्वासात घेऊन आपले मत वाचकाच्या गळी उतरविण्याच्या त्यांच्या मोहक शैलीचा प्रत्यय त्यांच्या साहित्यविषयक अनेक प्रबंधातून आणि निबंधातून येतो. 'प्रतिभासाधन' या विधानाची साक्ष देईलच. 'कलेकरिता कला' हे त्यांचे आवडते मत. त्याचा प्रपंच अत्यंत खेळकर भाषेत 'अक्षर वाङ्मयाचे गुणविशेष' या निबंधामधून त्यांनी कसा केला आहे याचा निबंध वाचत असताना सहज प्रत्यय येईल. लालित्य आणि खेळकरपणा हे त्यांच्या शैलीचे विशेष. त्यांच्या सर्वच साहित्यातून या त्यांच्या शैलीचा प्रत्यय येतो. त्यातल्या त्यात त्यांच्या 'गुजगोष्टी'त हा प्रत्यय विशेषत्वाने येतो. त्यांचे साहित्यविषयक लेख ललितनिबंध व चर्चात्मक निबंध याच्या सीमारेषेवर विहार करीत असतात.

**प्र. के. अत्रे : ( १८९८ )**

नाटककार, पटकथालेखक, वृत्तपत्रकार, कवी इत्यादी अनेक पैलूत ज्यांचे व्यक्तिमत्व रंगून गेले आहे असे चतुरस्र लेखक. गंभीर विषयाचे जरी यांना वावडे नसले तरी यांचा स्थायी भाव विनोद. साहित्याच्या सर्वच क्षेत्रात विनोदाची भरपूर पखरण करणाऱ्या या लेखकाचा 'विनोदाचे तत्त्वज्ञान'

हा निबंध अभ्यासण्यासारखा आहे. गंभीर आणि हास्य यांच्या छटा परस्परात मिसळून गेल्याने या निबंधाची गुंफण दुहेरी झाली आहे. मनुष्य हा हसणारा प्राणी आहे–हास्य ही जीवनातील एक मूलभूत प्रवृत्ती आहे हे सांगताना अनेक विनोदी प्रसंगांची गंभीर समस्येला दिलेली फोडणी मोठी रोचक वाटते. अत्रे यांची मिष्किल आणि खेळकर प्रवृत्ती सर्व निबंधात प्रतिबिंबित झाल्याचे दिसेल. प्रसंगी झुंझार वृत्तीने लिहिणारे अत्रे हास्यातून विसंगतीचे दर्शन घडवितात आणि वाचकांना अन्तर्मुख करतात. अत्रे यांचे व्यक्तित्व बहुरंगी आहे—राजकारणापासून साहित्यापर्यंत सर्वच व्यासपीठे त्यांनी गाजविली. व विडंबन काव्यापासून गंभीर करुण नाट्यापर्यंत सर्वच वाङ्मय प्रकारात त्यांनी संचार केला. निबंध हे त्यांच्या या स्वैर विहाराचे एक क्षेत्र.

**वि. स. खांडेकर : ( १८९८ )**

वि. स. खांडेकर यांनीही कथा, कांदबरी व लघुनिबंध या तीन क्षेत्रात अप्रतिहतपणे संचार करून त्या तीनही क्षेत्रात यश मिळविले. लघुनिबंध हे क्षेत्र त्यांच्या प्रतिभेला विशेष मानवले. स्वैर व उत्कट आत्माविष्कार हा त्यांच्या लघुनिबंधाचा गाभा आहे. क्वचित तो अलंकाराच्या हव्यासामुळे किंवा तत्त्वप्रतिपादनाच्या आवडीमुळे कृत्रिम होतो. पण त्यांच्या साहित्याच्या इतर क्षेत्राइतकी कृत्रिमता त्यांच्या लघुनिबंधाला आली नाही. लघुनिबंधाची स्वैर व तरल प्रकृती त्यांच्या प्रतिभेला मानवली व त्यामुळे त्या क्षेत्रात त्यांना विशेष यश लाभले. ‘ वायुलहरी ’ पासून ‘ मंजधारा ’ पर्यंत त्यांचे लघुनिबंधसंग्रह त्याच्या बहुश्रुत, चिंतनशील पण तितक्याच रसिक मनाची साक्ष देतात. सुरवातीला अलंकारांच्या व कोट्यांच्या आहारी गेल्याने त्यांच्या लघुनिबंधात कृत्रिमता आली. ती नंतर नंतरच्या लघुनिबंध संग्रहातून खूपच कमी झाली.

साहित्यावर त्यांनी पुष्कळच लिहिले. ‘जीवनाकरिता कला’ हा त्यांचा पक्ष. यामुळे त्यांच्या विवेचनात त्यांच्या भूमिकेचे प्रतिपादन, समर्थन व अभिनिवेश येणे अपरिहार्य आहे. पण ‘ गंधर्वकन्ये काय बोलू ? ’ हा त्यांचा रसग्रहणपर निबंध अगदी निराळा आहे. रसग्राही टीकेचाच केवळ हा उत्कृष्ट नमुना आहे असे नाही, पण त्यांच्या व्यक्तिगत आठवणींचे अनेक रंग त्यात कौशल्याने मिसळले आहेत. त्यामुळे त्यांच्या या निबंधाला परंपरागत पुस्तक परीक्षणापेक्षा

निर्मितिक्षम टीकेचे स्वरूप आले आहे.

वा. ल. कुलकर्णी : ( १९१२ )

मराठीतील एक नाणावलेले टीकाकार. साहित्याच्या मूलभूत प्रवृत्तींचा अभ्यास करून त्याचे चिकित्सक दृष्टीने विश्लेषण करण्याचा त्यांच्या लेखन-प्रकृतीचा गुणधर्म. हे विश्लेषण कधी विघातक असत नाही. त्यातील सौंदर्याचा वेध घेत व त्यातील शाश्वत मूल्ये निश्चित करीत त्यांचे हे विश्लेषण मराठी साहित्यातील नव्या नव्या प्रवृत्तींचा व नव्या नव्या प्रवाहांचा शोध घेत असते. नव्यातील अनिष्टाकडेही त्यांची डोळेझाक होत नाही. मुख्य म्हणजे त्यांची साहित्यविषयक समीक्षा चिंतनातून व जिज्ञासेतून निर्माण झाली आहे. एका नम्र अभ्यासकाच्या भूमिकेवरून त्यांचा साहित्यशोध सुरू असतो. इतर टीकाकारांप्रमाणे त्यांची आग्रही भूमिका कधीच नसते. आणि विशेष म्हणजे त्यांचा साहित्यविषयक प्रत्येक लेख म्हणजे त्यांचें प्रगट चिंतन असते. 'डायरीतील पाने' 'ऐतिहासिक कादंबरीच्या निमित्ताने' इत्यादी त्यांच्या लेखाची शीर्षके हेच स्पष्ट करतात. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक लेखामागे वा. ल. दिसतात आणि त्यांची ठाम भूमिका दिसते. सत्य, सौजन्य आणि सौंदर्य हा लेख याच वृत्तीची साक्ष देईल. जिज्ञासू वृत्ती, साहित्याबद्दल वाटणारे विलक्षण प्रेम आणि अभ्यासातून स्फुरलेले चिंतन यामुळे वा. लं. चा प्रत्येक लेख काही नवी दृष्टी देतो.

दुर्गा भागवत : ( १९१४ )

मराठी साहित्यात ललित लेखाला निराळे वळण लावणाऱ्या दुर्गा भागवत 'ऋतुचक्र' मुळे सर्वांच्या परिचयाच्या झाल्या आहेत. निसर्ग आणि लेखिका यांच्या अभिन्नतेचे स्वरूप त्यांच्या ऋतुचक्रातील प्रत्येक लेखात दिसून येते. काव्यात्म वृत्ती, चिंतनशीलता व समाजशास्त्राचा गाढ व्यासंग यामुळे त्यांच्या लेखनाला निराळेच रंगरूप आले आहे. त्या सर्वांत 'व्यासचक्र' ही त्यांची महत्त्वाची कलाकृती. महाभारतातील व्यक्तींचे आजवर अनेकांनी विश्लेषण केले आहे. पण 'व्यासचक्रा' मध्ये दुर्गा भागवत यांनी घडविलेले निरनिराळ्या व्यक्तींचे दर्शन काही आगळेच आहे. त्यात दुर्गा भागवत यांच्या व्यक्तिमत्वाचे

विविध रंग मिसळलेले आहेत. ‘ कोंडलेले क्षितिज ’ मधील अश्वत्थामा तर त्याची साक्ष देईलच. पण त्यानी रंगविलेल्या ‘ द्रौपदी ’, ‘ कर्ण ’ यांच्या व्यक्तिरेखा त्यांच्या या सामर्थ्याची साक्ष पटवितात. व्यक्तिचित्रणाची कला कशी निराळ्याच दिशेने वाटचाल करीत आहे याची साक्ष हा लेख वाचताना आपणाला पटते.

**वि. द. घाटे : ( १८९५ )**

विठ्ठलराव घाटे आज अनेक नात्यांनी आपणाला परिचित आहेत. ते शिक्षणतज्ञ आहेत, कवी आहेत, नाटककार आहेत. पण आज घाट्यांचे नाव निघाल्याबरोबर आपणासमोर उभी राहतात ती ‘ काही म्हातारे व एक म्हातारी ’, ‘ पांढरे केस व हिरवी मने ’ ही त्यांची शब्दचित्रात्मक पुस्तके. त्यामधील प्रत्येक शब्दचित्र रेखीव तर आहेच पण त्यात विठ्ठलरावांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू मिसळले आहेत. किंबहुना विठ्ठलराव आहेत म्हणून त्या व्यक्ति आपणाला जिवंत व रसरसलेल्या वाटतात. ‘ नानी ’ हे त्यांच्या आईचे व्यक्तिचित्र ‘ दिवस असे होते ’ या त्यांच्या आत्मचरित्रातून घेतले आहे. त्यामध्ये विठ्ठलरावांच्या व्यक्तित्वाचा भावनात्मक आविष्कार पाहण्यासारखा आहे. ‘ नानी ’ तर आपणापुढे उभी राहते पण तिच्याबरोबर तिच्या दुःखाने तळमळणारे व व्याकुळ होणारे विठ्ठलरावही आपणाला दिसू लागतात. या शब्दचित्राला त्यामुळे एका गद्यकाव्याची उत्कटता व गोडी प्राप्त झाली आहे.

**न. वि. गाडगीळ : ( जन्म १८९६ )**

महाराष्ट्रातील कॉंग्रेसमधील ज्येष्ठ पुढारी. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मध्यवर्ती मंत्रिमंडळातील खाणी व वीज या खात्याचे मंत्री, पंजाबचे राज्यपाल, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू अशा अनेक नात्यांनी काकासाहेबांच्या बहुरंगी कार्याचा परिचय करून देता येईल. हाडाचे पुढारी, अभ्यासाचा कल अर्थशास्त्राकडे आणि वृत्तीने साहित्यिक अशा काकासाहेबांचे लेखन वाचत असताना एका अनुभवसंपन्न, बहुश्रुत व रसिक व्यक्तिमत्वाचा परिचय आपण करून घेत आहोत याची जाणीव सतत होत असते. त्यांचे पुष्कळसे स्फुट लेखन व प्रदीर्घ लेखन त्यांच्या अनुभवातूनच स्फुरले आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाला एक निराळीच गोडी आल्याचे आढळते. ‘ पथिक ’ हे त्यांचे आत्मचरित्र

किंवा 'लाल किल्ल्याच्या छायेत' हा आत्मवृत्तपर राजकारणाचा इतिहास त्यांच्या कार्याची व त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या निरनिराळ्या पैलूंची ओळख करून देतो. 'माझे समकालीन' सारख्या व्यक्तिचित्रणात्मक लेखनात हीच अनुभवसंपन्नता डोकावते. पण खरे काकासाहेब दिसतात ते त्यांच्या स्फुट निबंध (वा ललितनिबंध) वजा स्फुट लेखनातून. 'माझा येळकोट', 'पाव आणि मिसळ', 'अनगड मोती' इत्यादी त्यांच्या स्फुट निबंधांचे अनेक संग्रह वाचत असताना काकांचा मिष्किल स्वभाव, स्वतःच्या स्वभावदोषांचा हसत खेळत व प्रांजळपणे आविष्कार करण्याची दृष्टी आणि अनेक ठिकाणी आढळणारी काव्यात्मता अशा गुणांनी त्यांचे स्फुट लेख मोठे रोचक झाले आहेत. प्रवासाची त्यांना फार आवड. त्यामुळे प्रवास लेखनपर निबंधातही त्यांचे हे बहुविध व्यक्तित्व डोकावते. 'एक अपूर्व संध्या' यामध्ये या सर्व विशेषांचा प्रत्यय येईल. गोष्टीवेल्हाळपणा, निरनिराळ्या आठवणी, बहुश्रुतता, काव्यात्मत इत्यादी अनेक ढंग त्यांच्या या लेखनात आढळतील व त्यामागे दिसेल काकांचे संपन्न व्यक्तिमत्व. निसर्गवर्णन आज आगळेच रूप घेत आहे, त्याची चुणुक 'एक अपूर्व संध्या' मध्ये दिसेल. सृष्टीचे वस्तुनिष्ठ वर्णन आता मागे पडले. लेखकाच्या मनोधर्मांचे व भावनांचे रंग-रूप घेऊन निसर्ग आज आपणापुढे साकार होत आहे. याची साक्ष या लेखाने पटेल.

**रा. भि. जोशी : ( जन्म १९०३ )**

प्रवास करणे व त्याचा रस घेणे हा ज्यांचा छंद अशांपैकी रा. भि. जोशी हे एक नादी. ते इंग्रजीचे प्राध्यापक. उर्दू कथाकादंबऱ्यांचे अनुवादक आणि कथालेखक ही पण त्यांची साहित्यातील एक भूमिका. पण त्यांचे नाव मराठी साहित्यात स्थिर झाले आहे ते त्यांच्या प्रवास-वर्णनामुळे. 'वाटचाल' आणि 'मजल दरमजल' हे त्यांचे दोन प्रवासवर्णनपर लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत. प्रवासवर्णनाच्या वस्तुनिष्ठ दृष्टीला आत्मनिष्ठ दृष्टीची जोड देऊन त्यांना ललित निबंधाच्या पातळीवर आणण्याचे श्रेय बहुतांशी यांच्याकडेच जाते. प्रवासवर्णन किंवा स्थलवर्णन हे केवळ त्या प्रवासाच्या किंवा स्थलाच्या तपशीलाचे वर्णन असत नाही. त्यात लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे रंग भरले जातात आणि त्यामुळे ते वर्णन एक कलाकृती होऊ शकते याची मराठी रसिकांना त्यांनी जाणीव

करून दिली. त्यामुळे प्रवास किंवा स्थळ हे लेखकाच्या व्यक्तिमत्वाच्या आविष्काराचे साधन बनले. ‘शरावती’ या प्रवासवर्णनात आपणाला दिसतात रा. भि. जोशी, त्यांची काव्यात्मवृत्ती, त्यांचा भावनात्मक आविष्कार. त्या रंगामध्ये ‘शरावती’ कशी न्हाऊन निघाली आहे हे हा ललित लेख वाचताना सहज जाणवेल.

गंगाधर गाडगीळ : ( १९२३ )

‘नवकथाकार’ ‘म्हणून गंगाधर गाडगीळ यांचे नाव मराठी साहित्यात सर्वमान्य झाले आहे. कथानकाच्या व तंत्राच्या चाकोरीत अडकलेल्या मराठी कथेला नवे वळण आणि नवा आकार देण्याचा ज्या कथाकारांनी प्रयत्न केला त्यातील आघाडीवरील कथाकार म्हणून गाडगीळांचा उल्लेख करावा लागेल. नवकथा व ललित निबंध यांच्या सीमारेषा एकमेकांना भिडू लागल्या असल्याची जाणीव त्यांच्या ‘तलावातील चांदणे’, ‘बिनचेहेऱ्याची सायंकाळ’ अशासारख्या अनेक कथा वाचताना दिसून येते. कथेप्रमाणेच त्यांनी केलेले प्रवासवर्णन वैशिष्ट्यपूर्ण आहे. ‘गोपुरांच्या प्रदेशात’ व ‘सातासमुद्रापलीकडे’ या दोन्ही प्रवासवर्णनात नावीन्याची चमक दिसते. विशेषतः ‘उध्वस्त विजयनगर’ हा ‘गोपुरांच्या प्रदेशात’ मधील उतारा वाचत असताना त्या सर्व वर्णनावर लेखकाच्या विषण्ण व उद्विग्न मनःस्थितीची छाया किती दाट पसरली आहे याची कल्पन येते.

मं. वि. राजाध्यक्ष : ( १९१३ )

थोडेच पण फार चांगले व वैशिष्ट्यपूर्ण लेखन करणाऱ्या लेखकात मं. वि. राजाध्यक्ष यांची गणना करावयास हवी. ते इंग्रजीचे प्राध्यापक आहेत, उत्तम टीकाकार आहेत. पण त्याबरोबर मार्मिक विनोदी लेखनही ते करीत असतात. त्यांच्या विनोदाचे स्वरूप सोज्वळ आहे. त्यात कुणाला बोचकारे किंवा चिमटे आढळणार नाहीत. पण मानवी जीवनातील विसंगतीचे मार्मिक दर्शन त्यात आढळेल. त्याचप्रमाणे साहित्यात निर्माण होणाऱ्या आवर्तांची मार्मिक रीतीने केलेली चेष्टाही आढळेल. ‘आकाशभाषिते’ हा त्यांच्या नभोवाणीवरील भाषणांचा संग्रह आणि ‘खर्डेघाशी’ हा त्यांचा ललित लेखसंग्रह हे दोन त्यांचे

महत्त्वाचे ग्रंथ. ' पुस्तकांची दुःखे ' हा त्यांचा ' खडेंघाशी ' मधून घेतलेला विनोदी ललित निबंध त्यांच्या सोज्ज्वळ पण मार्मिक विनोद वृत्तीची साक्ष देईल

पु. ल. देशपांडे : ( १९१९ )

'हसविण्याचा माझ्या धंदा' अशी प्रतिज्ञा केलेले मराठीतील आजचे अग्रेसर विनोदी लेखक. आज ' विनोदी लेखक ' म्हणून जरी ते प्रामुख्याने ओळखले जात असले तरी त्यांच्या साहित्याचे इतरही अनेक पैलू तितकेच महत्त्वाचे आहेत. अंमलदार ',' तुझे आहे तुजपाशी ',' सुंदर मी होणार ' सारखी श्रेष्ठ नाट्यकृती, निर्माण करणारे पु. ल. ' अपूर्वाई ' व ' पूर्वरंग ' सारखी वैशिष्ट्यपूर्ण आणि आपल्या बहुरंगी व्यक्तिमत्वाने रंगलेली प्रवासवर्णने लिहिणारे पु. ल. आणि व्यक्ति आणि वल्ली आपल्या डोळ्यासमोर उभे करणारे पु. ल.-अशा कितीतरी स्वरूपात ते आपणापुढे उभे राहतात. ते एका अर्थाने खरोखरच साहित्यातील ' बहुरूपी ' आहेत. पण हे त्यांचे बहुरूपी व्यक्तिमत्व पाहत असताना ' विनोद ' हा त्यांच्या साहित्याचा स्थायीभाव आहे हेही सहज जाणवते. हा ' विनोद ' बहुरंगी आहे, बहुढंगी आहे. यामागे उपहास आहे, सहानुभूती आहे, कारुण्य आहे आणि चिंतनही आहे. आपल्या ढासळणाऱ्या जुन्या संस्कृतीचे अवशेष अनेकदा त्यांना अन्तर्मुख करतात तर साहित्यातील अनेक नव्या व अनाकलनीय प्रवृत्ती त्यांच्या उपहासवृत्तीला आव्हान देतात. ' नस्ती उठाठेव ' ' खोगीर भरती ', ' गोळाबेरीज ' इत्यादी त्यांचे विनोदी लेखसंग्रह त्यांच्या अनेक पैलूंची ओळख पटवितील. ' मी नाही विसरलो ' हा त्यापैकीच एक पैलू. शुद्ध विनोदाचा एक सुंदर नमुना.

अनंत काणेकर : ( १९०५ )

कथा, काव्य, नाटक, प्रवासवर्णन, लघुनिबंध या सर्वच क्षेत्रात यशस्वी रीतीने संचार करणारे अनंत काणेकर आपल्या प्रसन्न व खेळकर वृत्तीने सर्वांचे लक्ष वेधून घेतात. कवी आणि कथाकार या त्यांच्या भूमिका फार जुन्या. तरी त्यात ' चांदराती ' सारखी किंवा ' एकलेपणाची आग ' सारखी कविता किंवा ' काळी मेहुणी ' सारखी कथा आजही आपल्या मनाला ओढ लावते. प्रवास वर्णनात त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. पण लघुनिबंध हा त्यांचा

खास प्रांत. मराठी लघुनिबंधाच्या विकासाला ज्या तिघांनी प्रामुख्याने हातभार लावला त्या फडके, खांडेकर यांच्याबरोबर काणेकरांचे नावही प्रामुख्याने घेतले जाते. त्यांच्या लघुनिबंधाची जातच काही वेगळी आहे. परंपरागत मानलेली जी काही नीतितत्त्वे आहेत किंवा जे काही रूढ संकेत आहेत, त्यांची वय्यर्थता अगदी हसत खेळत व मार्मिक रीतीने ते पटवून देतात. त्यासाठीच त्यांनी आपल्या लघुनिबंधातून 'गणुकाका' निर्माण केला. परंपरागत मूल्यांचा व रूढ संकेताचा कैवार घेणारा गणुकाका आणि वैय्यर्थता पटविणारे लेखक यांची जुगलबंदी मोठी मार्मिक वाटते. काणेकरांच्या सिष्किल व्यक्तिमत्वाचे मोठे मार्मिक दर्शन त्यांच्या लघुनिबंधातून होते. क्षणभर ते वाचकांना अन्तर्मुख करतात.

भगवंत देशमुख : ( १९२२ )

मराठवाड्यातील श्रेष्ठ लेखक आणि आज कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधील मराठीचे प्रमुख. थोडेच पण फार चांगले लिहिणारे राजाध्यक्षांसारखे जे लेखक त्यांच्यातच भगवंत देशमुख यांची गणना करावयास हवी. प्रसन्न व खेळकर व्यक्तिमत्व व जीवनाकडे पाहण्याचा उमदा दृष्टिकोन यांचे प्रतिबिंब त्यांच्या लघुनिबंधात पडत असल्याने त्यांच्या लघुनिबंधांना वेगळेच आकर्षण प्राप्त झाले आहे. 'आलोक' हा त्यांचा लघुनिबंधसंग्रह त्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण वाटतो. याशिवाय त्यांनी संशोधनक्षेत्रात पुष्कळ महत्त्वाचे कार्य केले आहे.

म. ना. अदवंत : ( १९१४ )

लघुकथा, टीका व लघुनिबंध ही यांच्या साहित्याची प्रमुख अंगे. लघुकथा-लेखनात मध्यमवर्गीय जीवनाचे त्यानी केलेले चित्रण मोठे वेधक आहे. विशेषतः माध्यमिक शिक्षकांच्या जीवनात निर्माण झालेले प्रसंग व प्रश्न यांचे त्यांनी अतिशय जिव्हाळ्याने चित्रण केले आहे. त्याच बरोबर विनोदी कथांच्या दालनातही त्यांनी प्रवेश केला आहे. त्यांच्या लघुनिबंधांविषयी प्राचार्य म. वि फाटक म्हणतात, "प्रा. अदवंत हे लघुकथालेखक व रसिक समीक्षक म्हणून आजच्या तरुण पिढीसमोर असले तरी त्यांचा मनःपिंड शांत स्वभावाच्या लघुनिबंध-काराचा आहे. किंबहुना त्यांच्या आत्माविष्काराचे खरे माध्यम लघुनिबंध याच वाङ्मयप्रकारात आढळते." 'मनाचे संकल्प' व 'मनाची मुशाफरी' हे

त्यांचे दोन्ही लघुनिबंधसंग्रह वाचकासमोर आहेत. अदवंतांची भाषाशैली मोहक नाही किंवा अलंकारप्रचुर व काव्यात्मक नाही. तथापि तिला साधेपणाचे व सरळपणाचे वैशिष्ट्य आहे. प्रामाणिक मित्राच्या बहुश्रुत गप्पांचा आस्वाद एखाद्या तत्वाबरोबर घडण्याचा प्रत्यय त्यांच्या विविध लघुनिबंधातून येतो. ( रा. श्री. जोग गौरव ग्रंथ. )

गो. वि. करंदीकर : (१९१८)

मराठी कवितेला आशय व अनुभूती या दोन्ही दृष्टींनी अगदी नवे वळण देणाऱ्या विंदा करंदीकरांचे लघुनिबंध मराठी लघुनिबंधालाही अगदी वेगळे व आगळे रूप देताना दिसतात. कवी व तत्वज्ञ यांच्या मनाचा मोठा मोहक, गूढ व तरल आविष्कार त्यांच्या लघुनिबंधातून पाहावयास मिळतो. 'स्पर्शाची पालवी' आणि 'आकाशाचा अर्थ' हे त्यांचे दोन लघुनिबंध संग्रह. त्यांच्या कवितेने जसा मराठी काव्याला नवा अर्थ दिला व नवे रूप दिले तसेच त्यांचे लघुनिबंधही ठराविक पद्धतीच्या आविष्कारातून निर्माण होणाऱ्या लघुनिबंधांपेक्षा वेगळे वाटतात. कविमनाची झेप त्यात आढळते, अनुभूतीची तरलता आढळते आणि अज्ञाताचे गूढ उकलण्याची प्रज्ञेची असोशी आढळते. त्यात तरळत असते त्यांच्या आकर्षक व्यक्तिमत्वाचे क्षणात अवखळ होणारे, क्षणात गंभीर होणारे रम्य प्रतिबिंब. असा आहे करंदीकरांचा लघुनिबंध. नव्या वाटेने झेप घेणारा.

७१३२६
१७७५ निबंध
१५।१।६७
९४९३२

REFBK-0015132